मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

( ठाणे जिल्हा वाचनालय )    वाचनालय / संदर्भ / नौपाडा

इतिहास १२८ सन १८९५

लेखक · दत्तात्रय बळवंत पारसनीस

पुस्तक · मराठ्यांचे पराक्रम
बुंदेलखंड प्रकरण

वा. ह. १८/३

# मराठ्यांचे पराक्रम.

## बुंदेलखंड प्रकरण.

हें पुस्तक

दत्तात्रय बळवंत पारसनीस

ह्यांनीं लिहिलें,

तें

मुंबईंत,

'निर्णयसागर' छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

सन. १८९५.

प्रकाशकः—रामचंद्र आपाजी चितळे,

शुभसूचकचे चालक, सातारा.

कागदी बांधणी १। रुपया. कापडी बांधणी १॥ रुपया.

8

( ह्या पुस्तकासंबंधीं सर्व हक्क पुस्तककर्त्यांनीं सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें रजिस्टर करून आपणाकडे ठेविले आहेत )

"Here are men who fought in gallant actions
As gallantly as ever heroes fought,
But buried in the heap of such transactions
Their names are rarely found nor often sought."

—*Byron.*

संग्रामीं रणधीर वीर करिती तैशा करोनी कृती
हा! हा!! हे असती इथें पहुडले योद्धे प्रतापी किती
गेल्या कालवशें पराक्रमकथा त्याच्या विनाशाप्रती
होते कोण कुठील ते न उरली ह्याचीहि आतां स्मृती!

हें पुस्तक

स्वदेशाच्या इतिहासाविषयीं

अभिमान व प्रीति बाळगणाऱ्या

सर्व

देशबांधवांस

प्रेमपूर्वक

समर्पण केलें आहे.

ग्रंथकर्ता.

# प्रस्तावना.

इतिहासोत्तमादस्माज्जायन्ते कविबुद्धयः ।
पंचभ्य इव भूतेभ्यो लोकसंविधयस्त्रयः ॥ १ ॥
इतिहासप्रदीपेन मोहावरणघातिना ।
लोकगर्भगृहं कृत्स्नं यथावत् संप्रकाशितम् ॥ २ ॥

महाभारत

स्वदेशाच्या इतिहासापासून राष्ट्रास किती फायदे होतात हें आज निराळें सांगण्याची आवश्यकता राहिली नाहीं सांप्रत ज्ञानप्रसाराच्या योगानें आह्मास जी थोडीशी जागृतावस्था प्राप्त झाली आहे, तिच्यामुळें आमच्या पूर्व स्थितीचें आह्मास थोडें थोडें स्मरण होऊं लागून आमच्या प्रतापी पूर्वजांच्या कर्णप्रिय कथा व त्यांच्या अलौकिक कृति अवलोकन करण्याची इच्छा होऊं लागली आहे ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे आजपर्यंत ह्या विषयाची अभिरुचि आमच्या ठिकाणीं व्हावी तितकी उत्पन्न न झाल्यामुळें आमच्या देशाचा (विशेषत महाराष्ट्रीयांचा) खरा इतिहास प्रसिद्ध करण्याकडे एतद्देशीय विद्वानांचें लक्ष लागलें नव्हतें तथापि, महाराष्ट्रीयांचा परिचय असणाऱ्या ग्रांटडफ आणि स्कॉट वेरिंग ह्या दोन आंग्ल गृहस्थांनीं तो यथामति लिहिला आहे त्यामध्यें त्यांनीं पुष्कळ परिश्रम करून चांगली माहिती दिली आहे परंतु त्यांच्या देशभिन्नत्वामुळें, आचारभिन्नत्वामुळें व इतर कित्येक कारणांमुळें त्यांत बरेच दोष राहिले आहेत व तसें होणें साहजिकच आहे ह्या

परकीय लोकांनीं लिहिलेल्या इतिहासावरचें आजपर्यंत चालढकल चालली होती; परंतु अलीकडे निस्सीम स्वदेशाभिमानी व इतिहासभक्त कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर ह्यांनीं *महाराष्ट्रजनाच्या ठिकाणीं* स्वदेशाच्या इतिहासाचें महत्व उत्तम प्रकारें ठसविल्यामुळें एक दोन विद्वान् गृहस्थांस मराठ्याच्या इतिहासाचें खरें साधन ज्या ऐतिहासिक बखरी, पत्रें, यादी वगैरे, त्या जुन्या लोकाकडून मिळवून प्रकाशित करण्याची इच्छा उत्पन्न झाली त्याचें उत्तम फल 'काव्येतिहाससंग्रह' हें होय. ह्या संग्रहामध्यें ज्या बखरी व जे लेख प्रसिद्ध झाले आहेत, त्यांच्या योगानें महाराष्ट्राच्या इतिहासाचें बरेंच पुनरुज्जीवन झाल्यासारखें होऊन पुष्कळ लोकाच्या अंतःकरणांत आपल्या विक्रमशाली पूर्वजाविषयीं व त्यांच्या अलौकिक कृतींविषयीं अभिनंदनीय पूज्यबुद्धि उत्पन्न झाली आहे, व त्याना त्यांच्या रमणीय चरित्रकथा वाचण्याची बरीच गोडी लागली आहे ह्यांत शंका नाहीं. तथापि तेवढ्यानें महाराष्ट्राच्या इतिहासाची परिपूर्णता झाली असें समजून स्वस्थ बसणें योग्य होणार नाहीं

'काव्येतिहाससंग्रह'द्वारें महाराष्ट्राच्या खऱ्या इतिहासाची बरीच सामुग्री प्रसिद्ध झाली आहे, व तिच्या योगानें त्याची योग्यता अधिक व्यक्त झाली आहे तथापि ज्यांच्या योगानें बहुजनसमाजाची चित्तवृत्ति उल्लसित होऊन त्यांच्या अंतःकरणांत स्वदेशाभिमान व स्वदेशप्रीति ह्या दोन अमूल्य गुणाची स्फूर्ति होईल व आपल्या प्रतापी पूर्वजाच्या उत्तम गुणांचें अनुकरण करण्याची विशेष प्रेरणा होईल अशा प्रकारचे इतिहासग्रंथ अद्यापि प्रसिद्ध झाले नाहींत, एवढेंच नव्हे, तर अत्यंत दुःखाची गोष्ट ही कीं, महाराष्ट्राच्या इतिहासाचे कित्येक भाग अद्यापि अंधकारांत लोळत पडले आहेत! महाराष्ट्राचा इतिहास म्हणजे छत्रपतींच्या कारकीर्दी किंवा पेशव्यांनीं मारलेल्या दहापाच प्रसिद्ध लढाया एवढ्यांत समाविष्ट होत नसून तो सागरासारखा अत्यंत विस्तीर्ण आहे. ज्यांनीं आपल्या बाहुबलानें व बुद्धिकौशल्यानें स्वतंत्र राष्ट्र निर्माण केलें व शेंदोनशें वर्षें सर्व हिंदुस्थानावर साम्राज्य चालवून

स्वातन्त्र्याचा उपभोग घेतला त्यांचा इतिहास अत्यल्प कसा असेल? शास्त्रीबावांनीं 'निबंधमाले'मध्यें एके ठिकाणीं महाराष्ट्राच्या इतिहासाचें स्वरूप वर्णन करितांना तो कसा असला पाहिजे ह्याबद्दल पुढील उद्गार काढिले आहेत — "प्रथमारंभीं मराठे लोकाची स्थिति शिवाजीमहाराजांच्या पूर्वीं कशी होती, त्यांस पुढें जें एवढें वैभव प्राप्त झालें, त्यास कारणभूत असे त्याच्या अंगीं मुळचे गुण कोणते व कितपत होते, व वरील राज्यस्थापकानें त्यांचा विकास कोणते प्रकारानें केला, हिंदुधर्माची स्थिति त्या वेळेस कशी होती व तिनें यवनांच्या अपकर्षास कितपत साह्य केलें, इत्यादि गोष्टी मूळ उपोद्घातांत आल्या पाहिजेत नंतर मावळे लोकांचें वर्णन, शिवाजीचे सवंगडे तानाजी, बाजी, येसाजी यांचे वृत्तांत, शिवाजीचें शिक्षण, सैन्यव्यवस्थेचा व राज्यव्यवस्थेचा प्रकार, आरमारी फौजेची तयारी, अवरंगजेबाचा दरबार, मोंगलाचें लष्कर, भगवा झेंडा, रामदासाचा राजनीतिपर व धर्मपर उपदेश, तुकारामबोवाचें कीर्तन, वामनाचें पांडित्य व कवित्व, परभू लोकाचें शौर्य, इत्यादि गोष्टी शिवराजाच्या वृत्तातात दाखल झाल्या पाहिजेत नंतर संभाजीपासून शाहूपर्यंतच्या इतिहासात, सैन्यव्यवस्थेंत व राज्यव्यवस्थेंत झालेले फेर, कलुषाचें वर्चस्व, फिरग्याची सत्ता, बेगमसाहेबाची हकीकत व शाहूचें आपल्या शत्रूच्या घरीं वाढणें, चित्पावनांची पूर्वस्थिति व उत्कर्ष, ब्राह्मणाच्या व मराठ्याच्या झटापटी, बाळाजीचें चातुर्य व वक्तृत्व, त्याचे दोघे वच्चे याज्ञिकीच्या किंवा कारकुनीच्या कामांत फार तर वाकबगार व्हावयाचे ते हानिबाल व हासड्रुबल यांसारखे महावीर बनून शत्रूचे काळ कसे होऊन राहिले तो प्रकार, दोघा भावाची परस्पर प्रीति, मस्तानी व समशेरबहादूर, शूद्र अधिपतींचा अभ्युदय, महाराष्ट्रांतील जातिभेदजन्य वैमनस्य मोडून सर्वांचा कट करण्याविषयीं पेशव्याचा कटाक्ष, शाहूच्या गळ्यातील केवळ ताईत बनून गेल्यामुळें त्यानें अंतकाळीं सर्व राज्याधिकाराचें त्यास केलेलें समर्पण, इत्यादि गोष्टींचा या दुसऱ्या भागात अंतर्भाव झाला पाहिजे यापुढें तर मराठ्याचा इतिहास ह्मणजे साऱ्या हिंदुस्थानचाच इतिहास,

का कीं चारी मुलखांत त्याचे सत्ताधारी कायम होऊन राहिले तेव्हां नदीचें पात्र रुंदावत जातां जाता समुद्रसंगमाच्या स्थानीं जसें अफाट होऊन सागराशीं एकात्मक होऊन जातें, त्याप्रमाणें वरील काळाच्या इतिहासात अवघ्या भारतवर्षांच्या इतिहासाचा अंतर्भाव होतो ' यापुढें छत्रपतींचें किंवा पेशव्यांचें घराणें हें मागील सूत्र सुटून शिंदे, होळकर, गायकवाड, भोंसले, पवार, बुंदेले, पटवर्धन इत्यादि शाखाच्या पृथक् विस्तारांत शिरावें लागतें तेव्हां या सर्वांचें यथातथ्य वर्णन म्हटलें म्हणजे पुन' वरच्यासारखा प्रत्येकाचा अवांतर परिवार झाला " अशा तऱ्हेचा जेव्हा आमच्या देशाचा इतिहास प्रसिद्ध होईल तेव्हांच तो महाराष्ट्राचा खरा इतिहास ह्या संज्ञेस पात्र होईल

वर सांगितलेल्या नमुन्याचा इतिहास लिहिणें हें अत्यंत महत्वाचें व बिकट काम आहे तें करण्याचें चांगले बुद्धिवान्, लेखनकुशल, व इतिहासशास्त्रनिपुण अशा विद्वानांनींच मनावर घेतलें पाहिजे व त्यास साहित्यही उत्तम प्रकारचें मिळालें पाहिजे तसा प्रसंग ज्या वेळीं येईल त्या वेळीं आमचा भाग्योदय झाला असेंच म्हटलें पाहिजे (लिहिण्यास अत्यंत आनंद वाटतो कीं, विद्वन्मुकुटमणि नामदार न्यायमूर्ति रा व महादेव गोविंद रानडे ह्यानीं अशा प्रकारचा महाराष्ट्राचा इतिहास लिहिण्याचें मनावर घेतलें आहे व त्यांच्या अमोलिक ग्रथानें महाराष्ट्रावर अत्यंत उपकार होणार आहेत ) अशा प्रकारचे इतिहासग्रथ तयार करण्याकडे आमच्या महाराष्ट्रीय विद्वज्जनांचें लक्ष लागेल तितकें उत्तमच आहे परंतु त्याच्या अभावीं ज्यांस ह्या विषयाची अभिरुचि आहे, त्यानीं स्वस्थ न बसतां यथाशक्ति प्रयत्न करून जुने ऐतिहासिक लेख, जुन्या बखरी, जुने कागदपत्र हीं मिळविणें व त्याच्या आधारानें अप्रसिद्ध इतिहास लोकापुढें आणणें व तद्वारें कालाचीं कृतत पटलें वसून जीं रत्नें स्मरणांतून नाहींशीं होत चाललीं आहेत, त्याच्या पराक्रमगुणांचें प्रकाशन करणें हें एक अवश्य कर्तव्य होय असें आमचें मत आहे कारण, अशा रीतीनें महाराष्ट्राच्या इतिहासाशीं ज्यांचा संबंध आहे अशा सर्व मुत्सद्याच्या व सरदाराच्या घराण्याचे वृत्तांत, व इतर सर्व

राजकीय घडामोडींच्या सविस्तर हकीकती ह्या प्रसिद्ध झाल्यावांचून महाराष्ट्राचा इतिहास संपूर्ण झाला असें मानतां यावयाचें नाहीं

मराठ्यांच्या इतिहासातील जीं कांहीं प्रकरणें अद्यापि अनुपलब्ध आहेत, त्यांत तंजावरच्या राजघराण्याचा इतिहास व बुंदेलखंडांतील मराठी राज्यसत्तेचा इतिहास हीं दोन प्रकरणें मुख्य होत. सूक्ष्म दृष्टीनें पाहू गेलें तर मराठी राज्यसत्तेचा उगम कर्नाटकांत तंजावर प्रांतीं झाला व तिची एक शाखा महाराष्ट्रांत येऊन ती तेथील देशस्थिति व कित्येक नैसर्गिक गोष्टी ह्यांच्या योगानें बळावत जाऊन इतकी विस्तीर्ण झाली कीं तिच्या योगानें सर्व भरतखंड व्याप्त होऊन तिचा एक अत्युच्च झेंडा सर्व बुंदेलखंड आक्रमण करून हिमालयापर्यंत जाऊन पोहोंचला परंतु दुःखाची गोष्ट ही कीं, महाराष्ट्राच्या इतिहासामध्यें मराठ्यांच्या राज्यसत्तेचा हा मूळारंभींचा भाग व अगदीं शिखरास पोहोंचलेला भाग हे दोन्ही एकसारखेच अनुपलब्ध राहिले आहेत त्यापैकीं पहिल्या भागाचें स्मरण होण्यास मद्रास येथें गेल्या वर्षी झालेली राष्ट्रीय सभा व तन्निमित्तानें तंजावर प्रांतांत झालेला प्रवास हीं विशेष कारण झालीं व त्यास वर निर्दिष्ट केलेल्या विद्वान् गृहस्थाचा 'मराठ्यांच्या इतिहासांतील एक अप्रसिद्ध भाग' ("An unwritten chapter of Maratha History") ह्या नांवानें प्रसिद्ध झालेल्या पुणें सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकांतील एका लेखानें विशेष प्रोत्साहन मिळालें त्यामुळें तंजावरचा इतिहास ज्ञात करून घेण्याची जिज्ञासा विशेष उत्पन्न झाली व सुदैवानें तत्प्रीत्यर्थ केलेल्या प्रयत्नास चांगलें यश येऊन त्याचे कांहीं लेख 'केसरी' वर्तमानपत्रांत प्रसिद्धही झाले आहेत व लवकरच तो मनोरम इतिहास साकल्येंकरून प्रसिद्ध होईल

दुसरें प्रकरण, बुंदेलखंडांतील मराठ्यांची राज्यसत्ता हें होय कालचक्राच्या विचित्र गतीनें ज्याप्रमाणें तंजावरचीं व महाराष्ट्राचीं स्नेहसूत्रे अगदीं विलुप्त झालीं आहेत, त्याप्रमाणें बुंदेलखंडांतील मराठ्यांचीही तशीच स्थिति झाली आहे तेथें मराठ्यांनीं अनेक लढाया मारल्या, पराक्रम गाजविले; राज्यें संस्थापित केलीं; स्वातंत्र्याचा व वैभवाचा उपभोग

घेतला; परंतु त्यांची आजमितीस कालचक्राच्या फेऱ्यामुळें आह्मास नुसती ओळखही राहिली नाहीं! ज्या बाजीराव पेशव्यांनीं आपल्या अतुल शौर्याचा सर्व महाराष्ट्रभरच नव्हे, पण बुंदेलखडभर दिव्य प्रकाश पाडून तेथील छत्रसाल नामक वीर्यशाली क्षत्रिय भूपतीस यवनांच्या त्रासातून मुक्त केलें व

संत एव सतां नित्यमापदुद्धरणक्षमाः ।
गजानां पंकमग्नानां गजा एव धुरंधराः ॥ १ ॥

ह्या वचनाची परिपूर्णता करून दाखविली, आणि त्या राजाकडून तीस चाळीस लक्षांचा मुलूख संपादन करून तेथें मराठ्याचा विजयध्वज अखंड फडकत ठेविला, आणि महाराष्ट्राचा व बुंदेलखंडाचा एकजीव करून सोडला, त्यांचे चरित्र उपलब्ध असावें आणि मराठ्यास आश्रय देण्याऱ्या छत्रसाल राजाची बिलकुल माहिती नसावी ही किती शोचनीय गोष्ट आहे ? त्याचप्रमाणें बाजीरावसाहेबांजवळ शागिर्दपेशाची नौकरी करून केवळ आपल्या अलौकिक गुणानीं त्यांचें मन प्रसन्न करून तीस चाळीस लक्षाच्या प्रांताची सुभेदारी संपादन करणारे व परक्या देशात राहून तेथील 'एक सो दुडी न एक बुंदेलखंडी'* अशा प्रमत्त लोकास अगदीं जेर करून सोडणारे समशेरबहादूर गोविंदपंत बुंदेले ह्यांचा व त्याच्या घराण्याचा इतिहास महाराष्ट्रीयांस स्वीडननॉर्वेच्या इतिहासा इतका अनवगत असावा काय ? ज्या पुरुषानीं महाराष्ट्रराज्यसत्तेच्या अभिवृद्धीकरिता आपल्या जिवाकडे न पाहता अनंत कष्ट सोशिले, ज्यांनीं आपलें बाहुबळ व बुद्धिबळ त्यात सर्वस्वीं खर्चीं घातलें, ज्यांनीं अनेक पराक्रमाचीं कामें करून पंतप्रधानाकडून शाबासकी मिळविली; एवढेंच नव्हे, तर शिवाजीनें उभारलेल्या हिंदुपदपातशाहीच्या भव्य मंदिरावर स्वातंत्र्याचा दिव्य

* बुंदेलखंडचे लोक किती प्रमत्त आहेत त्याचें दर्शक ही ह्मण आहे. हिचा अर्थ दिल्लीचे शभर लोक आणि बुंदेलखंडचा एक मनुष्य ह्यांची बरोबरी होणार नाहीं असा आहे.

कळस बसविण्याकरितां दिल्लीपदावर असंख्य महाराष्ट्र वीरांसमवेत निघालेल्या भाऊसाहेबाच्या जरीपटक्याच्या संरक्षणार्थ ज्यांनीं आपल्या प्राणाच्या आहुति दिल्या, त्यांची व त्यांच्या वंशजाची आह्मास नाममात्रही ओळख असू नये ही अत्यंत शोचनीय गोष्ट होय. रणशूर गोविंदपंत बुंदेले ह्यांचा पानिपतच्या घनघोर संग्रामांत वध झाला तरी त्याच्या वंशजांनीं बुंदेलखंडांत मराठ्याची राज्यसत्ता कायम ठेवण्याबद्दल अटोकाट प्रयत्न केले, परंतु दुर्दैवानें वक्रदृष्टि केल्यामुळें ते विफल झाले व कालचक्राच्या कुटिलत्वानें ती सत्ताही नष्ट झाली तथापि आजमितीस तिचा एक अल्प अंश कायम असून तो महाराष्ट्रीयानीं तिकडे अनेक मर्दुमक्या केल्या त्यांची अद्यापि साक्ष देत आहे व त्यांचे वंशज त्या प्रांतात वास करीत आहेत परंतु केवळ इतिहासाच्या अज्ञानामुळें त्यांची ओळख विसरली गेली आहे !

परंतु आता विद्याप्रसाराच्या योगानें आपल्या राष्ट्रामध्यें सुधारणेचा प्रकाश हळू हळू चमकू लागला आहे व सर्व हिंदुस्थान देशातील विभिन्न लोकांचे पूर्वापार संबंध लक्षात घेऊन स्वदेशप्रेमाचीं सूत्रें दृढ करण्याचा व परस्पर संघट्टनाचे मार्ग वाढविण्याचा प्रसंग सांप्रत आला आहे. तेव्हां अशा वेळीं आमच्या पूर्वस्थितीची यथायोग्य माहिती आह्मास असणें अगदीं अवश्य आहे व तशा प्रकारची माहिती आमच्या पूर्वजाच्या इतिहासावांचून कशानेंही होणार नाहीं परंतु आजपर्यंत त्या इतिहासाची आह्मीं विशेष पर्वा न केल्यामुळें त्याचा मागमूसही सध्या नाहींसा होत चालला आहे ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे अर्थात् महाराष्ट्राच्या इतिहासाची जर अशी शोचनीय स्थिति आहे, तर बुंदेलखंड, तंजावर, ओरिसा वगैरे प्रांतांतील मराठ्याच्या इतिहासाची किती शोकप्रद स्थिति असली पाहिजे ह्याची वाचकांनींच कल्पना करावी असो अशी जरी स्थिति आहे तरी काहीं चमत्कारिक योग घडून आल्यामुळें बुंदेलखंडांतील महाराष्ट्रीय नररत्नाची ओळख करून देण्याचा आह्मास आज सुप्रसंग प्राप्त झाला ह्याबद्दल आनंद प्रदर्शित केल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं.

ज्या वेळीं झांशीच्या राणीसाहेबांची माहिती मिळविण्याचा आह्मीं प्रयत्न केला त्या वेळीं प्रथमतः गोविंदपताचें नाव आह्मास विशेष श्रुत झालें. महाराष्ट्राच्या इतिहासांत बुंदेलखंड प्रकरणासंबधानें विशेष माहिती नसल्यामुळें झांशीचें नांव देखील विशेष माहीत असण्याचें कारण नाहीं; परंतु सन १८५७ च्या बडामध्यें तेथील अद्वितीय स्त्रीरत्नाच्या योगानें तें महाराष्ट्रीयासच काय, पण सर्व जगास माहीत झालें आहे. झांशीच्या मराठी घराण्याची विशेष माहिती नसल्यामुळें तेथील रणशूर अबला ही गोविंदपताच्या घराण्यातील होती असा तोंपर्यंत लोकाचा समज होता.* तथापि जेव्हां झांशीच्या राजघराण्याची आह्मास काहीं माहिती मिळाली, तेव्हा झांशीचे सुभेदार व गोविंदपत बुंदेले ह्यांचीं घराणीं अगदीं भिन्न भिन्न आहेत असें दिसून आलें. परंतु त्या वेळीं तत्संबधानें आह्मास विशेष माहिती मिळाली नसल्यामुळें गोविंदपताच्या घराण्याचा इतिहास समजण्याची आमची उत्कंठा तशीच अतृप्त राहिली.

नंतर चालू वर्षाच्या (सन १८९५) एप्रिल महिन्यात दुसऱ्या एका महत्वाच्या ऐतिहासिक ग्रंथाकरितां माहिती मिळविण्यासाठीं उत्तर हिंदुस्थानांत व बुंदेलखंडात प्रवास करण्याचा आह्मास प्रसंग आला. त्या वेळीं आह्मास त्या प्रांतांतील कित्येक महाराष्ट्रीय मित्रमंडळीच्या व गोविंदपंत बुंदेल्यांच्या वंशातील राजपुरुषाच्या भेटीचा लाभ झाला. त्या समयीं गोविंदपताची बरीच माहिती उपलब्ध होऊन सागर, जालवण वगैरे ठिकाणचीं राजघराणीं हीं त्यांच्याच वंशजांपैकीं असून, झांशी जिल्ह्यातील गुलसराई नावाचें लहानसें संस्थान अद्यापि त्याच्या वंशजां-कडे चालू आहे असें कळलें. तदनंतर आमचे प्रियमित्र व गुलसराई घराण्यांतले राजपुरुष श्रीमंत रावबहादूर माधवराव जयराम खेर बी. ए., डेप्युटी कलेक्टर बांदा, ह्यांची व राजेबहादुर केशवराव दिन-कर ह्यांचे चिरंजीव श्रीमंत कृष्णराव व रघुनाथराव ह्यांची व आमची भेट झाली, त्याचप्रमाणें सागरचे सुभेदार श्रीमंत गणपतराव व श्रीमंत शंक-रराव ह्यांच्याही भेटी झाल्या. तेव्हां त्यांस आपल्या रणशूर पूर्वजाची

---

* काव्येतिहाससंग्रह— पेशव्याची बखर, २८ व्या पृष्ठावरील टीप पहा.

जुनी माहिती प्रसिद्ध करून महाराष्ट्रीय लोकांवर उपकार करावेत अशी आह्मीं विनति केली; तिचा त्यांनीं प्रेमपूर्वक स्वीकार करून बरीच माहिती व जुने कागदपत्र पाठवून दिले ही अत्यंत संतोषाची गोष्ट आहे

गोविंदपंत बुंदेले हे बुंदेलखंडात 'पंत साहेब' ह्या नावानें प्रसिद्ध असून त्यांचें नांव ज्याप्रमाणें सर्वप्रिय आहे, त्याप्रमाणें बाजीरावांस तिसरा पुत्र कल्पून त्यास आपला राज्यविभाग देणारा महोदार राजा छत्रसाल ह्याचीही कीर्ति तिकडे विशेष दुमदुमत आहे, एवढेंच नव्हे, तर पन्ना, चरखारी, बिजावर, अजयगड, सरिला, बेरी, लुगासी, जिगनी वगैरे ठिकाणीं त्याचे वंशज आजमितीस राज्योपभोग घेत आहेत. तेव्हां त्या परम विख्यात छत्रसाल राजाचीही माहिती मिळवावी अशी इच्छा झाली त्याप्रमाणें पांच सहा महिने अंतःकरणपूर्वक प्रयत्न करून बरीच माहिती मिळविली, तों छत्रसाल राजा व महाराष्ट्रभूषण छत्रपति श्रीशिवाजी हे समकालीन असून त्यांच्या चरित्रांत विशेष साम्य दिसून आलें, एवढेंच नव्हे, तर छत्रसाल राजास नवीन राज्य संस्थापित करण्याचे कामीं प्रोत्साहन देण्यास शिवाजी महाराजच कारण झाले, असें पाहून बुंदेलखंडाच्या इतिहासाविषयीं आह्मास विशेष आदरबुद्धि वाटू लागली. ह्मणून ह्या पुस्तकाच्या प्रारंभीं बुंदेलखंडाचा प्राचीन इतिहास संक्षेपेंकरून देऊन बुंदेले लोक व राजा छत्रसाल ह्याची मिळाली तितकी माहिती दिली आहे

प्रकृत विषय हा स्वतंत्र इतिहासाच्या रूपानें न लिहिता केवळ मिळालेले ऐतिहासिक कागदपत्र, बखरी, इंग्रजी ग्रंथ व मुसलमानी इतिहास ह्यांच्या आधारानें बुंदेलखंडातील मराठ्यांच्या इतिहासाची ओळख होण्याकरिता एक स्वतंत्र लिहिलेलें टिपणच आहे असें ह्मटलें तरी चालेल ह्याचें कारण तसा विस्तृत इतिहास लिहिण्या इतकी माहिती अद्यापि उपलब्ध नाहीं त्यामुळें मिळाली तेवढी माहिती संकलित करून प्रसिद्ध केली आहे

ह्यामध्यें मुख्यत्वेंकरून श्रीमंत बाजीरावसाहेब पेशव्यानीं व गोविंदपंत बुंदेल्यानीं बुंदेलखंडामध्यें जे पराक्रम गाजविले व तेथें जी

मराठ्यांची राज्यसत्ता स्थापन केली तिचा संक्षिप्त वृत्तात आहे, ह्मणून ह्या पुस्तकास स्थूलमानानें 'मराठ्याचे पराक्रम' असें नाव दिलें आहे मराठ्यांच्या इतिहासातील हें प्रकरण अगदींच अपरिचित व अप्रसिद्ध असल्यामुळें ह्या संबधानें जेवढी काहीं कागदपत्राची व इंग्रजी लेखांची माहिती मिळाली तेवढ्यांचा उपयोग करून तें सुबोध रीतीनें महाराष्ट्र वाचकास सादर केलें आहे त्यात माहितीच्या कमतरतेमुळें कांहीं दोष असण्याचा संभव आहे, तथापि बुंदेलखडांतील झांशी, गुलसराई, जालवण, सागर, जैसिनगर, रहेली वगैरे ठिकाणचे आमचे स्वदेशाभिमानी व इतिहासप्रिय महाराष्ट्रीय बंधु ह्या संबधानें आह्मास भरपूर माहिती देऊन हा इतिहास निर्दोष व संपूर्ण करण्याबद्दल आह्मास योग्य मदत करतील अशी सबळ आशा आहे प्रकृतचें पुस्तक हें केवळ त्या इतिहासाची दिशा दाखविण्याच्याच उद्देशानें लिहिलें आहे हें येथें सांगणें अवश्य आहे

ह्या पुस्तकाचें श्रेय लिहिणारापेक्षा ती माहिती मिळवून देणाराकडे अधिक आहे असें प्रांजलपणानें ह्मटल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं त्यांत मुख्यत' **श्रीमंत सीतारामराव नानासाहेब** संस्थान **गुलसराई** ह्यांनीं मोठ्या आनंदानें संस्थानच्या दप्तरातील अनेक अस्सल कागदपत्र देण्याची मेहरबानी केली व आपल्या पराक्रमी पूर्वजांचा इतिहास प्रसिद्ध करण्याचे कामीं आह्मास अत्युत्तम साह्य केलें, ह्याबद्दल त्याचे आमच्यावरच काय, परतु सर्व महाराष्ट्राच्या इतिहासावर फार उपकार झाले आहेत त्यांच्या सारख्या रसिक, इतिहासप्रिय व स्वदेशाभिमानी अशा इतर संस्थानिकांनीं आपापल्या घराण्याचा इतिहास प्रसिद्ध करण्याचें मनावर घेतलें तर पुष्कळ कार्य होण्यासारखें आहे श्रीमंत नानासाहेब ह्यांच्या खालोखाल त्यांचे बंधु श्रीमंत कृष्णराव साहेब व पुतणे श्रीमंत रावबहादूर माधवराव साहेब बी ए, ह्यांनीं व सागरचे सुभेदार श्रीमंत गणपतराव व शंकरराव ह्यानींही प्रेमपुरस्सर साह्य केलें, तेव्हां त्याचेही फार उपकार मानणें अवश्य आहे श्रीमंत शंकरराव सुभेदार ह्यानीं, सागरच्या सुप्रसिद्ध **लघाटे** घराण्यातील

रा रामचंद्र कृष्ण लघाटे ह्यानीं स्वतःच्या माहितीनें व दसरांतल्या अस्सल कागदपत्रांच्या आधारानें सागरचे राजे श्रीमंत बळवंतराव रघुनाथ ह्याच्या आज्ञेवरून लिहिलेली 'गोविंदपंत बुंदेल्याची कैफीयत' रा रा. धुंडिराज केशव लघाटे ह्याचेकडून पाठवून दिली, तिचा आह्मास विशेष उपयोग झाला ह्याबद्दल रा रा धुंडिराज केशव ह्यांचेही आह्मी फार आभारीं आहोंत

ह्याखेरीज क्याप्टन पॉग्सन, कर्नल स्लीमन, क्याप्टन फ्रांक्लिन, इत्यादिकांनीं लिहिलेल्या व इतर अनेक इंग्रजी ग्रंथांचा, चरखारी संस्थानच्या राजेसाहेबाकरिता लिहिलेल्या त्यांच्या घराण्याच्या वृत्तांताचा व काव्येतिहाससंग्रह वगैरे अनेक पुस्तकाचा आह्मास फार उपयोग झाला हेंही येथें सांगितल्यावाचून आमच्यानें राहवत नाहीं

ही माहिती देणाराची व ग्रंथाची गोष्ट झाली त्याचप्रमाणें हें पुस्तक वाचण्याची मेहरबानी करून ज्यांनीं योग्य सूचना केल्या असे आमचे विद्वान् व रसिक मित्र रा सा. रावजी भवानराव पावगी बी ए, ह्याचे आमच्यावर फार उपकार आहेत, हें कृतज्ञ अंतःकरणानें येथें व्यक्त केल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं तसेंच ज्या 'निर्णयसागर छापखान्यात हें पुस्तक छापलें गेलें त्याचे मालक रा. रा तुकाराम जावजी ह्यानी तें सुबक रीतीनें लवकर छापून देण्याची तजवीज केली तेव्हां त्याचेही आभार मानणें इष्ट आहे. त्याचप्रमाणें मि० विश्राम लक्ष्मण कोरगांवकर ह्यांनीं प्रुफें तपासण्याचे कामी काळजी घेतली हेंही येथें आभारपूर्वक व्यक्त करणें अवश्य आहे

असो शेवटीं ज्या महाराष्ट्रभाषाभिज्ञ, इतिहासप्रिय व रसिक वाचकानीं आमची पहिली अल्प कृति (झाशीच्या महाराणीसाहेबांचें चरित्र) गोड मानून आह्मांस अत्यंत आभारी केलें त्यांच्या कृपेस हीही अत्यल्प सेवा पात्र होवो अशी जगन्नियंत्याजवळ प्रार्थना आहे, ती तो पूर्ण करो

मुंबई,
ता. २० डिसेंबर १८९५.

**दत्तात्रय बळवंत पारसनीस.**

# अनुक्रमणिका.


| भाग. | | पृष्ठ. |
|---|---|---|
| १ | बुंदेलखंड—देशस्वरूप व प्राचीन इतिहास... ... | १ |
| २ | राजा छत्रसाल. ... ... ... ... ... | २६ |
| ३ | मराठ्यांची बुंदेलखंडावर स्वारी.... .. .. | ५० |
| ४ | बुंदेलखंडांत मराठी राज्याची संस्थापना, सुभेदार गोविंदपंत बुंदेले. . . ... | ८१ |
| ५ | पानिपतची लढाई आणि गोविंदपंत बुंदेल्याचा वध. | ११२ |
| ६ | बाळाजी गोविंद व गंगाधर गोविंद ह्यांच्या कारकीर्दी. | १४५ |
| ७ | बाळाजी गोविंद व गंगाधर गोविंद ह्यांचा मृत्यु, आणि बुंदेलखंडातील धडामोडी. . | १८३ |
| ८ | बुंदेलखंडातील मराठी राज्यसत्तेचा ऱ्हास. . | २०३ |
| ९ | गुलसराई संस्थान. .. ... .. .. | २३७ |
| | परिशिष्ट अ गोविंदपंत बुंदेल्याचा वंशवृक्ष. .. | २५९ |
| | परिशिष्ट ब गुलसराईवाले खेर ह्यांचा वंशवृक्ष. .. | २६० |

# मराठ्यांचें पराक्रम.

## भाग १ ला.

### बुंदेलखंड—देशस्वरूप व प्राचीन इतिहास.

उत्तर हिंदुस्थानामध्यें विंध्याद्रीच्या उत्तरेस व यमुना नदीच्या दक्षिणेस जो सृष्टिसौंदर्यालंकृत वर्तुलाकृति रमणीय प्रदेश आहे, त्यास बुंदेलखंड किंवा भारतवर्षाचें केंद्रस्थान असें ह्मणतात. उत्तरेकडून वाहत जाणारा यमुनेचा प्रचंड प्रवाह, पश्चिम बाजूनें मंद मंद वाहणारी चमेली अथवा चंबळा नदी, दक्षिणेस मध्यप्रांतांतील जबलपूर, सागर हे सुपीक जिल्हे, आणि बघेलखंडातील रत्नांच्या खाणींनीं परिपूर्ण असलेलें सुप्रसिद्ध रेवा संस्थान, व पूर्वेस आपल्या विविध रूपांनीं सुशोभित करणारी व विशेषतः चित्रकूट, मिरझापूर वगैरे ठिकाणीं विशाल स्वरूप भासविणारी विंध्यपर्वतावलि ही बुंदेलखंडाची मर्यादा होय. ह्या प्रदेशामध्यें सांप्रत हमीरपूर, जालवण, झांशी, ललितपूर आणि बांदा ह्या पांच जिल्ह्यांचा, ओरछा अथवा टेहेरी, दतिया आणि समथर ह्या तीन संस्थानांचा, आणि चरखारी, छत्रपूर, पन्ना, बिजावर, अजयगड इत्यादि मांडलिक राज्यें, व अष्टगढी अथवा अष्टभाई आणि तदितर लहान लहान जहागिरी इतक्यांचा समावेश होतो. यमुना व चंबळा ह्या दोन नद्यांखेरीज

बढवा, धसान, पहुज, तस आणि केन इत्यादि अनेक नद्या ह्या प्राता-तून वाहत जातात. त्यांच्या विपुल जलानें सर्व प्रदेशास विशेष सुपीकता आली आहे. ह्या प्रांतामध्यें कालिंजर, अजयगड, जैतपूर, झांशी, काल्पी इत्यादि अनेक इतिहासप्रसिद्ध किल्ले, महोबा, खजुराह वगैरे ठिकाणचीं प्राक्कालीन देवालयें आणि शिलालेख; बरवासागर, मदन-सागर, किरातसागर, कचनेया, पचवारा इत्यादि प्रचड सरोवरें, पन्ना, चरखारी वगैरे संस्थानातील हिऱ्याच्या खाणी आदिकरून अनेक रमणीय गोष्टी असल्यामुळें सृष्टिसौंदर्यविलासी जनांस हा प्रदेश अत्यत आनददायक होऊन राहिला आहे.

ह्या प्रांताचा प्राचीन इतिहास मुख्यत्वेंकरून दंतकथा, प्राचीन शिलालेख आणि मुसलमान इतिहासकाराचे ग्रथ ह्यांच्या आधारानें काहींसा उपलब्ध झाला आहे. तथापि त्यात मतभेद व वादग्रस्त गोष्टी पुष्कळ असल्यामुळें त्या सबधानें साधार व निश्चित अशी माहिती मिळणें कठिण आहे. परपरेनें चालत आलेल्या दतकथावरून बुंदेलखडामध्यें अगदीं प्राचीन कालीं पश्चिम भागातून आलेल्या गोंड लोकांनीं वसाहत केली असें दिसून येतें. गोंड लोकांच्या मागून परिहार व काती वगैरे जातींचे लोक झांशी वगैरे प्रातात वसाहत करून राहिले होते, आणि त्यांच्या मागून, मुसलमान लोकाचा अमल होईपर्यंत चंडेल नामक रजपुतांची राज्यसत्ता पुष्कळ वर्षें चालली होती, असें तत्कालीन पुराव्यावरून सिद्ध होतं. कलिंजर आणि अजयगड येथील प्रचड किल्ले, खजुराह व महोबा येथील भव्य देवालयें आणि हमीरपूर जिल्ह्यातील अद्यापि अस्तित्वात असलेले कित्येक मोठमोठे कालवे हे चंडेल राज्यसत्तेची उत्तम साक्ष देतात. चंडल राजाच्या कारकीर्दीमध्यें बुंदेलखंडामध्यें अनुपम वैभव वास करीत असून उत्तरेकडून मुसलमानी राज्यसत्तेचा असह्य महौघ येईतोंपर्यंत त्यास बिलकूल क्षय लागला नव्हता. परतु पुढें

मुसलमानाच्या जबरदस्त हल्ल्यांनीं चंडेल राज्यसत्ता अगदीं क्षीण होऊन गेली, व ती दिल्लीच्या सार्वभौमाची अंकित होऊन राहिली. तदनंतर कालचक्राच्या विचित्र गतीमुळें लवकरच बुंदेलखंडामध्यें महाराष्ट्रांतील परमप्रतापी नरवीर छत्रपति श्रीशिवाजी महाराजाप्रमाणें छत्रसाल राजा उदय पावून त्यानें स्वराज्य स्थापन केलें. ह्याच छत्रसाल राजाच्या कारकीर्दीमध्यें महाराष्ट्रीयांचा बुंदेलखंडांत प्रवेश होऊन तेथें त्यांनीं आपल्या अतुल पराक्रमानें मराठी साम्राज्याची एक शाखा संस्थापित केली, आणि महाराष्ट्रीयांची कीर्ति बुंदेलखंडा-मध्यें सतत गाजत ठेविली. परंतु मध्यंतरीं सर्वच पारडें फिरलें जाऊन तेथें आंग्ल राज्यसत्ता स्थापन झाली. व सांप्रत तिच्याच कृपेनें बुंदेलखंडांतील प्राचीन बुंदेले आपल्या शेषवैभवाचा उपभोग घेत आहेत. ह्या सर्व राज्यक्रांतीचा इतिहास जरी महत्वाचा आहे तरी विशेषतः बुंदेलखंडांतील मराठी राज्यसत्तेच्या इतिहासाचें आह्मास विस्तृत विवेचन करावयाचें असल्यामुळें त्या सर्वांचें साद्यंत कथन येथें करितां येणार नाहीं. तथापि त्याचें अल्प दिग्दर्शन केलें असतां हा अपरिचित विषय महाराष्ट्रीय जनास बराच मनोरंजक होईल अशी आशा आहे.

बुंदेलखंड हा प्रदेश अगदीं प्राचीन कालापासून प्रसिद्ध आहे, असें रोमन भूशास्त्रवेत्त्याच्या वर्णनावरून सिद्ध होतें. टॉलेमी नामक महाविख्यात संशोधकानें आपला सर्वमान्य भूगोलग्रंथ इ०स० १२१ च्या सुमारास समाप्त केला, त्यांत त्यानें बुंदेलखंडांतील अनेक स्थलाचा नामनिर्देश केला आहे. त्यांत कलिंजर ह्यास 'कानागोरा' असें नांव देऊन तें 'प्रसिक'(Prasiake) राज्यामध्यें यमुनेच्या दक्षि-णेस आहे असें लिहिलें आहे. त्याचप्रमाणें त्यानें इतर अनेक गांवाचा व नद्यांचा उल्लेख करून ह्या प्रदेशास 'कंद्रावती' (Kandravati) असें नांव दिलें आहे. ह्या प्रदेशावर प्राचीन काळीं गुप्त राजाचा

अंमल होता, असें त्याच्या इतिहासावरून व नरवरच्या नाग राजांच्या वेळच्या नाण्यावरून व्यक्त होतें. विष्णुपुराणामध्यें "नऊ नाग राजे पद्मावती, कांतिपुरी ह्या ठिकाणीं, व मगध देशाचे गुप्त राजे गंगेच्या काठीं प्रयागापर्यंत आणि साकेत व मगध देशावर राज्य करतील" ह्मणून लिहिलें आहे, त्यावरून जनरल कनिंगहाम साहेबांनीं असा शोध लाविला आहे कीं, पद्मावती ही ग्वाल्हेरजवळील नरवर नामक प्राचीन नगरी होय. तेथील नाग राजाचा अंमल यमुना, नर्मदा, चंबळा व केन ह्या नद्यांनीं वेष्टिलेल्या १८०० चौरस मैल प्रांतावर होता असें नरवर येथें सापडलेल्या अनेक प्राचीन ताम्रपटावरून व नाण्यावरून दिसून येतें. शिवाय गणपति नाग हा समुद्रगुप्ताचा एक मांडलिक होता अशाबद्दल प्रयाग येथील प्राचीन स्तंभावर उल्लेख केलेला आहे, व ह्या जुन्या नाण्यामध्येंही त्याचेंच नाव अनेक वेळा आलें आहे. त्याअर्थी अप्रत्यक्ष रीतीनें बुंदेलखंडावर गुप्त घराण्याची सार्वभौम सत्ता होती असें स्थूल मानानें ह्मटलें तरी चालेल. इ०स० २२५ च्या सुमारास नाग राजाचा अस्त झाल्यानंतर कच्छवाह राजाचा ह्या प्रांतावर अंमल सुरू झाला. ग्वाल्हेरजवळ एक प्रचंड मूर्ति सापडली आहे, तिच्यावरील कोरींव लेखामध्यें भुपाल (भोपाळ) आणि बुंदेलखंड ह्या प्रांतावर तोरमन राजाचें राज्य आहे असें ध्वनित केले आहे. ह्याच तोरमन राजानें गुप्त राजांपैकीं शेवटचा राजा बुद्ध गुप्त ह्यास इ० स० २४३ ह्या वर्षांच्या सुमारास पदच्युत केलें असावें असें दिसतें. हा राजा पूर्वीं तदागत गुप्त राजाचा सेनापति असून केवळ स्वपराक्रमाच्या जोरानें पुढें स्वतंत्र झाला व त्यानें नवीन कच्छवाह घराणें स्थापित केलें. परंतु तिसऱ्या शतकापासून तो आठव्या शतकापर्यंत बुंदेलखंडाचा संगतवार इतिहास मिळत नाहीं. नाग राजाच्या मागून तोरमन राजांचा वंश ग्वाल्हेर व बुंदेलखंड वगैरे प्रांतांवर राज्य करीत होता

असें अनेक पुराव्यांवरून दिसून येतें. पुढें चिनी प्रवासी ह्यूएन्त्संग हा सातव्या शतकाच्या मध्यभागीं कनोजचा राजा हर्षवर्धन ह्याच्या कारकीर्दीत ह्या प्रांतात आला होता, त्या वेळीं यमुना व नर्मदा ह्या दोन नद्यांच्या मधला सर्व मुलूख ह्या राजानें पादाक्रांत केला होता असें त्यानें लिहिलें आहे. मुसलमान इतिहासकाराच्या माहितीवरून असें दिसतें कीं, हर्षवर्धन राजाच्या मृत्यूनतर हिंदुस्थानामध्यें धर्म-संबधी अनेक जुलूम व परिवर्तनें झालीं व ह्याच वेळीं सर्व हिंदुस्था-नाच्या इतिहासांत गाजलेलीं रजपुत लोकांचीं घराणीं उत्पन्न झालीं. महोबा व खजुराह येथील चंडेल राजे व नरवर आणि ग्वाल्हेर येथील कच्छवाह राजे ह्यांचा उदय ह्याच समयीं झाला ह्यात शंका नाहीं, तथापि त्याचा साधार इतिहास अद्यापि उपलब्ध नाही.

नवव्या शतकापासून बुंदेलखडातील चंडेल राजाची बरीच विश्वसनीय माहिती मिळते. छत्रपूर संस्थानातील खजुराह नामक प्राचीन गावीं लालजीच्या देवालयामध्यें संवत् १०५६ ( इ० स० ९९९ ) सालचा कोरींव लेख सापडला आहे, त्यावरून बुंदेलखं-डातील धांग नामक चंडेल राजाचा काल संवत् ११७३ ( इ० स० १११६ ) हा सिद्ध होतो. तत्संबधाचा उल्लेख जयवर्मादेव ह्या राजानें केला असून त्यात राजा धांग ह्यानें काशी, कोसल, सिंहल, आन्ध्र, अंग्र, राध इत्यादि देशातील राजास व त्याच्या राण्यास कैद करून आपल्या बंदीखान्यांत ठेविलें होतें, असा त्याचा पराक्रम वर्णन केला आहे. मऊ येथें असाच दुसरा एक कोरींव लेख सापडला आहे. त्यांत ह्या धांग राजापासून मदनवर्मा राजापर्यंत नऊ राज-पुरुषाची व त्याच्या दिवाणाची मालिका दिली आहे. ती येणेंप्रमाणें:— धांग, विद्याधर, विजयपाल, कीर्तिवर्मा, पहिला सुलक्षण, जयवर्मा, दुसरा सुलक्षण, पृथ्वीवर्मा, आणि मदनवर्मा. ह्यावरून मदनवर्मा हाच चंडेल घराण्यातील बुंदेलखंडावर स्वतंत्र रीतीनें राज्य करणारा

शेवट्चा हुजा होय. ह्या मदनवर्म्यासंबधानें राजदेवानें तयार केलेल्या एका शिलालेखामध्यें, 'विद्वन्मुकुटमणि, राजराजेंद्र, लक्ष्मीपति कलिंजराधिप, मदनवर्मा' असें ह्मटलें आहे. ह्या सर्व चंडेल राजाच्या कारकीर्दी अत्यंत महत्वाच्या झाल्या असल्या पाहिजेत, पण त्याची माहिती उपलब्ध नाहीं, ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे. मदनवर्म्याच्या मागून दुसरा कीर्तिवर्मा व परमाराध्यदेव असे दोन राजे गादीवर बसले. व त्यांच्या कारकीर्दीत चंडेल राज्यसत्तेस उतरती कळा लागत चालली. परमाराध्य अथवा परमल राजासंबधानें कलिंजरच्या किल्ल्यात नीलकंठाच्या देवालयामध्यें एक शिलालेख आहे, त्यामध्यें त्याची पुढें लिहिल्याप्रमाणें स्तुति केली आहे.

## श्लोक.

आकाश प्रसर प्रसर्पत दिशस्त्वं पृथ्वि पृथ्वीभव
प्रत्यक्षीकृतमाद्रिराजयशसा युष्माभिरुज्जृंभितम् ।
अद्य श्रीपरमर्द्दिपार्थिवयशोराशेर्विकाशोदया-
द्बीजोच्छ्वासविदीर्णदाडिममिव ब्रह्मांडमालोक्यते ॥ १ ॥
कीर्तिस्ते नृप दूतिका मुररिपोरंके स्थितामिन्दिरा-
मानीय प्रददौ तवेति गिरिशः श्रुत्वार्धनारीश्वरः ।
ब्रह्माभूच्चतुराननः सुरपतिश्चक्षुःसहस्रं दधौ
स्कंदो मंदमतिर्विवाहविमुखो धत्ते कुमारव्रतम् ॥ २ ॥
नागो भाति मदेन कं जलरुहैः पूर्णेंदुना शर्वरी
शीलेन प्रमदा जवेन तुरगो नित्योत्सवैर्मन्दिरम् ।
वाणी व्याकरणेन हंसमिथुनैर्नद्यः सभा पंडितैः
सत्पुत्रेण कुलं त्वया वसुमती लोकत्रयं विष्णुना ॥ ३ ॥

* हा शिलालेख वादा येथील पंडित कुंदरदास ह्यानीं क्यापटन फॉर्ग्सन ह्यास दिला असून त्याच्या आधारें तो आह्मीं येथें दिला आहे ह्यावर "संवत् १२०९ कार्तिक शुद्ध १० सोममंगल महाशी." असा शक आहे.

ह्या परमल राजाच्या कारकीर्दींत बुंदेलखडावर पारतंत्र्याची वक्र-दृष्टि फिरली. इ० स० ११८३ मध्यें दिल्लीचा चव्हाण राजा पृथ्वीराज ह्यानें परमल राजावर स्वारी करून त्याचा पराभव केला व बुंदेलखड प्रांतावर आपला अमल बसविला. ह्या वेळेपासून परमल राजानें कलिंजरच्या किल्ल्यामध्यें आपलें वसतिस्थान केलें. तेथें व अजयगडच्या किल्ल्यामध्यें त्याच्या कारकीर्दीचीं चिन्हें अद्यापि दृश्यमान होतात. हें चव्हाण व चंडेल ह्यांचें युद्ध होण्यापूर्वी चंडेल राजाची राजधानी महोबा येथें असून त्याच्याकडे उत्तरदक्षिण यमुना व नर्मदा आणि पूर्वपश्चिम रेवा व सिंध ह्यांच्या मधला सर्व प्रांत होता. परमल राजाच्या मागून त्याच्या कायस्थ दिवाणानीं ह्या प्रांतावर कांहीं दिवस राज्य चालविलें, एवढेंच नव्हे, पण नामधारी चंडेल राजा भोजवर्मा (किंवा भोजब्रह्म) ह्याचा कायस्थ प्रधान नाना ह्यानें इतिहासांत आपलें नाव उत्तम प्रकारें गाजविलें. परंतु वास्तविक पाहू गेलें तर पृथ्वीराज चव्हाणाचा अमल झाल्यानंतर साहसी मुसलमानानीं त्याकडे लवकरच आपली करडी नजर वळविली. ह्यामुळे चंडेल सत्तेंत पुढें कांहीं त्राण राहिलें नाहीं

उत्तरेकडून हिंदुस्थानावर मुसलमानांच्या प्रचंड स्वाऱ्या होऊ लागल्या, तेव्हांपासूनच त्यांचा विचार, कलिंजर, चंदेरी, काल्पी हे बळकट किल्ले हस्तगत करून तेथून हळहळू पुढील प्रांतावर मोहीम करावी असा होता. काल्पी ह्मणजे पश्चिमेचें द्वार, तें मुसलमान योद्धा कुतुबुद्दीन ह्यानें इ० स० ११९६ मध्यें सर करून तेथून पुढें बंगाल व दक्षिणप्रांत ह्यास शह देण्याची योजना केली. ह्या समयीं सर्व हिंदुस्थानामध्यें आपसातील द्वेष आणि कलह ह्यांचें साम्राज्य माजून सर्व हिंदु राजे त्यांच्या आधीन झाले होते, त्यामुळें अर्थातच मुसलमानाचा पाय शिरकण्यास उत्तम संधि प्राप्त होऊन त्यानीं आपला लाभ करून घेतला. ह्यावरून संघशक्तीचा जोर नाहींसा झाला

ह्मणजे महाप्रबल राष्ट्रेंही पारतन्त्र्याच्या प्रखर दंष्ट्रेंत पडण्यास फार वेळ लागत नाहीं, हें उघड दिसून येतें.

दिल्लीचा चव्हाण राजा पृथ्वीराज आणि कनोजचा राजा जयचंद ह्यांच्या मध्यें विग्रह उत्पन्न झाला आहे, अशी संधि पाहून शहाबुद्दीन घोरी ह्यानें इ० स० ११९१ मध्यें हिंदुस्थानावर स्वारी करून पृथ्वीराजाबरोबर ठाणेश्वर आणि कर्नाल ह्यांच्यामध्यें लढाई केली, परंतु त्या वेळीं पृथ्वीराजाच्या प्रबल सैन्यापुढें त्याचा टिकाव न लागतां त्यास अपयश घेऊन पळून जाणें भाग पडलें. परंतु पुढें दोन वर्षांनीं पृथ्वीराजाच्या मांडलिक राजांची स्थिति लक्षांत घेऊन त्यानें पुनः हिंदुस्थानावर स्वारी केली आणि दिल्लीपतीच्या प्रचंड सैन्याचा पराभव करून त्यास ठार मारिलें, व लगेच कनोज, बनारस, ग्वाल्हेर वगैरे कलहानें जर्जर झालेल्या प्रांतांवर स्वाऱ्या करून तो प्रदेश पर्जन्यकाळांत गिरिशिखरावरून जोरानें वाहत येणाऱ्या जलप्रवाहांप्रमाणें मुसलमानी सत्तेनें आक्रमून टाकिला, व त्याचाच ओघ बुंदेलखंडावर येऊन तोही प्रांत सन १२०८ सालीं शहाबुद्दिनाचा सुभेदार कुतबुद्दीन ह्याच्या ताब्यांत आला. तथापि चंडेल राजघराण्यांतील नामशेष झालेल्या वंशजांची तेजस्विता व स्वातंत्र्यप्रियता पुनः प्रज्वलित होऊन त्यांनीं देथील मुसलमान प्रतिनिधीस हांकून देऊन आपला अमल प्रस्थापित करण्याचा फिरून यत्न चालविला, परंतु दिल्लीपति अल्तमश ह्याजकडून सन १२३४ मध्यें नासिरउद्दीन नामक एक सरदार प्रचंड सैन्यानिशीं बुंदेलखंडांत येऊन त्यानें कलिंजरच्या किल्ल्यास पुनः वेढा दिला, व त्यांत गतस्वातंत्र्य परत मिळविण्याचा प्रयत्न करणाऱ्या दुर्बल चंडेल राजाची पुरी खोड मोडून त्याचा खजिना वगैरे लुटून फस्त केला, आणि शेवटीं त्या बिचाऱ्यास यमपुरीं पाठवून बुंदेलखंडांतील चंडेल राज्यसत्तेचा समूळ उच्छेद केला! कित्येकांच्या मतें अजयगड येथें सन १२८८ पर्यंत ह्मणजे जलाल-

द्दीन खिलजीच्या राज्यारोहणापर्यंत चंडेल राज्यसत्तेचा एक अल्प ततू राहिला होता, तेव्हां तोंपर्यंत चंडेलाची सत्ता जीवत होती असें मानण्यास हरकत नाहीं. साराश, तेराव्या शतकाच्या अखेरीस बुंदेलखड यवनाक्रात होऊन गेलें होतें ही गोष्ट निर्विवाद आहे.

चंडेल राजांच्या मागून बुंदेलखडाच्या पश्चिम भागामध्यें खंगार-कंगार जातीच्या कांहीं लोकानीं झांशीजवळील करेरा वगैरे मुलूख बळकावून स्वतत्र होण्याचा प्रयत्न चालविला होता, परतु बुंदेला राजा छत्रसाल अवतीर्ण होईपर्यंत ह्या प्रातास स्वातन्त्र्यसुखाचा लाभ मिळाला नाहीं. आतां हा छत्रसाल राजा ज्या बुंदेले घराण्यात उत्पन्न झाला, व ज्यामुळें ह्या प्रांतास बुंदेलखड असें अभिधान प्राप्त झालें त्याच्या आद्य इतिहासाचें आता थोडेंसें निरीक्षण केलें पाहिजे.

बुंदेले ह्या नांवाची उत्पत्ति मोठी चमत्कारिक आहे. तद्देशीय लोकामध्यें प्रचलित असलेल्या दतकथावरून असें दिसते कीं, बुंदेले हें नाव उत्पन्न होण्यास काशीच्या सूर्यवशीय राजघराण्यातला कोणी पंचम राजा कारण झाला. त्याची हकीकत अशी सागतात कीं, तो काशी येथें राज्य करीत असता त्याचे दायाद बलोन्मत्त होऊन त्यानीं त्याला पदभ्रष्ट केलें व राज्यांतून हाकून लाविलें. तेव्हा तो हताश होत्साता भटकत भटकत विंध्याचलावर आला. तेथें विंध्यवासिनी देवीचें स्थान फार प्रसिद्ध असल्यामुळें त्यानें तेथेंच राहून देवीची आराधना करण्यास सुरुवात केली, एवढेंच नव्हे, पण देवीस सुप्रसन्न करण्याकरितां त्यानें स्वदेहाचा बळी देण्याचा निश्चय केला, व त्याप्रमाणें तो तरवारीनें आपल्या शरीरावर घाव मारू लागला. हें निस्सीम भक्तीचें चिन्ह पाहून विंध्यवासिनी देवी प्रसन्न झाली, आणि तिनें आपलें स्वरूप प्रकट करून आपल्या उपासकाच्या हातातील तरवार घेतली व 'तुझे राज्य तुला परत मिळेल' असा त्यास आशीर्वाद दिला. पंचम राजानें आपल्या अंगावर वार

केले होते तेथून रक्तबिंदु (बुंद) गळत होते. तेव्हां त्याच्या वंशजांस ह्या विलक्षण भक्तीचें स्मरण राहावें ह्मणून त्याचें बुंदेले हें नाव पडलें. परंतु मुसलमानी इतिहासाचे नामांकित पंडित मि० इलियट ह्यांना ही दंतकथा केवळ काल्पनिक वाटून ती बुंदेले लोकांनीं आपल्या नीच कुलाचें गोपन करण्याकरिता तयार केली आहे असें ह्मटलें आहे. त्यांनीं 'हृदीकत-इल-अकालिम' नामक मुसलमानी

---

* ह्या रक्तबिंदूची हकीकत 'छत्रप्रकाश' ग्रंथामध्यें जी दिली आहे ती क्याप्टन पॉग्सन पुढें लिहिल्याप्रमाणें देतात:—

The perseverance, piety, and devotion of Puncham had won her affection and induced her to prevent the sacrifice of his life a drop of blood, however, had fallen from the wound, which he had inflicted on himself, and she immediately conveyed to it a portion of Amrita, or water of immortality, which is inherent in every Devatâ. The blood accordingly became animated, and assumed the form of a child, the exact resemblance of Puncham On beholding the infant, she yearned with maternal affection, and put it to her breast which supplied a copious flow of nourishment. Then blessing Puncham and the babe, she, with prophetic spirit, revealed that the sword should always aid him in war, and be the prop of his posterity to which the sovereignty should be continued from one generation to another that his descendants should possess plenitude of wealth and power, be the supporters of the Chuttree faith, and never experience from kindred or foe, trouble or distress, and that whoever, in future times, should in rebellion rise against them, should be exposed to the arm of divine wrath"

ह्या हकीकतीवरून शिवाजीला व त्याच्या पित्याला प्रसन्न होणारी भवानी देवी व ही विंध्यवासिनी ह्यांचें बरेंच सादृश्य कल्पितां येईल.

आ-३.१०९



ग्रथाच्या आधारें बुंदेले ह्या नावाच्या उत्पत्तीचा इतिहास पुढें लिहिल्याप्रमाणें दिला आहे:—"हरदेव ह्या नांवाचा काशीच्या गरवार घराण्यांतला कोणी पुरुष खैरागड येथून एक दासीकन्या पळवून आणून ओरछा येथें येऊन राहिला होता. ती कन्या सुस्वरूप असल्यामुळें ओरछा प्रांताच्या त्यावेळच्या खंगार राजानें तिला प्राप्त करून घेण्याचा बेत केला. त्यानें हरदेवापाशीं तिची मागणी केली, परतु प्रथम त्यानें ही मान्य केली नाहीं. नंतर त्यानें, राजानें आपल्या बंधुजनासहवर्तमान सर्व परिवारानिशीं ज्ञातिभेद मनात न आणिता मला मेजवानी द्यावी ह्मणजे मी मुलगी देतों असें कबूल केलें. त्या मेजवानीच्या वेळीं हरदेवानें त्या राजास व त्याच्या बधूस विषप्रयोग केला आणि मोठ्या युक्तीनें त्याचा सर्व प्रात आपणच बळकावला. त्याला ह्या बंदी ह्मणजे दासीपासून जी प्रजा झाली तिला बंदेल किंवा बुंदेल असें नाव प्राप्त झालें.*" ह्या दोन्ही गोष्टीं-पैकीं सत्य कोणती ह्याचा निर्णय करितां येत नाहीं. तथापि दुस-रीपेक्षा पहिलीच ग्राह्य समजणें ज्यास्त सयुक्तिक आहे.

असो. पुढें पंचम राजास बीरसिंग नावाचा पराक्रमी पुत्र झाला, व त्यानें सर्व बुंदेलखड पादाक्रांत करण्याचा निश्चय करून तेथील यवनराजसत्तेचा स्वभुजबलानें विध्वंस करण्यास सुरवात केली. प्रथमतः त्यानें सतारखान नामक एका अफगाण सरदाराबरोबर युद्ध केले व त्याच्या ७२ सरदाराचा पराभव करून त्याला बुंदेल-खडांतून हाकून लाविलें, नंतर त्यानें कलिंजरच्या किल्ल्यावर मोर्चे लावून तो सर केला, व काल्पीस वेढा देऊन तीही हस्तगत केली. येणेंप्रमाणें त्याची सत्ता व पराक्रम दिवसेंदिवस वाढत जाऊन सर्व बुंदेलखडाचें स्वामित्व त्याच्याकडे येत चाललें. तेव्हा त्यानें महोबा येथें आपल्या राज्याची गादी स्थापन केली. त्याच्या लोकोत्तर सामर्थ्यावरून

* Dowson's Elliot. I, 45.

त्यास लोहधार अशी संज्ञा प्राप्त झाली. अर्थात् हाच पराक्रमी पुरुष बुंदेले राजाचा मूलसंस्थापक असून त्याच्या राज्यस्थापनेचा काळ चवदाव्या शतकाच्या प्रारंभींचा असावा असें मानण्यास हरकत नाहीं.

वीरसिंगाच्या मागून त्याचा मुलगा करण हा गादीवर बसला. तोही आपल्या बापाप्रमाणें वीर्यशाली असल्यामुळें त्यास बलवत असें ह्मणत असत. त्याला अर्जुनपाल नावाचा एक मुलगा होता. त्याचा पुत्र सोहनपाल. हे क्रमशः बुंदेलखंडाच्या गादीचा उपभोग घेत होते. सोहनपालाच्या पराक्रमाची चांगली ख्याति आहे. त्यानें कुंठारगड जिंकून घेऊन जेतरा (जैतपूर?) येथें पुष्कळ वर्षें राज्य केलें. त्याच्या मागून सहज--इंदर (सहजेंद्र?), नानकदेव, आणि पृथ्वीराज हे पुरुष अनुक्रमें गादीवर बसले. ह्यांपैकीं पृथ्वीराज हा सुप्रसिद्ध पृथुराजाप्रमाणें यज्ञयागादि कृत्यांमध्यें दक्ष असून त्यानें प्रांताचे विभाग करून धर्मसंबंधी व व्यवहारसंबंधी उत्तम नियम केले. त्याच्या मागून रामचंद्र, मदनपाल, अर्जुनदेव आणि मलखन हे एकापेक्षा एक पराक्रमी पुरुष गादीवर आले. नंतर त्याच्या मागून ओरछाचा मूलसंस्थापक राजा रुद्रप्रताप हा अधिष्ठित झाला. हाच बुंदेल्याच्या बहुविध शाखांचा मूळपुरुष असून त्यानें सभोंवतालच्या राजे लोकांशीं टक्कर देऊन व त्यांच्या शक्तीचा ऱ्हास करून ओरछा येथें नवीन शहर वसविलें व बुंदेल्याच्या कुलास विशेष महत्त्व आणिलें. ह्यांच राजाच्या कारकीर्दीपासून बुंदेले लोकांचा विशेष विस्तार होत जाऊन त्या प्रांतास बुंदेलखंड असें स्वतंत्र नाव प्राप्त झालें. रुद्रप्रताप राजास भारतीचंद, मधुकरसा, ऊर्ध्वजित, किरातसा, भूपतसा, अमानतसा, चंद्रदास, दुर्गादास, घनःश्यामदास, प्रयागदास, भैरवदास आणि खंडेराय असे बारा पुत्र असून ते शौर्य, पराक्रम, विद्वत्ता, औदार्य, दातृत्व इत्याद्यनेक गुणांमध्यें प्रवीण होते. सांप्रत बुंदेलखंडामध्यें जीं अनेक लहानमोठीं

संस्थानें, जहागिरी व राज्यें आहेत तीं सर्व ह्या द्वादशपुरुषाचाच विस्तार होय. राजा रुद्रप्रताप हा ओरछाचा राज्यकारभार आपला वडील मुलगा भारतीचंद ह्याजवर सोंपवून कठारा (कोठारपूर?) किल्ल्यावर हल्ला करण्याकरितां निघाला असतां मध्यंतरीं मृत्यु पावला. नंतर भारतीचंद हाच गादीचा अधिपति झाला. त्याच्या मागून त्याचा भाऊ मधुकरसा गादीवर बसला. ह्या उभय बंधूंनीं अनुक्रमें २३ व ३६ वर्षें राज्य केलें. ह्यांच्याच कारकीर्दींत ऊर्ध्वजित नामक तिसऱ्या भावानें महोबा येथें आपलें वसतिस्थान करून तेथून परचक्राचा बंदोबस्त करण्याचा क्रम आरंभिला व तोच कित्ता इतर सर्व बंधूंनीं चालविला. त्यामुळें 'नास्ति बंधुसम बलम्' ह्या म्हणीप्रमाणें ओरछाच्या राजास विशेष सामर्थ्य प्राप्त होऊन सर्वत्र त्याचा अमल बसत चालला. ऊर्ध्वजित हा महापराक्रमी पुरुष असून त्याचा मुलगा प्रेमचंद हा सुद्धां त्याचप्रमाणें गुणवान् होता. त्याला कुंवरसिंह (सेन?), मानसा आणि भगवतराय असे तीन पुत्र होते. त्यांनीं निरनिराळ्या प्रांताचा बंदोबस्त करून मोठी कीर्ति मिळविली. त्यापैकीं भगवतराय हा पराक्रमाचा व सद्गुणाचा मूर्तिमंत

---

* ह्या राजाच्या मृत्यूची कथा मोठी चमत्कारिक आहे. कठारा किल्ल्यावर हल्ला करण्याकरितां निघाला असतां तो एका नदीच्या कांठीं मृगया करण्याकरितां गेला. तेथें एकाएकीं भयभीत झालेल्या गाईचा दीन स्वर त्याच्या कानावर आला तेव्हां तो आपली तरवार घेऊन एकदम त्या अनाथ धेनूचें रक्षण करण्यास अरण्यांत गेला. तों एक भयंकर वाघ एका गाईवर चालून आला आहे असें त्याच्या दृष्टीस पडलें. तेव्हां तो त्याच्यावर चालून गेला. उभयंतांची खूप चकमक उडाली व धेनूचा जीव बचावला जाऊन ते दोघेही मृत्यु पावले! ह्या गोष्टीवरून गोरक्षणाविषयीं आमच्या प्राचीन राजांचा केवढा बाणा होता हे चांगलें सिद्ध होतें.

पुतळाच होता असें त्यावेळच्या इतिहासकारांनीं वर्णन केलें आहे. त्यास कुलनदन नावाचा एक मुलगा होता. तो त्याच्या मागून महोबा प्रांताचा मालक झाला. तोही आपल्या बापाप्रमाणें मोठा दयाशील, धार्मिक आणि सद्गुणी असून त्यास अनुक्रमें खर्ग-(खड्ग ?)राय, चंद, सुभानराय आणि चंपतराय असे चार पुत्र होते. ह्यांपैकीं शेवटचा चंपतराय हा महाप्रतापी छत्रसाल राजाचा जनक असून बुंदेलखडातील राजकारणाचा मुख्य सूत्रचालक होय.

वर सांगितलेला ओरछाचा राजा भारतीचद इ० स० १५७४ मध्यें मृत्यु पावून त्याच्या गादीवर त्याचा भाऊ मधुकरसा हा अधिष्ठित झाला होता. ह्या वेळीं दिल्लीच्या सिंहासनावर सुप्रसिद्ध अकबर बादशाह राज्य करीत असून त्यानें आपल्या पराक्रमानें दूरदूरचे प्रांत जिंकण्याचा क्रम चालविला होता. बुंदेलखंडातील कांहीं भागावर दिल्लीपतीची सत्ता असून ग्वाल्हेरपासून दक्षिणेस गढमडलापर्यंत बादशाही अमल झाला होता. तो ओरछाच्या ह्या तेजस्वी राजास असह्य होऊन त्यानें सिरोंज, ग्वाल्हेर वगैरे मुलुखांवर हल्ले करण्याचा सपाटा चालविला; परंतु त्या प्रांताच्या सरक्षणार्थ अकबराचा सरदार सय्यद महमद बडा हा प्रबळ सैन्यानिशीं तत्पर असल्यामुळें ओरछाच्या राजाचा हेतु सिद्धीस गेला नाहीं. तथापि मधुकरसा व त्याचे बुंदेले सरदार हे दिल्लीपतीच्या अमलांतून बुंदेलखड मुक्त करण्याकरितां रात्रंदिवस झटत असल्यामुळें, त्यांचें पारिपत्य करणें अकबर बादशाहास जरूर पडलें. तेव्हां त्यानें १५७८ सालीं गडमडलाचा सुभेदार सादकखान व दुसरे सरदार ह्याच्या हाताखालीं सैन्य देऊन त्यांना ओरछावर पाठविलें. त्यांनीं बुंदेले लोकांचा मुलूख जाळून लुटून फस्त करीत ओरछावर चाल केली व मधुकरसा राजाचा पराभव करून त्याच्या भावास व दोनशें सरदारांस ठार मारिलें. तेव्हां मधुकरसा हा आपला जीव बचावून पळून गेला व

शेवटीं त्याचा निरुपाय होऊन त्याला अकबर बादशाहास शरण जाणें भाग पडलें. अकबर बादशाह हा मोठा उदार असल्यामुळें त्यानें त्यास क्षमा केली. परंतु पुढें मधुकरसानें पुन: सैन्य जमवून पुंडावा केला व बादशाही मुलुखास उपद्रव देण्यास सुरुवात केली. तेव्हां दिल्लीहून शहाजादा मुराद हा त्याचें पारिपत्य करण्याकरितां माळव्यामध्यें येऊन दाखल झाला. त्याच्या व बुंदेल्यांच्या झटापटी सुरू झाल्या.

राजा मधुकरसा हा सन १५९३ मध्यें मृत्यु पावला. त्याला रामचंद्रसा, होदलराय, आणि बीरसिंगदेव असे तीन मुलगे होते. त्यांपैकीं वडील मुलगा रामचंद्रसा हा आपल्या बापाच्या मागून गादीवर बसला. दुसरा मुलगा बेटवाच्या लढाईत बादशाही सैन्याबरोबर लढत असता मृत्यु पावला. व तिसरा बीरसिंगदेव हा आपल्या अचाट कृत्यांनीं पुढें प्रख्यात झाला. रामचंद्रसा हा देखील शूर पुरुष होता. त्यानें गादीवर बसल्यापासून बराच मुलूख काबीज केला, परंतु दिल्लीपति जहांगीर ह्याचें व बीरसिंगदेव ह्याचें फार सख्य असल्यामुळें आपल्यावर कांहीं तरी संकट येऊन आपण राज्यवैभवास मुकूं ह्या भीतीनें त्यानें, जहांगीर हा दिल्लीच्या बादशाही पदावर आरूढ होताच जें बंड उद्भवलें त्यात सामील होऊन स्वतंत्र होण्याचा प्रयत्न केला. पण 'मनसा चिंतितं कार्यं दैवमन्यत्तु चिंतयेत्' असा प्रकार होऊन त्याजवर सन १६०६ सालीं बादशाही सरदार व काल्पीचा जहागीरदार अबदुल्लाखान ह्याची दिल्ली दरबारांतून योजना झाली व त्याला कैद करून तिकडे नेण्यात आलें. तेथें त्यानें कृतापराधाबद्दल बादशाहाची क्षमा मागून आपली मुक्तता करून घेतली, परंतु त्यास ओरछाचें राज्य परत न मिळतां तें बीरसिंगदेव ह्यास देण्यात आलें. रामचंद्रसा ह्याच्यावर पुढें बादशाहाची बहाल मर्जी झाली व त्यानें सन १६०९ मध्यें त्याच्या एका रूपवती कन्येबरो-

बर विवाह केला. रामचंद्रसानें पुढें चंदेरीचें राज्य स्थापन केलें व तेथेंच सन १६१२ मध्यें तो मृत्यु पावला.

बीरसिंगदेव हा केवळ दिल्लीपतीच्या मेहेरबानीनें ओरछाचा राजा* झाला असें नसून तो फार अचाटकर्मा पुरुष असल्यामुळें जहांगीर बादशाहा त्याच्या पूर्ण कह्यात होता. त्यानें नर्मदा—सागरपर्यंतचा सर्व डांग देश काबीज करून बुंदेल्यांचें रक्त कसें तेजस्वी असतें तें जिकडे तिकडे मश्हूर केलें. त्यानें अकबराच्या कारकीर्दीमध्यें राजपुत्र सेलिम ह्याच्या बंडात सामील होऊन, सन १६०२ सालीं एक फार अघोर कर्म केलें, त्यामुळें अकबर बादशाहाची त्याजवर इतराजी झाली होती. हें अघोर कर्म ह्मणजे अकबराचा कंठमणि व प्रसिद्ध 'ऐने—अकबरी' नामक सर्वमान्य ग्रंथाचा कर्ता अबुलफजल हा बुंदेलखंडातून दिल्लीस जात असता, त्याचा वाटेंत बारकीसराई येथें मोठ्या क्रूरत्वानें वध केला हें होय. ह्या नीच कृत्याबद्दल अकबरास त्याचा मनस्वी राग येऊन त्यानें त्याचा सर्व मुलूख उध्वस्त करून टाकावा व त्यास कैद करून आणावें, असा हुकूम केला होता. परंतु राजपुत्र सेलिम हा त्यास अनुकूळ असल्यामुळें त्याला त्या क्रोधाग्नीपासून आपला कसा तरी बचाव करिता आला. सन १६०५ मध्यें दिल्लीपति अकबर हा आपली अमर कीर्ति इहलोकीं ठेवून परलोकीं गेला व त्याच्या मागून आपणास 'जगज्जेता' (जहांगीर) ह्मणविणारा त्याचा पुत्र सेलिम हा दिल्लीपदावर अधिष्ठित झाला. मृगेंद्राच्या पश्चात् जंबुक ज्याप्रमाणें स्वतंत्र होऊन स्वतःचें आधिपत्य

* सेलिम हा अबुलफजलच्या वधास कारणीभूत असून ती गोष्ट त्यानें आपल्या आत्मचरित्रात नमूद केली आहे मात्र त्यानें असें कारण दाखविलें आहे कीं, अकबरानें काढलेल्या नवीन धर्मतत्वांचा अबुलफजल हा पुरस्कर्ता असल्यामुळें तो प्रत्येक खऱ्या मुसलमानाचा शत्रु होता, ह्मणून त्याचा वध केला —Price's Jahangir, P 33.

मिरविण्यास तयार होतो, त्याप्रमाणें बीरसिंगदेव हा अकबर बादशाहाच्या पश्चात् पुनः बलाढ्य होऊन जहांगीर बादशाहाच्या मर्जीतला एक प्रमुख सरदार होऊन बसला.

सन १६२७ मध्यें जहांगीर बादशाहा मृत्यु पावला व त्याचा पुत्र शहाजहान हा दिल्लीच्या तक्ताचा अधिपति झाला. त्या समयीं बुंदेलखंडातील प्रबल राजांनीं दिल्लीपतीचें सार्वभौमत्व झुगारून देऊन स्वतंत्र होण्यास उत्तम संधि आहे असें पाहून, ते आपणांस स्वतंत्र राजे म्हणवूं लागले. ओरछाचा राजा बीरसिंगदेव व त्याचा चुलतभाऊ महोबाचा राजा चंपतराय आणि दुसरे बुंदेले राजे ह्यांनीं एकत्र होऊन बुंदेलखंडावरील दिल्लीपतीचें वर्चस्व अमान्य केलें. ही गोष्ट शहाजहान बादशाहाच्या कानावर गेली व त्यामुळें त्यानें अत्यंत क्रोधाविष्ट होऊन त्याचें पारिपत्य करण्याकरितां बाकीखान नावाचा एक सरदार पाठविला. परंतु चंपतरायानें आपल्या अद्वितीय शौर्यानें त्याचें कांहींएक चालूं न दिल्यामुळें त्यास हताश होऊन परत जाणें भाग पडलें, त्यामुळें शहाजहान बादशाहास जास्त त्वेष उत्पन्न होऊन तो स्वतः बुंदेलखंडावर चालून आला व ओरछास वेढा देऊन तें शहर हस्तगत करण्याकरितां त्यानें आपलें सर्व सामर्थ्य खर्च केलें. तथापि ह्या भीमपराक्रमी बुंदेल्या राजापुढें त्याचे सर्व यत्न फुकट जाऊन त्याला कांहीं कालपर्यंत माघार घेणें भाग पडलें.

चंपतरायास ह्या वेळीं सर्वाहन, अंगदराय आणि रतनसिंग असे तीन मुलगे होते. ते तिन्ही मोठे वीर्यशाली असून आपल्या बापाच्या मदतीकरितां मुसलमान सैन्याबरोबर लढत होते. त्यापैकीं सर्वाहन हा बाकीखानाशीं निकरानें लढत असतां धारातीर्थीं पतन पावला, त्यामुळें चंपतरायास व त्याच्या प्रियकर राणीस असह्य पुत्रशोक होऊन तीं उभयतां दुःखसागरामध्यें अगदीं बुडून गेलीं. ह्या वेळीं असा चमत्कार झाला कीं, चंपतरायाच्या राणीस एक विचित्र स्वप्न पडून

त्यामध्यें भारतीय युद्धातील अभिमन्यूप्रमाणें तो बालवीर सर्वांहून आपल्या मातेपुढें आला व त्यानें मी मुसलमानांचा संहार करून बुंदेल्याचें क्षात्रतेज भूमंडळावर चिरप्रदीप्त करण्याकरिता पुन: तुझ्या पोटीं अवतीर्ण होईन असें सांगितलें; ह्याप्रमाणें पुढें चंपतरायास एक मुलगा झाला. तोच विक्रमशाली राजा छत्रसाल हा होय.

शहाजहान बादशाहास प्रथम प्राप्त झालेल्या अपजयामुळें अतिशय राग आला व त्यानें बुंदेलखंड सर करण्याकरितां निरनिराळे नामांकित सेनापती निरनिराळ्या दिशेनें बुंदेलखंडावर पाठविले. आग्र्याहून मोहबतखान, दक्षिणेकडून खानजहान लोदी व अलहाबादेहून अबदुल्ला ह्या तिघांनीं बुंदेलखंडावर चाल करावी, अशी योजना केली. अर्थात् हें वीरत्रय एकत्र होऊन अजिंक्य सैन्यानिशीं चालून आल्यामुळें त्याच्यापुढें टिकाव धरण्याची बुंदेले लोकाची छाती कशानें होणार? तेव्हां त्यानीं महाराष्ट्रांतील मावळे लोकांप्रमाणें डोंगरांतील बिकट प्रदेशाचा आश्रय धरिला व कांहीं दिवस मुसलमानाचे सैन्यास स्वस्थ आराम घेत पडूं दिलें, त्यामुळें मोठ्या त्वेषानें चालून आलेल्या मुसलमान सेनापतींस आपल्याशीं टक्कर देण्यास कोणी धजत नाहीं असें वाटून आपल्या सामर्थ्याचा गर्व झाला व त्यानीं आपलें पुष्कळ सैन्य परत पाठविलें. यवनसेना आपल्या आटोक्यांत येतांच मग बटवा नदीच्या खोल दऱ्यातून व विंध्यपर्वताच्या दुर्गम भागांतून छपून बसलेले बुंदेले वीर आपला नायक चंपतराय ह्याच्या अनुज्ञेनें एकदम पुढें सरसावले व त्यांनीं तिची अगदीं दाणादाण करून सोडली. ह्या चकमकीमध्यें शाहबाजखान, बाकीखान, फत्तेखान, वगैरे मी मी ह्मणणारे कित्येक योद्धे पतन पावले. अशा रीतीनें यवनाचा पराभव होऊन राजा चंपतराय ह्यास यशश्री वश झाली. हें वृत्त शहाजहान बादशाहास कळताच त्यानें पुनः दुसरें सैन्य तयार करून त्याचें आधिपत्य महमद सुभा, वलीबहादरखान, अबदुल्लाखान, नौरोजखान इत्यादि

सरदारांकडे सोंपविलें व त्यांना पुनः बुंदेलखंडावर पाठविलें; परतु त्यांना ह्मणण्यासारखें मुळींच यश आलें नाहीं. तेव्हां आता बुंदेले लोकाशीं लढत बसण्यात काहीं अर्थ नाहीं, असें पाहून शहाजहान बादशाहानें बीरसिंगदेवाचा मुलगा पहारसिंग ह्यास ओरछाचा राजा असें मान्य केलें व बुंदेल्याचा पुढारी चंपतराय ह्याच्या शौर्याचें अभिनदन करून त्यास कुंच परगणा जहागीर दिला व आपल्या उमरावांत त्याची गणना केली. अशा रीतीनें ओरछाच्या राजास दिल्लीपतीकडून मान्यता मिळून बुंदेले लोकांचा वीर्यशाली राजा चंपतराय ह्याच्या शौर्याची फार वाहवा झाली.

परतु परोत्कर्ष सहन करण्याची शक्ति त्या कालीं देखील बुंदेले लोकात मुळींच नव्हती. राजा चंपतराय ह्याचा कीर्तिचद्र प्रतिदिनीं एक एक केलेनें जास्त जास्त वृद्धि पावत होत आहे, असें पाहून खुद्द त्याच्या पराक्रमाच्या जोरावर ओरछाचें राज्यपद मिळविलेला त्याचा पुतण्या पहारसिंग ह्याच्या अंगाची आग झाली, आणि त्या कृतोपकार न समजणाऱ्या अधम पुरुषानें चंपतरायास एक मेजवानी देऊन विषप्रयोग करण्याचा प्रयत्न केला. परतु सुदैवानें दाशरथी रामचंद्राच्या लोकोत्तर बंधूप्रमाणें चंपतरायास भीम ह्या नांवाचा एक बधु होता, त्यानें बधुप्रीति व्यक्त करून सर्व विष स्वतःच प्राशन केलें, व मोठ्या चातुर्यानें आपल्या प्रिय बधूचा प्राण वांचविला. याचें नाव बधुप्रीति ! असो. ह्याप्रमाणें पहारसिंगाचा बेत फसल्यामुळें तो चंपतरायाचा जास्त जास्त द्वेष करू लागला व त्याच्या नाशाचे अनेक उपाय योजूं लागला.

ह्या वेळीं दिल्लीपति शहाज़हान ह्याचे दारा, सुजा, औरगजेब आणि मुराद असे चार पुत्र दिल्लीच्या गादीविषयीं आपआपसांत भांडत असून वडील पुत्र दारा हा बादशाहाच्या मर्जीतला असल्यामुळें तोच सर्व राज्यकारभार पहात होता. तेव्हा त्याकडे संधान ला-

वलें ह्मणजे चंपतरायाचा नाश होईल, ह्या हेतूनें पहारसिंग ह्यानें दाराकडे आपला एक वकील पाठविला; व त्यास विनंति केली कीं, "मी हुजूरच्या सेवेंत सदा तत्पर असून सरकारचें हित तेंच माझें हित असें समजतो, त्याअर्थी मला सरकारास असें विदित करणें भाग आहे कीं, दिल्लीदरबारांतून चंपतराय ह्यास जो कुंच परगणा तीन लक्ष रुपये वार्षिक खंडणीच्या ठरावावर जहागीर दिला आहे, तो फार उत्पन्नाचा असल्यामुळें त्यांत सरकारचें फार नुकसान आहे; ह्याकरितां तो मजकडे दिल्यास मी त्याबद्दल नऊ लक्ष रुपये देण्यास तयार आहें." ह्या द्रव्यलोभानें दारा लागलाच भुलून गेला व त्यानें पहारसिंगावर संतुष्ट होऊन त्यास तो परगणा जहागीर दिला. ही गोष्ट चंपतराय ह्यास कळताच दिल्लीदरबारांत आपण केलेल्या उत्कृष्ट साह्याचें चीज होण्याची आशा आतां राहिली नाहीं असें पाहून त्यास फार वाईट वाटलें, व त्यानें भर दरबारांत जाऊन प्रत्यक्ष शहाजाद्याच्या तोंडावर त्याच्या ह्या कृतघ्नपणाबद्दल निर्भर्त्सना केली, आणि असल्या दरबाराशीं इत:पर संबंध ठेवणार नाहीं असें ह्मणून त्यानें दिल्लीच्या तक्ताला शेवटला नमस्कार केला व तो आपल्या महोबा शहरीं परत आला.

चंपतरायाचें युद्धकौशल्य आणि लोकोत्तर सामर्थ्य ह्याची कीर्ति सर्वत्र प्रसृत झाल्यामुळें त्याच्यासारखा प्रबल सरदार दिल्लीदरबारांतून रागावून परत आला, ही गोष्ट बादशाहाच्या शत्रूंस अत्यंत इष्ट वाटली व ते त्याच्या साह्याची अपेक्षा करूं लागले. राजकारणपटु व महाधूर्त औरंगजेब हा त्या वेळीं दक्षिणेंत होता. त्यास ही गोष्ट कळताच त्यानें चंपतरायाचें आर्जव करून त्यास आपल्या पक्षास वळवून घेतलें. त्यामुळें त्याच्या पक्षास जास्त सामर्थ्य येऊन पुढील युद्धामध्यें त्यास यश मिळालें. औरंगजेब ह्याचीं व त्याच्या बंधूंचीं राज्यप्राप्त्यर्थ माळव्यामध्यें जीं घनघोर युद्धें झालीं त्यांमध्यें

चंपतरायाचें पराक्रम विशेष व्यक्त होऊन औरंगजेबास विजय प्राप्त झाला. सन १६५८ मध्यें समगड येथें जी लढाई झाली व जिच्यामध्यें प्रतिपक्षाचा पुरा मोड होऊन औरंगजेबास दिल्लीचें सार्वभौमपद मुकररपणें प्राप्त झालें, तिच्यामध्यें राजा चंपतराय हा प्रमुख असून त्याच्या अश्रुतपूर्व रणावेशानें बुंदेले लोकांनीं फार चांगलें शौर्य गाजविलें, एवढेंच नव्हे, तर त्याच्या राजा रामचद्र नामक पुतण्यानें आपले प्राण देखील खर्ची घालण्यास मागें पुढें पाहिलें नाहीं. अर्थात् ह्या अप्रतिम विजयामुळें औरंगजेब हा त्या अतुल पराक्रमी बुंदेल्या वीरावर संतुष्ट झाला व त्यानें त्यास १२००० स्वाराची मनसब व बुंदेलखंडातील ओरछापासून यमुनेपर्यंतचा सर्व प्रांत जहागीर दिला, आणि दिल्लीदरबारांत श्रेष्ठ प्रतीच्या उमरावांमध्यें त्याची अग्रस्थानीं योजना केली.

---

* चंपतरायानें औरंगजेबास साह्य केलें, त्याचें विस्तृत वर्णन मुसलमानी ग्रंथामधून फारसें आढळून येत नाहीं; परंतु त्यांत चंपतरायाच्या साह्याचा वारंवार उल्लेख केला आहे फ्रेंच प्रवासी बर्नियर ह्यानेंही त्याबद्दल थोडासा उल्लेख केला आहे तो येणेंप्रमाणें —

"He (Dara) goeth forth, briskly taketh horse, and seizeth on the passage of the river Ichumbal, which is about 20 miles from Agra, where he fortifieth, expecting his enemy But the subtle crafty fakeer (Ourangzeb), who wanted no good spies and people that gave him intelligence of all, and who knew that the passage was there difficult, took good heed to attempt the forcing it. He came to encamp himself near it, so that from the camp of Dara, one might discover his tents. But what doth he in the mean time? He inveigles a certain rebel Raja, called Chempet, presents him richly, and promiseth him a thousand fine things, if he would let him pass through his territories. Chempet agreeth, and offers of his own accord, that he

अशा रीतीनें चंपतराय ह्यास दिल्लीदरबारात उत्तम प्रकारचा सन्मान मिळाला, परतु तो फार दिवस टिकला नाहीं. ह्याचें कारण त्याचा तेजस्वी स्वभाव हेंच होय. औरंगजेब बादशाहानें आपल्या स्वार्थाकरिता बाह्यात्कारें ह्या हिंदु राजाचा एवढा सत्कार केला तरी त्याचें व त्याच्या प्रमुख सरदाराचें त्याविषयीं अंतःकरण शुद्ध नसून त्यांना ह्या पराक्रमी पुरुषाचें प्रस्थ वाढविलें तर तें आपल्या नाशास कारण होईल, अशी भीति वाटत होती. ह्याकरिता त्यानीं त्याचा अधिकार व मानमरातब कमी करण्याचा प्रयत्न चालविला होता. एके वेळीं औरंगजेबाचा प्रिय सरदार बहादुरखान ह्यानें आपला घोडा चंपतरायानें घेतला आहे असें कारण दाखवून त्याचा अपमान करण्याकरिता, त्याजकडे मुद्दाम मागें लढाईमध्यें पतन पावलेल्या राजा रामचंद्र नामक शूर बुंदेल्या वीराचें खड्ग वगैरे कित्येक वस्तु पाठविल्या, त्यामुळें चंपतरायास पराकाष्ठेचा राग आला व त्यानें असल्या उपकारशून्य लोकाची मोहबतीकरिता देखील सेवा करावयाची नाहीं, असा निश्चय केला, व बादशाहाकडून मिळालेलीं सन्मानाचीं वस्त्रें व तरवार परत पाठवून तो यवनाच्या दास्यातून मुक्त झाला, आणि स्वातंत्र्याचा झेंडा उभारुन नौबत वाजवीत बुंदेलखडामध्यें परत आला.

बुंदेलखडामध्यें परत आल्यानतर चंपतराय यानें नवीन सैन्य जमवून स्वराज्य स्थापन करावें व मुसलमानाचा पराभव करून स्वतंत्र व्हावें, असा बेत करून बादशाहाच्या ताब्यांतला मुलूख काबीज करण्यास सुरवात

---

would himself attend him, and show the way through the woods and hills of his country &c."

—Bernier's History of the late Revolution of the Empire of the Great Mogul P. 52

केली व एक एक बळकट किल्ला तो जिंकीत चालला. त्यामुळें बुंदेलखंडातील मुसलमान सुभेदार अगदीं त्रस्त होऊन गेले व त्यानीं औरंगजेबास साह्य पाठविण्याबद्दल विनंति केली. चंपतरायाचें सामर्थ्य पूर्वीं औरंगजेबाच्या नजरेस आलें असल्यामुळें मुसलमान सरदाराची मात्रा त्यापुढें काहीं चालणार नाहीं, अशी त्याची खात्री झाली होती, ह्मणून त्यानें बुंदेले लोकापैकीं कोणी तरी पुढारी गाठून त्यास आपल्या वतीनें चंपतरायाचें पारिपत्य करण्यास सांगावें अशी युक्ति काढली. ह्या वेळीं सभाकरण (शुभकरण?) नावाचा एक प्रबल बुंदेला बराच मुलूख बळकावून बुंदेलखंडांतील कांहीं भागामध्यें पुंडावा करीत होता, त्यास औरंगजेबानें सरदारीचीं वस्त्रें देऊन व त्याच्या बावीस साथीदारास वजिराती देऊन, त्याना चंपतरायाचा नाश करण्याबद्दल हुकूम केला.

चंपतरायानें जिरुच्छा किल्ल्याचा आश्रय करून तेथून मुसलमानाच्या दाढेंतून आपला देश मुक्त करण्याचा प्रयत्न चालविला होता; तों इतक्यांत सभाकरण त्याच्या नाशास उद्युक्त झाला व त्याचें व चंपतराय ह्याचें झुंज सुरू झालें. 'कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ' ह्या ह्मणीप्रमाणें चंपतरायाचे स्वजातीय बांधव त्याच्या इष्ट हेतूच्या आड आल्यामुळें त्यास पुढचे विचार सोडून देऊन आत्मरक्षणार्थ झटणें भाग पडलें. सभाकरणाच्या व त्याच्या अनेक चकमकी झाल्या तरी त्यांत चंपतरायाचा वरपगडा कायम राहून विरुद्ध पक्षाच्या बुंदे-

* चंपतरायानें औरंगजेबाची सरदारी सोडून देण्याचें मुख्य कारण त्याची स्वतंत्र राज्यस्थापनेची इच्छा हेंच होय औरंगजेब व सुजा ह्या उभयतांची भांडणें सुरू आहेत त्या संधीस एकदम सैन्य जमवून दोघांचाही पराभव करावा व मुसलमानी राज्याचा उच्छेद करून हिंदुराज्य संस्थापित करावें असा त्याचा हेतु होता. डो ह्या इतिहासकारांचेंही असेंच मत आहे. (See Dow, vol. III.)

त्यांचा फार नाश झाला. हें वृत्त औरंगजेब ह्यास कळताच त्यानें सभाकरणास परत बोलाविलें व स्वत: बुंदेलखंडावर जाऊन चंपतरायाचा पराभव करण्याची तयारी केली. औरंगजेबाची स्वारी प्रचंड सैन्यानिशीं आपल्यावर चालून येत आहे, असें चंपतरायास कळलें तरी देखील त्याचें धैर्य बिलकूल न ढळता, तो बादशाही सैन्याबरोबर सामना देऊन आपल्या पराक्रमाची शर्थ करण्यास एका पायावर सिद्ध झाला. औरंगजेब मोठा कपटपटु व दूरदर्शी असल्यामुळें त्यानें बुंदेले लोकाच्या माहितगारीनें चंपतरायावर मारा करण्याच्या जागा शोधून काढल्या व त्या बाजूनीं हल्ले चालविले. उभय पक्षाच्या झटापटी सुरू झाल्या. बादशाहाचें सैन्य जरी प्रचंड होतें, तरी त्याच्या माऱ्यास न जुमानता चंपतरायाच्या अनेक वीरानीं चांगला पराक्रम व्यक्त केला व निकरानें लढून समरांगणामध्यें देह ठेविले. अशा रीतीनें चंपतरायाच्या सैन्याची शक्ति कमी होत चालली व इकडे ओरछा येथील हिरादेवी नामक राणीनें आपल्या नवऱ्याप्रमाणें (पहारसिंग) चंपतरायाशीं वैर धरून मुसलमानाना साह्य केलें, व चंपतरायाचा प्रियमित्र व शूर सरदार सुजनराय ह्याचा दगलबाजीनें दिदू- येथें वध केला. ह्यामुळें चंपतरायास आपला स्वराज्यस्थापनेचा मनोरथ आतां सिद्धीस जात नाहीं, असें वाटून जिवावर उदार होऊन त्यानें मुसलमानाशीं ठिकठिकाणीं लढाया केल्या. ह्या युद्धामध्यें त्याचे तरुण व अल्पवयी पुत्रही त्यास मदत करीत होते, परंतु त्यांच्या अल्प साह्यानें प्रचंड यवनसेनेचा पराभव कसा होणार? ह्मणून शेवटीं तो सहारा येथील इंदमन राजाकडे गेला. तेथेंही त्यास योग्य आश्रय मिळाला नाहीं. तेव्हां त्यानें आपल्या जीवनसा

मेहुण्याकडे जाऊन त्याच्या साह्यानें पुनः सैन्य जमवून आपला हेतु सिद्धीस नेण्याचा विचार केला. परंतु तेथेंही विश्वासघाताचें 'जारोपण झालें असल्यामुळें, तो एका जंगलांतून आपल्या राणीसह- वर्तमान जात असतां त्यावर शत्रूंनीं हल्ला केला; त्यामध्यें तो महावीर आपला अद्वितीय पराक्रम दाखवून क्षात्रधर्माप्रमाणें धारातीर्थीं मरण पावला. ही हकीकत सन १६६४ च्या सुमारास घडून आली.



# भाग २ रा.

## राजा छत्रसाल.

गेल्या दोन शतकापूर्वी महाराष्ट्रामध्यें क्षत्रियकुलावतंस श्रीछत्रपति शिवाजी महाराज अवतीर्ण झाले व त्यांनीं आपल्या अतुल पराक्रमानें सर्व भरतखंडामध्यें पसरलेल्या यवनसत्तेचा विध्वंस करून आपल्या मातृभूमीस स्वातंत्र्याचा सौभाग्यतिलक लाविला, आणि आपल्या देशबांधवांस स्वराज्यसुखाचा लाभ करून दिला. त्याप्रमाणें बुंदेलखंडामध्यें ज्यानें समशेरीच्या जोरावर अविंधसत्तेची वाताहत करून हिंदुधर्माचें रक्षण केलें आणि तत्रस्थ–बुंदेले–लोकांस स्वातंत्र्य आणि स्वराज्य ह्यांची सुखकर्ी जोड मिळवून दिली, तो लोकोत्तर पुरुष राजा छत्रसाल होय. हा मागील भागांत वर्णन केलेल्या रणशूर चंपतरायाचा कनिष्ठ पुत्र असून त्याचा जन्म सन १६५० च्या सुमारास झाला. चंपतरायाचा ज्येष्ठ पुत्र सर्वाहन हा त्या वेळीं चालू असलेल्या मुसलमानाच्या रणसंग्रामामध्यें एकाएकीं मारला गेला. तो अत्यंत शूर असल्यामुळें त्याच्या मरणानें त्याच्या मातापितरांस पराकाष्ठेचें दुःख झालें, त्या समयीं त्यानें त्याच्या सांत्वनाकरितां असा स्वप्नदृष्टांत दिला कीं, मी तुमच्या पोटीं पुनः जन्म धारण करून यवनांचा सूड घेईन. ह्या गोष्टीस कांहीं दिवस लोटल्यानंतर चंपतरायाची पत्नि गरोदर होऊन तीस पुत्ररत्न झालें, ह्मणून त्यास सर्वाहनाचा अवतार असें लोक समजू लागले, ह्या गोष्टीचें दिग्दर्शन मागील भागामध्यें केलेंच आहे.

छत्रसाल राजाचीं पुढील भाग्योदयाचीं पूर्ण चिन्हें त्याच्या बालपणातच व्यक्त होऊं लागलीं होतीं. त्याच्या बाळपणाचें वर्णन 'छत्रप्रकाश' नामक ग्रंथामध्यें पुढें लिहिल्याप्रमाणें केलें आहे:– "त्याची तेजस्वी मुद्रा व बाललीला पाहून सर्व लोकास हा कोणी तरी लोकोत्तर पुरुष असून आपल्या क्षत्रियकुलाचा उद्धार करील असें वाटूं लागलें, ह्मणून त्यास छत्रसाल असें नामाभिधान देण्यांत आलें. तो शुक्लेंदूच्या एकएक कलेप्रमाणें दिवसेंदिवस वाढूं लागला. तो थोडासा रांगू फिरूं लागला नाहीं, तोंच तो आपल्या हातामध्यें तरवार घेऊन तिच्याशीं खेळूं लागला. हें पाहून चंपतरायाच्या पदरच्या लोकास परम कौतुक वाटूं लागलें व त्यांनीं तो महाकीर्तिशाली निपजणार असें भविष्य केलें. छत्रसाल प्रातःकाळीं लवकर उठून बसत असे व आपल्या प्रसन्न आणि प्रफुल्ल वदनानें चंपतरायाच्या भेटीस येणाऱ्या सर्व सरदार लोकास आनंदित करून आपल्या रम्य लीलांनीं त्याचें अंतःकरण वेधून घेत असे. तो भिंतीवर जी छाया पडत असे तिच्यामध्यें हत्ती, घोडेस्वार, शिपाई ह्यांचीं चित्रें कल्पून आपल्या बुद्धिचातुर्याची विचित्र चमक दाखवीत असे. त्याचें सात वर्षांचें वय झालें नाहीं तोंच त्यास बरीच विद्या अवगत होऊन परमेश्वरभक्तीचें वारें त्याच्या अंगीं खेळूं लागलें." चंपतराय हा महोबा येथें राहत असे. तेथें श्रीरामचंद्राचें देवालय प्रसिद्ध असून तेथील देवमूर्ति फार मनोहर होती. त्याच्या दर्शनानें छत्रसालास अत्यंत आनंद वाटून त्याच्या कर्णप्रिय कथा श्रवण करण्याची त्यास इच्छा झाली. अगोदर क्षत्रियाचा तेजस्वी छावा व त्यांत महाकवि वाल्मीकीच्या रसाल वाणीनें ग्रथित झालेल्या रघुनंदनाच्या वीररसप्रचुर कथाची भर, मग काय विचारावें? तत्काल त्या वीरपुत्राच्या अंगात वीरश्रीचा संचार होऊन त्याचे बाहु स्फुरण पावूं लागले, व त्यास अद्वितीय पराक्रम करावा अशी प्रबळ इच्छा उत्पन्न झाली. रामायण महा-

भारतादि इतिहासग्रंथाच्या श्रवणानें शिवाजीच्या अंगीं जसा वीररस खळखळूं लागला व त्यास स्वराज्य स्थापण्याची इच्छा झाली, त्याच भासल्याचें हेंही एक उदाहरण आहे. ह्यावरून पूर्वजांच्या अद्भुत शौर्यकथाच्या योगानें मनावर केवढा विचित्र परिणाम होतो हें चांगलें व्यक्त होतें. पाश्चात्य कविसार्वभौम होमरच्या मधुर वाणींतून निघालेलें आकिलिसचें यशोवर्णन श्रवण करून शिकंदर अवतीर्ण झाला अथवा शिकंदराचे अलौकिक पराक्रम श्रवण करून सीझरच्या अंगीं रणोत्साह उत्पन्न झाला, त्याप्रमाणें आमच्या आर्यकविसार्वभौमाच्या वाणींतून निघालेल्या चरित्रश्रवणानें शिवाजी, छत्रसाल, बाजीराव इत्यादि वीररत्नें निर्माण झालीं, ह्याचा आम्हास अतिशय गर्व वाटून स्वदेशाच्या इतिहासाविषयीं आह्मीं निस्सीम प्रीति बाळगली पाहिजे. अस्तु.

छत्रसाल दहा वर्षांचा झाला नाहीं तोंच त्यास भाला, बर्ची, बोथाटी, तरवार इत्यादि शस्त्राचे अचूक नेम मारणें, घोडा भरधांव फेंकणें, मोठ्या धैर्यानें हिंस्र श्वापदावर तुटून पडून त्यांची शिकार करणें वगैरे क्षत्रियास आवश्यक असणाऱ्या गोष्टी त्यास चांगल्या कळूं लागल्या होत्या, व तो नेहमीं आपल्या बापाबरोबर असल्यामुळें वारवार ऐकूं येणाऱ्या शौर्यकथांनीं त्याच्या अंगांत रणस्फूर्ति उत्पन्न होऊं लागली होती. चंपतरायावर अखेर जो आणीबाणीचा प्रसंग आला, त्या वेळीं त्यानें छत्रसालास आपल्या मातेचें संरक्षण करण्याचें काम सांगितलें होतें. त्याचप्रमाणें त्यानें एकदा दिल्लीच्या शाहाजाद्यास ह्या मुलाचा पराक्रम दाखविला होता. अशाप्रकारें छत्रसालाची तेजस्विता अल्पवयात दृष्टिगोचर होऊं लागली न लागली तोंच चंपतराय मृत्यु पावला व चौदाव्या वर्षापासून त्यास एकसारखा युद्धप्रसंग प्राप्त होऊन आपल्या समशेरीचें दिव्य तेज व्यक्त करणें भाग पडलें! चंपतराय मृत्यु पावला त्या

वेळीं हा बालवीर सहारा येथें होता. त्यास ही दु:खवार्ता समजताच अत्यंत शोक झाला, तथापि त्यानें त्याचें सुविचारानें परिमार्जन केलें आणि मोठें धैर्य धरून चंपतरायाचा बच्चा होईन तरच त्याच्यापेक्षां जास्त पराक्रम करीन असा पण केला. पुराणातरीं श्रवण केलेल्या विक्रमशाली राजाच्या शौर्यकथाचें स्मरण होऊन त्यास विशेष प्रोत्साहन आलें, व सर्व नृपति ज्याप्रमाणें आपलें शौर्य, आपला मनोनिग्रह, आपलें औदार्य, इत्यादि अनेक सद्गुण कीर्तिरूपानें चिरप्रकाशित करून मृत्युवश झाले, त्याप्रमाणें आपणही कांहीं करून आपलें जन्मसार्थक करावें असा त्याचा कृतसंकल्प झाला, आणि लगेच तो पुढील कार्यक्रम ठरविण्याकरिता आपला वडील बंधु अंगदराय ह्याजकडे गेला. अंगदराय हा त्या वेळीं देवगड येथें होता. त्यास छत्रसालाच्या भेटीनें परम संतोष झाला. त्यानें छत्रसालाचें सर्व ह्मणणें ऐकून घेऊन त्यास असें सांगितलें कीं, "सध्याचा प्रसंग मोठा बिकट आहे. यवनसत्तेनें सर्व देश ग्रासून जाऊन आमचें स्वातंत्र्य, आमचा प्राणप्रिय धर्म आणि आमचें सर्वस्व नाहींसें झालें आहे. आणि आमच्या अंगीं ब्रदेगुलामपण आलें असून आह्मी म्लेंच्छाच्या ओंजळीनें पाणी पीत आहोत. ह्या प्रसंगातून मुक्त होण्यास आपली पाणीदार समशेर आणि अद्भुत पराक्रम ह्यावाचून दुसरा मार्ग नाहीं. यवनानीं उन्मत्तपणानें आमच्या मातृभूमीचे जे हाल माडले आहेत ते माझ्यानें पहावत नाहींत. ह्याकरिता तिची त्यांतून मुक्तता केलीच पाहिजे." ज्येष्ठ भ्रात्याचें हें भाषण ऐकून छत्रसालास अतिशय स्वेष आला व त्या उभय बंधूनीं अशा दुर्धर स्थितींतून पार पडून जाण्याचे नानाप्रकारचे बेत चालविले.

चंपतरायानें स्वपराक्रमानें कांहीं प्रांत काबीज केला होता, परंतु कित्येक बुंदेले जहागीरदार यवनांस साह्य झाल्यामुळें तो प्रांत त्यांनीं हस्तगत केला. त्यामुळें नवीन सैन्य जमवून नवीन मुलूख सर

केल्यावाचून त्याना गत्यतर राहिलें नव्हतें. परतु सैन्य ठेवण्यास पैसा पाहिजे. तेव्हा त्या उभय बधूनीं दिलवारी येथें आपल्या आईचें कांहीं जवाहीर शिलक होतें तें विकून सैन्य बाळगण्यास प्रारभ केला, आणि सर्वत्र सुरू असलेल्या यवनी युद्धामध्यें आपला पराक्रम गाजवून इलहल आपलें डोकें वर काढावें असा बेत केला.

ह्या सुमारास दिल्लीपतीचा सरदार बहादुरखान कोका हा देवगडास वेढा घालून बसला होता, व त्यास साह्य करण्याकरिता दिल्लीहून रजपूत सेनापति जयसिंग हा प्रचड सैन्यानिशीं चालला होता. त्याच्या विनतीवरून ह्या उभय बंधूनीं बहादूरखानाच्या पतकाखालीं जाऊन आपला पराक्रम फार चागल्या रीतीनें व्यक्त केला. त्यामुळें बहादुरखानास विजय प्राप्त होऊन दिल्लीपति औरगजेब ह्यानें त्यास नबाबाची मनसब दिली व त्याचा अतिशय गौरव केला. वस्तुतः ह्या युद्धामध्यें छत्रसाल ह्यानें आपलें अतुल शौर्य व्यक्त केल्यामुळें, सर्व यश मिळालें होतें, परतु हिंदुद्वेष्ट्या दिल्लीपतीच्या दरबारांत, त्याचें योग्य चीज न झाल्यामुळें छत्रसालास अतिशय राग आला व इतःपर यवनांची सेवा न करितां स्वतत्र रीतीनें सैन्य उभारून आपल्या समशेरीचा प्रताप त्यास दाखवावा हेंच त्यास योग्य वाटू लागलें. औरगजेबानें सर्व हिंदूचीं व रजपुताचीं मनें अतिशय दुखवून हिंदु धर्माचा उच्छेद करण्याचा एकसारखा सपाटा चालविला होता, त्यामुळें सर्व प्रातात अस्वस्थता उत्पन्न होऊन दगेधोपे सुरू झाले होते. अशा संधीस आपल्या विचित्र बुद्धिप्रभावानें लोकामध्यें जूट उत्पन्न करून त्याच्या साह्यानें स्वराज्य संस्थापित करण्याची व स्वत्व मिळविण्याची कल्पना ज्या लोकोत्तर पुरुषाच्या मनात आली तो नरश्रेष्ठ श्रीशिवाजी दक्षिणेमध्यें बराच प्रबल होत चालला होता. त्यानें जागोजागच्या यवन सुभेदारांवर हल्ले करून व बादशाही सैन्याची दाणादाण करून अकरा प्रात उध्वस्त केले होते, व प्राto-

प्रांतीं खंडणी बसविण्याचा सपाटा चालविला होता. त्यामुळें जिकडे तिकडे शिवाजीच्या स्वातन्त्र्योत्कर्षाचें कर्णप्रिय वृत्त पसरत चाललें होतें. तें ह्याच समयास छत्रसाल राजाच्या श्रवणीं पडून त्यास परम हर्ष झाला, आणि त्यानें अशा पराक्रमपटु नरपुंगवाचें दर्शन घेऊन त्याच्या साह्यानें आपला हेतु सिद्धीस न्यावा असा संकल्प केला.

बुंदेलखंडातून दक्षिणेंत येणें त्या वेळीं अतिशय दुर्घट होतें, परंतु छत्रसालानें आपल्या मनाचा हिय्या करून व अनेक संकटें सोसून दक्षिणेचा प्रवास केला. आणि शेवटीं एका डोंगराच्या पायथ्याशीं भीमा नदीच्या कांठावर त्या स्वातंत्र्यप्रिय महाराष्ट्र वीराची प्रेमोत्कंठापूर्वक भेट घेतली आणि तेथें उभयताचे हृद्गत परस्परांस माहीत होऊन त्याचे विवक्षित बेत ठरले. शिवाजीच्या अंगीं गुणग्राहकत्व विशेष असल्यामुळें छत्रसालाची अपार स्वातन्त्र्यप्रीति, अद्वितीय स्वधर्माभिमान, अद्भुत शौर्य, अढळ धैर्य आणि अप्रतिम साहस इत्यादि अनेक गुण पाहून त्याचें अंतःकरण आनंदानें भरून गेलें. त्यानें त्यास प्रेमालिंगन देऊन आपल्या मधुर वाणीनें त्यास सुंदर उपदेश केला. तो केवळ मौक्तिकतुल्य असल्यामुळें तो जशाचा तसाच येथें नमूद करणें अत्यंत अवश्य आहे, तो असाः—"हे पराक्रमी राजा, तूं आपल्या शत्रूचा संहार करून विजयी हो! तूं आपला देश पुनः काबीज करून त्यावर राज्य कर! बादशाही सैन्याची वाताहत करून सोड! त्या कपटी लोकाचा विश्वास न धरिता तुर्क मोंगलाचा स्वाहाकार कर! ज्या ज्या वेळीं ते तुजवर हल्ला करण्याचा बेत करतील त्या त्या वेळीं मी तुला साह्य करून त्यांचे बेत सिद्धीस जाऊं देणार नाहीं. ज्या वेळीं त्यानीं आमच्याशीं वैर आरंभिलें त्या वेळीं श्रीभवानी माझ्या साह्यास आली. तिच्या कृपाप्रसादानें मला मुसलमानांच्या सामर्थ्याची मुळींच पर्वा वाटत नाहीं. मजवर त्या कपटी लोकाचे अनेक मी मी ह्मणणारे सरदार चालून आले आणि त्यांनीं

माझा कंठच्छेद करण्याचा प्रयत्न केला, परतु त्या सर्वांवर मीं आपल्या तरवारीचें पाणी चालवून त्यांना मोक्ष दाखविला. ह्याकरितां तू तिळमात्र काळजी न करितां आपल्या देशामध्यें परत जा, सैन्याची भरती कर, मुसलमानांना हांकून दे; सदोदित नगी समशेर हातात असूं दे, ह्मणजे युद्धप्रसगीं परमेश्वरकृपेनें तुझें रक्षण होईल. गोब्राह्मणाचा प्रतिपाल करणें, वेदाचें रक्षण करणें आणि समरागणावर शौर्य दाखविणें हेंच क्षत्रियाचें मुख्य व्रत होय. जर ह्यांत तुला मृत्यु प्राप्त झाला तर तू सूर्यमडळ भेदून स्वर्गद्वार जिंकशील व तेथील अपार सुखाचा उपभोग घेशील, आणि रणामध्यें विजयी झालास तर तुला तुझें स्वराज्य आणि अमर कीर्ति प्राप्त होईल. ह्या प्रातामध्यें तू मला साह्य केलेंस व शत्रूवर आपण उभयतानीं हल्ला केला तरी सर्व यशाचा धनी मी होईन. ह्याकरिता तू आपल्या देशामध्यें जा व तेथें युद्ध कर, ह्मणजे तुझ्या कीर्तीचा वांटा घेण्यास पुष्कळ लोक सिद्ध होतील, तेथें तुला यश.श्री माळ घालील आणि तुझें शौर्य व तुझी कीर्ति यावच्चद्रदिवाकरौ चमकत राहील !"

---

* हा शिवाजीचा उपदेश क्याप्टन पॉग्सन ह्यांनी 'छत्रप्रकाश' ग्रथावरून इग्रजीमध्यें लिहिला आहे तो येणेंप्रमाणें·—

"Illustrious Chief! Conquer and subdue your foes! resume and rule your native land! destroy the Emperor's army! Slay the Turks and Moguls, and trust not that deceitful race! and whenever they evince an attention of attacking you, I will distract their attention, and subvert their plans by active co-operation When they opposed us, Shree Bhowanee came-to our aid confiding in her favour and protection, I fear no Moslim power Numerous were the nobles of that deceitful race, by whom I was assailed, on whom I tried the temper of my blade, and whom I slew Return then to your native land, levy an

हें उपदेशामृत प्राशन करून छत्रसालाचें हृदय वीर्योत्साहानें उच्च बळून गेलें व त्याच्या नेत्रातून आनंदाश्रु गळू लागले. नंतर शिवाजीनें त्यास आपली तरवार बक्षीस देऊन व वारंवार त्याचें अभीष्ट चिंतन करून त्यास मार्गस्थ केलें.*

---

army, expel the invaders, grasp the sword, and Kunheeya (Krishna) will protect you in day of battle. For does not the Chuttree faith consist in protecting the cow and the Brahmans, in guarding the Vedas, in shewing skill and valor in battle? and if you lose your life, will you not through the solar orb enter the mansions of bliss, enjoying plenitude of happiness and repose? If victorious, you will repossess your country, and immortalize your name If in this quarter we attack, the fame of the deed will be mine. It is therefore expedient to commence hostilities in your own dominions, where your reputation will gain many adherents, success will crown your efforts, and your glory and renown remain emblazoned in the annals of time"

—*Pogson's Boondelas, p 52-53*

* शिवाजीच्या ह्या भेटीची हकीकत आजपर्यंत कोठेंच उपलब्ध झाली नसल्यामुळें ती वाचून कोणासही पराकाष्ठेचा विस्मयानंद वाटल्यावांचून राहणार नाहीं ही हकीकत शिवाजीची व छत्रसालाची कारकीर्द प्रत्यक्ष आपल्या नेत्रांनीं अवलोकन केलेल्या भूषन कवीनें वर्णन केली असल्यामुळें तिच्या खरेपणाविषयी शंका घेण्याचें काही कारण नाहीं ह्याला मराठी बखरीमध्यें कोठें चांगलासा आधार सापडत नाही, परंतु क्याप्टन फ्राङ्क्लिन नामक एका ग्रंथकारानें एके ठिकाणीं छत्रसाल हा दिल्लीच्या बादशाहाची सेवा न करिता शिवाजीकडे गेला अशा आशयाचे पुढील उद्गार काढले आहेत

" ..Chhatrasal entered into the services of Bahadur Khan, Governor of the Dekhan in the reign of the Emperor Aurangzeb But some cause or other induced him to change it for that of the Mahrattas, which was

शिवछत्रपतीनें आपल्या प्रेमळ शब्दानीं ज्याच्या मनांत स्वदेशाभिमान व स्वधर्माभिमान ह्यांची प्रेरणा केली व आपण साह्य करूं असें आश्वासन देऊन ज्यास स्वकर्तव्य अंत.करणपूर्वक बजावण्याविषयी विशेष प्रोत्साहन दिलें, त्याच्या हातून अद्वितीय कार्यें व्हावींत ह्यात काहीं आश्चर्य नाहीं. छत्रसाल दक्षिणेंतून परत बुंदेलखडात गेला मात्र, तो तेथें त्यानें नवीन सैन्य जमवून लहान लहान बुंदेले सरदार, कीं जे दिल्लीपतीच्या सुभेदाराचे दासानुदास बनून त्याच्या ओंजळीनें पाणी पीत होते, त्यास आपल्या पक्षाकडे वळवून घेण्याचा व त्याना त्या वेळीं प्राप्त झालेल्या अत्यत शोचनीय पारतन्त्र्यस्थितीचें ज्ञान करून देऊन त्याचे नेत्र उघडण्याचा प्रयत्न चालविला. ओरछाचा राजा ह्मणजे बुंदेले लोकाचा मुख्य अग्रणी तो देखील ह्या वेळीं मुसलमानांचा बदा गुलाम झाला होता, एवढेंच नव्हे, तर प्रत्यक्ष त्याच्या राजधानीमधलीं सर्व हिंदु देवालयें फोडून त्याच्या मशीदी बाधाव्या, असा बुंदेलखडाचा मुसलमान सुभेदार फिदाईखान हास दिल्लीच्या बादशाहाकडून हुकूम फर्मांविण्यांत आला होता, तरी देखील त्याच्या विरुद्ध ब्र काढण्याची त्याची.छाती झाली नव्हती ! अशी स्थिति पाहताच छत्रसालानें बुंदेले लोकाचें धुरीणत्व पत्करून त्यांच्या ठिकाणीं स्वधर्माभिमान जागृत केला, व आपल्या प्राणप्रिय हिंदु देवालयाचें रक्षण करणें हेंच आपलें आदिकर्तव्य होय, असें त्याच्या अतःकरणात पूर्ण बिंबविलें. त्या योगानें सर्व बुंदेले इरेस पेटून बादशाही सैन्याशीं टक्कर देण्यास तयार झाले. अर्थात् सर्व प्रजा मुसलमानाच्या विरुद्ध होऊन

---

then a rising power under the famous Shivaji, in which employment, he is said to have performed some useful services and he returned to his country with reputation and credit '

—*Franklin's Memoir on Bundelkhand. p* 265.

आपल्या धर्माचें रक्षण करण्यास सिद्ध झाली आहे, असें पाहून दिल्लीपतीचा मांडलिक जो ओरछाचा राजा तो देखील बादशाहाचा स्नेह झुगारून देऊन तिच्या वतीनें भांडूं लागला. ह्यामुळें प्रथम मुसलमानाच्या आणि बुंदेले लोकाच्या कलहास सुरवात झाली. त्यात छत्रसाल राजाच्या प्रतापानें बुंदेल्याची सरशी होऊन अखेर मुसलमानी सत्तेचा पूर्ण ऱ्हास झाला.

छत्रसालाच्या आणि मुसलमान लोकाच्या युद्धास ओरछाच्या लढाईपासून प्रारंभ झाला. पहिल्या युद्धामध्यें फिदाईखानाचा बुंदेले लोकानीं पराभव करून तींत चांगला विजय मिळविला. हें समजतांच अनेक बुंदेले सरदार छत्रसालाच्या गुणांची प्रशंसा करून त्याच्या बाजूस येऊन मिळाले. सभाकरण नामक जो प्रबल बुंदेला वीर, दिल्लीपतीचा अंकित असून त्याच्या वतीनें बुंदेलखंडातील दक्षिण भागावर आपला अधिकार चालवीत होता, तोही छत्रसालास वश झाला. त्याचप्रमाणें औरंगाबादेचा बीरबलदेव ह्यानेंही छत्रसालाची विनति मान्य करुन त्यास साह्य करण्याचें कबूल केलें. येणेंप्रमाणें हळूहळू लोक जमा करुन छत्रसालानें बादशाहाच्या मुलखात लूटमार करण्यास व बुंदेलखंडातील डोंगरी किल्ले सर करण्यास प्रारंभ केला. सन १६७१ मध्यें प्रथमत. त्यानें पन्नाच्या बाजूच्या डोंगरी मुलखांत धुमाळी सुरू केली, आणि मुसलमान सैन्यावर छापे घालून जागोजाग त्याची दाणादाण उडविली, व मुलूख उध्वस्त पाडला. त्यास ज्या ज्या सरदारानीं अडथळा केला त्याचाही खरपूस समाचार घेण्यास त्यानें कमी केलें नाहीं. धारीरच्या राजानें त्याच्या सैन्यास अडथळा केला ह्मणून त्यानें धारीरवर हल्ला करुन तें लुटून फस्त केलें, व तेथील राजास दातीं तृण धरून शरण येणें भाग पाडलें. त्यानें छत्रसालाचा अपूर्व पराक्रम पाहून त्यास आपली कन्या समर्पण केली. नंतर छत्रसाल राजानें रतनगड सर

करून सिरोंजमार्गें कुंडाघाटाकडे वळून तेथें आपल्या सैन्याचा तळ दिला. हें वर्तमान मुसलमान सरदारास समजताच त्याच्या अंगाची लाही झाली. महमद हाशीमखान नामक त्या प्रांताचा सुभेदार मोठ्या त्वेषानें आनंदराय नामक एका बुंदेल्या राजाचें साह्य घेऊन छत्रसालावर चालून आला, परंतु त्याचा छत्रसालानें खूप शौर्यानें पराभव करून पुष्कळ पठाण लोकांना आपल्या तरवारीनें कटल्यान घातलें, आणि गडाकोटापर्यंत देश काबीज केला. नंतर बांसा, बडीपिटरी वगैरे गांवें लुटीत लुटीत तो बाकीखान सुभेदाराच्या मुलुखामध्यें येऊन दाखल झाला अशा रीतीनें छत्रसालाचें प्राबल्य दिवसेंदिवस वाढत चाललें, हें पाहून त्याच्या पारिपत्यार्थ बडे बडे मुसलमान सरदार जिवापाड मेहेनत करूं लागले. छत्रसाल धूमघाटामध्यें आला असें समजताच सय्यद बहादूर नामक एक शूर सरदार त्यावर चालून आला. तेथें ह्या उभयतांचें तुमुल युद्ध झालें. त्यांत छत्रसालास विजय प्राप्त होऊन त्यानें समरांगणातून मोंगल व पठाण सैन्यास जीव घेऊन पळावयास लाविलें, आणि विजयोत्साहानें सिंध, ग्वाल्हेर, कंजिया, दयापूर, दमो इत्यादि प्रांतावर चाल करून प्रत्येक ठिकाणीं आपला अंमल स्थापित केला. ह्याप्रमाणें अल्पावकाशामध्यें बुंदेलखंडाचा सर्व पश्चिम भाग काबीज करून तेथें स्वतंत्र राज्यकारभार सुरू केला. गडाकोटा हा प्रचंड किल्ला सर्व भान्याच्या जागाचें मुख्य नाकें असल्यामुळें तेथें ज्यास्त सैन्य ठेवून तेथून त्यानें चोहोंकडून येणाऱ्या शत्रूचा बंदोबस्त केला. ह्या वेळीं छत्रसालाच्या हाताखालीं सुमारें सत्तर शूर सरदार व पुष्कळ सैन्य जमा झालें होतें, त्यामुळें त्यास पुढील प्रांत काबीज करण्यास विशेष सुलभ झालें.

छत्रसाल राजानें बुंदेलखंडामध्यें एकसारखी रणधुमाळी उडवून देऊन सर्व मुसलमान सरदारांचा पराभव केला, व दिल्लीची सत्ता नाहींशी केली, हें वृत्त औरंगजेब बादशाहाच्या कानावर गेलें. त्यामुळें

त्यास मनस्वी क्रोध उत्पन्न होऊन त्यानें छत्रसालाचें पारिपत्य करण्याकरिता दिल्लीदरबारातील खासे बावीस वजीर व आणखी आठ सरदार अशा तीस योद्ध्याची योजना केली आणि त्यानीं बुंदेलखडात जाऊन दतिया, ओरछा, कुंच, धमोनी वगैरे ठिकाणीं जें मोंगल सैन्य आहे तें सर्व एकत्र करून छत्रसाल राजावर स्वारी करावी व त्याचा मोड करावा असा सक्त हुकूम केला. ह्या तीस सरदाराचें आधिपत्य रणदुल्लाखान नामक एका महायोद्ध्याकडे दिलें. त्याप्रमाणें रणदुल्लाखान हा छत्रसालाचा पराभव करून बादशाहाकडून वाहवा मिळवावी ह्या ईर्षेनें सर्व सैन्य एकत्र करून, छत्रसालाचें मुख्य ठिकाण जें गडाकोटा तेथें येऊन युद्धास सिद्ध झाला. त्याचें प्रचड सैन्य पाहून छत्रसालासही वीर्योत्साह उत्पन्न झाला, व त्यानें सर्व बुंदेले सरदारांस एकत्र करून रणदुल्लाखानाबरोबर निकराचें युद्ध केलें. त्या वेळीं मुसलमान सैन्याचा जमाव पुष्कळ असून त्याचे नुसते घोडेस्वार तीस हजार होते. एवढ्या प्रचड सैन्याशीं बुंदेले लोकानीं मोठ्या धैर्यानें टक्कर देऊन आपला अद्वितीय पराक्रम व्यक्त केला, व रणदुल्लाखानाचा अगदीं पराभव करून त्यास जीव घेऊन पळावयास लाविलें. ह्या विजयाच्या योगानें छत्रसालाची मुसलमान सरदारावर विशेष छाप बसून त्याना तो कर्दनकाळासारखा अजिक्य भासू लागला.

रणदुल्लाखानाचा पराभव केल्यानतर छत्रसालनें नवीन प्रांत घेण्याचा एकसारखा क्रम चालविला होता. त्यानें प्रथम सागर, रतनगड वगैरे प्रात सर करून नरवराकडे आपला मोहरा वळविला, आणि तेथून बादशाहाकडे जाणाऱ्या दक्षिणेंतील मूल्यवान् जिनसाच्या शभर गाड्या लुटल्या. हें वृत्त बादशाहास कळताच त्याचें रणदुल्लाखानाच्या पराभवानें सतप्त झालेलें मन, क्रोधाग्नीनें दुप्पट खवळलें आणि त्यानें छत्रसालाचा पक्का सूड घेण्याकरिता आपले

जवानमर्द तुर्क लोक त्याच्यावर पाठविले हे तुर्क लोक त्या वेळीं रोमन लोकाप्रमाणें रणपटु समजले जात असत. तेव्हां ते समरभूमी-वरून अपयश घेऊन परत येणार नाहींत, अशी दिल्लीच्या हुजूर दरबाराची खात्री होती! परतु त्या वेळीं बुंदेले लोकांवर विजयश्रीचा पूर्ण प्रसाद असल्यामुळें त्याचा व ह्या महाबलाढ्य तुर्क लोकाचा सामना होताच त्यांत छत्रसालास यश आलें. ह्या प्रसगीं उभय पक्षाच्या लोकांनीं बसिया नामक गावाजवळ आपल्या शौर्याची शिकस्त करून फार निकराची लढाई केली, तरी शेवटीं तुर्कांचा नाश होऊन बुंदेल्याची सरशी झाली.

ही गोष्ट औरंगजेबास कळताच त्यास परमावधीचें दुःख झालें, व हे भीमपराक्रमी बुंदेले लोक आतां उत्तरेकडे येत येत दिल्लीस शह देतील कीं काय, अशी त्यास भीति वाटू लागली तेव्हां त्यानें आपल्या बलाढ्य सरदारापैकीं तहवूरखान नामक योद्ध्याची पुनः बुंदेले लोकावर योजना केली. हा सरदार मोठा युक्तिवान् व कपटपटु असल्यामुळें त्यानें छत्रसालावर एकाएकीं हल्ला न करितां, संधि साधून त्याजवर घाला घालावा असा निश्चय केला. ह्याच समयास मागें सांगितलेल्या धारीर येथील राजाच्या मुलीचा छत्रसालाशीं विवाह ठरून तो मगलसमारभ सिरवा नामक गावीं मोठ्या थाटानें चालला होता. ही गोष्ट तहवूरखान ह्यास कळतांच त्यानें बुंदेले लोक लग्नसमारभात गुग असतील असें समजून मोठ्या बदोबस्तानें त्याच्यावर हल्ला केला. त्या वेळीं छत्रसाल हा पीतपटानिशीं आपली नगी समशेर घेऊन युद्धास सिद्ध झाला, व त्यानें आपल्या शूर सरदाराच्या साह्यानें तहवूरखानाची अगदीं दाणादाण उडवून देऊन त्याचे पुष्कळ लोक ठार केले. येणेंप्रमाणें दिल्लीपतीकडून येणाऱ्या मोठ्या मोठ्या रणझुंजाराचा छत्रसालापुढें निरुपाय झाला, व त्यांना हताश होऊन परत जावें लागलें.

अशा रीतीनें दिवसेंदिवस छत्रसाल राजास जास्त जास्त यश येत जाऊन अनेक प्रांत त्याच्या ताब्यात येऊ लागले, त्यामुळें त्याचें राज्य लवकरच अतिशय विस्तृत होत चालले. त्याच्या अलौकिक शौर्यगुणामुळें व अजब कर्तृत्वशक्तीमुळें सर्व बुंदेले लोकामध्यें स्वातंत्र्याची अभिरुचि उत्पन्न होऊन ते त्याकरिता आपले प्राण खर्ची घालण्यास तयार झाले, व त्याचें प्रचंड सैन्य त्याच्या हाताखालीं जमा झालें. त्यांनीं बुंदेलखंडाचा पश्चिम भाग सर केल्या-नतर उत्तरेकडील व पूर्वेकडील प्रांत आणि मुसलमानाच्या ताब्यां-तील मोठमोठे लढाऊ किल्ले जिंकण्याचा निश्चय केला. त्यांनीं प्रथ-मतः कलिंजरच्या किल्ल्यास वेढा देऊन तो मोंगलाच्या ताब्यातून हस्तगत करून घेतला आणि बांदा, हमीरपूर, झांशी वगैरे प्रांतावर वरचेवर स्वाऱ्या करून ते काबीज केले; त्यामुळें लवकरच चंबळा नदीच्या दक्षिणेकडे व पूर्वेकडे बघेलखंडापर्यंतच्या सर्व प्रांतावर त्याची अव्याहत सत्ता सुरू झाली. दिल्लीहून अनवरखान, मिर्झा सदरुद्दीन, आणि हमीदखान वगैरे प्रबल सरदार छत्रसालाचे पारि-पत्य करण्याकरिता मध्यंतरीं आले; परंतु छत्रसालानें त्या सर्वांचा पराभव करून बुंदेले लोक मुसलमानास हार येण्याची आशा रा-हिली नाहीं अशी त्याची खात्री करून सोडिली. नंतर त्यानें जाल-वंण परगणा सर करून काल्पी, कचूर, कमूर आणि उरई इत्यादि गावांवर हल्ले केले, व तेथें एकसारखी लूट मिळविण्याचा सपाटा चालविला. ज्या ज्या गावचे लोक छत्रसालास एकदम साह्य करीत त्याच्याशीं खंडणीचा ठराव करून त्याचा स्नेहभाव तो कायम ठेवीत असे. आणि जे लोक मुसलमानाच्या चिथावणीनें त्यास विश्वास-वचन देऊन दगलबाजी करण्याचा यत्न करीत, त्याची तो पुरी खोड मोडल्यावाचून कधींही राहत नसे. बरहट गावच्या जहागीरदारानें अशा तऱ्हेचें वर्तन केल्यामुळें छत्रसालानें त्या गावचा अगदीं पूर्ण

विध्वस केला. येणेंप्रमाणे छत्रसालाचा प्रतापभानु जास्त जास्त प्रकाशमान् होत चालला, हें पाहून ठिकठिकाणच्या मुसलमान सुभेदारानीं त्यास खडणी देऊन आपला बचाव करण्यास सुरवात केली. कोट्रा येथील सुभेदार सय्यद लतिफ ह्यानें दोन महिनेपर्यंत बुंदेले लोकाचा जबरदस्त वेढा पडला असतां तेथील किल्ल्याचें मोठ्या हिंमतीनें सरक्षण केलें, परतु बुंदेले लोकापुढें त्याचा अखेर निरुपाय होऊन त्यानें त्यास एक लाख खंडणी देऊन वेढा उठवविला ! अशा रीतीनें मुसलमान सुभेदाराकडून खडणी मिळण्यास सुरवात होताच छत्रसालानें पुढें मोठमोठ्या प्रातावर स्वाऱ्या करून तेथून खडणी घेण्याचा क्रम आरभिला. पूर्वेस काल्पी वगैरे ठिकाणाहून त्यास खडण्या सुरू झाल्या व पश्चिमेस उज्जयनी, भेलसे वगैरे ठिकाणाहून चौथाई मिळू लागली, एवढेंच नव्हे, तर ठिकठिकाणचे प्रबल राजे व जहागीरदार त्याच्या आश्रयास येऊ लागले. दुर्जनसा नावाचा जहागीरदार छत्रसालाचे पराक्रम ऐकून थक्क झाला व त्यानें मोठ्या आनदानें त्याच्याशीं दोस्तीचा तह केला. असौंधीचा बसत नामक जहागीरदार छत्रसालाबरोबर बाकून वागत होता ह्मणून त्यानें त्यावर हल्ला करून त्याचा पराभव केला. त्याप्रमाणे इद्रमन नामक एका राजानें बादशाहाशीं सल्ला करून छत्रसाला-बरोबर कृतघ्नपणाचें वर्तन केलें. हें पाहताच त्यानें त्याच्या मुलखावर स्वारी करून तो उध्वस्त करून सोडला आणि गरोरा, कमूर, कच्च-निया वगैरे गांवें हस्तगत केलीं. त्यामुळें इंद्रमनाची पुरी खोड मोडून त्यास छत्रसालाचें सामर्थ्य कळून आलें. तात्पर्य, अशा रीतीनें सर्व राजे छत्रसालाच्या कह्यात येऊन त्याची सर्व बुंदेलखंडावर निष्कटक सत्ता सुरू झाली, एवढेंच नव्हे, तर त्यास एका दिवसात कोणाचा अडथळा न होता साठ साठ कोस प्रवास करितां येऊ लागला. सर्व मुसलमान सुभेदार त्याच्या प्रभावास दिपून जाऊन

त्यास चौथाई देऊ लागले. त्यामुळें चंबळा नदीच्या पूर्वेकडील सर्व प्रांतातून बादशाही सत्ता नाहींशी झाली, असें ह्मणण्यास काहीं हरकत नाहीं.

छत्रसालाच्या प्रतापाची ही सायंत हकीकत दिल्लीपतीस कळतांच त्यास अत्यंत दुःख होऊन त्यानें छत्रसालाचें पारिपत्य करण्याकरितां शेख अनवरखान ह्याची योजना केली. त्याप्रमाणें अनवरखान ह्यानें अनावर झालेल्या ह्या बुंदेल्या वीरास चीत करण्याकरितां दहा बारा हजार निवडक घोडेस्वार, मस्त झालेले लढाऊ हत्ती, भरपूर दारूगोळा, उंटावरच्या जेजाला, वगैरे कडेकोट युद्धसामुग्री बरोबर घेऊन बुंदेलखंडावर स्वारी केली, व त्यास साह्य करण्याकरिता सय्यद, शेख व पठाण जातींचे हजारो लोक येऊन मिळाले. ह्याप्रमाणें हें बलाढ्य सैन्य छत्रसालावर चालून जाताच त्यानें बादशाही सैन्याच्या नजीकचे प्रांत जाळून टाकण्याचा व त्यावर छापे घालण्याचा एकसारखा सपाटा चालविला. बादशाही सैन्य प्रचंड असल्यामुळें त्याच्याशीं समोरासमोर सामना करणें मुळींच इष्ट नव्हतें ह्मणून बुंदेले लोकांनीं निरनिराळ्या टोळ्या करून निरनिराळ्या दिशेनें मोंगल सैन्यावर हल्ले केले. त्या योगानें तें सैन्य निरनिराळ्या टोळ्यांशीं लढण्याकरिता आपली मान्याची जागा सोडून पुढें येई, आणि बुंदेल्याच्या पेंचात सापडून पराभव पावत असे. अनवरखानानें आपली शर्थ करून पाहिली· तथापि त्याच्या शौर्याचा काहींएक उपयोग न होता त्यास छत्रसाल राजास शरण जाऊन व सव्वा लाख रुपये खंडणी देऊन आपली सुटका करून घेणें भाग पडलें! अनवरखानासारख्या शूर योद्ध्याची देखील छत्रसालानें दाद लागू दिली नाहीं हें वृत्त बादशाहास समजताच त्याची जी स्थिति झाली ती वर्णन करणें अशक्य आहे. तो क्रोधानें खदिरांगारासारखा लाल झाला व त्यानें भरदरबारामध्यें

अनवरखानाची फटफजिती करून त्याची सरदारी काढून घेतली, आणि सर्व मोठमोठ्या सरदाराची रणभीरुत्वाबद्दल निर्भर्त्सना करून सर्व राज्यामध्यें छत्रसालाचें पारिपत्य करणारा एकही मायेचा पूत राहिला नाहीं, ही शरमेची गोष्ट असें ह्मणू लागला. तेव्हा त्याच्या क्रोधानें स्फुरण पावून मिर्झा सदरुद्दीन नामक एक सरदार बादशाही सैन्याचें आधिपत्य घेऊन बुंदेलखंडावर स्वारी करण्यास सिद्ध झाला. त्यास बादशाहानें एकदम सुभेदारीचीं वस्त्रें देऊन व नानाप्रकारचे हितमत्र सागून त्याची धमोणीस रवानगी केली. मिर्झा सदरुद्दीन हा कावेबाज व राजकारणी पुरुष असल्यामुळें त्यानें बादशाहाच्या कानमंत्राप्रमाणें छत्रसालास युक्तिप्रयुक्तीनें घेऱ्यात घालावें असा निश्चय केला व प्रथमत छत्रसाल राजाकडे एक वकील पाठविला. त्यानें छत्रसालाच्या छावणीमध्यें जाऊन त्याची भेट घेतली व त्यापाशीं मिर्झा सदरुद्दीन ह्याचा शौर्यमहिमा वर्णन करून त्याला शरण गेल्यास तो बादशाहाकडून फार कल्याण करील असा उपदेश करविला. परतु छत्रसालासारखा बाणेदार पुरुष अशानें थोडाच वळणार ? त्यानें त्या वकिलास असें चोख उत्तर दिले कीं, “आपले सुभेदारसाहेब मोठे पराक्रमी असतील तर असोत. त्यानीं रीतीप्रमाणें चौथाई दिलीच पाहिजे. ती देण्यास ते राजी नसतील तर आह्मी त्याच्याशीं लढण्यास सिद्ध आहों.” सुभेदाराच्या वकिलानें मिर्झासाहेबास हें छत्रसालाचें बाणेदार उत्तर कळविलें आणि साफ सागितलें कीं, “बुंदेले लोक ह्मणजे केवळ रणवीर आहेत, त्यातून छत्रसाल राजावर विजयश्रीची पूर्ण कृपा आहे, तेव्हां त्यास चौथाई कबूल करावी हेंच बरें.” परतु हे शब्द त्या गर्विष्ठ खानास विषारी बाणाप्रमाणें असह्य होऊन त्यास अत्यत अपमानास्पद वाटले व त्यानें त्याचा धिःकार करून छत्रसालास युद्धाचा निरोप पाठविला.

छत्रसाल राजानें मी मी ह्मणणाऱ्या अनेक योद्ध्यांचा पराभव केला होता, तरी ह्या वेळीं बादशाही सैन्याशीं टक्कर देणें त्यास बरेंच कठीण झालें होतें. कारण दिवसेंदिवस पुष्कळ प्रांत त्याच्या ताब्यांत येत चालल्यामुळें, व चोहोंकडून परशत्रूची फार भीति असल्यामुळें, त्याचें सैन्य प्रांतामध्यें निरनिराळ्या ठिकाणीं विभागलें गेलें होतें. तें एकत्र केलें तर जागोजागचा बंदोबस्त कमी होऊन शत्रूस अनायासें आपला कार्यभाग साधता येईल, ही त्यास मोटीच अडचण होती. ह्मणून त्यानें विशेष सैन्य एकत्र करण्याचा प्रयत्न न करिता ह्या बिकट प्रसंगीं मोठ्या धैर्यानें व युक्तीनें शत्रूचें पारिपत्य करण्याचा निश्चय केला. आणीबाणीच्या प्रसंगावाचून मनुष्याच्या अंगच्या लोकोत्तर गुणाचें प्रकाशन होत नाहीं हें अगदीं खरें आहे. त्या वेळीं बुंदेले लोकांवर असाच बिकट प्रसंग आला होता ह्यांत शंका नाहीं मिर्झा सदरुद्दीन हा चवताळलेल्या वाघाप्रमाणें बुंदेल्या-घर चालून आला असून त्याच्या रक्ताचा घोट घेण्यास इच्छित होता, व चोहींकडचे मुसलमान सुभेदार छत्रसालाच्या सामर्थ्याचा कमीपणा दृष्टीस पडताच त्याच्या प्रांतावर हल्ले करण्यास अगदीं डोळ्यांत तेल घालून बसले होते. अशा वेळीं छत्रसाल बिलकूल न डगमगतां आपल्या जवळ शिल्लक असलेलें सैन्य तयार ठेवून स्वतः एका उमद्या घोड्यावर स्वार झाला आणि शत्रूच्या तलासासाठीं एकदम बाहेर पडला, तों इतक्यांत उभय पक्षाच्या युद्धास प्रारंभ झाला. छत्रसालाच्या सैन्यांतले बुंदेले लोक मोठ्या निकरानें बाण सोडूं लागले व मोंगली सैन्यांतून एकसारखा तोफांचा मारा सुरू झाला. बुंदेले लोकांनीं आपली पराकाष्ठा केली तरी बादशाही सैन्य प्रचंड असल्यामुळें त्याच्या माऱ्यानें पुष्कळ बुंदेले सरदार धारातीर्थी पतन पावले. छत्रसालाकडील परशुराम, नारायणदास, अजितराय, बाळकृष्ण, गंगाराम, मेघराज, वगैरे नामांकित बुंदेले सरदारांनीं

आपला अद्वितीय पराक्रम दाखविला. खुद्द छत्रसाल हा भैरवरूप धारण करून सर्व सैन्याच्या अग्रभागीं आपल्या सैनिकांस प्रोत्साहन देण्याकरितां उभा राहिला होता व स्वतः मोठ्या निकरानें लढत होता. पुष्कळ वेळपर्यंत उभय पक्षाचें घनघोर युद्ध होऊन शेवटीं बुंदेल्यास विजय प्राप्त झाला आणि यवनसैन्य पळून जाऊन गर्वानें फुगून गेलेले मिर्झासाहेब व त्याचे अनेक सरदार बुंदेल्यांच्या हस्तगत झाले. छत्रसाल राजानें ह्या वेळीं मोठें औदार्य दाखवून, त्याच्याकडून चौथाईचा ठराव करून घेऊन, त्या सर्वांस सोडून दिलें.

ह्यानंतर छत्रसालानें बुंदेलखंडाच्या पूर्व भागामध्यें आपला मोर्चा वळविला, व महोबा प्रांतातल्या जमीनदारांनीं मांडलेला पुंडावा मोडून टाकला, आणि तेथें आपला दरारा बसवून कांहीं दिवस जलालपूर येथें वास्तव्य केलें. तों पुनः दिल्ली दरबारांत छत्रसालाच्या पारिपत्याचा विचार ठरून अबदुससमाद ह्या नावाचा एक सरदार प्रचंड सैन्य घेऊन बुंदेलखंडांत येण्यास निघाला. हें वर्तमान छत्रसालास कळताच त्यानें आपले शूर सरदार एकत्र जमवून सैन्याची उत्तम व्यवस्था केली. औरंगाबादेचा वीर बलदेव व राय मनदुवा अशा दोन सरदारास सैन्याच्या दोन भागाचे प्रमुखाधिकारी नेमून अघाडीचा भाग छत्रसालानें आपल्या स्वतःकडे घेतला. ह्या समयीं छत्रसालाची व अबदुससमाद ह्याची मोठी हातघाईची लढाई झाली. उभय पक्षाकडील पुष्कळ सरदार मारले गेले. खुद्द छत्रसाल राजास बऱ्याच जखमा लागल्या. परंतु त्याच्या अपार शौर्यामुळें व अप्रतिम युद्धचातुर्यामुळें त्याच्या पक्षास यश येऊन पूर्ववत् मुसलमानाचा पराभव झाला. त्याचे कित्येक मातबर वजीर पाडाव झाले. तदनंतर छत्रसाल राजा पन्ना येथें गेला व तेथें कांहीं दिवस राहून त्यानें आपल्या जखमा बऱ्या होततोपर्यंत देशाची राज्यव्यवस्था चालविली, आणि पुनः लवकरच लाबलाबचा मुलूख

घेण्या करितां स्वारीची तयारी केली. ह्या खेपेस त्यानें हरिलाल गज-सिंह ह्याचा प्रांत काबीज केला. व जागोजाग खंडण्या वसूल करून भेलशाजवळचीं गांवें जाळून व लुटून टाकिलीं. ही बातमी धमो-नीचा सुभेदार बहिलोलखान ह्यास कळतांच त्यानें नऊ हजार सैन्य बरोबर घेऊन त्याच्यावर चाल केली. त्याची व छत्रसालाची मदीना येथें जंगी लढाई झाली. ह्या लढाईमध्यें बहिलोलखानाच्या वतीनें लढणारा मदीनाचा ठाकूर जगत्सिंग हा मारला जाऊन इतर पुष्कळ लोक पतन पावले. नंतर छत्रसाल शहागडास गेला. तेथेंही पुनः त्याची व बहिलोलखानाची चकमक उडाली. बहिलोलखान हा एकसारखा तीन दिवस लढत होता, परंतु अखेर तो हताश होऊन धमोनीस परत गेला आणि आपल्या शूरपणास कलंक लागला ह्मणून आत्मघात करून ह्या लोकांतून नष्ट झाला.

बहिलोलखान मृत्यु पावल्यानंतर छत्रसालानें पुनः युद्धास सुर-गत केली, आणि कोस्यास वेढा देऊन तो किल्ला व जसू आणि गौघाट हीं गावें हस्तगत केलीं. नंतर महोब्यावर हल्ला केला व तेथून सिहोंद्याचा सुभेदार मुरादखान ह्याच्यावर चाल केली. मुरा-दखान हा दिल्लीपतीच्या मर्जींतला पठाण नवाब दुलेलखान ह्याच्या तर्फे त्या प्रांताचा बंदोबस्त करीत असून, छत्रसालाशीं अतिशय उन्म-त्तपणानें वागून त्यास जुमानीनासा झाला. तेव्हा त्याची खोड मोडण्याकरितां छत्रसालानें सिहोंद्यावर हल्ला केला. ह्या लढाईमध्यें मुरादखान व त्याचे प्रमुख पठाण सरदार ठार मारले गेले. तेव्हा त्या प्रांताचा मुख्य अधिपति दुलेलखान ह्यानें छत्रसालाशीं वांकून वागण्यांत कांहीं अर्थ नाहीं असें पाहून त्याच्याशीं दोस्तीचा घाट घातला व त्यास अतिनम्रपणानें एक पत्र लिहून मज दीनावर दया करावी अशी विनवणी केली. छत्रसालानें मोठ्या उदार बुद्धीन त्या पत्राचा स्वीकार करून त्याच्याशीं दोस्तीचा तह केला,

आणि मुरादखानाशीं झालेल्या युद्धात त्याचे पाडाव झालेले हत्ती व इतर संपत्ति दुलेलखान ह्यास परत पाठवून दिली. ह्या छत्रसाल राजाचा मोठेपणा पाहून दुलेलखानास फार संतोष झाला.

वरील वर्तमान घडल्यानंतर छत्रसाल राजानें मतौंधच्या जमीनदारावर चाल केली, व त्याचा पराभव करून बहिलोलखानाच्या जागीं आलेला सुभेदार आसदखान ह्याचा किरपूर येथें मोड केला. आसदखानाच्या साह्याकरिता शहाकुलीखान नावाचा एक सरदार प्रबल सैन्यानिशीं छत्रसालाच्या मुलुखावर चालून आला. परंतु छत्रसालानें त्याचाही मऊ येथें पराभव केला. आसदखान व शहाकुलीखान हे दोघेही प्रबल सरदार असून त्यानीं छत्रसालाचा पराभव करण्याकरिता भगीरथ प्रयत्न केले. मऊ येथील युद्धाचे वेळीं छत्रसालावर दुर्धर प्रसंग येऊन बेतला होता. व त्याचें सैन्य पठाण सैन्याच्या असह्य माऱ्यामुळें अगदीं जर्जर होऊन सैरावैरा पळत सुटलें होतें. परंतु ह्या वेळीं छत्रसाल राजानें सर्व बुंदेले लोकांना आपल्या वीररसपूरित शब्दानीं उत्तेजन देऊन त्याच्यामध्यें रणावेश उत्पन्न केला. ह्या युद्धाचे प्रसंगीं छत्रपति शिवाजी महाराजाच्या सुप्रसिद्ध श्रीसमर्थ रामदास सद्गुरूप्रमाणें छत्रसाल राजाचे गुरु श्री प्राणनाथ प्रभु* ह्यानीं त्यास वारंवार प्रोत्साहन व आशीर्वचन देऊन बुंदेल्यांनीं आजपर्यंत मिळविलेल्या यशाचें उत्तमप्रकारें संरक्षण केलें, ही विशेष लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट आहे.

आसदखान व शहाकुलीखान ह्याचा छत्रसाल राजानें पराभव

---

* प्राणनाथ प्रभु हा श्रीरामदास स्वामीप्रमाणें एक साधुपुरुष असून त्यानें सिंध पंजाब, दिल्ली, बुंदेलखंड वगैरे प्रांतामध्यें पुष्कळ प्रवास केला होता बुंदेलखंडामध्यें मऊ येथें त्याची व छत्रसाल राजाची भेट झाली. छत्रसाल राजानें त्या सत्पुरुषाचा उपदेश ग्रहण करून मोठ्या भक्तिभावानें त्याची सेवा केली. प्राणनाथाचें टोपण नाव जू साहेब असें आहे.

केल्यानंतर लवकरच दिल्लीदरबारामध्यें पुष्कळ फेरफार झाले; त्यामुळें छत्रसाल राजास पुनः पुष्कळ दिवसपर्यंत दिल्लीपतीकडून त्रास झाला नाहीं, एवढेंच नव्हे, पण उलट त्यावर दिल्लीदरबारची फार मेहेरबानी झाली. तो प्रकार असाः—औरंगजेब हा दक्षिणेमध्यें अहमदनगर येथें इ० स० १७०७ मध्यें मृत्यु पावला. त्यास मोअजीम, अजीमशहा व कामबक्ष असे तीन मुलगे होते. ह्यापैकीं वडील मुलगा मोअजीम, हा त्या वेळीं काबुलामध्यें होता ह्मणून दुसऱ्या मुलानें लागलीच आपल्या नावानें बादशाहीची द्वाही फिरवली व कामबक्षास दक्षीणेचें राज्य द्यावयाचें कबूल करून त्यास आपल्या पक्षास वळवून घेतलें. परंतु मोअजीम हा गादीचा खरा वारस असल्यामुळें त्यानें तत्काळ प्रचंड सैन्यानिशीं हिंदुस्थानात येऊन व बहादूरशहा हें नाव धारण करून आपल्या नावानें द्वाही फिरविली. त्यामुळें दिल्लीस उभय बंधूचे कलह सुरू होऊन अनायासें तिसऱ्यास आपला फायदा करून घेता आला. औरंगजेबाच्या संशयी व ग्रही स्वभावानें सर्व मुसलमान सरदार स्वतंत्र झाले होते, व धर्माच्या बाबतींत अतिशय जुलूम केल्यामुळें सर्व हिंदु लोकास अगदीं त्राहि त्राहि झालें होतें. त्यामुळें तो मृत्यु पावताच सर्वत्र गोंधळ माजून राज्यव्यवस्थेचीं सूत्रें एकदम बिघडून गेलीं, व ठिकठिकाणचे प्रबळ सरदार स्वतंत्र होऊन निरनिराळीं राज्यें स्थापण्याचा विचार करूं लागले. ह्याच समयास दिल्लीच्या गादीसबंधानें

* ह्यावेळच्या स्थितीचें एका इंग्रज ग्रंथकारानें पुढील हुबेहूब चित्र दिलें आहे:—

"... Every-where the Empire had been shaken to its foundation, and was breaking up The administrative system had been disarranged, revolutions at Court, and wars of succession followed each other with accelerated rapidity, the Emperor had become a puppet in the hands of his

दोघा भावांमध्यें तटे लागल्यामुळें बहादुरशहा आपल्या पक्षास बळकटी आणण्याकरिता प्रबल राजे लोकाशीं दोस्तीचे तह करू लागला. त्यानें शाहू महाराजाची कैदेंतून सुटका केली व मराठ्याशीं सख्य करण्याचा घाट घातला. त्याचप्रमाणें बुंदेल्याचा अध्वर्यु राजा छत्रसाल ह्याच्याकडे आपला दिवाण खानखानन ह्याच्या मध्यस्तीनें दोस्तीचा खलिता पाठवून त्यास लोहगड नामक किल्ला घेण्याचे कामीं साह्यास बोलाविलें. हा किल्ला फार बळकट असल्यामुळें तो बादशाहाच्या ताब्यामध्यें येत नव्हता. तेव्हां छत्रसालानें बादशाहाची विनति मान्य करून तो किल्ला त्यास जिंकून दिला. त्या योगानें बहादुरशहास परम हर्ष होऊन त्यानें छत्रसाल राजाला मुद्दाम दिल्लीदरबारीं पाचारण केलें व त्याचा फार आदरसत्कार करून त्यास त्याच्या योग्यतेनुरूप बादशाही मनसब देण्याची इच्छा दर्शविली. त्या वेळीं छत्रसालानें मोठ्या नम्रतेनें त्यास असें सांगितलें कीं, माझ्या ताब्यात दोन कोटींचा मुलूख आहे व त्याल हिऱ्याच्या अनेक खाणीही आहेत. त्या अर्थी बादशाही मनसबेची मला मुळींच गरज नाहीं. हें स्वाभिमान व स्वातंत्र्यप्रियता ह्यांचे द्योतक असें उत्तर ऐकून बहादुरशहास व त्याच्या दरबारी मंडळीस

---

ministers, and feebly endeavoured to buy off hostility by concession, and to guard against rebellion by promoting divisions among his national servants Wild tribes and adventurous chieftains were preying on the vitals of the State, and draining its resources by their depredations Soon it was to become a question with each ambitious Satrap, whether he should not withdraw altogether his allegiance to so effete an authority, and constitute himself an avowedly independent potentate."

—*India on the Eve of the British Conquest* p 174.

फार आश्चर्य वाटलें. शेवटीं बहादुरशहानें, छत्रसाल नको नको म्हणत असतां आपलें सार्वभौमत्व स्थापित करण्याच्या उद्देशानें त्यास त्यानें मिळविलेल्या सर्व प्रांताची सनद करून दिली, व त्यास स्नेहभाव राखण्याबद्दल प्रार्थना करून स्वदेशामध्यें जाण्याबद्दल निरोप दिला. येणेंप्रमाणें छत्रसाल राजानें स्वपराक्रमानें सर्व बुंदेलखंड काबीज करून व खुद्द दिल्लीदरबारावर आपली छाप बसवून पन्ना येथें स्वतंत्र रीतीनें राज्यकारभार चालू केला.

---

* 'छत्रप्रकाश' ग्रंथामध्यें छत्रसाल राजानें बादशहाकडून मनसब वगैरे कांहीं घेतली नाहीं असें लिहिलें आहे; पण 'बुंदेलखंड ग्याझीटियर'—मध्यें बहादुरशहानें नबाब खानखानचच्या शिफारशीवरून छत्रसालाचे बुंदेलखंडावरील सर्व हक्क मान्य केले असें लिहिलें आहे

# भाग ३ रा.

## मराठ्यांची बुंदेलखंडावर स्वारी.

औरंगजेब मृत्यु पावल्यानंतर दिल्लीच्या दरबारांत कलह सुरू होऊन मुसलमानी राज्यसत्तेचा जोर दिवसेंदिवस कमी होत चालला. औरंगजेबाच्या मागून बहादुरशहा दिल्लीच्या तक्ताचा अधिपति झाला, परंतु तो स्वतः दुर्बळ असल्या-मुळें त्यानें शाहू राजाची सुटका करून मराठ्यांशीं सख्य करण्याचा प्रयत्न केला व तिकडे बुंदेलखंडांतील छत्रसाल राजाबरोबर दोस्तीचा तह करून त्यास सर्व बुंदेलखंडाची सनद दिली. त्यामुळें मराठे, बुंदेले हे स्वतंत्र होऊन आपल्या पराक्रमानें स्वराष्ट्रांचा उत्कर्ष करूं लागले. राजा छत्रसाल हा पन्ना येथें आपली राजधानी संस्थापित करून सर्व बुंदेलखंडावर उत्तम रीतीनें राज्यकारभार चालवूं लागला व राजा शाहू हा दक्षिणेंत गेल्यानंतर सातारा येथें हिंदुपदपादशाहीची मुख्य राजधानी करून सर्व महाराष्ट्राचीं राज्यसूत्रें चालवूं लागला. त्या दोघांनींही आपल्या प्रजेस अतिशय सुख दिलें व मुसलमा-नांच्या राज्यछलानें व धर्मछलानें त्रस्त झालेल्या हिंदु प्रजेस फार संतुष्ट केलें. त्यामुळें त्यांची सत्कीर्ति सर्व हिंदुस्थानामध्यें दुमदुमूं लागली. भूषण कवीनें छत्रसाल राजाच्या कारकीर्दीचें जें सुरस वर्णन केलें आहे, त्यामध्येंही त्यानें शाहू व छत्रसाल ह्या दोघांची स्तुति केली आहे. ती येणेंप्रमाणें:—

चाकचक चमूके अचाकचक चहूं ओर
चाकसी फिरत धाक चंपतिके लालकी।
भूषण भणत बादशाही मारि जेर करि
काहू उमराव ना करेरी करबालकी॥
सुनि सुनि रीति बीर दैतके बडप्पनकी
थप्पन उथप्पनकी रीति छत्रसालकी।
जग जीति लेवा ते वै व्हे कै दाम देवा
भूपसेवा लागे करन महेवामहि पालकी॥१॥
भुजभुजगेशके वै संगिनी भुजंगिनीसी
खेदि खेदि खाती देह दारुण दलनकें।
बखतर पाखरनि बीच धसि जात
मीन पैरी पारजात परबाह ज्यों जलनके॥
रैयाराव चंपतिके छत्रशाल महाराज-
भूषण सकतको बखानियों बलनके।
पछीपर छीने ऐसे परेपर छीने बीर
तेरी बरछीने बर छीने हैं खलनके॥२॥
राजत अखंड तेज छाजत सुजश बडो
गाजत गयन्द दिग्गज निहिये शालको।
जाके परतापसों मलिन आफताब होत
ताप तजि दुर्जनकरत बहू ख्यालको॥
साजि सजि गज तुरी कोतल कतारैं
दीन्हे भूषण भनत ऐसो दीन प्रतिपालको।
और राजा राव मन एक हू न ल्याऊं
अब साहूको सराहौं की सराहौं छत्रशालको॥३॥

बुंदेलखंडामध्यें छत्रसाल राजानें बुंदेल्याचा अभ्युदय करण्याचा जसा प्रयत्न चालविला होता तसा इकडे दक्षिणेमध्यें शाहूनेंही मराठ्याचा अभ्युदय करण्याचा यत्न केला. सुदैवानें त्या समयास महाराष्ट्रामध्यें एकापेक्षा एक वरचढ अशीं नररत्नें निर्माण झाल्यामुळें

बुंदेल्यांशीं महाराष्ट्रीयांची कर्तृत्वशक्ति अधिक प्रकाशित होऊन त्याची सत्ता महासागराप्रमाणें अतिशय विस्तार पावत चालली, व अखेर छत्रसालासारख्या परमप्रतापी बुंदेल्या राजासही दि्. आश्रयाखालीं जाऊन आपलें संरक्षण करून घेणें भाग पडलें, तो वृत्तांत ह्या भागामध्यें संक्षेपेंकरून सादर करावयाचा आहे

बहादुरशहा सन १७१२ साली मृत्यु पावला, व त्याच्या मागून फिरुकशीर हा दिल्लीच्या सिंहासनावर बसला. हा बादशाहा नावाचा मात्र धनी असून सर्व राज्यकारभार अबदुल्ला व हुसेनअलीखान नावांच्या सय्यद बंधूंनीं चालविला होता. हे दोघे पुरुष मोठे मसलती, धाडसी व महत्वाकांक्षी होते. त्यांनीं दिल्लीदरबारांतला मुख्य मुत्सद्दी झुल्पिकारखान ह्यास ठार मारून सर्व अधिकार आपल्याकडे घेतला होता व फिरुकशीर बादशाहास फक्त बाहुलें करून ठेविलें होतें. त्याच्याच साह्यानें मीर कमरुद्दीन ऊर्फ चिनकुलिचखान नामक एका महाराजकारस्थानी पुरुषाची दक्षिणचा सुभेदार दाऊद-खान ह्याच्या जागीं योजना झाली, परंतु तो लवकरच त्या उ॰ सय्यद बंधूंचा नाश करून सर्व दक्षिण हिंदुस्थानचें स्वामित्व आपल्या हातीं येईल असा यत्न करूं लागला. हा चिनकुलिचखान ह्मणजे इतिहासप्रसिद्ध निजामउल्मुल्क होय.

इकडे दिल्लीदरबारामध्यें उभय सय्यद बंधूंचें फिरुकशीर बाद-शाहावर दिवसेंदिवस जास्त वर्चस्व होऊं लागलें व तो त्यातून मुक्त होण्याकरितां गुप्तपणे बेत करूं लागला. त्यानें त्या दोघा बंधूंची फोडाफोड करून त्यांची सत्ता कमी करण्याच्या उद्देशानें सय्यद हुसेनअली ह्यास दक्षिणच्या सुभ्यावर पाठविलें, व निजामउल्मुल्क ह्यास मुरादाबाद येथील सुभेदारी दिली. एवढ्यानें फिरुकशीर बादशाहाचा कार्यभाग साधत नसल्यामुळें त्यानें सय्यदांच्या प्रति-स्पर्ध्यांस आपल्या बाजूस वळविण्याचा प्रयत्न चालविला. गुजराथचा

सुभेदार दाऊदखान पन्नी, हा सय्यद हुसेन ह्याचा पूर्वीचा शत्रु असल्यामुळें त्यास, मराठ्याचें साह्य घेऊन सय्यद हुसेनाचा हरतऱ्हेनें नाश करावा ह्मणजे दक्षिणची सुभेदारी देण्यात येईल, असा हुकूम पाठविला. त्याप्रमाणें दाऊदखान ह्यानें हुसेनअल्लीबरोबर लढाई केली, परंतु तींत त्याचाच अत झाला. अशा तऱ्हेनें दिल्लीच्या प्रमुख अधिकाऱ्यात अनेक प्रकारचीं वैमनस्यें माजून जो तो एकमेकाच्या नाशार्थ उद्युक्त झाला आहे, अशी संधि पाहून मराठ्यानीं मुसलमानांच्या ताब्यातील मुलूख जिंकण्याचा एकसारखा सपाटा चालविला. त्यावेळचे शूर मराठे सरदार खंडेराव दाभाडे, कंठाजी कदम, परसोजी भोंसले, वगैरेंनीं मोंगलाची अगदीं त्रेधा उडवून दिली, आणि मराठ्याची सत्ता दूरवर संस्थापित केली, त्यामुळें मुसलमान सुभेदारास मराठ्यांशीं सख्य केल्यावाचून स्वसरक्षणाचा मार्ग राहिला नाही. सय्यद हुसेन ह्यानें बादशाहाच्या वतीनें शाहू महाराजाशीं सख्य करण्याचा बेत केला; व शाहूचा वकील शंकराजी नारायण ह्याबरोबर, "दिल्लीच्या बादशाहानें दक्षिणेंतील सहा सुभे, व तंजावर, त्रिचनापल्ली व म्हैसूर ह्या राज्याची चौथाई व सरदेशमुखी मराठ्यास द्यावी, स्वराज्याची सनद करून द्यावी, शिवनेरी व त्रिंबक हे किल्ले परत द्यावे; शिवाय गोंडवण व वऱ्हाड यांतील जो मुलूख सेनासाहेबसुभे कान्होजी भोंसले ह्यानीं घेतला असेल तो द्यावा, आणि शाहू महाराजाची मातुश्री येसूबाई व दुसरीं त्याच्या कुटुंबाचीं माणसें जीं दिल्लीस राहिलीं आहेत त्यास दक्षिणेंत पाठवून द्यावें. व ह्याप्रमाणें सर्व कामें झालीं तर शाहू महाराजानीं दरसाल १० लाख रुपये बादशाहास खंडणी द्यावी; सरदेशमुखीबद्दल मुलुखाचा बंदोबस्त ठेवावा, चोरटे लोकाचा उपद्रव बंद करावा, व चोरी झाली असता जें नुकसान होईल तें भरून द्यावें; चौथाईबद्दल १५००० फौजेनिशीं त्यानीं बादशाहाची नोकरी

करावी. व त्याच्या सुभेदारांस लागेल तें साह्य करावें, इ० इं०,"* ह्याप्रमाणें कलमें ठरविलीं. मराठ्यांस बादशाहाशीं सख्य करून आपला फायदा साधून घेण्याची इच्छा होतीच, त्यामुळें त्यांनी हीं कलमें मान्य करून हुसेनअल्लीस दहा हजार सैन्याची कुमक दिली व संताजी व परसोजी भोंसले, उदाजी पवार वगैरे सरदारांस तिचें आधिपत्य सांगितलें. फिरुकशीर बादशाहा सय्यदांच्या विरुद्ध असल्यामुळें त्यानें हा तह पसत न करितां निजामउल्मुल्क, सादतखान, राजा जयसिंग वगैरेंच्या मसलतीनें त्यास ठार मारण्याचा बेत चालविला. ही गोष्ट हुसेनअल्लीस कळतांच त्यानें मराठ्याची जास्त मदत घेऊन दिल्लीस जावें, व आपल्या प्रतिस्पर्ध्यांचें पारिपत्य करावें असा निश्चय केला. मराठ्यांना कोणीकडून तरी उत्तर हिंदुस्थानांत प्रवेश करून आपलें हित साधावयाचें होतेंच. तेव्हा शाहू राजानें बाळाजी विश्वनाथाच्या हाताखाली आणखी सैन्य देऊन त्यास दिल्लीकडे पाठविलें, व सैन्याचा खर्द- आणि दौलताबाद व चांदा हे दोन किल्ले, व गुजराथ व माळवे ह्या दोन प्रांतांच्या चौथाईचा हक्क सपादन करावा असें सांगितलें. त्याप्रमाणें बाळाजी विश्वनाथ पेशवे हे बाळाजी महादेव भानू व संताजी भोंसले ह्यांसह सय्यद हुसेनअल्लीबरोबर दिल्लीस गेले. तेथें सय्यदाचें व बादशाही सैन्याचें तुमुल युद्ध झालें. त्यांत मराठ्यांच्या शौर्यामुळें सय्यदांस यश येऊन त्यांनीं फिरुकशीर बादशाहाचा वध केला व आपल्या मर्जीप्रमाणें रफिउद्दर्जात व रफिउद्दवला ह्या दोन मुलांस अल्पावकाशानें दिल्लीच्या तक्तावर बसविलें. परंतु ते अल्पवयी बादशाहा लवकरच मरण पावल्यामुळें मोअजीमचा नातू रोषनअखत्यार ह्यास महमदशाहा असें नांव देऊन बादशाहीचीं वस्त्रें दिलीं; व सर्व राज्यकारभार सय्यद बधूंनीं

---

* *Grant Duff's History of the Mahrattas p.* 178.

आपल्या हातात ठेविला. ह्या दिल्लीच्या मोहिमेमध्यें मराठ्यांचें पुष्कळ सैन्य व बाळाजी महादेव भानू* व संताजी भोंसले वगैरे सरदार ठार मारले गेले. परतु सय्यद बंधूनीं मराठ्यांचे कृतोपकार स्मरून त्याना चौथ, सरदेशमुखी व स्वराज्य ह्यांच्या सनदा बादशाही शिक्यानिशीं दिल्या व त्याच्याशीं ठरविलेलीं सर्व कलमें अमलात आणून त्याना खुष केलें. आणि त्याचा स्नेहभाव कायम ठेवण्याकरिता देवराव हिंगणे नामक एका हुषार वकिलास शाहू महाराजाच्या तर्फे दिल्लीदरबारात ठेवून घेतलें. येणेंप्रमाणें उत्तम यश सपादन करून व दिल्लीदरबारात मराठ्यांचें वर्चस्व कायम करून बाळाजी विश्वनाथ पेशवे दक्षिणेंत आले, परतु पुढें ते लवकरच मृत्यु पावले. त्याच्या मागून त्याचे पुत्र बाजीरावसाहेब ह्यास शाहू महाराजानीं पेशवाईचीं वस्त्रें दिलीं. ह्याची कारकीर्द ह्मणजे मराठ्यांच्या वैभवोन्नतीचा ऐन बहार होय. ह्या पेशव्यानें आपल्या बापापेक्षाही बहुत करामत दाखवून आपल्या अगाध चातुर्यानें, अप्रतिम राजकारस्थानपटुत्वानें व अपार रणशौर्यानें आपल्या यजमानाची मर्जी पूर्ण प्रसन्न करून सोडली व त्याच्याकडून 'तुह्मासारखे कर्ते पदरीं असता

---

* बाळाजी महादेव भानू हे नाना फडनविसाचे आजे. हे दिल्लीस असता ज्या वेळीं बादशाहाकडून चौथाई व सरदेशमुखीच्या पेशव्यास सनदा मिळाल्या त्या वेळीं कामास आले असें ह्मणतात. त्या सनदा पेशव्यास दक्षिणेंत नेऊं द्यावयाच्या नाहींत असा दिल्लीच्या सरदारानीं निश्चय केला होता. त्या वेळीं बाळाजी महादेव यांनीं बाळाजी विश्वनाथास खऱ्या सनदा देऊन पायवाटेनें मराठ्यांच्या गोटात पाठविलें व आपण खोट्या सनदा घेऊन पेशव्यांच्या पालखींतून निघाले. तेव्हां मुसलमान सरदारानी तेच पेशवे असें समजून त्याना ठार मारिलें व त्यांच्या सनदा हिसकावून घेतल्या ! पण इकडे खऱ्या सनदा मराठ्यांनीं दक्षिणेंत आणल्या. त्यामुळें त्यांची निराशा झाली व मराठ्यांचा एक सरदार बळी पडून सर्व महाराष्ट्राचें अतिशय कल्याण झालें.

हिमालयाच्या पलीकडील दुसरे किन्नरखंडाचें राज्यही साधता येईल' असे गर्वोद्गार काढविण्यास कमी केलें नाहीं. त्यानें पराक्रमपटु शिंदे, होळकर, पवार, गायकवाड, जाधव इत्यादि मराठे सरदारांच्या साह्यानें गुजराथ, खानदेश, माळवा वगैरे प्रांतावर स्वाऱ्या करून तेथील मुसलमान सुभेदाराची खोड मोडण्याचा व खंडण्या घेण्याचा एकसारखा क्रम चालविला. त्यामुळें उत्कृष्ट भूमींतील जोमदार वृक्षास ज्याप्रमाणें भरपूर जीवन मिळालें असता तो जोरानें वळावत जातो व आपल्या बहुविध शाखांच्या विस्तारानें आसमंतातील सर्व प्रदेश व्यापून टाकितो, त्याप्रमाणें महाराष्ट्रराज्यसत्तेच्या जोमदार वृक्षानें हिंदुस्थानातील बरेच भाग व्यापून टाकिले. व तिकडे बुंदेलखंडांत प्रबल झालेल्या बुंदेल्याच्या सत्तातरूशीं त्याचा मिलाफ होऊन तो अगदीं एकजीव झाला. मध्यतरीं दिल्लीपतीच्या कित्येक मुसलमान सरदारानीं ह्या दोन्ही वृक्षावर कुठारप्रहार करून त्यांचा उच्छेद करण्याचा प्रयत्न केला. परंतु वामनपंडितानीं ह्मटल्या-प्रमाणें 'कीं तोडिला तरु फुटे अणखी भरानें' असा आनंददायक प्रकार होऊन तो अधिक जोरदार मात्र झाला. महाराष्ट्रराज्यसत्तेवर घाव घालण्याकरिता निजामउल्मुल्क वगैरे सरदारांनीं कसे जंग जंग पछाडले हें महाराष्ट्रेतिहासज्ञास निराळें सांगावयाची आवश्यकता नाहीं. तेव्हां बुंदेल्याच्या सत्तेचा भंग करण्याचा मुसलमानांनी कसा प्रयत्न केला व अनायासें कलम झालेल्या भागावर महाराष्ट्रराज्य-सत्तेची दूरवर पसरलेली शाखा कशी जडून चिकटली त्याचाच फक्त विचार करणें प्रस्तुत स्थलीं इष्ट आहे.

छत्रसाल राजा पन्ना येथें स्वतंत्रपणें राज्य करूं लागल्यानंतर त्यास अनेक वेळां मुसलमान सुभेदारानीं त्रास दिला, व त्याच्या ताब्यातील प्रांतावर वारंवार हल्ले केले. त्यामध्यें फरुकाबादचा नबाब महमदखान बंगष हा प्रमुख असून त्यानें छत्रसालाचा नाश

करण्याकरितां अनेक युद्धें केलीं. छत्रसालानें व त्याच्या पुत्रांनीं पुष्कळ वर्षे त्याच्याशीं टिकाव धरून अनेक वेळां महमदखानाचा व त्याच्या सरदारांचा पराभव केला. परंतु अखेर महमदखानानें दिल्लीच्या बादशाहाच्या साह्यानें बुंदेलखंडांतील अनेक राजे लोकांची कुमक घेऊन व स्वतः जंगी फौज तयार करून छत्रसालास जमीनदोस्त करण्याचा संकल्प केला. त्यामुळें त्या वृद्ध राजाचा उपाय हरून त्यास मराठ्यांची मदत घेणें भाग पडलें. महाराष्ट्रराज्यसंस्थापन करणारा मूळपुरुष जो शिवाजी त्याचा व छत्रसाल राजाचा पूर्वींचा स्नेहसंबंध असल्यामुळें मराठ्यांनीं त्यास साह्य करून तो पुनः दृढ केला. ही मनोवेधक हकीकत सांगण्यापूर्वीं महमदखान बंगषाचा मूळ वृत्तांत सांगणें अवश्य आहे.

महमदखान बंगष ह्याची स्वदेशभूमि कोहात ही असून त्याचे पूर्वज तेथील बंगष नावाच्या दरीमध्यें राहत होते, ह्मणून त्यास बंगष असें ह्मणत असत. त्याच्यापैकीं मलिक तेजखान नावाचा एक पठाण ह्या औरंगजेब बादशाहाच्या कारकीर्दींत हिंदुस्थानांत आला व तो मऊराशिदाबाद येथें येऊन राहिला. त्यास हिंमतखान आणि महमदखान असे दोन मुलगे होते. त्यांपैकीं महमदखानानें यासीनखान बंगष नांवाच्या सरदाराच्या फौजेमध्यें नोकरी पत्करून बुंदेलखंडामध्यें व दक्षिणेमध्यें चाललेल्या युद्धामध्यें आपलें नशीब काढलें. व त्यावेळच्या रीतीप्रमाणें थोडें थोडें सैन्य जमवून तो लवकरच शक्तिमान् सरदार बनला. पुढें फिरुकशीर बादशाहाच्या कारकीर्दींमध्यें त्यानें सय्यद बंधूंस चांगलें साह्य करून बादशाहाची कृपा संपादन केली. त्यामुळें त्यास चार हजार स्वाराची मनसब, नबाबाची पदवी, व सैन्याच्या खर्चाकरितां बुंदेलखंडांतील इरिच्छ, भांडेर, कुंच, काल्पी, सिहोंदा, मौधा, सिम्री आणि जालवण ह्या आठ परगण्यांची जहागीर, इतकें मिळालें. त्यांवर त्यानें दलेलखान, अहमदखान,

पीरखान, व सुजातखान ह्याची योजना केली. नंतर त्यानें ठिक-ठिकाणी अनेक पराक्रम करून काईमगज, अहमदाबाद व फरुकाबाद हीं शहरें वसविलीं. फिरुकशीरच्या सर्व कारकीर्दीमध्यें दिल्लीच्या दरबारीं अनेक घोटाळे सुरू असल्यामुळें निरनिराळ्या प्रांतांवरच्या सुभेदारास ज्यास्त स्वातंत्र्य प्राप्त होऊन ते कर्तृत्व-शक्तीच्या जोरावर नवीन मुलूख जिंकूं लागले, व बादशाहास मुळींच जुमानीतनासे झाले. महमदखान बंगषही ह्याच वर्गांतील होता तेव्हा त्यानें आपला फायदा करून घेतला असेल ह्यात नवल नाहीं. असो. पुढें सय्यद बधूंचा नाश करून महमदशहा बादशाहास दिल्लीचें तक्त प्राप्त करून देण्याचे कामीं महमदखानानें बरेंच साह्य केलें, ह्मणून त्यास सप्तहजारी (७००० हजार स्वारांचा अधिकारी) हा हुद्दा, सात लाख रुपयाचें बक्षीस, 'धाजनफरजग' (रणांतला सिंह) हा किताब, आणि भोजपूर व शमशाबाद परगण्याची जहागीर इतकीं प्राप्त झालीं, व सन १७२१ मध्यें त्यास अलहाबाद प्रांताची सुभेदारी मिळाली. अशा प्रकारें महमदखानाचा भाग्योदय होऊन त्याचे दिल्लीदरबारात दिवसेंदिवस चांगलें वजन पडूं लागलें. महमदखान अलहाबादेचा सुभेदार झाल्यानंतर त्यानें अनेक सस्था-निकाना आपलें सामर्थ्य दाखवून त्यांना जेर करण्याचा क्रम आर-भिला. तेव्हा पुष्कळ दुर्बळ राजे त्याच्या प्रचंड सैन्यास भिऊन त्यास शरण गेले, पण बुंदेलखडातील स्वातन्त्र्यप्रिय व बाणेदार राजा छत्रसाल व त्याचे इतर माडलिक हे त्यास शरण न जाता उलट त्याच्या प्रांतावर हल्ले करून त्याची नक्षा उतरण्याचा प्रयत्न करू लागले. त्या योगानें महमदखानाचें व त्याचें हाडवैर उत्पन्न होऊन तो त्याच्या पारिपत्याचा प्रयत्न करू लागला.

महमदखानास दिल्लीच्या बादशाहाकडून बुंदेलखडातील आठ परगण्याची जहागीर मिळाली, ह्मणून पूर्वी सांगितलें आहे; परंतु त्या

प्रातावर बुंदेल्यांचा अंमल असल्यामुळें त्यांनीं त्याच्या सुभेदारास हुसकून लावून, त्याचें कांहींएक चालू दिलें नव्हतें. सन १७१९।२० मध्यें त्यानीं त्याचा मुलगा व काल्पीचा अमलदार पीरखान ह्यास ठार मारून तेथील मुसलमानांचा फडशा पाडिला, व त्यांच्या मशीदी व धरेंदारें लुटून उध्वस्त केलीं. ही गोष्ट महमदखानास व दिल्लीच्या बादशाहास असह्य होऊन त्यानीं बुंदेल्याचें पारिपत्य करण्याचा निश्चय केला. महमदखान हा त्या वेळीं बादशाहाच्या शूर सरदारामध्यें मोडत असल्यामुळें तें काम तिकडून त्याजकडेच सोंपविण्यांत आलें. त्यानें आपला प्रिय सरदार दुलेलखान ह्याची त्या कामावर योजना केली. दुलेलखानही मोठा शूर व स्वाभिमानी असल्यामुळें त्यानें बुंदेल्याची रग तेव्हांच जिरवीन ह्या बाण्यानें त्याच्यावर स्वारी केली आणि महमदखानाचा मुलगा काईमखान हाही मोठ्या आवेशानें त्याच्या मदतीस गेला.

बुंदेल्याचा शूर अधिपति राजा छत्रसाल ह्याला हें वर्तमान समजल्यातांच तोही आपले पुत्र हिरदेसा, जगत्राज, मोहनसिंग आदिकरून बरोबर घेऊन तीस हजार सैन्यानिशीं दुलेलखानावर चालून गेला. दुलेलखानाच्या व बुंदेल्याच्या पूर्वी पुष्कळ चकमकी झाल्यामुळें परस्परांचें शौर्य परस्परांस ठाऊक झालें होतें. त्यामुळें परस्पराविषयीं परस्परांच्या मनात सन्मानबुद्धि वसत होती. छत्रसाल राजाची व त्याची मौधा येथें लढाई झाली. त्या वेळीं त्याच्या मोहनसिंग व किरतसिंग ह्या दोन मुलांनीं ऐन प्रसंगीं दगा दिला. त्यामुळें छत्रसालानें त्याशीं मोठ्या चातुर्यानें सलोखा करण्याचा घाट घातला व दुलेलखानाकडे असा निरोप पाठविला कीं,

हिरदेसाहसे नहिं छली कीरतसेन कपूत ।
बेटा कहिये दुलेलसे बंगष वंत सपूत ॥
भाई महम्मद खाँनने डाऱ्यो मोरी गोद ।

तब से तुम बेटा मेरे जगत समान सुबोध ॥
* मोहन ठारा दै गये हिरदे रहे लुकाय ।
तुमहूँ कन्यात्रा देहु तौ मैं जगतै लेहुँ समझाय ॥

ह्याचा तात्पर्यार्थ:—"हिरदेसानें मला फसविलें नाहीं, परतु किरत-सेन कुपुत्र आहे. महमदखानाचा पुत्र व बंगशाच्या चांगल्या कुलांतला वंशज जो दुलेलखान त्यास मीं आपला पुत्र मानिलें आहे. आतां माझे पुत्र हिरदेसा व मोहन हे लपून बसले आहेत, त्या अर्थी दुलेलखानानें माझ्या विनतीकडे लक्ष द्यावें व मजशीं स्नेह जोडावा म्हणजे जगत्राज् त्याची समजावणी करील."

—दुलेलखान फार अभिमानी असल्यामुळें त्यानें छत्रसालाच्या विनतीप्रमाणें त्याशीं समेट न करिता त्यास असें बाणेदार उत्तर पाठविलें कीं,

तुम राजा महाराज हौ सब राजन में छज्ज ।
अब दुलेल कैसे हटै दोहू दीनकी लज्ज ॥

ह्याचा अर्थ असा कीं, "हे छत्रसाल राजा, तूं राजाधिराज असूनें अतिथोर आहेस, तेव्हां तू दुलेलला शरण ये म्हणून कसें सांगतोस? कारण जरी तूं मला पुत्र समजलास तरी तसें करणें हें उभय कुला-सही लांछनास्पद होईल. त्या योगानें बंगशच्या कुलाला कमीपणा येईल व तुझ्या शौर्यालाही कालिमा लागेल."

हें उत्तर आल्यानतर छत्रसालाची व दुलेलखानाची मोठी तुंबळ लढाई झाली. तिच्यामध्यें उभय पक्षाचा अद्वितीय पराक्रम व्यक्त झाला.

---

* हीं पद्यें, रूपब्राह्मण नावाच्या एका वृद्ध गृहस्थाकडून बांदा जिल्ह्याचे सेटलमेंट ऑफिसर मि० अलन क्याडेल ह्यानीं मिळविलीं, तीं आम्ही येथें दिलीं आहेत. दुलेलखानासबधानें पुष्कळ आख्यायिका अद्यापि त्या प्रांतामध्यें प्रचलित आहेत. हा पुरुष मूळचा राठोड जातीचा रजपूत असून त्यास महमदखानानें मुसलमान केलें होतें अशी माहिती मिळते

दुलेलखानानें आपल्या निवडक पांचशें स्वारानिशीं छत्रसाला-वर हल्ला केला, परंतु भारतीय भीष्माचार्याप्रमाणें शोभणाऱ्या त्या वयोवृद्ध रणपंडितानें दुलेलखानावर उलट चाल करून आपल्या तरवारीनें व भाल्यानें त्याच्या सैन्यास मागें हटविलें व खुद्द दुलेल-खानास आपल्या तरवारीचे अनेक वार केले. त्यामुळें तो जवानमर्द यवनवीर घायाळ होऊन रणांगणामध्यें पतन पावला.*

छत्रसाल राजानें दुलेलखानास ठार करून त्याच्या हाताखालच्या पाचशें पठाणांची लाडगेतोड केली, हें भयंकर वर्तमान महंमदखान बंगशास कळताच तो दुखविलेल्या नागाप्रमाणें खवळून

* दलेलखानाच्या शौर्याबद्दलची ख्याति अद्यापि बुंदेलखंडामध्यें ऐकू येते. त्याच्या शौर्यासंबधानें पुढील कवन बुंदेले लोक ह्मणत असतात.

गजभर छाती दलेलकी बीस बिसे का ज्वान ।
जोति में जोति समागई पायो पद निरवान ॥
सारी सरन सकेल कै मरन कियो एक ठौर ।
ज्यों पतंग दीपक जरै या बिधि धँस्यौ दलेल ॥
दिल्ली से दलेलखा चल्यो खङ्ग गहि बाँहि ।
जगतराज सहराज सों मार मौदहा बीच ॥
भई युद्ध पठानकी बह्यो रकत की कीच ॥
तीन दिवस पठान ने करो बडा घमसान ।
जगतराज कंपित भयो छोड भग्यो मैदान ॥
चौथे दिन दो पहर को घेर बुंदेलन लीन ।
तब दलेल भुईंसा गिरे खङ्ग न धाई कीन ॥

ह्यावरून बुंदेले लोकांची शौर्यप्रियता व्यक्त होते. अद्यापि देखील दलेलखानाची मौधा येथें जी कबर आहे, तेथें दर गुरुवारी बुंदेले लोक जमत असून तेथें प्रसाद वाटीत असतात, व दलेलखांप्रमाणें आपला मुलगा शूर व्हावा ह्मणून त्याच्या कबरीवरील ढाल व तरवार आपल्या मुलाच्या अंगावरून फिरवीत असतात.

गेला व छत्रसालाचा केव्हां सूड घेईन असें त्यास होऊन गेलें. त्यानें लागलेंच जंगी सैन्य तयार करून व दिल्लीचा मुख्य प्रधान अमीर-उल्-उमरा खानदौरानखान ह्याच्या मार्फतीनें दिल्लीच्या मांडलिक राजाची मदत मिळवून तो छत्रसाल राजाच्या प्रांतामध्यें एकसारखे हल्ले करीत सुटला. त्यानें सहा महिन्यांमध्यें यमुना नदी ओलांडून बांद्याच्या दक्षिणेस सिहोंदा परगण्यापर्यंत बुंदेल्याचा सर्व प्रांत काबीज करीत आणिला. तों एकाएकीं दिल्लीहून त्यास, 'ग्वाल्हेरवर मराठ्यांनीं शह दिला आहे, तेव्हां त्यांच्या पारिपत्याकरितां तिकडे जावें' असा हुकूम झाला. त्याप्रमाणें तो कांहीं दिवस ग्वाल्हेरकडे गेला. दरम्यान इकडे छत्रसालाच्या हिरदेसा वगैरे प्रमुख पुत्रांनीं सर्व बुंदेलखंड उध्वस्त करून अलहाबाद प्रांतात धुमाकूळ उडवून दिला. तेव्हा महमदखान ह्यास पुनः परत बोलावून व दरमहा दोन लाखांचा नवीन तनखा देऊन बुंदेल्याचा बंदोबस्त करण्याबद्दल दिल्लीहून लिहून आलें. तो पुन. अलहाबादेस गेला, व सैन्याची भरती करूं लागला. त्या वेळीं प्रत्येक शिपायाचा पगार सतरा रुपये व जमादाराचा पगार वीस रुपये करून त्यानें आपला मुलगा आबातखान ह्यास बऱ्याच फौजेनिशीं यमुना ओलांडून पुढें पाठविलें. ह्या वेळीं महमदखानाचे पधरा सोळा हजार घोडेस्वार व तितकेंच पायदळ होतें. शिवाय त्यानें ओरछाचा राजा उदितसिंग, दतियाचा राजा राय रामचंद्र, सिहोंदाचा जमीनदार पृथ्वीसिंग, चंदेरीचा जहागीरदार दुर्जनसिंग, मौधाचा राजा जयसिंग वगैरे बुंदेलखंडातील दिल्लीपतीचे मांडलिक राजे, व सय्यद नजमुद्दीनअल्लीखान, साबीतखान, जाननिसारखान, वजारतअल्लीखान, वगैरे वडे वडे मुसलमान सरदार आपल्या साह्यास बोलाविले होते. त्यामुळें तो फार प्रबल होऊन त्यास छत्रसाल राजाचा तेव्हाच पराभव करीन अशी फार घमेंड वाटू लागली.

ह्या वेळीं छत्रसालाकडेही सुमारें वीस हजार स्वार व एकंदर एक लाख पायदळ इतकें सैन्य होतें. परंतु छत्रसाल हा अनेक युद्धें करून अगदीं थकला होता व वार्धक्यामुळें आतां त्याच्या अंगात शत्रूशीं टक्कर देण्याची कुवत राहिली नव्हती. त्याचे पुत्र त्याच्याप्रमाणेंच पराक्रमी होते, परंतु ते परस्पराविषयीं मत्सरग्रस्त असल्यामुळें त्यांच्या हातून राजधोरण राखून युक्तीनें शत्रूचा नाश करण्याची सर्व जबाबदारी तडीस जाण्याची विशेष आशा नव्हती. इकडे महमदखान आपला अजिंक्य सेनासमूह घेऊन बुंदेलखंडातील एक एक किल्ला काबीज करीत अगदीं समीप येत चालला होता. त्यानें चौखंडी, गढककरेली, मऊ वगैरे किल्ले पादाक्रांत करून सुमारें शंभर कोस प्रांत हस्तगत केला व तारावन येथें बुंदेल्यास शह देऊन सुमारें दहा महिनेपर्यंत त्यांस त्राहि त्राहि करून सोडलें. महमदखानाचा मुलगा काईमखान ह्यानें व इतर मुसलमान सरदारांनीं बुंदेल्यांची अगदीं त्रेधा उडवून दिली. इकडे वृद्ध वीराग्रणी राजा छत्रसाल व त्याचे मुलगे हिरदेसा व जगत्‌राज, ह्यांनींही मुसलमान सैन्याशीं घनघोर युद्धें करून जागोजाग आपली मर्दुमकी व्यक्त केली. बंगषच्या फौजेची बाजू जास्त खंबीर असल्यामुळें प्रत्येक लढाईमध्यें बुंदेल्यांची पिछेहाट होऊं लागली. तेव्हां त्यांनीं माळवा व गोंडवणचे जमीनदार व गोंड व परिहार जातीचे लोक गोळा करून महमदखानाशीं एकदा निकरानें लढण्याचा प्रयत्न केला. महमदखानानेंही आपल्या सैन्यात नव्वद हजार रुपये वांटून सर्वांस निकरानें लढण्याबद्दल ईर्षा उत्पन्न केली. छत्रसालाकडील बुंदेले लोकही वीर्योत्साहप्रेरक रणघोष करूं लागले. उभय पक्षाकडील सैन्यें जेतपूरच्या दक्षिणेस कांहीं कोसावर येऊन समरांगणात उभीं ठाकलीं आणि लढाईस प्रारंभ झाला. उभय पक्षानीं जिवापाड मेहनत करून विजयश्रीस आळविण्याचा

प्रयत्न केला. बुंदेले लोक मुसलमान सैन्यावर वाघासारखे तुटून पडूं लागले व महमदखानही आपल्या शूर पठाणास 'बहादुरो, इही वक्त बहादुरीका है' असे उत्तेजनपर शब्द उच्चारून त्याच्याकडून निकरानें युद्ध करवूं लागला. बुंदेले लोकांनींही आपली पराकाष्ठा केली व आपल्या बाणांच्या व तरवारींच्या अद्वितीय प्रभावानें त्यांनीं महमदखानास दिपवून सोडलें. उभय पक्षाचे मोठे मोठे वीर ठार झाले व सायंकाळीं महमदखानाचा व छत्रसालाचा हत्ती समोरा-समोर भिडून तरवारीची टिपरघाई सुरू झाली. बुंदेले लोकांची [illegible] होऊन त्यांस यश येणार असें पाहताच महमदखानानें अतिशय शिताफीनें छत्रसालाच्या हत्तीवर आपली बर्ची फेंकून त्यास घायाळ केलें. त्या सपाट्यात छत्रसालासही जबर जखम लागून तो मूर्च्छित झाला. त्यामुळें युद्धाचा शेवट होऊन बुंदेल्यास अप-यश आलें, व छत्रसाल राजास त्याच्या एकनिष्ठ सेवकांनीं मोठ्या युक्तीनें बुंदेल्यांच्या लष्करात आणिलें.*

* छत्रसाल आपल्या लष्करात आल्यानंतर शुद्धीवर आला व युद्धाम-कोणाचा जय झाला ह्मणून विचारूं लागला, तेव्हां जवळच्या सरदारांनीं सांगितलें कीं, 'अद्यापि कोणाचाच जय झाला नाही महाराज बे-शुद्ध झाले तेव्हा आह्मी आठ दहा मैल मागें हटलों व पुन: आता लढाई करण्यास सिद्ध झालो आहोंत' हें उत्तर ऐकताच छत्रसालाचे डोळे रक्तासारखे लाल झाले व त्यानें आपल्या सर्व सरदार लोकास ओर-डून असें सांगितलें कीं, 'प्राण गेला तरी पत्करेल पण मी महमद-खानास कधींच पाठ दाखविणार नव्हतों, असें असून तुह्मी मला का आणलें ? छे, छे, तुह्मी माझ्या कीर्तीला कलंक लाविला ! चला, न्या मला रणात किंवा देहांत करा माझा अत', हे शब्द ऐकून सर्व शूर बुंदेले अगदी स्तब्ध झाले व त्यानी इकडूच युक्तीनें त्याचें सांत्वन करून त्याचा राग कमी केला

अशा रीतीनें छत्रसालाचा पराभव होऊन दिवसेंदिवस त्याचे लढाऊ लोक जाया होत चालले; प्रांताचा बदोबस्त कमी झाला, व भगीरथ प्रयत्नानें मिळविलेलें स्वातंत्र्य व स्वराज्य ह्यांच्यावर वृद्धापकाळींच दुर्दैवाचा घाला पडून सर्व बुंदेलखंड पुनः यवनाक्रांत होतें कीं काय अशी त्यास भीति पडली. तेव्हा त्यानें महाराष्ट्रांतील गोब्राह्मणप्रतिपालक क्षत्रियकुलावतंस श्रीमत छत्रपति शाहू महाराज ह्यांचे पट्टप्रधान थोरले बाजीरावसाहेब पेशवे ह्यांचें साह्य घेऊन यवनाच्या जाचांतून मुक्त व्हावें असा बेत केला, व त्याप्रमाणें त्यानें पेशव्याच्या दरबारीं आपला एक चतुर वकील पाठविला. त्याच्या बरोबर त्यानें करुणरसानें ओतप्रोत भरलेलें असें एक विनतिपत्र देऊन त्यात हिंदुस्थानी भाषेमध्यें शंभर दोहरे लिहिले होते. त्यांत पुढें लिहिल्याप्रमाणें एक दोहरा होता:—

### दोहरा

जो गत ग्राहगजेंद्रकी सो गत भइ है आज ।
बाजी जात बुंदेलनूकी राखो बाजी लाज ॥ १ ॥*

* ह्या दोहऱ्याचीं निरनिराळीं पाठांतरें वाचण्यांत येतात. त्यांपैकीं चरखारी संस्थानाच्या इतिहासांत जें पाठांतर आहे, तें जास्त विश्वसनीय दिसतें. तें असें:—

जो बीति गजराजपर सो बीती अब आय ।
बाजी जात बुदेलकी राखो बाजी राय ॥ १ ॥

ह्याचें इंग्रजी व मराठी भाषांतर खालीं लिहिल्याप्रमाणें:—

What befel Gajraj has come to pass now,
The Bundela's wager is being lost, save him O Baji Rao

जी गति झाली गँजेंद्राची । तीच आज आमची साची ।
बाजी जाते बुंदेल्याची । राखी बाजी राजया ॥ १ ॥

वरील दोहरा वाचून कोणासही मराठ्याच्या त्यावेळच्या रणशौर्याबद्दल अत्यंत अभिमान वाटल्यावांचून राहणार नाहीं. बुदेलखंडामध्यें देखील हा दोहरा फार लोकप्रिय आहे.

नक्रानें गजेंद्रास ग्रस्त केलें, त्या वेळीं जसा गजेंद्रानें विष्णूचा धावा केला, व त्यास त्याची जशी दया आली त्याप्रमाणें यवनांच्या पेचांत सापडलेल्या हिंदुधर्माभिमानी बुंदेल्या राजाची ही नम्र विनति श्रवण करून श्रीमत बाजीरावसाहेबाचें अंतःकरण अगदीं दयार्द्र झालें व त्यानीं छत्रपति महाराजांची या कामीं परवानगी घेऊन बुंदेलखडावर स्वारी करून यवनाचें पारिपत्य करण्याचा सकल्प केला. *

मराठ्यांच्या सैन्यानें माळव्याचा सुभेदार दायबहादूर ह्याला ठार मारून तेथें प्रवेश केला होता, ह्मणून बाजीरावसाहेब माळव्यात आल्यानतर मल्हारराव होळकर, विठ्ठल शिवदेव विंचूरकर, पिलाजी जाधव वगैरे सरदार व त्यांच्या हाताखालचे रणशूर लोक यास बरोबर घेऊन सुमारें बावीस दिवसात बुंदेलखडात येऊन दाखल झाले. त्याचे एकंदर प्रमुख सरदार बारा असून फौजेची संख्या सत्तर हजारावर होती.

महमदखानानें बुंदेले लोकाचा अतिशय पराभव करून त्यां

---

* ह्या स्वारीबद्दल निरनिराळे ग्रथकार निरनिराळ्या हकीकती देतात व सनाचा तर कोठेंच मेळ जमत नाहीं. ग्रांटडफ साहेब सन १७३३ मध्यें बाजीरावानें छत्रसालास साह्य करून छत्रसालाकडून झाशीचा किल्ला व सव्वादोन लक्षाचा मुलूख मिळविला असें लिहितात. (Grant Duff's History, Bom. Ed. 228) सर जॉन माल्कम ह्यांनीं सवत् १७९० (सन १७३३) हाच सन मान्य करून ग्रांटडफप्रमाणेंच हकीकत लिहिली आहे. परतु मि० डब्ल्यु. आयर्विंग ह्यांनीं फरुकाबादच्या बगष नबाबाचा जो इतिहास लिहिला आहे त्यात मार्च सन १७२९ मध्यें मराठ्याची महमदखान बंगषाची लढाई झाली असें लिहिलें आहे. हा इतिहास सगळ्यात जास्त महत्त्वाचा असल्यामुळें हाच सन मान्य करणें भाग आहे.

पुष्कळ मुलूख काबीज केल्यामुळें तो विजयानंदानें फुगून गेला होता, व त्यास बुंदेल्याची फारशी भीति वाटत नव्हती. त्यानें आपल्या फौजेस रजा देऊन तिला अलहाबादेस पाठविलें, व बरेच लोक बुंदेलखंडांत नवीन काबीज केलेल्या ठाण्यावर पाठविले. त्यामुळें त्याजवळ आता सुमारें चार हजार घोडेस्वार मात्र राहिले होते. त्या समयीं मराठे लोक माळव्याचा नाझीम गिरिधरबहादूर, ह्याचा वध करून बुंदेलखंडावर चढाई करून येत आहेत अशा बातम्या त्यास कळूं लागल्या, परंतु तो आपल्या प्रतापाच्या प्रौढीमध्यें गढून गेला असल्यामुळें त्यास त्या खऱ्या वाटेनात. शेवटीं मराठ्यांचें सैन्य त्याच्या लष्करापासून सुमारें नऊ दहा कोसावर येऊन ठेपलें, असें जेव्हां समजलें तेव्हां त्याचे डोळे उघडले, व मग तो घाईघाईनें सैन्याची जमवाजमव करूं लागला. त्याच्या पक्षास पूर्वी जे राजे लोक मिळाले होते, ते श्रीमंत बाजीरावसाहेबांचा शौर्यमहिमा ऐकून अगदीं तटस्थ राहिले. फक्त मोंधाचा राजा जयसिंग व ओरछाच्या राजाचा धाकटा भाऊ कुंवर लक्ष्मणसिंग, ह्या दोघावाचून त्यास साह्य करण्यास कोणी आले नाहीं. दारूगोळा वगैरे संपून गेला असल्यामुळें त्यानें दिल्लीहून तो मागविला, परंतु आयत्या वेळेस तो कशानें येणार? अशा प्रकारची त्याच्या सैन्याची अव्यवस्था होती तरी त्यास स्वसामर्थ्याची पूर्ण खात्री असल्यामुळें त्यानें आपलें सर्व सैन्य एकत्र करून व त्याच्या सभोंवतीं एक खंदक तयार करून विरुद्ध पक्षाचें कांहीं चालणार नाहीं असा कडेकोट बंदोबस्त केला.

मराठे लोकही लढाईच्या कामांत पूर्ण कसलेले असल्यामुळें त्यानीही आपल्या सैन्याची सुरेख व्यवस्था केली होती विठ्ठल शिवदेव विंचूरकर ह्यांची श्रीमंतानीं आपल्या उजव्या बाजूस योजना केली होती. मल्हारराव होळकर व पिलाजी जाधव हे डाव्या बाजूस होते. ह्याचप्रमाणें निरनिराळ्या भागावर दुसऱ्या

सरदारांकडे योजना करून सैन्याच्या निरनिराळ्या फळ्या बांधल्या होत्या. बुंदेले लोकही मोठ्या उमेदीनें पेशव्यांच्या सैन्यात एकत्र होऊन यवनाचा पराभव करण्यास अगदीं तयार झाले होते. राजा छत्रसाल व त्याचे पुत्र हे महमदखानाच्या सैन्यानें जैतपूरच्या किल्ल्यापलीकडे कोंडले असल्यामुळें त्याची सुटका होणें सर्वस्वी मराठ्यांच्या विजयावर अवलंबून होते. चद्र २२ शाबान (हिजरी सन ११४१–ता० १२ मार्च १७२९) रोजीं युद्धास प्रारभ झाला. प्रथमतः मराठ्यानीं अजनेरच्या उच टेंकडीवर आपल्या सैन्याची एक टोळी शत्रूच्या तलाव्यासाठीं पाठविली. तेथून महमदखानाचें लष्कर एक कोसाच्या अंतरावर असून त्याचें बाजारबुणगे अगदीं त्यांच्या सपाट्यात होतें. त्यामुळें त्यानीं एकदम त्याच्यावर हल्ला केला व लढाईस सुरवात झाली. मराठ्यांची ही अघाडीस गेलेली टोळी लहानशी असल्यामुळें मुसलमान सैन्यानें तिच्यावर उलट चाल करून तीन स्वार ठार केले व काहीं घोडे हस्तगत केले. हें वृत्त मराठ्याच्या सैन्यास कळताच त्याना फार त्वेष आला, व त्यांनीं दुसरे दिवशीं आपल्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें आपल्या सैन्याच्या निरनिराळ्या तुकड्या करून त्या निरनिराळ्या दिशेनें शत्रूवर पाठविल्या. मराठ्यांना छापे घालण्याची युक्ति चांगली साधली असल्यामुळें त्याच्या आकस्मिक मान्यानें मुसलमान सैन्याची तेव्हांच गाळण होऊ लागली. दुसऱ्या दिवसाच्या युद्धामध्यें शत्रूच्या उटावर व इतर सामानावर मराठ्यांनीं चागलाच हात चालविल्यामुळें त्याचा पुष्कळ फायदा झाला. दोनचार दिवस असे लहान लहान हल्ले करून शत्रूच्या बळाबळाची त्यांनीं चांचणी घेतली. चद्र २५ शाबान रोजीं महमदखानानें मराठ्यांवर एकदम छापा घालण्याचा प्रयत्न केला, परंतु ते लागलेच जवळच्या पहाडामध्यें दबून बसले व सायंकाळीं एकदम विद्युल्लतेप्रमाणें चालून आले. त्यामुळें रात्रीच्या समयीं तुमुल युद्ध सुरू

होऊन मुसलमानाच्या गोटांतून गोळ्यांचा भडिमार होऊं लागला, परंतु बाजीरावाच्या युद्धचातुर्यामुळें मराठ्यांचा नाश फार न होतां अवघे चार लोक मारले गेले व कांहीं उंट व घोडे शत्रूच्या हातीं लागले. अशा रीतीनें दररोज उभय पक्षांच्या चकमकी झडूं लागल्या व मराठ्यांनीं लवकरच चोहींकडून नाकेबंदी करून शत्रूची रसद बंद केली, आणि जेथें जेथें मान्याच्या जागा होत्या तेथें पक्का बंदोबस्त केला. त्यामुळें चोहोंकडून तंबी बसून महमदखानाच्या गोटामध्यें एकच हाहाःकार झाला. चोहोंकडून रस्तेबंदी झाल्यामुळें सैन्याची रसद बंद झाली व अन्नपाण्याचा दुष्काळ सुरू झाला. मडथा नाचाचें अगदीं भिकार धान्य वीस रुपयास शेरप्रमाणें मिळूं लागलें! तरी दोन महिनेपर्यंत मुसलमानांनी मराठ्यास हार न जातां आपला टिकाव धरिला. दररोज पांच सहा वेळा मराठ्याच्या व त्याच्या चकमकी होऊं लागल्या. महमदखानानें आपली सर्व शक्ति खर्च करून व जिवावर उदार होऊन मराठ्यांशीं टक्कर दिली; परंतु अरुणोदयकाळीं क्षणमात्र चमकून लगेच अदृश्य होणाऱ्या तारकापुंजाप्रमाणें मराठे लोक एकदम त्या पहाडी प्रदेशामध्यें चमकत व महमदखानाच्या सैन्यावर छापा घालून लगेच अदृश्य होत. त्यामुळें दिवसेंदिवस महमदखानाच्या सैन्याचा नाश होत जाऊन तो अगदीं हताश झाला.

इतक्यांत महमदखानाचा शूर पुत्र काईमखान हा आणखी कुमक घेऊन जेतपूर किल्ल्याच्या दुसऱ्या बाजूस सहा कोसांवर सुपें येथें येऊन दाखल झाला, असें ऐकतांच मराठे तिकडे वळले. ती संधि साधून महमदखानाचे अगदीं दीन झालेले लोक एकदम जेतपूरच्या बाजूकडे वळले व त्यांनीं तेथील किल्ल्याचा आश्रय केला. ह्या वेळीं त्याच्याजवळ फक्त १००० लोक शिल्लक राहिले. बुंदेले लोक, मुसलमानांनीं पळ काढल्याचें वर्तमान ऐकतांच दुसऱ्या बाजूनें पुढें सरसावून अजनेरच्या टेंकड्यांतून संमुख आले. महमदखानाची व

त्यांची तेथें हातघाईची लढाई झाली, परतु त्यात महमदखानाचा पराभव होऊन त्यास जेतपूरच्या किल्ल्याचा आश्रय करणें भाग पडलें, व त्याचे कित्येक लोक वाट फुटली तिकडे पळू लागले. महमदखान आजपर्यंत मोठ्या शूरत्वाच्या बाण्यानें लढत होता, परतु त्याचा ह्या मराठ्याच्या भयकर माऱ्यापुढें अगदीं नाइलाज होऊन तो जेतपुरास जाऊन पोहोंचला. जेतपूरचा किल्ला फार बळकट असल्यामुळें तेथें त्यानें चागला बदोबस्त करून शत्रूवर मारा करण्याचा यत्न चालविला. परतु तेथें कोणतीही सामुग्री शिलक नसल्यामुळें त्याची पूर्ण निराशा झाली. मराठे लोक इकडे काईमखानाचा पराभव करून एकदम विजयोत्साहानें जेतपुरावर परतून आले, व त्यांनीं त्या किल्ल्यास वेढा दिला. महमदखानानें अगदीं भिऊन जाऊन किल्ल्याचे दरवाजे बद केले. मराठ्याचे शूर सरदार मल्हारराव होळकर, विठ्ठल शिवदेव विंचूरकर व पिलाजी जाधव ह्यांनीं बाजीरावसाहेबाच्या आज्ञेप्रमाणें किल्ल्यावर एकसारखे मारे चालविले. तिकडून महमदखानाचा दुसरा मुलगा अफरखान हा किल्ल्यावरून प्रचंड धोंडे खालीं फेंकून देऊ लागला, परंतु मराठ्यांनीं त्यासही दाद न देता आपल्या शौर्यानें शत्रूस त्राहि त्राहि करून सोडलें.

जेतपूरचा किल्ला अतिशय बळकट असून त्याचा तट फार अभेद्य असल्यामुळें मराठ्यांस तो लवकर साध्य होईना. तेव्हा त्यानीं शत्रूची हालचाल पाहून त्यावर तोफांचा भडिमार सुरू केला. बाजीरावसाहेब स्वतः घोड्यावर स्वार होऊन शत्रूची हालचाल पहात व आपल्या सैन्यास उत्तेजन देत एकसारखे फिरत होते. त्याच्या शौर्यप्रभावामुळें महमदखानाची अगदीं दुर्दशा उडून त्याची सर्व शक्ति नाहींशी झाली. किल्ल्यामध्यें त्याचे हजारों लोक उपाशीं मरू लागले. मराठ्याच्या वेढ्यामुळें आतील मनुष्य बाहेर येईनांसें झालें

व बाहेरील मनुष्य आंत येण्याची मारामार पडूं लागली. जोंपर्यंत किल्ल्यामध्यें अन्नपाणी होतें तोंपर्यंत त्यांचा कसा तरी निभाव लागला. परंतु पुढें पंचाईत पडूं लागली. तेव्हा मुसलमान लोक गाई, बैल, घोडे, उंट वगैरे मारून त्याच्यावर आपला गुजारा करूं लागले! कित्येक पटापट तरवारीनें आपली आत्महत्या करूं लागले व कित्येकांनीं निःशस्त्र होऊन मराठ्यांस शरण जाऊन आपला बचाव केला. **"ज्यांनीं हत्यार सोडून धर्मवाट मागितली त्यांस वाट* दिली."** त्यामुळें शरण आलेले मुसलमान लोक बाजीरावसाहेब पेशव्याचें मानसिक औदार्य व सौजन्य पाहून थक्क होऊन गेले व त्यांचे धन्यवाद †गाऊं लागले.

---

* गोविंदपंत बुंदेल्यांची कैफियत

† जैतपूरच्या वेढ्याचें व महंमदखानाच्या पराजयाचें हृदयद्रावक वर्णन फक्त 'गोविंदपंत बुंदेल्याच्या कैफियती'मध्यें लिहिलें नसून तें 'सियार उल्मुताखिरीन' ग्रंथामध्यें व मि० आयर्विन ह्यांनी फरकाबादच्या इतिहासामध्येंही लिहिलें आहे. 'सियारउल्-मुताखिरीन' ग्रंथाचा मुसलमान इतिहासकार लिहितो:—

"These (Bundela) Rajas, returned to Bundelcund, where Mahmedkhan Bangash thought himself so secure that he had dismissed the greatest part of his Afghans to their homes, retaining only a small body about his person. He had too little local information to be acquaint-ed with all its bases, so that the native princes found means to come upon him before he had any intimation of their approach. He had hardly time to mount his horse, and to put himself at the head of the little force- he had left, and being soon overpowered by numbers, was obliged to quit the field, and after wandering two or three days, he had just time to throw himself into Jitgur with his troops and followers, wherein he was immediately besieged

वर सांगितल्याप्रमाणें मराठ्यांनीं महमदखानास अगदीं गोगलगाय करून सोडलें तरी तो त्यांस शरण आला नाहीं! त्यानें गुप्त हेराकडून आपल्या काईमखान नामक मुलास सैन्य घेऊन येण्याबद्दल वारंवार निरोप पाठविले, परंतु त्यास कोणीच साह्य करीना. सरतेशेवटीं त्यानें व त्याच्या आईनें फैजाबादच्या पठाण लोकाची पायधरणी केली व मराठ्यांच्या कचाटांतून महमदखानास सोडविण्याबद्दल त्याची मदत मागितली. तेव्हा त्यांनीं साठ पठाण सरदार व बरेंच सैन्य त्याच्या साह्यास दिलें. त्यांनीं बुंदेलखडांत येऊन मोठ्या युक्तीनें महमदखानाची सुटका केली. महमदखान जेतपूरच्या किल्ल्यातून पळून गेल्यानंतर तो किल्ला मराठ्याच्या हातीं आला व त्यांनीं

---

A great multitude of people of both sexes and of all ages had taken shelter in the place, a scarcity of provisions was soon experienced, which ended in a famine. Cows, horses, and asses became food to the garrison, and a dead beast attracted thousand eyes. Nor was it possible to receive any supply from without, or to get out of the fortress. ....."

—*Briggs' Tran. Siyar-ul-Mutakherin.*

ह्यास दुसरा पुरावा मि० डब्ल्यू आर्यव्हिन ह्याचा ते लिहितात:—

" x x Jaitpur was strictly invested for several months till there was no longer any grain for food. Then the soldiers began to slaughter their horses and bullocks Flour could not be procured even at one hundred rupees a seer Many of the soldiers died of starvation, and many more leaving the Nawab to his fate escaped from the fort. *Baji Rao's orders to his guards were that any of Muhammed Khan's men who gave up their arms should be allowed to pass unmolested.* Many having no food preferred to give up their arms and get away. ....."

—*The Bangash Nawabs of Furrukhabad.*

तो मोठ्या विजयोत्सवानें छत्रसाल राजाच्या स्वाधीन केला. अशा रीतीनें छत्रसालावरचें संकट दूर होऊन त्याचा शत्रु जो महमदखान त्याची पुरी खोड मोडली.*

श्रीमत बाजीरावसाहेब पेशव्यांचा हा अद्भुत पराक्रम पाहून छत्रसाल राजास अत्यंत हर्ष झाला. तो स्वतः अतिशय शूर असून त्याचें सर्व आयुष्य रणांगणामध्यें गेलें असल्यामुळें श्रीमतांच्या अतुल प्रतापाची योग्यता जाणण्याची त्याच्या अंगीं शक्ति होती, त्यामुळें त्यानें श्रीमतांचा योग्य गौरव करून आपलें गुणग्राहकत्व प्रकट केलें असेल ह्यात कांहीं नवल नाहीं! त्यानें स्वसैन्यानिशीं पुष्कळ कोसपर्यंत बाजीरावसाहेबांस सामोरें येऊन त्यांची प्रेमपूर्वक भेट घेतली व त्यास आनदभरानें गाढालिंगन दिलें. त्या वेळीं वृद्ध छत्रसालास गहिंवर येऊन त्याच्या नेत्रांतून आनदाश्रु वाहू लागले व बाजीरावसाहेबांसही त्याचा स्नेहभाव व सहृदयता हीं पाहून अतिशय संतोष झाला. परस्पराच्या भेटी होऊन परस्परांचीं हृदयें प्रेमानंदानें उल्लसित होऊन गेल्यानतर छत्रसाल राजानें बाजीरावसाहेबाचा व त्याच्या पराक्रमपटु सैनिकाचा फार चांगला आदरसत्कार केला. बुंदेलप्रभूनें त्या सर्वांस मगल वाद्यघोष करीत मोठ्या थाटानें आपल्या पन्ना राजधानीस नेलें व तेथें टोलेजग मेजवान्या व मजलसी देऊन त्यांना सतुष्ट केलें. भर दरबारामध्यें छत्रसाल राजानें बाजीरावसाहेबास आपला पुत्र मानून त्यांचा अतिशय बहुमान

---

* मि० आर्यव्हिन ह्यांनी, ही हकीकत जेतपूरच्या वेढ्यामध्यें हजर असलेल्या एका इसमाने 'हकीकत-उल् अकालिम' नामक मुसलमानी ग्रथ लिहिला आहे त्याशीं ताडून पाहिली आहे. ह्यावरून थोरले बाजीरावसाहेब पेशव्यानी आपल्या मनाचें केवढें थोरपण दाखविलें तें चांगलें व्यक्त होतें. महंमदखान हा स्त्रीवेष धारण करून पळून गेला अशीही आख्यायिका आहे.

केला. ह्या प्रसंगीं एक मौजेची गोष्ट घडून आली, ती येथें सांगणें अवश्य आहे. छत्रसाल राजानें प्रथम ज्या वेळीं पेशव्यांची मदत मागितली, त्या वेळीं त्याच्या वकिलानें पेशव्यांशीं असा ठराव केला होता कीं, आपण आह्मांस साह्य करून बंगष नबाबाचें पारिपत्य कराल तर आपणास राज्याचा एक हिस्सा आह्मी देऊं. तें कबूल करून बाजीरावसाहेबांनीं स्वारीची तयारी केली व आपल्या पराक्रमानें छत्रसालाचा हेतु परिपूर्ण केला. पुढें पन्ना येथें आल्यानंतर त्यास अशी गोष्ट समजली कीं, छत्रसाल राजास *छप्पन्न पुत्र असून त्याप्रमाणें राज्याची वांटणी होऊन आपणांस आजच्या दरबारांत एक हिस्सा मिळणार. व त्या योगानें आपल्या लढाईचा खर्चेही पुरता निघणार नाहीं, तेव्हां त्यांनीं छत्रसालाकडून इतकी अल्प वाटणी न घेता मोठ्या चातुर्यानें आपला कार्यभाग साधून घेण्याचा निश्चय केला. ते छत्रसाल राजाच्या बड्या दरबारांत येऊन दाखल झाले. छत्रसाल राजा व त्याचे सर्व पुत्र आणि मोठमोठे बुंदेले सरदार आपापल्या योग्यतेनुरूप दरबारांत येऊन बसले. त्यानीं पेशवे व त्यांचे सरदार येतांच त्याना खडी ताजीम दिली व त्यांना योग्य स्थानीं बसण्याविषयीं विनंति केली. छत्रसालाचे छप्पन्न पुत्र मोठ्या थाटानें येऊन बसले होते. तेव्हा त्याच्यामध्यें आपण बसावें हें बाजीरावसाहेबांस योग्य न वाटून ते तसेच उभे राहिले. राजा छत्रसाल फार वृद्ध असल्यामुळें त्यानें आपल्या सिंहासनावर बसूनच त्यांस सांगितलें कीं, 'आपण बसावें.' त्या वेळीं बाजीरावसाहेबानीं नम्रपणानें उत्तर केलें कीं, 'आह्मास बसावयास जागा द्यावी. आह्मीं कोठें बसावें?' त्यावर राजानें सांगितलें कीं, 'आपण आमचे

*'छत्रप्रकाश' ग्रंथामध्यें छत्रसाल राजास ५२ पुत्र होते असें लिहिलें आहे व मँग्सन १७ होते असें ह्मणतो. पण ह्याबद्दल खरी माहिती मिळत नाहीं.

चिरंजीव आहांत.' हे खुबीचे शब्द ऐकून श्रीमत् ह्मणाले:-'आपले चिरंजीव छप्पन्न आहेत. त्यांत आमचा समावेश केला असतां शाहू महाराजांची गैरमर्जी होईल!' (ह्या खुबीदार शब्दांचा अर्थ असा होता कीं, छप्पन्न पुत्रांपैकीं मला एक समजलां तर आमच्या वांट्यास अवघा दोन लक्षाचा प्रांत येईल व त्या योगानें आमच्या फौजेचा खर्चही निघणार नाहीं, व शाहू महाराजांची आमच्यावर गैरमर्जी होईल. ह्याकरितां योग्य जागीं आमची गणना करून आह्मांस पुष्कळ हिस्सा द्यावा.) राजा छत्रसाल परम चतुर होता. त्यानें श्रीमंतांचें हें भाषण ऐकून असें उत्तर दिलें कीं, 'आमचे चिरंजीव दोघे (हिरदेसा व जगत्राज.) वडिल व कनिष्ठ. तिसरे तुह्मी!' (ह्याचा भावार्थ माझे तीन पुत्र समजून ज्येष्ठकनिष्ठाचे जसे हिस्से लागतात त्याप्रमाणें तुह्मास तिसरा हिस्सा देतो.) नंतर श्रीमंतांस त्या वृद्ध राजानें आपल्या हातानें जगत्राजाजवळ बसविलें व पोषाख व नजरनजराणे देऊन त्याचा फार गौरव केला. छत्रसालाचे वडील चिरंजीव हिरदेसा ह्यांनीं व कनिष्ठ चिरंजीव जगत्राज ह्यानीं श्रीमंतास आपले बंधु समजून पगडीबदला केला. नंतर राज्याच्या सनदा वगैरे होऊन दरबार बरखास्त झाला.*

पुढें कांहीं दिवस पन्ना येथें राहून व छत्रसाल राजास आपल्या सहवासानें संतुष्ट करून श्रीमंतांनीं त्याचा निरोप घेतला व स्वदेशीं कुच केलें.

---

* ह्या वेळीं बाजीरावास किती प्रांत मिळाला हें निश्चित सांगतां येत नाहीं. तथापि ग्रांटडफच्या ह्मणण्याप्रमाणें तो सव्वादोन लक्षांपेक्षां पुष्कळ जास्त होता ह्यांत शंका नाहीं गुलसराई संस्थानच्या दप्तरांतील यादीवरून बाजीरावाकडे छत्रसालाच्या पश्चात् जो त्याच्या राज्याचा तिसरा हिस्सा आला, त्याचें उत्पन्न काय होतें तें उत्तम समजतें. ती माहिती आह्मी ४ थ्या भागांत दिली आहे.

येणेंप्रमाणें वृद्ध छत्रसाल राजा यवनांच्या त्रासांतून मुक्त झाल्यानतर पुढें काहीं दिवस पन्ना येथें आनदानें राज्य करीत होता. परतु लवकरच त्यावर मृत्यूची गदा येऊन तो सन १७३३ मध्यें परलोकवासी झाला. त्यामुळें सर्व बुंदेलखड दुःखसागरामध्यें बुडून गेलें.

छत्रसाल राजाच्या कारकीर्दीचें सूक्ष्म रीतीनें निरीक्षण केलें तर तो राज्यसस्थापक पुरुष असून त्याची छत्रपति शिवाजीबरोबर गणना करण्यास काहीं हरकत दिसत नाहीं. किंबहुना त्याचें एकदर जीवनचरित्र शिवाजीसारखेंच आहे असें ह्मटलें तरी चालेल. शिवाजी जसा एका स्वातन्त्र्यप्रिय व कर्तृत्ववान् मराठे सरदाराचा मुलगा, तसा छत्रसालही एका बुंदेले वीराचा बेटा होता. शिवाजीच्या बालपणीं यवनसत्तेनें सर्व देश ग्रासून गेल्यामुळें व हिंदुधर्माची राखरांगोळी झाल्यामुळें जशी शोचनीय परिस्थिति होती तशीच छत्रसालाच्या बालपणींही होती. शिवाजीस ज्याप्रमाणें दादोजी कोंडदेवाकडून गृहशिक्षण मिळालें, व महाभारत रामायणादि ऐतिहासिक ग्रंथांतील सुंदर कथाभागांच्या श्रवणानें वीरश्रीचें वारें अंगीं सचारलें त्याप्रमाणें छत्रसालासही झालें. शिवाजीनें अल्पवयामध्यें मावळे लोक जमा करून जसें अद्वितीय कार्य आरभिलें व मुसलमानांवर छापे घालून एकापाठीमागें एक अनेक गड सर केले, त्याप्रमाणें छत्रसालानेंही बुंदेले लोकांच्या अंगीं शौर्यस्फूर्ति उत्पन्न करून त्यांच्याकडून अद्भुत पराक्रम करून दाखविले. शिवाजीनें दिल्लीपतीकडून चालून आलेल्या अनेक मुसलमान सरदारांची खोड मोडून जसा अविधसत्तेचा पूर्ण विध्वंस केला व स्वराज्य स्थापन करून महाराष्ट्रमडळाचा उत्कर्ष केला तसा छत्रसालानेंही आपल्या लोकांचा केला. शिवाजीच्या अंगीं धैर्य, शौर्य, स्वाभिमान, दाक्षिण्य, दया, सौजन्य, स्वधर्मनिष्ठा वगैरे गुण जसे वास करीत होते तसे छत्रसालाच्याही अंगीं वसत होते. शिवाजीनें स्वधर्मरक्षणाकरितां व स्वदेशक-

त्याणाकरितां आपली काया चंदनाप्रमाणें झिजविली, त्याप्रमाणें छत्रसालानेंही झिजविली. शिवाजीस ज्याप्रमाणें यवनाचा ताप दूर करून धर्मस्थापना करावी आणि अनाथाचें रक्षण करावें असें सांगणारे निस्पृह व वंदनीय सत्पुरुष मिळाले होते, त्याप्रमाणें छत्रसालासही एक सद्गुरु सापडले होते. श्रीसमर्थ रामदासस्वामींनीं शिवछत्रपतीचें चित्त उद्विग्न झालें असतां ज्याप्रमाणें आपल्या सुरस व प्रेमळ शब्दांनीं त्यास वारंवार उत्तेजन दिलें, आणि

प्रस्तुत यवनांचें बंड । हिंदु उरला नाहीं चंड ।
बहुतां दिवसांचे मुंड । शास्ता न मिळे तयांसी ॥ १ ॥
देव ब्राह्मण उच्छेदिले । कर्म अवघें भ्रष्टविलें ।
नामसंकीर्तन लोपलें । दुष्टयोगें ॥ २ ॥
पापराशी बळावले । धर्मवान निर्बळ झाले ।
आनंद गौरव विराले । सकटकाळें ॥ ३ ॥
दुष्ट आपणें करिती । नानापरी जाचिती ।
रघुपतिसी नावडती । ह्मणोनि योजना केली ॥ ४ ॥
तुह्मी आहांत अंशभूत । प्रजेचें करा कांहीं हित ।
धर्म स्थापावा तुह्मां उचित । काळपरत्वें ॥ ५ ॥
धर्माकरितां मरावें । मरोनि अवघ्यांसी मारावें ।
मारतां मारतां घ्यावें । राज्य आपुलें ॥ ६ ॥
राज्य आहे धर्मनीतीचें । नीति करितां सर्व सांचे ।
साच चालतां वैभवाचें । मान पावती ॥ ७ ॥
मानाकरितां तरवार घेतली । वैरीकुळें संहारिलीं ।
प्रकट कीर्ति जगीं झाली । आनंदमूर्ति ॥ ८ ॥
आनंद असावा सर्वांठायीं । शूरत्वें करावी कमाई ।
कमाई करितां सुख देहीं । पावेल तोची ॥ ९ ॥

अशाप्रकारें वारवार देशस्थितीचें ज्ञान करून देऊन त्याच्या ठिकाणीं स्वधर्माविषयींची कळकळ उत्पन्न केली, एवढेंच नव्हे, तर वारवार

त्यांच्या पराक्रमाची प्रशंसा करून व त्यांच्या अंतःकरणांत परमानंद उत्पन्न होईल अशा प्रकारच्या पारमार्थिक ज्ञानाचा लाभ करून देऊन जशी त्यांच्या हातून महाराष्ट्रराज्याची टोलेजंग इमारत उभारली,— त्याप्रमाणें राजा छत्रसालास प्राणनाथ प्रभु नामक एका सत्पुरुषाचा लाभ होऊन त्यानें त्याच्याकडून बुंदेलखंडांत स्वतंत्र राज्य स्थापन केलें.*

---

* प्राणनाथ प्रभूनें छत्रसालास वारंवार उपदेश करून त्याचा व्यामोह दूर केला, अशाबद्दलची विस्तृत माहिती जरी अद्यापि उपलब्ध झाली नाहीं, तरी 'छत्रप्रकाश' ग्रंथामध्यें त्यासंबंधानें जो उल्लेख आहे, तो अवश्य वाचण्यासारखा आहे.

"Pran Nath Prabhoo came to visit Chuttur Saul, and by wise and prudent counsel, dispelled the clouds of apprehension from the minds of all. By dilating on the transitory nature of terrestrial, the stability of celestial, objects, and on the omnipotence, mercy, and goodness of God, elevated the minds of his auditors, who became steadfast i the principles of piety and devotion."

*Pogson's Boondelas*, p 96

त्याचप्रमाणें दुसऱ्या एके ठिकाणीं छत्रसालास प्राणनाथ प्रभूनें उत्तम आशीर्वाद दिल्याचें व त्यास स्वहस्तानें राज्यतिलक लावल्याचें लिहिलें आहे.—

"Pran Nath Prabhoo then blessed Chutter Saul, saying.—During your life you shall rule and govern your dominions and be successful in war The Rajas of your race shall be mighty, magnanimous, and brave, and their posterity shall long retain sovereign sway and whoever contemplates their downfall, will seek only his own destruction, for by divine grace your house shall be strong and mighty. God has given you a land which abounds in diamonds. You and your posterity shall receive the produce of the

महाराष्ट्रामध्यें रामदासस्वामी व श्रीशिवाजी ह्यांची जी देवाप्रमाणें योग्यता आहे त्याप्रमाणें प्राणनाथ प्रभूंची व छत्रसालाची बुंदेलखंडांत योग्यता समजली जाते. रामदासस्वामींचें ज्याप्रमाणें स्तुतिस्तोत्र ऐकू येतें त्याप्रमाणें बुंदेलखंडामध्येंहीः—

कृष्ण महम्मद देवचंद प्राननाथ छत्रसाल ।
इन पंचनको जो भजे दुःख हरे तत्काल ॥ १ ॥

असा दोहरा ऐकू येतो. श्रीशिवाजी महाराजाचें नांव प्रत्येक महाराष्ट्रीयास ज्याप्रमाणें अत्यंत मंगलकारक वाटतें व त्याचा जयजयकार करण्यास त्यास आनंद वाटतो, त्याप्रमाणें प्रत्येक बुंदेल्यास छत्रसाल राजाचें नांव परम वंदनीय वाटत असून प्रातःकाळीं ते

'छत्रसाल महा बली । रहे सदा भली भली'

असें ह्मणत असतात. ह्यावरून एकंदरींत छत्रसाल राजा शिवाजीच्या तोडीचा असून तो त्या 'यवनकुंजरशिर'पर चढणाऱ्या महाराष्ट्रसिंहाप्रमाणें सर्व भरतखंडास ललामभूत झाला असें ह्मणण्यास काहीं हरकत नाहीं. त्यातून विशेषतः आमच्या परमपूज्य छत्रपति शिवाजी महाराजाच्या हितमंत्रानें छत्रसाल राजाच्या अंगीं स्वराज्य स्थापन करण्याची प्रेरणा झाली व त्याच्या हातून यवनाचें पारिपत्य होऊन बुंदेलखंडात हिंदुधर्माचें पुनरुज्जीवन झालें ही गोष्ट

---

diamond mines: but by no other race shall this blessing and inexhaustible source of wealth be enjoyed."

*Pogson's Boondelas, p* 102.

ह्यावरून रामदासस्वामी व प्राणनाथ प्रभु ह्यांच्यासारख्या स्वधर्मरक्षणार्थ अवतीर्ण झालेल्या लोकोत्तर पुरुषांची देशकल्याणाविषयीं कशी दक्षता होती हें चांगलें व्यक्त होतें, आणि तेणेंकरून मार्मिक इतिहासवाचकांस देशहिताची खरी गुरुकिल्ली कोणती, ह्याचा चांगला बोध होऊन त्यांची स्वधर्माच्या ठायीं निष्ठा दृढतर होते.

लक्षात घेतली तर त्याचें सर्व श्रेय पर्यायेंकरून महाराष्ट्राकडे येत असून त्याबद्दल् आह्मास अभिमान वाटला पाहिजे.*

---

* छत्रसाल राजाचें वर्णन चरखारी संस्थानच्या इतिहासकारानें पुढे लिहिल्याप्रमाणें केलें आहे·—

"More than two hundred years ago, in the time of Aurangzeb and his successor Shaha Alum, Emperor of Delhi, Raja Chattra Sal shone bright in Bundelkhand. His capital was Mahowa, near Mow, east of the river Dhasan... .. Like his famous father Chanpat Ray he spent most of his time in the field against Mussalmans. Almost always he beat them off He was not fond of shows and sights like most Rajas of the present days Nor did he live an idle life. He cared not for "Peishvai" and "Tazim" For he was a high minded brave soldier who built up his Raj out of nothing. His estates yearly gave him over a crore of Rupees, out of which he paid nothing to the Emperor. He was indeed an independent Raja, the greatest among the great in the history of Bundelkhand."

—*Juvenile History of Charkhari*. p. 10.

# भाग ४ था.

## बुंदेलखंडांत मराठी राज्याची संस्थापना- सुभेदार गोविंदपंत बुंदेले.

छत्रसाल राजानें मृत्युसमयीं आपल्या प्रांताचे तीन हिस्से केले असें मागील भागांत सांगितलें आहे, ते पुढें लिहिल्याप्रमाणें. पहिला:-४२ लक्षाचा, वडील पुत्र हिरदेसा ह्यास. ह्यामध्यें पन्ना, कलिंजर, मऊ, इरिछ, धमोनी वगैरे सर्व प्रांत आला. दुसरा:- ३६ लक्षाचा, द्वितीय पुत्र जगत्राज ह्यास. ह्यामध्यें जेतपूर, अजयगड, चरखारी, बांदा, बिजावर वगैरे प्रांत मिळाले. तिसरा:- ३३ लक्षाचा, ह्यामध्यें काल्पी, हटा, सागर, झांशी, सिरोंज, कुंच, गडकोटा आणि हृदेनगर वगैरे प्रांत असून तो हिस्सा पेशव्यास मिळाला.* ह्या वेळीं छत्रसाल राजाच्या पुत्रांचा

*१८०६च्या 'एशियाटिक अन्युअल रजिस्टर' मध्यें पेशव्यांकडे छत्रसालाकडून ३०,७६,९५३ रुपयांचा मुलूख मिळाला व हिरदेसास ३८,४६,१२३ रुपये वसुलाचा मुलूख मिळाला असें लिहिलें आहे. गुलसराई संस्थानच्या कागदांतून आह्मास जी याद मिळाली आहे, तिच्यावरून संवत् १७८२ मध्यें पेशव्यांस छत्रसाल राजाकडून जी वाटणी मिळाली ती ४२ लक्षांची होती असें दिसतें ह्या यादीमध्यें पुढील परगणे व त्याचा वसूल दिला आहे. परगणे कमर, उरई, कोंच, यरेछ, गुलसराई, महोबा, काल्पी, महमदाबाद, रायपूर, हमीरपूर, कुदोदा, मेहेर, धामोनी, सागर, रहली वगैरे.

व पेशव्यांना करारमदार ठरून त्यांत पुढील तीन कलमें नमूद झालीं होतीं:—

"१ त्या उभयतां बंधूनीं यमुना आणि चंबेल याचे पलीकडचा मुलूख खेरीज करून बाकी सर्व मुलुखावरील स्वाऱ्यात बाजीराव-साहेबांबरोबर जाऊन आपल्या बरोबरच्या फौजेच्या मानानें सर्व लुटींत आणि जिंकलेले मनुष्यात भागीदार व्हावें.

२ बाजीरावसाहेब दक्षिणेंतील युद्धात गुंतले ह्मणजे त्या बंधूनीं बुंदेलखंडाचा किमानपक्ष दोन महिनेपर्यंत तरी बचाव करावा.

३ छत्रसाल राजे ह्यांनीं बाजीरावसाहेब यांस पुत्राप्रमाणें मानिलें आहे ह्मणून बाजीरावसाहेबानीं त्याच्या त्या दोन पुत्राचें बंधूप्रमाणें रक्षण करावें."

ह्याप्रमाणें यशोवैभव प्राप्त झाल्यानंतर बाजीरावसाहेब स्वदेशीं परत आले. बुंदेलखंडामध्यें मराठ्यांचे पराक्रम व्यक्त होऊन त्याना अत्युत्तम विजय प्राप्त झाल्यामुळें त्यांच्या भावी अभ्युदयांचें द्वारच त्यांना साध्य झालें असें ह्मटलें तरी चालेल. ह्या वेळीं बुंदेलखंडामध्यें मराठ्याचा प्रवेश झाला, त्यामुळें त्याना उत्तर हिंदुस्थानात व दुआबात प्रवेश करण्यास पुढें फार सुलभ झालें. किंबहुना उत्तरेकडे जिवत राहिलेल्या मुसलमानांच्या सत्तेचें समूळ उन्मूलन करण्यास बुंदेलखड हेंच मराठ्यांस उत्तम साधन झालें, ह्यात शका नाहीं. बाजीरावसाहेबास व मल्हारराव होळकर, पिलाजी जाधव, व विठूजी वगैरे त्याच्या सरदारास ह्या प्रातात यश आल्यानतर त्यानां तेवढ्यांत संतुष्ट न होतां पुढें लांब लाब मराऱ्या मारण्यास सुरवात केली. सन १७३५ मध्यें मल्हाररावानें बुंदेलखडातून निघून एकदम आग्र्यापर्यंत चाल केली व मुजफरखा व खानदौरान ह्यांशीं टक्कर देऊन पुष्कळ प्रात सर केला. सन १७३६ मध्यें बाजीरावानीं बुंदेलखंडांतील साह्याच्या जोरावर मथुरा, अलहाबाद व बनारस हे प्रात जिंकण्याचा यत्न

केला, एवढेंच नव्हे, पण सन १७३७ मध्यें बाजीरावसाहेबांचे चिरंजीव नानासाहेब ह्यास बरोबर घेऊन मराठ्यांनीं भीमथडीच्या घोड्याना यमुनेचें पाणी पाजलें व छत्रसालाच्या पुत्रांच्या साह्यानें कोरा, इटावा वगैरे प्रांतात त्यानीं धुमश्चक्री उडवून दिली. हें वर्तमान दिल्लीदरबारीं कळलें, तेव्हा तिकडून छत्रसालाचा पुत्र जगत्‌राज ह्याचें पारिपत्य करण्याकरितां पुनः महमदखान बंगषास हुकूम सुटला. महमदखान बंगष ह्याची जेतपूरच्या लढाईमध्यें मराठ्यांनीं पुरी रग जिरविली होती व मध्यंतरीं त्यास दिल्लीदरबारांतून सुभेदारीवरून काढूनही टाकण्यांत आलें होतें, परतु तो फार खुनशी असल्यामुळें त्याच्या मनात मराठ्याचें पारिपत्य करावें अशी प्रबळ इच्छा झाली, व ज्या छत्रसालाच्या पुत्रानें मराठ्याना साह्य करून त्याना आपल्या घरांत घेतलें त्याची खोड मोडण्याकरिता तो त्याच्यावर चालून गेला. राजा जगत्‌राज हा मराठ्याचा पूर्ण दोस्त असल्यामुळें त्याजवर संकट आलेलें कळतांच बाजीरावसाहेब पेशव्यांनीं सन १७३८ मध्यें पुनः बुंदेलखंडावर स्वारी केली. व त्यानीं महमदखानाचा पूर्ण पराभव करून त्यानें पुनः बुंदेलखंडात येऊं नये असा पक्का बंदोबस्त केला. त्यामुळें जगत्‌राजास परम हर्ष होऊन त्यानें त्यांस आणखी कांहीं लक्ष रुपये खंडणी दिली व बराच नजराणा कबूल केला. त्याचप्रमाणें इतर बुंदेल्या राजांनींही त्यास चौथाई कबूल केली. जगत्‌राजानें आपल्या बापाप्रमाणें बाजीरावसाहेबाचा उत्तम प्रकारचा आदरसत्कार करून त्यांस अनेक मजलसी दिल्या व आपल्या स्नेहाची अल्प नजर ह्मणून एक खुबसुरत दासीकन्या समर्पण केली. हीच सुप्रसिद्ध मस्तानी होय.*

* ह्या स्वारीमध्यें पेशव्यांस मस्तानी प्राप्त झाली असें ग्रँन्टडफचें ह्मणणें आहे, परतु छत्रसालानेंच ती दिली असावी हें सयुक्तिक दिसतें. सागरकर

श्रीमंतांबरोबर ह्या स्वारीमध्यें जे कर्तृत्ववान्, स्वामिनिष्ठ, व

सुभेदाराकडून आह्मास बादेवाले नवाबांची जी वंशावळ मिळाली आहे तींत पुढील मजकूर आढळतो.—'बाजीराव बल्लाळ पेसुवा साहव दखनसे हिंदुस्थानमें परनावाले राजा छत्रसालने बुलाए राजाके ऊपर रुहेलखंडसे बंदसकी फौज चढकर परनाका राज खाली किया ओर राजाको जेर बारबहद किया उसवक्त राजाने पूनाको खत भेजकर बुलाये सो पेसुवा साहवकी सवारी आयकर परनाके उपर लढाई कर बंगसको भगा दिया ओर राजा छत्रसालको गादीपर कायम किया उसवक्त तीन हिसे राजके करके येक हिसा पेसुवा साहवको दिया, ओर महालसे मस्तानी ओरत कबूल सुरतथी सो राजाने पेसुवा साहवको दी.' ही मस्तानी बाजीरावाची प्रियकर नाटकशाळा असून तिला त्यानें आपल्या वाड्यामध्यें एका महालांत ठेविलें होतें एका जुन्या बखरीमध्यें पुढील मजकूर आढळतो:- 'शके १६५८ वाड्याचें काम तयार झालें. मस्तानी कलावतीण राखली. तींस जागा वाड्यात करून देऊन ठेविली आणि स्वारी भिंडभदावर दतीया ओडसें यमुना स्थानें हिंदुस्थान प्राप्ति करून घरांस आले' ही मस्तानी पुण्यास शनिवारच्या वाड्यामध्यें ज्या महालामध्यें रहात असे त्याचें 'मस्तानीमहाल' हें नाव सर्वश्रुत आहे. ह्या मस्तानीस समशेरबहादर नांवाचा एक मुलगा झाला होता. तो पानिपतच्या लढाईत मारला गेला. तो मोठा शूर असून पानिपतच्या पोंवाड्यामध्ये त्याचें वर्णन अद्यापि ऐकू येतें.—

समशेरबहाद्दर रणशूर रणगाडा। रणीं वाजे चौघडा।
हटकून गिलचे हाणितो धडधडा। ढाल तरवार जमदडा॥
ज्याणें रणीं अडविला तीस घोडा। सन्मुख दावी मुखडा।
जसा बाजीचा पुत्र हिरा। येती जखमाच्या लहरा॥

ह्या समशेरबहाद्दरावर बाजीरावसाहेबांची फार प्रीति असून त्याचें उपनयन करावें असाही त्यांचा विचार होता. समशेरबहाद्दरास अलीबहाद्दर नावाचा मुलगा होता. त्यानें पुढें बुंदेलखंडावर स्वारी करून बांदा येथें राज्य स्थापिलें. ह्मणून त्याच्या वंशजास बांद्याचे नबाब असें ह्मणतात.

शूर असे लोक होते त्याच्या गुणांची योग्य पारख करून श्रीमतांनी त्यांची ह्या नवीन मिळालेल्या प्रांतावर नेमणूक केली. श्रीमताबरोबर गोविंद बल्लाळ खेर, हरी विठ्ठल डिंगणकर, व कृष्णाजी अनत तांबे असे तीन हुशार सेवक होते. त्याचा भाग्योदय होऊन त्याना आजपर्यंत केलेल्या एकनिष्ठ सेवेचें योग्य फळ मिळालें. त्यानीं पेशव्यांच्या फौजेमध्यें राहून अनेक प्रसंगीं शौर्याचीं कामें केलीं होतीं व स्वत:च्या जिवाकडे न पाहता स्वामिकार्यार्थ आपलें शरीर झिजविलें होतें. ह्मणून श्रीमताची त्यांच्यावर बहाल मर्जी होऊन त्यानीं त्या त्रिवर्गास बुंदेलखंडात राहून ह्या नवीन प्रांताचा बदोबस्त करावा असा हुकूम केला, व त्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणें त्यांच्याकडे निरनिराळ्या प्रांताची वाटणी करून दिली. गोविंद बल्लाळ खेर हे मोठे शूर, हिंम्मतबाज, व कर्ते पुरुष असल्यामुळें श्रीमंतानीं त्याच्याकडे सागर, जालवण, कलिंजर वगैरे प्रांत सोंपवून त्यानीं राजा हिरदेसाच्या प्रांताचा बदोबस्त करावा व हिऱ्याच्या खाणीचें उत्पन्न घेत जावें, अशी योजना केली. हरी विठ्ठल डिंगणकर व कृष्णाजी अनत तांबे ह्यानीं अनुक्रमें इटोरा परगणे, काल्पी व श्रीनगर येथें राहून छत्रसालाचे द्वितीय चिरजीव जगत्‌राज ह्याच्या प्रांतांची खंडणी घ्यावी असें ठरविलें. हरी विठ्ठल याच्याकडे काल्पी, हमीरपूर हे परगणे होते, व कृष्णाजी अनत ह्यांच्याकडे श्रीनगर, खडिया, कबरई, चरखारी, बांदा, बारीगड, जैतपूर, मोथ, अजेगड वगैरे परगणे होते. हे उभयता बरींच वर्षें ह्या प्रांताची व्यवस्था करीत असत. परतु पुढें अनेक राजकीय उलाढाली होऊन सर्व प्रांत गोविद बल्लाळ खेर ह्याच्याकडे आला. व तेच पेशव्याच्या वतीनें बुंदेलखंडाचे पूर्ण अधिपति बनले.* त्यांनीं आपल्या अजब कर्तृत्वानें

* गोविंदपत बुंदेले झाशीचे सुभेदार होते असें कित्येक ठिकाणीं लिहिलें आहे, पण ती चूक आहे छत्रसाल राजानें बाजीरावसाहेब पेशव्यास आपल्या

सर्व बुंदेल्या राजास अंकित करून मराठी राज्यसत्तेचा ध्वज बुंदेलखंडांत अखंड फडकत ठेविला. त्याचें चरित्र व पराक्रम महाराष्ट्र वाचकांस सादर करणें अवश्य आहे.

गोविंद बल्लाळ खेर हे जातीचे कऱ्हाडे ब्राह्मण. ह्यांचें मूळ

---

राज्याचा जो तिसरा हिस्सा दिला त्यांत झांशी प्राप्त मिळाला परंतु त्या वेळीं झांशी वगैरे निराळें गाव नसून फक्त एक किल्ला होता त्यामुळें बाजीरावाच्या कारकीर्दीत झांशी येथें स्वतंत्र सुभेदार कधींही नेमण्यांत आला नाहीं पुढें श्रीमंत नानासाहेब पेशव्याच्या कारकीर्दीमध्यें नारोशंकर मोतीवाले ह्यांनीं ओरछा संस्थानावर स्वारी करून तेथें अठरा लक्षाचा प्रांत सर केला. त्यामध्यें जोतीबा शिंदे बुंदेल्याशीं लढत असतां बरवासागर येथें मृत्यु पावला व तें गांव बुंदेल्याकडून हस्तगत झालें, ह्मणून तें जोतीबाच्या बायकोस देण्यात आलें. मल्हारराव होळकरास बारा हजाराचें गांव दिलें व नारोशंकरांकडे झांशीचा किल्ला, कोंच, कनार, हरिछ वगैरे परगणे सोंपवून त्यास सन १७४२ मध्यें तेथील सुभेदार केलें नंतर नारोशंकरांनीं झांशी शहर वसविलें, व ओरछाहून लोक नेऊन तेथें वसाहत केली, आणि दतिया वगैरे प्रांतांतील मुलख काबीज करून झांशीच्या सुभ्याचें पुष्कळ उत्पन्न वाढविलें. नारोशंकर सन १७५७ पर्यंत तेथें होते पुढें त्याच्याकडून वेळेवर वसूल येईना ह्मणून त्यांस पेशव्यांनीं परत बोलाविलें व त्यांचे जागीं महादाजी गोविंद याची योजना केली पुढें दोन वर्षांनीं बाबुराव कनकराय यांस नेमलें व पुन. सन १७६१ मध्यें नारोशंकरांस पाठविलें पुढें नारोशंकर मृत्यु पावल्यानंतर विश्वासराव लक्ष्मण नामक गृहस्थास सुभेदार नेमिलें व तदनंतर रघुनाथराव हरी नेवाळकर ह्या गृहस्थांची सन १७७० मध्यें योजना केली ह्यांनीं झांशी प्रांतावर आपली चांगली छाप बसवून व श्रीमंतांची मर्जी खुप करून झांशी प्रांत आपणाकडे घेतला. ह्यांच्याच घराण्यांतील शेवटली स्त्री राणी लक्ष्मीबाई ही १८५७ सालच्या बंडाच्या वेळीं आपल्या अतुल पराक्रमानें सर्वत्र प्रसिद्ध झाली. ह्या एकंदर माहितीवरून झांशीच्या सुभ्याचा द्र गोविंदपंत बुंदेल्याचा कांहीं संबंध नाहीं हें दिसून येईल.

ठिकाण रत्नागिरी जिल्ह्यात नेवरें ह्मणून जें लहानसें खेडें आहे तें होय. ह्यांचे मूळपुरुष विठ्ठलभट नेवरेकर ह्मणून कोणी होते. त्यांचे वंशज बाळाजी गोविंद खेर हे नेवरें येथील कुळकर्णाचें वतन चालवीत होते. व त्याचे भाऊबंद नरसीपंतबाबा खेर ह्मणून होते ते नेवऱ्याच्या शेजारींच बुरमाड ह्मणून गाव आहे तेथील कुळकर्णी होते. त्यास लक्ष्मणपंत, अंताजीपंत, रामाजीपंत, विठ्ठलपंत, काशी-पंत व बाबूराव असे सहा पुत्र होते, व बाळाजी गोविंद यांस एकही पुत्र नव्हता. तेव्हां त्यांनीं नरसीपंतबाबास विनंति करून त्याचा मुलगा लक्ष्मण ह्यास दत्तक घेतलें व त्याचें गोविंद असें नांव ठेविलें. तो लहान असल्यामुळें त्यानीं त्याची सर्व व्यवस्था नरसी-पंतबाबाकडे सोंपविली. ही हकीकत माघ शुद्ध १० शके १६२८ व्यय नाम संवत्सरामध्यें घडून आली.*

---

* ह्या वेळीं बाळाजी गोविंद यांनीं नरसीपंतबाबास जें व्यवस्थापत्र लिहून दिलें तें गुळसराई दप्तरांतून आह्मांस मिळालें आहे. तें येणें-प्रमाणें:—

श्री.

"ती० रा० राजश्री नरसीपंतबाबा खेर कुळकर्णी कर्यात
नेवरें व बुरमाड वडिलांचे सेवेशी:—

अपत्यें बाळाजी गोविंद खेर कुळकर्णी कर्यात नेवरें दोन्ही कर जोडून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना विशेष. आमचे पोटीं वंश नाहीं, वंशक्षय होणार. त्यास आमचें वतन कुळकर्णाचें व झाडमाड व इनामजमीन व घरघरटा व धान्याची शेतें वगैरे जी वतनदारी आहे त्यांतील खासगत माझा हिस्सा आहे, त्यास मजला संतान नाहीं सबब आपले भाऊबंद कर्यात मजकुरीं वगैरे गावीं आहेत, त्यांचे सर्वांचे घरीं मीं जाऊन त्यांस पृथक पृथक सांगितलें कीं माझे हिस्सास अधिकारी कोणी नाहीं तर सर्वांतून एक पुत्र द्यावा ह्मणजे माझा वंश चालेल. त्यास सर्व भाईबंद यांणीं दुर्बुद्धि धरून आह्मी कोणी मुलगा देत नाहीं असें दहा पांच वेळां

गोविंदपंताचें दत्तविधान झाल्यानतर थोडेच दिवसानीं बाळाजी गोविंद मृत्यु पावले व संसाराचा सर्व भार गोविंदपतावर पडला. गोविंदपताचें वय ह्या वेळीं तेरा चौदा वर्षांचें होतें. वडिलार्जित वतनाची व नेवऱ्याच्या कुळकर्णाची व्यवस्था त्याच्याकडेच आली. बालवय त्यातून ब्राल्य स्वभाव असल्यामुळें गावचे लोक ह्या पोरास मुळींच वळेनात. कांहीं दिवस बाळाजीपताच्या बायकोनें घरादाराची व्यवस्था संभाळली, परतु पुढें तीही पतिनिधनदु:खानें अगदीं खचली जाऊन लवकरच मरण पावली. त्यामुळें घरात वडील मनुष्य कोणी राहिलें नाहीं. अल्पवयीं गोविंदपत हूडपणांत व गावच्या चटोर पोरांशीं खेळण्यात आपला सर्व वेळ घालवू लागले. त्यामुळें वतनाची अव्यवस्था होऊन भाऊबंदांनीं गोविंदपंताचें वतन आपल्या पक्षात ओढण्याचा प्रयत्न केला. गोविंदपताचे पूर्वघरचे वडील

---

सर्व भाईबंद यांणीं सागितलें. त्याजवरून तुह्मी एक आमचे वशांतील भाईबद राहिलेला त्यास तुह्मास पुसावे असा विचार करून तुह्माकडे निघोन आलों. तुह्मास मुलगे सहा आहेत त्यांतून एक मुलगा आह्मास द्यावा असें बोलत असता ते समयीं रा० दादोबा नाईक मावळणकर ता० रत्नागिरी व खोत मौजे कुरमाड तर्फ कोडीवारे यांचे विद्यमानें चिरजीव लक्ष्मण "याग द्यावा असा ठराव जाहला त्याजवरून मी आपले वरून (?) सदरहू पैा तुह्मास निमे वरून (?) दिल्हे व निमे आपले वशास ठेवून वंशाचें उद्धारण मुलगा घेऊन केलें त्या मुलाचें नाव मी गोविंद ठेविलें असे. तुह्मी व मुलगा याणें एकविचारें वतनाची वहिवाट करावी आणिक भाईबद याचा कांहींएक सबध नाहीं हा मुलगा लहान सबब तुह्मीं या वतनाच्या वहिवाटीविषयीं पुस्तपणा वशपरपरा करावा. यास तुह्मीं अतर देऊं नये. कळावें बहुत काय लिहिणें मि० माघ शुद्ध १ शके १६२८ व्यय नाम सवत्सरे. सुरुसन सबा मयौ व अलफ. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना."

हें पत्र इंग्रज सरकारात नोंदलें असल्याबद्दल S, Babington for the Supdt. अशी सही आहे

नरसीपतबाबा ह्यानीं बुरमाडाहून पुष्कळ व्यवस्था केली व गोविंद-पंतांस शुद्धीवर आणण्याचा प्रयत्नही केला. परंतु त्या वेळीं अल्लड स्वभाव, उनाडपणा विशेष, अंगामध्यें तारुण्याची कुवत, आणि निष्काळजी वृत्ति असल्यामुळें गोविंदपंतास बापाचें सांगणें मुळींच रुचलें नाहीं ! त्यामुळें पुढें लवकरच आपल्या स्वछंदी वर्तनाचीं कटु फळें भोगण्याचें त्याच्या नशीबीं आलें. भाऊबंदानीं त्याच्याशीं भांडून त्याचें सर्व वतन गिळकृत केलें आणि पाच सहा वर्षांतच त्यास कफल्लक करून अन्नान्न दशा प्राप्त करून दिली.

दारिद्र्याचें अंजन मिळतांच गोविंदपंताचे डोळे उघडले व बिचारा नरसीपतबाबास शरण गेला व मला कसा तरी आश्रय द्या ह्मणून त्याची विनवणी करूं लागला. घरदार गेलें, वस्त्रपात्र गेलें, जवळ फुटका मणी राहिला नाहीं, अशी स्थिति झाली, तेव्हा त्यानें नरसीपतबाबाकडे धाव मारून एक हृदयद्रावक पत्र लिहिलें. तें वाचून त्याच्या त्या वेळच्या दारिद्र्य स्थितीचें मूर्तिमत चित्र कोणाच्याही नेत्रासमोर उभें राहील ह्यांत शंका नाहीं. हें पत्र येणें-प्रमाणें:—

"तीर्थस्वरूप राजश्री नरसीपतबाबा खेर,

कुळकर्णी कर्यात नेवरें व बुरमाड वडिलांचे सेवेशीं:—

अपत्यें गोविंद बल्लाळ खेर कुळकर्णी कर्यात नेवरें दोनी कर जोडून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना विशेष. मजला तुह्मीं ती० कैलास-वासी बाळाजी गोविंद खेर कुळकर्णी कर्यात नेवरें यास दत्तक दिल्हात. त्यास मी कर्यात मजकुरीं आपले वतनावर पाच साहा वर्षें होतों. आमचे ती० बाळाजीपंत यास देवाज्ञा जाहली व मातोश्री-सही जाहली. त्या उपरांत मजपाशीं भाईबंद यांणीं कज्या वगैरे करून मजला बहुत हैराणगती केली. अन्न खाण्यास नाहींसें जाहलें. माझा निरुपाय तेथें जाहला. यांजकरता मी तुह्माकडे आलों. त्यास

आह्मीं व तुह्मीं पूर्वीप्रमाणें एकत्र राहून चरितार्थ करावा. मी दत्तक जाहलों सबब माझा त्याग तुह्मीं करूं नये. कर्यात मजकु-रचा माझा हिस्सा कुळकर्ण व इनाम जमीन व धान्याची जमीन व घरघरठाण व झाडमाड वगैरे आहे त्यापैकीं वडिलानीं तुह्मास निम्मे पेशजी दिल्हेंच आहे. आजपासून तुमचे पांचजण व मी साहावा असे आपसात एकमेकाशीं कोणी प्रतारणा करणार नाहीं. इमानें इतबारें चालूं व कर्यात मजकूरचें वतनी शेतें वगैरे वतन आहे त्याची वहिवाट तुह्मीं व आह्मीं एकत्र करावी. भाईबंद याशीं कज्या तुह्मी व आह्मी करून आपले वतनाची वहिवाट सुरळीत चाले असें करूं व पुढें सहाजणातून एकास काहीं उद्योग व रोजगार वगैरे लागल्यास एकविचारें चालूं. हें आमचें वडील घर असे, तर सर्व-प्रकारें मान ठेवून वंशपरंपरेनें चालूं. आमचे वंशांतील कोणी आपले वंशासी प्रतारणा करणार नाहीं. कळावें बहुत काय लिहिणें. मिति मार्गशीर्ष शु० ८ शके १६२५ विजय नाम संवत्सरे सुरुसन अर्बा अशीरीन मया व अलफ. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना." *

ह्याप्रमाणें नरसीपंतबाबाशीं करार करून गोविंदपंत त्याच्याकडे गेले. नरसीपंतबाबानीं त्यांस आश्रय दिला, परंतु त्याचें उत्पन्न बातावेताचें व घरामध्यें घोरवडा फार असल्यामुळें सर्वांचा चरितार्थ तेथें चालेनासा झाला. तेव्हां दारिद्र्याच्या त्रासानें देशत्याग कर-ण्याचा विचार करून गोविंदपंत व त्याचे बंधु कोंकणातून देशात येण्यास निघाले.

ह्या वेळीं महाराष्ट्रामध्यें स्वराज्यसत्तेचा नुकताच अभ्युदय होऊं लागला होता. छत्रपति शाहू महाराज मोंगलांच्या कैदेंतून सुटून

---

* हेंही पत्र इंग्रज सरकारांत नोंदल्याबद्दल S. Babington for the Supdt. अशी सही आहे.

साताऱ्यास येऊन हिंदुपदपातशाहीचीं राज्यसूत्रें चालवू लागले होते. श्रीवर्धनकर बाळाजी विश्वनाथ भट व वेळासचे बाळाजी महादेव भानू वगैरे ब्राह्मण मंडळी साताऱ्यास जाऊन मराठी दरबारात आपला प्रवेश करू लागली होती. पुढें लवकरच भट यांनीं आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर शाहू महाराजांची मर्जी संपादन करून पेशवाईचीं वस्त्रें मिळविलीं. त्यामुळें ब्राह्मणांचा उदयकाल प्राप्त होऊन विपन्न स्थितींतलीं घराणीं कोकणातून देशावर येऊ लागलीं. आणि त्यांच्या अंगीं पराक्रमचातुर्यादि अद्वितीय गुणाची स्फूर्ति होऊन त्यांच्या हातून छत्रपतींची व त्यांच्या पट्टप्रधानांची मर्जी बसण्यासारखीं अलौकिक कृत्यें होऊ लागलीं. त्यामुळें दारिद्र्यानें गाजून जाऊन मृच्छकटिक नाटकांत ह्मटल्याप्रमाणें:—

दारिद्र्यान्मरणाद्वा मरणं मे रोचते न दारिद्र्यं ।
अल्पक्लेशं मरणं दारिद्र्यमनंतकं दु:खम् ॥ १ ॥

अशी ज्यांची स्थिति झाली होती ते शाहू महाराजांच्या कृपेनें अधिकारवैभवसंपन्न होऊं लागले होते. शाहू महाराजांची कृपा ह्मणण्यापेक्षा 'विधिलिखिताक्षरमालं फलति कपालं न भूपाल.' ह्या ह्मणीप्रमाणें त्यांच्या दैवाची रेषा उमटून ते राज्यलक्ष्मीचा उपभोग घेऊ लागले असें ह्मटलें तरी चालेल. असो. अशा वेळीं गोविंदपंत नेवरेकर हे महाराष्ट्रांत येऊन दाखल झाले व त्यांनीं राजदरबारीं कांहीं संधान लावण्याचा प्रयत्न केला. परंतु तेथें आश्रय मिळण्याचा योग आला नाहीं. ह्मणून अखेर त्यास पेशव्यांच्या पदरीं शागीर्दपेशाची नौकरी धरावी लागली.

बाळाजी विश्वनाथाच्या मागून पेशवाईचा अधिकार त्यांचे ज्येष्ठ पुत्र श्रीमंत बाजीरावसाहेब ह्यांस मिळाला. त्यांनीं 'बापसे बेटा सवाई' ह्या ह्मणीप्रमाणें आपली तरवार गाजवून दूरदूरचे देश काबीज करण्यास व मराठी राज्याचा झेंडा दूरवर फडकविण्यास प्रारंभ केला.

त्याच्या हाताखालीं हुजरे व शागीर्द ह्या नात्यानें जीं माणसें होतीं तीं केवळ झांकलेलीं माणकें असल्यामुळें प्रत्येक प्रसंगीं त्याचें दिव्य तेज चमकूं लागलें. गोविंदपंत ह्मणजे यःकश्चित् शागीर्द किंवा राणोजी शिंदे ह्मणजे जोडा पुसणारा हुजऱ्या, परंतु ह्या हुजऱ्यांनीं व शागीर्दांनीं श्रीमंताची जी एकनिष्ठ सेवा केली व आपलें अजब कर्तृत्व दाखविलें त्या योगानें त्यांनींही प्रसन्न होऊन त्यांचें कोट कल्याण करण्यास मागें पुढें पाहिलें नाहीं. उदारधी व गुणग्राहक प्रभु असल्यावर तेथें चांगल्या गुणाची योग्य पारख व्हावी हें अगदीं साहजिक आहे. गोविंदपंत जातीचा पीळदार, मनगटाचा जोरदार, छातीचा हिंम्मेबाज, असा होता. परंतु दारिद्र्याजनानें नम्र होऊन पेशव्याच्या पदरीं शागीर्दी करण्याचा प्रसंग त्यास आला होता, तरी त्याचे स्वाभाविक गुण श्रीमंताच्या नजरेस आल्यावाचून राहिले नाहींत. बाजीरावसाहेबाच्या स्वारीमध्यें असतांना त्याच्या चातुर्याची व प्रसंगानुरूप वागण्याची एक फार चमत्कारिक गोष्ट घडून आली. श्रीमंताची स्वारी दक्षिणेंतून एके वेळीं उत्तर हिंदुस्थानांत निघाली असतां त्याच्याबरोबर हा पाणीदार शागीर्द होता. मार्ग चालत असल्यामुळें श्रीमंतास दोन दिवस उपास-मार झाला. तेव्हां तिसरे दिवशीं त्यानें नर्मदेच्या कांठीं जळत असलेल्या एका प्रेताचा विस्तव घेऊन त्यावर रोट्या भाजल्या व आपल्या यजमानाची क्षुधा तत्काल शांत केली. हें पाहून श्रीमंतास त्याच्या धोरणाचा फार विस्मय वाटला. व त्यास हा कोणी तरी कर्तबगार पुरुष होईल असें वाटलें*. पुढें अनेक युद्धांमध्यें त्याच्या कर्तबगारीबद्दल श्रीमंतांची खात्री होऊन त्याची त्यावर पूर्ण मर्जी बसली आणि सन १७३३ मध्यें बुंदेलखंडांतील मोहिम फत्ते

* लोकहितवादींच्या 'ऐतिहासिक गोष्टीं'मध्यें हा वाई बावधनचा रहाणारा होता असें लिहिलें आहे परंतु त्याबद्दल शंका आहे.

झाल्यानंतर त्यास त्या प्रांताचा सुभेदार नेमिलें. ही हकीकत वर सांगितलीच आहे. येणेंप्रमाणें गोविंदपंताचा भाग्योदय होऊन ते शागीर्दांचे सुभेदार बनले व इतिहासांत गोविंदपंत बुंदेले ह्या नावानें प्रसिद्धीस आले.

बुंदेलखंड ह्मणजे अगदीं परदेश; तेथील बुंदेले लोक अतिशय दंगेखोर, त्यांतून मुसलमान लोक तो प्रांत घेण्यास टपलेले, अशी स्थिति असल्यामुळें त्या प्रांताची व्यवस्था करणें हें फार जोखमीचें काम होतें. तथापि गोविंदपंतानीं तें मोठ्या शहाणपणानें सिद्धीस नेऊन सर्व बुंदेले राजांवर आपलें वर्चस्व बसविलें व मराठ्यांचें अतिशय कल्याण केलें. ज्यास आपल्या गांवचें कुळकर्णाचें वतन संभाळण्याची देखील पुरती अक्कल नव्हती तो बाजीरावसाहेबांसारख्या पेशव्याच्या पसंतीस उतरून सर्व बुंदेलखंडाचा राज्यकारभार चालवितो हें पाहून ईश्वराच्या अद्भुत कृतीचें कोणासही कौतुक वाटल्यावाचून राहणार नाहीं. असो. गोविंदपंतास श्रीमंतानीं सुभेदारी सांगताच त्यानीं आपल्या मुत्सद्दीपणास प्रारंभ केला. प्रथमतः त्यानीं आपल्या ताब्यांत दिलेल्या प्रांताचा 'ऐनमाल कमाविसी, जकाती वगैरे'चे उघाईस आपल्या तर्फेनें निरनिराळे कमाविसदार नेमिले. ते पुढें लिहिल्याप्रमाणें:—

सागर प्रांतीं ठाणीं पांच.

१. रहिली रायगर, येथें गोविंद केशव कमाविसदार यास ठेविलें व त्यांच्याकडे रहिली, गढाकोटा, पथरिया, दमोई, बल्हई, वगैरे परगणे दिले.

२. दुसरें ठाणें कुटरी परगणे हटें, येथें केसो सोनदेव कमाविसदार यास नेमून त्याच्याकडे हटें, जह्राशकर, कोटा, सिमरिया, जेतपूर, अमानगंज, करेंटी वगैरे गांवें दिलीं.

३. तिसरें ठाणें उरई, येथें लक्ष्मणपंतदादा खेर कमावि-

...यांची नेमणूक केली व त्यांच्याकडे पंचमहाल, मेघाण, केळगांव, मालथोन वगैरे गांवें सोंपविलीं.

४. चौथें ठाणें जैसीनगर, कारण सागरचा किल्ला कुरई-वाले नबाब दाबून बसले होते, सबब ठाणें तेथें न राहून जैसीनगर येथें नेलें व तेथें एक कमाविसदार नेमून त्याकडे सागर परगणा, रणावली, जैसीनगर, हुसर-बारा, भेडा वगैरे प्रांत दिला.

५. पन्ना येथील हिऱ्याच्या खाणीचें जें उत्पन्न होईल त्याचा तिसरा हिस्सा घेण्याकरितां रामचंद्रपंत चितळे सुभेदार यांना ठेविलें.

ह्याचप्रमाणें जालवण प्रांतीं तीन ठाणीं ठेविलीं. तीं पुढें लिहि-ल्याप्रमाणें:—

जालवण प्रांतीं ठाणीं तीन.

१. चुरखी परगणे रायपूर येथें जनार्दन विठ्ठल खेर, यांच्याकडे परगणे कनार, जालवण, कोंच, कुटोण, गोहण, खजुवा, केलिया वगैरे.

२. दुसरें ठाणें ऐट परगणे महमदाबाद, येथें गोविंद जिवाजी नाफडे राहिले. यांच्याकडे ऐट, उरई, सैदनगर, कोठरा, आकोडी वगैरे.

३. तिसरें ठाणें गुलसराई, येथें विठ्ठलपंतकाका खेर यांनीं गुलसराई, सीमिरिया, बेरछ, तालवड वगैरेंची व्यवस्था पहावी.

येणेंप्रमाणें ठिकठिकाणीं योग्य ठाणेदार नेमून गोविंदपंतांनीं एकदर प्रांताची सुरेख व्यवस्था केली. छत्रसालाचा वडील पुत्र हिरदेसा ह्याच्याकडून कांहीं गडबड होऊ नये ह्मणून गोविंदपंत स्वतः पन्ना छत्रपूर येथें रहात असत व हिरदेसाकडून पेशव्यांस

मिळालेल्या प्रांताची उघाई आपल्या देखरेखीखालीं करीत असत. त्यांच्या दराऱ्यामुळें हिरदेसा जिवत होते तोंपर्यंत बुंदेल्यानीं बिलकूल तक्रार केली नाहीं.

गोविंदपंत आपल्या सुभ्याचा बंदोबस्त करूं लागल्यानंतर त्यांच्या अंगचे उत्तम गुण लवकरच प्रकाशमान होऊं लागले. त्यांनीं छत्रसालाचे चिरंजीव हिरदेसा ह्यांच्या दरबारांत आपला बस बसवून हळूहळू पेशव्यांस मिळालेल्या प्रांताचें चांगलें संरक्षण करण्याकरितां जागोजाग नवीन किल्ले बांधण्यास प्रारंभ केला व युक्तियुक्तीनें नवीन प्रांत काबीज करण्यास सुरवात केली. त्यांनीं प्रथमतः हिरदेसा राजास आपली कर्तबगारी दाखवून त्याजकडून गढाकोटाचा बळकट किल्ला मिळविला. हा पहाडी किल्ला पूर्वीं गोंड राजाच्या ताब्यात होता. त्या राजानें छत्रसाल राजाच्या वकिलाचा अपमान केला ह्मणून छत्रसालानें त्यावर स्वारी करून तो काबीज केला होता.* पुढें कुर-

* छत्रसालाचा जो वकील पेशव्यांची मेदत मागण्याकरितां पुणेदरबारीं गेला होता तो एका डोळ्यानें अंध होता तो पुण्याहून परत आला तेव्हां ह्या पहाडाजवळ जीं दोन प्रचंड तळीं आहेत त्याचे काठीं डेरे देऊन उतरला होता त्याचा अपमान करण्याकरितां गढमंडलाच्या राजानें त्यास मेजवानी दिली व त्यांत सर्व एकाक्ष माणसें पाठविलीं, एवढेंच नव्हे, तर ज्या कामदाराची त्या कामावर योजना केली तोही एकाक्ष, व त्याचा घोडा देखील एकाक्ष पाठविला होता. तें छत्रसालाच्या वकिलास असह्य होऊन त्यानें पन्ना येथें गेल्यानंतर आपल्या यजमानास ही गोष्ट कळविली. छत्रसाल राजा स्वाभिमानी असल्यामुळें त्यानें त्या गोंड राजावर स्वारी करून त्याचा प्रांत काबीज केला, व त्यास

हांसत कर्म करावें भोगावें रडत तेंच परिणामीं ।

ह्या मयूरकवीच्या उक्तीचा अनुभव आणून दिला. ही माहिती सागरच्या बखरींत दिली आहे. ह्या राजानें पलायन करून आपला बचाव

ईवाले नवाबाकडे हा प्रांत गेला. तो गोविंदपंत बुंदेल्यानीं हिरदेसाच्या करकें दांत आपणाकडे घेतला. नंतर त्यानीं तेथील हवापाणी व सृष्टिसौंदर्य पाहून तेथील सागर नावाच्या प्रचंड तलावाच्या कांठीं नवीन गांव वसविलें. व पुढें तेथेंच आपली राहण्याची जागा केली. नंतर सागर प्रांतांत गडपहाराचे गांव सामील करून तो स्वतंत्र परगणा केला. ह्या प्रांतामध्यें अहिर, गोंड वगैरे जातींचे रानटी व शूर लोक होते व त्यांचा पेशव्यांच्या मुलुखास फार उपद्रव होत असे. ह्मणून गोविंदपंतानीं त्यांच्यावर जरब ठेवून त्यांना अंकित करून सोडलें. ह्याप्रमाणें त्यांनीं आणखी प्रांत घेऊन व रहेली वगैरे ठिकाणीं किल्ले बांधून पेशव्यांच्या सुभ्याचें बुंदेलखंडांत चांगलें प्राबल्य स्थापित केलें.

इतक्यांत सन १७३९ मध्यें राजे हिरदेसा हे मृत्यु पावले. त्यास सभासिंग व पृथ्वीसिंग असे दोन पुत्र होते. पैकीं सभासिंग हा प्रबल असून त्यानें हिरदेसाच्या मागून लगेंच गादी बळकाविली. तो दुष्ट लोकांच्या सल्ल्यानें गोविंदपंताशीं बाहेरून गोड बोलून अंतस्थ द्वेषभावानें वागूं लागला, व पेशव्यांची वार्षिक खंडणी देण्यास तक्रार करून त्यांच्या मामलेदारास व कमाविसदारास न जुमानतां प्रांताची जमाबंदी करूं लागला. तेव्हां गोविंदपंतानीं त्याबद्दलचें स्पष्ट कारण त्यास विचारलें. अर्थात् त्याच्या मनांत पापबुद्धि उत्पन्न झाली असल्यामुळें त्यानें त्याचें सरळ उत्तर दिलें नाहीं. त्यामुळें गोविंदपंतास मनस्वी राग येऊन त्यानीं त्याचें पारिपत्य करण्याचा विचार केला. आजपर्यंत बुंदेल्याशीं स्नेहसंबंध चालत असल्यामुळें त्याच्याशीं युद्धप्रसंग करणें फार नाजूक असून कदाचित्

---

केला. त्याचे वंशज अद्यापि गढमंडलाजवळ एका गांवीं आहेत. ह्या राजाच्या वेळची 'मदनमहाल' वगैरे जुनीं चिन्हें जबलपुराजवळ अद्यापि दृष्टीस पडतात.

त्या योगानें बुंदेलखडांतील पेशव्यांच्या अमलास त्यांनी धोका पोहोंचेल कीं काय अशी भीति होती; सबब त्यांनीं त्याचा दूरवर विचार करून पेशव्यांच्या हुकुमानें काय तें करावयाचें असें ठरविलें. ह्याच समयास श्रीमत बाजीरावसाहेब कैलासवासी होऊन त्याचे चिरजीव नानासाहेब हे पेशवाईच्या पदाचे अधिकारी झाले होते. ह्याकरिता त्यास समक्ष भेटून व पुणेदरबारचा रागरग पाहून ह्या कामीं त्याची सल्ला घ्यावी ह्या उद्देशानें ते पुण्यास आले. तेथें आल्यानतर श्रीमताच्या व गोविंदपताच्या भेटी होऊन सभासिंगाचें राजकारण ठरलें व सरकारातून त्यास हुजरात व शिंदे होळकराच्या फौजा साह्यास मिळून ते पन्ना शहरावर हल्ला करण्याकरितां रवाना झाले. ते मजलदरमजल कुच करीत हृट्यास आले व तेथून सडे फौजेनिशीं दौड करून पन्ना येथें आले. तेथें राजा सभासिग हा बुंदेले लोक जमवून व मराठ्याच्या विरुद्ध होऊन युद्धास सिद्ध झाला. गोविंदपतांनीं पन्ना शहरास वेढा घालून मोठ्या चातुर्यानें सभासिगास किल्ल्यामध्यें कोंडून ठेविलें. पुढें त्यांची व बुंदेल्याची जगी लढाई झाली. तींत गोविंदपताचा पराक्रम उत्तम प्रकारें व्यक्त होऊन राजा सभासिंग हा शरण आला. आणि त्यानें पेशव्याच्या हिस्शाचे सर्व प्रात स्वतंत्र तोडून दिले व लढाईचा खर्च दिला. गोविंदपंताकडे सभासिंगाकडून हिरदेसाच्या हिस्शातील पुढील प्रात आले.

प्रात सागर—१ परगणे सागर—सागर, जैसीनगर, रणावली. २ परगणे हृटे—हृटे किल्ला कसबा बाहेर (खेरीज ?) करून; जटाशकर, बारपागर. ३ परगणे दमोई—दमोई, झुजार, आभाणे, बाळाकोट. ४ परगणे लखरोणी पथरिया. ५ परगणे रामगीर रहिली—रहिली, चाल्हई. ६ परगणे खेमलासें पंचमहाल—खेमलासें, खुरई, येरण, गडोला, इटावें, मोहासें. ७ मोघाण. ८ मालथोनचा किल्ला.

प्रांत जालवण:—१ परगणे कनार जालवण—जालवण, गोहोण,

कुरोण—न्नर ५- परगणे महमदाबाद ऐट—ऐट, उरई ३ परगणे रायपूर चुरखी ४ मौजे केलिया. ५ परगणे गुलसराई—गुलसराई, तालवड, सिमरिया, बोरछ. ६ परगणे कोंच.

येणेंप्रमाणें सागर व जालवण प्रांतीं मिळून चौदा परगणे अगदीं स्वतंत्र रीतीनें तोडून घेतले व हिऱ्याच्या खाणींतला तिसरा हिस्सा कायम करून घेतला.

ह्याच समयीं छत्रसालाचा दुसरा पुत्र जगत्‌राज हाही पन्नाच्या सभासिगास मिळाला होता ह्मणून त्याचेकडूनही सरकारी महाल तोडून घेतले. ते महोबा, हमीरपूर, काल्पी, नरसिंगगड असे चार होते. ह्या सर्व प्रांतांवर पूर्वीचे कमाविसदार कायम करून त्यांनीं स्वतंत्र रीतीनें वसूल करून सुभेदाराकडे पोहोंचता करावा असा बंदोबस्त केला. ह्या राजकारणामध्यें सरकारचा फार फायदा होऊन गोविंदपंतावर हुजूरची पूर्ण कृपा झाली.

गोविंदपंतानीं पन्नाच्या राजाकडून पेशव्यांचे सर्व प्रांत स्वतंत्र करून त्याचा बंदोबस्त केल्यानंतर उत्तरेकडे मुलुखगिऱ्या करण्याचा विचार केला. ह्या वेळीं मोठमोठे नामांकित सरदार महाराष्ट्रांतून उत्तर हिंदुस्थानात चढाई करण्यास निघाले असून बुंदेलखंडांतून ते निरनिराळ्या ठिकाणीं पसरले होते. राजपुतान्यामध्यें गोपाळराव बर्वे, दिल्लीकडे अंताजी माणकेश्वर, विठ्ठल शिवदेव विंचूरकर, अंतर्वेदीमध्यें मल्हारराव होळकर, गंगाधर यशवंत, व ओरछा वगैरे प्रांतात नारोशंकर वगैरे सरदार मोठमोठ्या फौजा घेऊन आपल्या कर्तबगारीनें व तरवारीच्या जोरावर आपला अंमल बसवीत चालले होते. अशा वेळीं गोविंदपंतास ताब्यात असलेल्या प्रांतांचाच नुसता बंदोबस्त करून स्वस्थ कसें राहवणार ? त्यांनींही आपल्या समशेरीचे चार हात चालवून नवीन प्रांत म्हाबीज करण्याचा निश्चय केला. त्यांनीं लगेच सागर वगैरे प्रांताची व्यवस्था पेशव्याच्या संमतीनें

आपल्या तर्फे आपला वडील मुलगा बाळाजी [illegible]कडे सोपवून व त्याच्या हाताखालीं कारभारी रामराव गोविंद, फडणीस केसो शंकर कान्हेरे, पोतनीस भिकाजी राम करकरे, चिटणीस रामचंद्र गोविंद चांदोरकर असे आपल्या जवळचे हुशार मुत्सद्दी व खाजगी पागा व शिलेदार ठेवून आपण स्वतः धाकटे चिरंजीव गंगाधर गोविंद ह्यास बरोबर घेऊन स्वारीस निघाले. पुढें काल्पीचा घाट यमुना उतरून मजलदरमजल कुच करीत ते अंतर्वेद प्रांतावर चालून गेले, आणि तेथील रोहिले पठाणांचा पराभव करून माणिकपुरापासून खुरज्याची गढी व कोळीजळेश्वरापर्यंत परगणे काबीज केले. ह्या वेळीं गोविंदपंतांनीं आपल्या समशेरीचा प्रभाव चांगलाच व्यक्त केला. प्रयागचा किल्ला व कुराजहानाबाद सर करून तेथें मराठ्यांचा झेंडा लावावा असा गोविंदपंतांचा हेतु होता परंतु तो सिद्धीस गेला नाहीं. ह्या मोहिमेमध्यें गोविंदपंतांस जो प्रांत मिळाला त्यावर त्यांनीं महालानिहाय आपल्या बरोबरीच्या मंडळीपैकीं काशीपंतकाका खेर वगैरे हुशार गृहस्थांस निरनिराळीं कामें सांगितलीं. गोविंदपंतांनीं अंतर्वेदीवर हल्ला करून बराच प्रांत काबीज केला. हें ऐकून दिल्लीहून कुबड्या नांवाचा एक सरदार चालून आला, परंतु त्यांनीं त्याच्याशीं मातबर लढाई करून त्याचा पराभव केला व त्याची फौज लुटून त्याला 'दे माय धरणी ठाय' करून सोडलें. ह्या मोहिमेमध्यें गोविंदपंतांनीं जे प्रांत काबीज केले त्यामध्यें शिंदे होळकरांचा बिलकूल हिस्सा नसून ते सर्व सरकारच्या मालकीचे होते.

ह्याप्रमाणें पहिली मोहीम फत्ते झाल्यानंतर दुसरे वर्षीं गोविंदपंतांनीं शिंदे होळकरांचें साह्य घेऊन, इटावें, फुफुंद, सकुराबाद वगैरे प्रांतावर स्वारी केली, व ते तिन्ही प्रांत हस्तगत करून तेथें आपला अंमल बसविला. शिंदे होळकरांच्या फौजा बरोबर असल्या ह्मणजे काबीज

झालेल्या ... ची वाटणी करून द्यावी लागत असे. ती दर शेंकडा पुढें लिहिल्याप्रमाणें असे.—

| सरकारी हिस्सा | होळकर | शिंदे |
|---|---|---|
| ५३।= | २३।– | २३।– |

ह्याप्रमाणें वांटणी होऊन इटावा महाल सरकारात आला. सकुराबाद होळकर याजकडे गेली व फुफुंद वगैरे महाल शिंद्यास मिळाले. ह्याखेरीज गढमुक्तेश्वरपर्यंत आणखी प्रांत मिळाला होता त्याची वाटणी होऊन सरकारचा प्रांत गोविंदपंताच्या जिम्मेखालीं आला. गोविंदपंत हे पेशव्याचे सुभेदार असल्यामुळें सरकारच्या वाटणीस जो प्रांत येईल तो त्याच्या ताब्यात येत असे. त्याचा बंदोबस्त ते पेशव्याच्या हुकुमानें मोठ्या चातुर्यानें करीत असत. नवीन मिळविलेल्या इटावा प्रांतावर त्यांनीं मोरोपंत पंडित नामक एका हुशार गृहस्थास मामलतदार नेमिले व फडणिसीचें काम कृष्णाजी राम लवाटे ह्यास सांगितलें. नवीन मिळालेल्या प्रांताची गोविंदपंतांच्या हातून योग्य व्यवस्था होते असें पाहून शिंदे होळकरानीं ह्या खेपेस आपापल्या वाटणीस आलेले महाल त्यांच्याच ताब्यात दिले, व ते दक्षिणेंत गेले. गोविंदपंत हे कांहीं दिवस इटावा येथें व कांहीं दिवस रायपुराजवळ उमरगड ह्मणून गाव आहे तेथें राहून चातुर्मास घालवीत असत. व खरीप रब्बीचे हंगामीं प्रांतांत स्वतः फिरावयास जाऊन जमाबंदी करीत असत. त्यामुळें प्रांताचें उत्पन्न नियमित रीतीनें जमा होत असे.

अशा रीतीनें गोविंदपंताचा बुंदेलखंडात चांगला अंमल बसूं लागला व बुंदेले राजेही त्याच्याशीं नम्रपणानें वागूं लागले. त्याचें सामर्थ्य व लौकिक ऐकून पुष्कळ बुंदेले संस्थानिक त्यांना आपल्या साह्यास बोलावीत व त्याजबद्दल त्याना निराळा मुलूख देत असत. गोविंदपंत स्वतः मोठे राजधोरणी व हिंमतदार असल्यामुळें ते बुंदेले संस्था-

निकाच्या साह्यास जाऊन आपलें वर्चस्व त्याच्या [illegible] कायम करून येत असत. पन्नाचा राजा सभासिंग व जेतपूरचे राजे जगत्‌राज ह्यांस त्यांनीं आपल्या मुठींत ठेविलें होतें. असें असतांही त्यांच्यामध्यें कुटिलमंत्रिमंडळाच्या कारस्थानानें वारवार विग्रह उत्पन्न होऊन गोविंदपंतांस त्यांत पडण्याचे नेहमीं प्रसंग येत. राजा सभासिंग हा हिरदेशाच्या मागून पन्नाच्या गादीवर आला व त्यानें गोविंदपंतांशीं उन्मत्तपणानें वागून पेशव्यांच्या खंडणीस हरकत केली. तेव्हां गोविंदपंतानीं त्यास आपल्या समशेरीचा जोर दाखवून पेशव्याचे प्रांत स्वतंत्रपणें तोडून घेतले ही हकीकत मागें सांगितलीच आहे. त्याच सभासिंगामध्यें व त्याचा धाकटा भाऊ दिवाण पृथ्वीसिंग ह्यामध्यें पुन्हा कलह उत्पन्न झाला, व पृथ्वीसिंग त्याजवळ राज्याचा अर्धा वाटा मागूं लागला. सभासिंग महाकपटी व स्वार्थपरायण असल्यामुळें त्यानें राज्यलोभाधीन होऊन आपल्या बंधूचा वध करण्याचा बेत चालविला. ही गोष्ट सभासिंगाच्या राणीस समजली. ती जातीनें अबला होती तरी अत्यंत कृपाळू व पापभीरु होती. तिनें रातोरात पृथ्वीसिंगास व त्याच्या मुलामाणसांस पन्ना नगरांतून पळवून लाविलें व आपल्या दुर्वृत्त पतीचा नीच हेतु तडीस जाऊं दिला नाहीं. दिवाण पृथ्वीसिंग पन्ना-नगरांतून पळून गेल्यानंतर गोविंदपंताच्या आश्रयास जाऊन राहिला, व त्यांच्या मार्फत पेशवे सरकाराजवळ विनंति करून पन्ना येथील राज्याचा सभासिंगाकडून अर्धा हिस्सा मिळण्याबद्दल प्रयत्न करूं लागला. गोविंदपंतांनीं त्याची दैन्यावस्था पाहून त्यास आश्रय दिला व पेशवे सरकारच्या परवानगीनें सभासिंगाकडून राज्याचा हिस्सा मिळवून देऊं असें अभयवचन दिलें. त्यामुळें पृथ्वीसिंगास फार समाधान वाटून तो गोविंदपंताजवळ राहिला. त्यांनींही त्याचा मोठेपणा व पेशव्यांचा व छत्रसालाचा स्नेहसंबंध ध्यानांत आणून त्याचा चांगला मरातब

ठेविला—त्याच्या तैनातीकरितां ३०० स्वार व ५०० प्यादे इतका सरजाम दिला. ह्यावरून गोविंदपंताची सुजनता व मनाचा थोरपणा हीं चांगलीं व्यक्त होतात.

ह्यानंतर कांहीं दिवसांनीं गोविंदपंत स्वतः पुण्यास गेले व आपल्या बरोबर पृथ्वीसिंगास नेऊन त्याची व श्रीमंतांची भेट करवून दिली. पेशव्याच्या दरबारीं गोविंदपंताची चांगली छाप असल्यामुळें श्रीमंतानीं पृथ्वीसिंगाचा योग्य सत्कार करून त्यास ठेवून घेतलें व कर्नाटकची मोहीम झाल्यानंतर त्यास बुंदेलखंडांतील राज्याचा हिस्सा मिळवून देऊं असें आश्वासन दिलें. दिवाण पृथ्वीसिंग पुढें सुमारें तीन वर्षेपर्यंत पेशव्यांच्या दरबारीं राहिले व त्यानीं आपल्या सरळ व आर्जवी वर्तनानें श्रीमंताची मर्जी खुश केली. ह्यावरून बुंदेले राजेही ह्या वेळीं पंतप्रधानाच्या चरणाची सेवा करावयाला झटत होते असें दिसून येतें.

श्रीमंत नानासाहेब पेशवे यांची व गोविंदपंताची पुणें मुक्कामीं जी भेट झाली तिच्यामध्यें एक विशेष गोष्ट घडून आली. हा समय म्हणजे मोठा आणीबाणीचा होता. श्रीमंताच्या मनातून कर्नाटकावर स्वारी करून सावनूरच्या नवाबाचें पारिपत्य करावयाचें होतें. परंतु त्यांच्याजवळ अगदीं द्रव्य नव्हतें. जागोजाग सैन्याचा खर्च वाढत चालल्यामुळें पैशाची टंचाई पडली होती व त्या योगानें पुढील बेत सिद्धीस जाण्यास बरीच अडचण प्राप्त झाली होती. तेव्हां श्रीमंतांनीं गोविंदपंतांस ही सर्व हकीकत निवेदन करून असें सांगितलें कीं, 'ह्या वेळीं तुमच्यासारख्या स्वामिनिष्ठ व पेशव्यांच्या गादीचा अभिमान बाळगणाऱ्या सुभेदारांनीं जर साह्य केलें तरच आलेला प्रसंग निवारण होईल. ह्या वेळीं सर्व मदार तुमच्यावर आहे.' श्रीमंताचे हे करुणात्मक शब्द श्रवण करून गोविंदपंतांनीं लगेच आपलें कलमदान सोडून शहाण्णव लक्षांच्या हुंड्या श्रीमंतांपुढें

ठेविल्या.''* हें पाहून श्रीमंतांस परमानंद झाला. त्यांनीं त्यांच्या प्रसन्नांतः-करणानें फार फार उपकार मानून त्यांच्या शहाण्णव लक्षाच्या हुंड्या-बद्दल त्यास दस्तऐवज लिहून देण्याविषयीं कारकुनास सांगितलें. त्या वेळीं गोविंदपंतानीं पुनः आपलें विलक्षण औदार्य दाखवून श्रीमंतांस चकित करून सोडलें. गोविंदपंतानीं ऐन संकटप्रसंगीं एकदम शहाण्णव लक्ष रुपयाची श्रीमंतांस मदत केली त्यामुळें ते अतिशय उपकारबद्ध होऊन त्यांना शहाण्णव लक्षाचा दस्तऐवज लिहून देण्यास तयार झाले होते. परंतु गोविंदपंतानीं त्याचा स्वीकार न करितां आपल्या मनाचा अलौकिक थोरपणा प्रकट केला. त्यांनीं श्रीमंतांस मोठ्या नम्र शब्दांनीं असें सांगितलें कीं, 'एव्हां मी दस्त-ऐवज घेत नाहीं. आपण मसलत फत्ते करून यावें व तोंवर मीही हिंदुस्थानांतील बंदोबस्त करून दर्शनास येतों. नंतर जशी आज्ञा होईल तसें करावयास येईल'' श्रीमंत नानासाहेब हे चतुर मुत्सद्दी होते. त्यांनीं गोविंदपंताच्या गंभीर भाषणाचा गर्भितार्थ ध्यानीं घेऊन हर्षभरित चित्तानें त्यांचें फार अभिनंदन केलें, व स्वामीचें यश राखण्याबद्दल गोविंदपंतानीं जी तत्परता दाखविली तिच्याबद्दल त्यास शिरपाव व भरजरीचे पोषाक देऊन त्यांचा योग्य सन्मान केला. नंतर गोविंदपंतानीं बुंदेलखंडातील कामाचे सर्व उगावे करून घेऊन व दिवाण पृथ्वीसिंग ह्यास पुणेदरबारांत ठेवून श्रीमंतांची रजा घेतली. श्रीमंतांनीं जातेसमयीं गोविंदपंतास मुतालकीचीं वस्त्रें व कित्येक नवीन दरबारचे अधिकार देऊन त्यांचा फार गौरव केला. ह्या वेळीं गोविंदपंतास पेशव्याकडून जे दरखदार नेमून मिळाले ते येणेंप्रमाणें:—

१ त्रिंबक कृष्ण कानिटकर—मुजूमदार.

२ जनार्दन आप्पाजी येरंडे—फडणीस.

* गोविंदपंत बुंदेले यांची कैफीयत.

-- ... .बचावा परभु-चिटणीस.

अशा रीतीनें गोविंदपंतांची पुण्याची स्वारी यशस्वी होऊन व त्यांच्यावर पेशव्याचा पूर्ण लोभ जडून ते त्यांचे धन्यवाद घेत बुंदेलखंडामध्यें परत गेले.

इकडे पृथ्वीसिंग पेशव्यांच्या दरबारीं तीन वर्षे राहिले. व त्यांनीं अनेक प्रसंगीं आपलें शौर्य श्रीमंतास प्रदर्शित करून त्यांची मर्जी सुप्रसन्न करून सोडली. कर्नाटकच्या मोहिमेमध्यें पृथ्वीसिंग स्वतः गेले होते व त्यांनीं शिंदे, होळकर, विंचूरकर वगैरे सरदाराच्या बरोबरीनें सैन्याची आघाडी संभाळून शत्रूच्या तोंडावर लढाई केली, त्यामुळें त्यांची फार वाहवा झाली. त्यांचा पराक्रम पाहून श्रीमंतानीं त्यांस बुंदेलखंडांतील जहागीर द्यावयाचें कबूल केलें व गोविंदपंतांस तत्प्रीत्यर्थ पुण्यास बोलाविलें.

गोविंदपंत पुनः पुण्यास आल्यानंतर त्यांच्या व श्रीमंताच्या भेटी होऊन पृथ्वीसिंगाच्या जहागिरीबद्दलचा विचार कायम झाला. श्रीमंतानीं पृथ्वीसिंगास भरदरबारामध्यें राज्यतिलक लावून त्यास गोविंदपंतांच्या हवालीं केलें व त्यांनीं पन्नाच्या राजावर स्वारी करून त्यास राज्यारूढ करावें ही कामगिरी सांगितली. गोविंदपंतानीं श्रीमंताची आज्ञा शिरसावंद्य करून पृथ्वीसिंगास पन्नाची अर्धी जहागीर देण्याचा निश्चय केला, व दरबारचें काम आटोपून पृथ्वीसिंगासह ते बुंदेलखंडांत चालते झाले. नंतर त्यानीं पन्नाच्या सभासिंग राजावर पुनः स्वारी करून त्यास अगदीं नम्र करून सोडिलें व त्यजकडून पृथ्वीसिंगाच्या वांट्याची जहागीर तोडून घेतली. परंतु पृथ्वीसिंगास बुंदेल्याकडून पुनः उपसर्ग लागेल म्हणून त्यानीं ती जहागीर त्यास न देतां तितक्याच किंमतीचा पेशव्यांच्या अमलांतला गढाकोटा, भेडा, शहागड, वगैरे प्रांत त्यांच्या स्वाधीन केला. त्या योगानें पृथ्वीसिंगावर पेशव्यांची छाप कायम राहून त्यास बुंदे-

त्यांचा उपसर्ग नाहींसा झाला. त्याबद्दल पृथ्वीसिंगानें श्रीमंतास स्वसंतोषानें ५०,००० सरकारी चौथ व ५,००० दरबारखर्च कबूल केला. गोविंदपतांनीं त्या प्रांतावर आपल्या तर्फे स्वतंत्र मामलेदार नेमून पृथ्वीसिंगास स्वस्थतेनें राज्योपभोग घेता येईल अशी तजवीज केली. येणेंप्रमाणें शरणागतास दिलेलें अभयवचन परिपूर्ण करून गोविंदपंत कृतकृत्य झाले.

पृथ्वीसिंगास स्वतंत्र जहागीर दिल्यानंतर गोविंदपतांनीं उत्तरेकडे होणाऱ्या मोहिमेमध्यें आपलें सर्व लक्ष घातलें, व शिंदे होळकर ह्यांस उत्तम प्रकारचें साह्य करून मोठमोठीं पराक्रमाचीं कामें केलीं. रघुनाथराव पेशव्यानीं दिल्लीअटकेपर्यंत भरारी मारून लाहोर–पंजाब प्रांत सर केला, विठ्ठल शिवदेव विंचूरकर, अंताजी माणकेश्वर, नारोशंकर राजेबहाद्दर ह्यांनीं व मल्हारराव होळकर, व दत्ताजी व जनकोजी शिंदे ह्यानीं मारवाड, राजपुताना, व भरतपूर येथें ज्या मोठमोठ्या राजकीय उलाढाली केल्या, त्याचप्रमाणें दिल्लीचा प्रबल नबाब वजीर गाझीउद्दीन, अयोध्येचा नबाब मनसूरअली सफदरजंग व रोहिल्यांचा सरदार नजीबखान ह्याच्याशीं जे मनसबे केले व त्यांस आपल्या शिपाईगिरीनें व गनिमी काव्यानें जेरीस आणून चोहोंकडे मराठ्यांचा दरारा बसविला, त्या सर्व मसलतींत गोविंदपंतांचें अंग असून त्यांनीं अनेक वेळा पेशव्यांच्या फौजेस ऐन संकटसमयीं जें द्रव्यसाह्य केलें तें अगदीं अप्रतिम होय. दक्षिणेंतून उत्तरेकडील राजमामल्याकरितां फौजा निघाल्या व पुढें आयत्या वेळेस द्रव्याचा तोटा आला कीं, गोविंदपंताकडून त्याचा पुरवठा होत असे. गोविंदपंतांजवळ जरी ऐवज शिल्लक नसला तरी ते स्वामिकार्यासाठीं झांशी, काल्पी वगैरे ठिकाणचे रायराव रतनसिंग, बिशंभरदास वगैरे मोठमोठ्या सावकाराकडून रोकडीचा भरणा करून सरदार लोकांची वेळ निभावून नेत असत.

सर्व बुंदेल्यांमध्यें त्यांची कदर मोठी असल्यामुळें व सर्व बुंदेले संस्थानिक त्याच्या ओंजळीनें पाणी पीत असल्यामुळें त्यांचा शब्द कोणीही अमान्य करीत नसत. रोहिले, पठाण, दिल्लीचे वजीर, व मारवाड प्रांतातील रजपूत व भरतपूरचे जाट राजे ह्या सर्वांकडे गोविंदपताचें राजकारण असल्यामुळें त्याच्या मसलतीचा पेशव्यांस व त्याच्या सरदारास फार उपयोग होत असे. एकदां सुजाउद्दवल्यानें मराठ्यांशीं सधान बाधून दिल्लीची वजिरी दिल्यास पन्नास लाख रुपये व काशी, प्रयाग वगैरे प्रांत देण्याचें बोलणें चालविलें. त्या वेळीं श्रीमंत नानासाहेब पेशव्यांनीं दत्ताजी शिंदे व जनकोजी शिंदे यास एक विस्तृत पत्र लिहून असें कळविलें कीं, 'हें राजकारण खरें खटके या गोष्टीचा पुर्ता शोध जाटाचे मार्फतीनें व गोविंद बल्लाळ याचे मार्फतीनें पुर्ता करून आपणाकडील इतबारी शहाणा सुजाउद्दवला पावेतों पाठवून सर्व रागरंग पाहून जर पन्नास लाख रोख व प्रयाग हातास येत असेल तर वजिरी द्यावी.' ह्यावरून नानासाहेबाचा गोविंदपंतावर किती विश्वास होता हें सहज व्यक्त होतें. उत्तर हिंदुस्थानात मराठ्यानीं जीं शिपाईगिरीचीं व मुत्सद्दीपणाचीं अनेक कामें केलीं त्याचा प्रस्तुत प्रकरणाशीं विशेष संबंध नसल्यामुळें त्याबद्दल येथें विशेष लिहिता येत नाहीं. तथापि शिंदे होळकरानीं गोविंदपतांच्या साह्यानें अहमदखान बंगष वगैरे मुसलमान सरदाराशीं अनेक युद्धें करून जी मर्दुमकी गाजविली व श्रीमंताकडून 'शाबास तुमच्या हिमतीची व दिलेरी रुस्तुमीची! व शाबास लोकाची! आमच्या दक्षिणच्या फौजानीं यमुना गंगापार होऊन रोहिले पठाणांशीं युद्ध करून आपण फत्ते पावावें हें कर्म लहान सामान्य न झालें! तुह्मी एकनिष्ठ कृतकर्मे सेवक या दौलतीचे स्तंभ आहा! जें चित्तावर धरितां तें घडून येतें. पहिलीं यशावह कर्में संपादिलींत तत्तोप्यधिक हें यश संपादिलेत. या यशास जोडाच नाहीं.'

अशा प्रकारचे वेळोवेळीं अवर्णनीय धन्यवाद मिळविल्यानें धरून कोणासही अत्यानंद झाल्यावांचून राहणार नाहीं.

गोविंदपंत जसे लेखणीचे खंबीर होते व त्याच्या ठिकाणीं मुत्सद्देगिरी चांगली वसत होती त्याप्रमाणें ते मनगटाचे जोरदार असून शिपाईगिरीच्या कामांतही पुरे निष्णात असत. त्यांनीं सर्व बुंदेले राजास आपल्या ओंजळीनें पाणी प्यावयास लावून त्या सर्वांकडून पेशवे सरकारचें मांडलिकत्व मान्य करविलें व स्वतः निरनिराळे प्रांत काबीज करून प्रांताचें उत्पन्न पुष्कळ वाढविलें. त्यांच्यावर सुजाउद्दवला वगैरे मुसलमान सरदारांचा फार कटाक्ष असून त्यांच्या प्रांतावर ते अनेक वेळां स्वाऱ्या करीत असत. पण गोविंदपंत स्वत. खंबीर असल्यामुळें आपल्या शौर्यानें त्याचा अगदीं धुव्वा उडवून देत असत. अयोध्येचा वजीर सुजाउद्दवला ह्यानें एक वेळ गोविंदपतांशीं वैमनस्य धरून त्यांच्या प्रांतावर मीरमिया नामक एक सेनापति पाठविला. त्या वेळीं गोविंदपतांनीं आपल्या तरवारीचें दिव्य तेज फारच उत्तम रीतीनें व्यक्त केलें. त्यांनीं त्या पठाण सरदाराच्या फौजेबरोबर निकराचें युद्ध करून तिची दाणादाण करून सोडली आणि त्यास बुंदेलखडांतून हांकून दिलें.* हा

---

* ह्या युद्धासंबंधाची सविस्तर हकीकत मिळत नाहीं इंग्रजी इतिहासात ह्या गोष्टी कोठें उपलब्ध नाहींत. फक्त मध्य हिंदुस्थानचे पोलिटिकल एजंट कर्नल स्लीमन ह्यांनी एके ठिकाणी गोविंदपतांसबधानें पुढील अभिनंदनपर चार ओळी लिहिल्या आहेत त्यात थोडासा उल्लेख केला आहे.

"Govind Pundit remained in charge of these districts as Mukasdar, and transferred the seat of government from Gurhpahra to Sauger, where he built a fortress and town upon the borders of a very handsome lake. He extended his conquests and authority over other chiefs and districts to the eastward as far as Calpee, and repelled an attempt

गोविंदपंतांचा अद्भुत पराक्रम पाहून सुजाउद्दवला चकित झाला व तेव्हापासून तो गोविंदपतांस फार वचकून राहू लागला.

ह्यानंतर दिवसेंदिवस बुंदेलखंडामध्यें गोविंदपताचें वर्चस्व अधिकाधिक स्थापित होऊन त्यांच्या कर्तबगारीनें मराठ्यांची सत्ता दूरवर पसरत चालली. व अनेक महाराष्ट्रीय कुटुंबें बुंदेलखंडांत जाऊन आपल्या गुणाच्या योगानें प्रसिद्धीस आलीं. गोविंदपताची प्रांताचा बंदोबस्त करण्याची शैली फार चांगली असून त्यात ते मोठ्या दक्षतेनें वागत असल्यामुळें त्याच्याजवळ द्रव्यसंग्रह चांगला असे व त्याचा वेळोवेळीं उत्तर हिंदुस्थानातील मोहिमेमध्यें उपयोग झाल्यामुळें त्याच्यावर पेशव्याची पूर्ण कृपा असे. गोविंदपंताकडून बुंदेलखंडाचा जावसाल पेशव्यांच्या दरबारीं प्रतिवर्षी नियमानें होत असे. त्यामुळें 'पुण्याचे दरबारीं विश्वास आणि आखत्यार होऊन ज्या कामात पडत तें होत *असे.' अयोध्येच्या नबा-

on the part of Shooja-oo-doula, the late Nawab Wazier of Oude, to wrest from him his newly acquired possessions in that quarter. An army under the command of Meer Meau was dispatched and driven back with great loss."

—*History of the Garh-Mandla Rajas* -

*Journal. Ben. R A S p. 635.*

* शिंदे, होळकर, अंताजी माणकेश्वर, गोविंदपंत बुंदेले वगैरे सरदार स्वतंत्र होण्याची इच्छा करून पेशव्यांच्या दरबारीं हिशेब वेळेवर पाठवीत नसत. त्यामुळें सदाशिवरावभाऊ त्याना फार तगादा लावीत ह्मणून हे सर्व सरदार त्याचा द्वेष करीत असत, असें रा. नातू यांनी महादजी शिंदे यांच्या चरित्रांत (पृ० ५८) लिहिलें आहे. पण गोविंदपंत बुंदेले ह्याच्याविषयीं तसा आरोप करण्यास आधार कोणत्याही कागदपत्रांत जागा सांपडत नाहीं उलट गोविंदपंतांचे वार्षिक हिशेब पाहिले तर पेशव्यांकडेच त्यांची जास्त बाकी निघते.

चाकडून आलेल्या प्रबल सरदारांचें पारिपत्य [illegible] सन १७५७ च्या सुमारास ) गोविंदपंत एकदाच पुण्यास गेले होते. तेथें त्यांच्या पराक्रमाची फार तारीफ होऊन त्यांना अनेक उंची पोषाक मिळाले. * तेथून श्रीमंताचा निरोप घेऊन बुंदेलखंडांत परत आल्यानंतर ते पुनः पुण्यास गेले नाहींत. ह्यानंतर उत्तर हिंदुस्थानामध्यें अनेक राजकीय उलाढाली सुरू होऊन सर्व कर्तृत्ववान् मराठ्यांचें लक्ष त्यांत गुतून राहिलें. त्याप्रमाणें गोविंदपंतही आपले उभय चिरंजीव बाळाजी गोविंद व गंगाधर गोविंद ह्यास घेऊन काल्पीस जाऊन राहिले व आपल्या प्रांताचा सुरेख बदोबस्त करून उत्तरेकडील मनसुबे साधू लागले. पुण्याहून गेल्यानंतर गोविंदपंतानीं सागर प्रांताची व्यवस्था आपले जावई विसाजी गोविंद चांदोरकर यांजकडे दिली होती. तिकडे त्यांनींही चांगला बदोबस्त ठेविला होता. पुण्याच्या दरबारीं गोविंदपंताचे बंधु बाबूराव खेर हे त्यांच्या तर्फे वकिलीवर होते. ते बुंदेलखंड प्रकरणासबधानें सर्व राजमामले पुणेदरबारांत उत्तमप्रकारें समजावीत असल्यामुळें गोविंदपंतास पेशव्याच्या दरबारातली काळजी बिलकूल रहात नसे. इकडे उभय चिरंजीव चांगले पराक्रमी व कर्तृत्ववान् निपजल्यामुळें प्रत्येक मोहिमेमध्यें त्यांचें उत्तम साह्य होऊन गोविंदपंताची प्रत्येक मसलत फत्ते होत असे. कोंचकनार प्रांतीं गढीबंद जमीदारानीं सरकारी जागा दाबून फार पुडावा

---

* ह्या संबधाचाही उल्लेख कर्नल स्लीमन ह्यांनीं केला आहे:—

"Having secured his dominions in Bundelkhand he returned to Poona, where he was received with all the respect and acknowledgements due to his highly important services He returned to Bundelkhand, left his son-in-law Bisajee as his representative at Saugor, and removed the seat of his government to Calpee"

मांडला. तेव्हां त्याचें पारिपत्य करण्याचे कामीं गंगाधर गोविंद ह्यांनीं फार शौर्य दाखविलें होतें. त्याचप्रमाणें बाळाजी गोविंद हेही सर्व बुंदेले राजांस शह देऊन राहिले होते. त्यामुळें गोविंदपंतांचा चोहों-कडून सुरेख जम जुळून प्रत्येक गोष्टींत त्यांस यशःप्राप्ति होऊं लागली व त्यांचा फार लौकिक झाला. गोविंदपंताच्या दिनचर्ये-संबंधानें व इतर खाजगी गोष्टींसंबंधानें विशेष माहिती उपलब्ध नाहीं, तरी ते स्वभावाचे मोठे मानी व उदार असावेत असें दिसून येतें. त्याच्या मनाच्या थोरपणाचें एक उदाहरण मागें सांगितलेंच आहे. त्यांच्या मानी स्वभावाचें आणखी एक उदाहरण त्यांच्या खदस्तुरच्या पत्रांत आह्मांस दिसून आलें तें सांगण्यासारखें आहे. शके १६८१ सालीं त्यानीं आपले बंधु व पुण्याच्या दरबारांतले बुंदेलखंडाचे वकील बाबूराव याच्या मार्फत श्रीमंतांकडून आपणांस पालखीचा अधिकार मिळावा असा प्रयत्न केला. परंतु तो अधिकार सर्व सरदारास देण्याची त्या वेळीं चाल नसल्यामुळें श्रीमंतानीं ती विनंती अमान्य केली. तेव्हा गोविंद-पंतास वाईट वाटून त्यांनीं बाबुराव ह्यांस असें साफ लिहून पाठविलें कीं, 'आह्मीं कांहीं खावंदांचें नारिलें नाहीं.' पुढें श्रीमंतांस ही गोष्ट कळतांच त्यानीं गोविंदपंताची योग्यता ध्यानीं घेऊन त्यांस पाल-खीचा अधिकार व सरंजाम पाठविला. परंतु गोविंदपंतानीं त्याचा आमरण स्वीकार केला नाहीं. ह्यावरून 'मानोहि महतां धनम्' ह्या उक्तीची सत्यता दिसून येते. गोविंदपंताच्या औदार्यासंबंधानें व दानधर्मासंबंधानेंही कांहीं गोष्टी प्रसिद्ध आहेत. अहमदखान पठाण ह्याचा पराभव केल्यानंतर अंतर्वेद प्रांत गोविंदपंतांस मिळाला. त्या वेळीं मल्हारराव होळकराचे दिवाण गंगाधरपंत तात्या हे गोविंद-पंतास लखनौचा वजीर मनसूरअलीखान ह्याच्या वकिलासमक्ष किंचित् टोंचून बोलले कीं, 'गोविंदपंतांस प्रांत घ्यावयाचा ठाऊक आहे. द्यावयाचा माहीत नाहीं.' त्या वेळीं गोविंदपंतांनीं १०००० ची

जहागीर नरसिंगदास निसबत वजीर मनसूरअलीखान यांस दिली व १००० रुपये ब्राह्मणांस धर्मादाय दिले; हें पाहून गंगाधरपंत मनांत खजिल झाले. ही गोष्ट संवत् १८१० सालीं मुक्काम कुंभेर येथें झाली.

येणेंप्रमाणें गोविंदपंताचा अतिशय लौकिक होऊन ते पेशव्याच्या दरबारांतले एक नामांकित सरदार होऊन राहिले.



# भाग ५ वा.

## पानिपतची लढाई

आणि

## गोविंदपंत बुंदेल्यांचा वध.

पानिपतचा घनघोर रणप्रसंग हा महाराष्ट्राच्या वैभवाचा मध्य होय असें ह्मटलें तरी चालेल. ह्यावेळपर्यंत शिवाजी महाराजांनीं बीजारोपण केलेला महाराष्ट्रराज्यसत्तारूपी वृक्ष अतिशय जोरानें वाढत जाऊन अवाढव्य विस्तार पावला होता; व त्याच्या विस्तीर्ण छायेखालीं सर्व भरतखंड नुकतेंच स्वातंत्र्याचें अप्रतिम सुख अनुभवूं लागलें होतें. परंतु दुर्दैवानें मध्यंतरीं प्रचंड विद्युत्पात होऊन त्याच्या सर्व शाखा भग्न पावल्या व तो अगदीं शक्तिहीन झाला. ह्याच दुर्धर प्रसंगांत बुंदेलखंडांतील महाराष्ट्र-राज्यसत्तेच्या शाखेचाही फार नाश होऊन तिचा मुख्याधार रण-वीर गोविंदपंत बुंदेले हे गतप्राण झाले. ह्या भयंकर रणकंदनाचीं मूळ कारणें काय झालीं? त्यास पेशव्याचा गृहकलह कितपत कार-णीभूत झाला? दिल्लीचें तक्त हस्तगत करून तेथें स्वतंत्र हिंदुपद-पातशाही स्थापण्याची महत्वाकांक्षा सदाशिवरावभाऊंच्या नाशास किती कारण झाली? मराठ्यांच्या युद्धपद्धतींत फेरफार झाल्यामुळें काय परिणाम झाले? अहमदशहा अबदाली व उत्तरेकडील पठाण व रोहिले ह्यांची मसलत कशी सिद्धीस गेली? आणि शेवटीं ह्या

युद्धामध्यें मराठ्यांचें अपूर्व रणशौर्य व्यक्त होऊनही अखेर [illegible] कसें अपयश आलें वगैरे गोष्टींचें विवेचन अनेक स्थलीं प्रसिद्ध झाल्यामुळें तें विस्तृतपणें येथें करण्याची आवश्यकता राहिली नाहीं. ह्या प्रतिभारतीय महायुद्धांत 'अभिमन्युवत् शरसंधान करणारा विश्वासराव, धृष्टद्युम्नतुल्य खड्गपटु जनकोजी शिंदा, भीमार्जुनसम एक बाजू संभाळणारा युद्धकुशल यशवंतराव पवार, घटोत्कचाच्या पर्वतवृष्टीप्रमाणें लोहगोलाची वृष्टि करणारा इब्राहिमखान गारदी, अश्वत्थामा कृपाचार्यांसारखे मेहेंदळे व विंचूरकर, द्रोणाचार्यांसारखे वृद्ध मल्हारराव होळकर, सुयोधनाप्रमाणें मानधनाग्रणी व आकाश कोसळलें असताही न डगमगणारे सत्यप्रतिज्ञ रणधीर सदाशिवरावभाऊ, अशा वीरमंडळाचें कडोविकडीचें धारिष्ट व पराक्रम' ह्यांचें वर्णन काव्येतिहाससंग्रहांतून प्रसिद्ध झालेल्या बखरींत मनोवेधक रीतीनें दिलेलें असून तें वाचून कोणाही सहृदय वाचकाचें अंतःकरण तन्मय झाल्यावाचून राहत नाहीं. तथापि त्या बखरीमध्यें भीष्माचार्याप्रमाणें अद्वितीय शौर्य गाजवून शेवटीं शरपंजरीं सापडलेले वयोवृद्ध वीरशिरोमणि गोविंदपंत बुंदेले ह्यांची साद्यंत हकीकत आलेली नाहीं. परंतु पानिपतच्या महायुद्धामध्यें समक्ष हजर असलेल्या एका गृहस्थानें लिहिलेली एक संक्षिप्त बखर आह्मास उपलब्ध झाली आहे, तिच्यामध्यें तत्संबंधीचें बरेंच वर्णन दिलें आहे. ह्याकरितां ह्या महारणाची हकीकत आम्ही स्वतंत्रपणें न लिहितां त्या बखरीच्या द्वारें ती येथें सादर करितों. ह्मणजे गोविंदपंताच्या युद्धाची हकीकत प्रसिद्ध होऊन अनायासें पानिपतच्या रणकंदनाचेंही दुसऱ्या तऱ्हेनें पर्यालोचन केल्यासारखें होईल*:—

* ही बखर पानिपतच्या युद्धांत हजर असलेल्या बाजीराव गोपाळ नामक इसमानें लिहिली आहे हा गृहस्थ रामचंद्र शिवाजी नावाचे भाऊसाहेबांच्या मर्जीतले जे एक सरदार होते त्यांच्या पदरीं होता असें

"राजश्री रामचंद्र शिवाजी गारदवंडेहून आश्विनमासीं पुण्यास येऊन रा० गंगाधर दाजी याची भेट घेऊन नतर दाजींनीं वर्तमान सांगितलें कीं, श्रीमंत रा० भाऊसाहेब यांची स्वारी हिंदुस्थानांत जाण्याची विचारमसलत आज महिनाभर सरकारवाड्यात होत आहे. असें वर्तमान मशारनिल्हेचे मुखें ऐकून मग रामचद्र शिवाजी यानीं भेटीचा योग करून श्रीमत रा० भाऊसाहेब याचे भेटीस जाऊन चरणावर मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार करून भेट घेतली. श्रीमत रा० नानासाहेब याचीही भेट घेऊन आपल्या बिऱ्हाडीं मशारनिल्हे आल. नतर रात्रीं रा० गंगाधर दाजी यांसीं बोलावून आणिलें कीं, खासा स्वारीचा बेत हिंदुस्थानात जावयाचा सिद्ध आहे. मग दुसरे दिवशीं वाड्यात जाऊन श्रीमतापाशीं जाऊन दररोज तेथें बसून मसलत

---

दिसतें रामचद्र शिवाजी ह्यांच्याकडे दीड हजार स्वारांचें स्वतंत्र पथक असून ते पानिपतच्या महायुद्धामध्यें मोठ्या शूरत्वानें लढत होते ही बखर अगदीं साध्या भाषेंत लिहिली असून तिची वर्णनशैली साधारण पत्राच्या नमुन्यावर आहे. त्यावरून व एकदर मजकुरावरून ती त्या प्रसगींच लिहिली असावी असें दिसून येतें. काव्येतिहाससग्रहामध्यें प्रसिद्ध झालेल्या 'रघुनाथ यादवविरचित पानिपतची बखर' व 'भाऊसाहेबांची बखर' ह्या दोन बखरींप्रमाणें हींत कादंबरीच्या थाटाचें चटकदार वर्णन नाही किंवा तितकी विस्तृत माहितीही नाहीं, तथापि तींत साधेपणा विशेष असून नवीन माहितीही बरीच आहे, व ती समक्ष हजर असलेल्या गृहस्थानें लिहिली असल्यामुळें तिची योग्यता थोडी अधिक वाढली आहे. ह्या बखरीतही दूरान्वय व विसगतपणा कचित् स्थलीं दिसून येतो, परंतु तेवढ्यावरून तिचें महत्व कमी समजतां यावयाचें नाही, हें सुज्ञ वाचकांस सांगावयास नकोच ही बखर आह्मास सपूर्ण मिळाली नाहीं ती मिळविण्याबद्दल आह्मीं बराच प्रयत्न केला, पण तो अद्यापि सिद्धीस गेला नाही! तेव्हां जेवढा भाग आज मिळाला आहे तेवढ्यांतच तूर्त समाधान मानणें अवश्य आहे.

वऊन विचार करू लागले. तेव्हा रामचंद्रपतांनीं सांगितलें कीं, हिराज, स्वारीची सिद्धता करावी. तेव्हा भाऊसाहेबीं उत्तर केलें कीं, काहीं निमित्त स्वारीस जाण्यास पाहिजे. हेविषयींचें श्रीमंत महाराज नानासाहेब यांस कळवावें. तेव्हां सिद्धता करावी म्हणोन आश्विन शु॥ १० चे दिवशीं श्रीमताकडे जाऊन चरणीं मस्तक ठेवून विनति केली कीं, हिंदुस्थानांत स्वारी करावी हा हेतु आहे. याविषयीं आज्ञा केली पाहिजे. तेव्हां श्रीमत रा० नानासाहेब यांनीं कांहीं उत्तर केलें नाहीं. उगेच एक क्षणभर (स्तब्ध) राहून मग बोलले कीं, ही मसलत तुह्मास जाण्यास कोणीं दिली हें मजला वर्तमान तुह्मीं साकल्य सांगावें. तेव्हा भाऊसाहेबानीं उत्तर केलें कीं, माझेच मनात वाटलें कीं स्वारी करावी. बाहेरून बारीक बातमी आणविली कीं, हिंदुस्थानांत मोहीम करावयास कोण कोण सिद्ध आहेत हें वर्तमान समजलें पाहिजे. त्यावरून रा० सखारामपंत बापू यासी बोलले कीं तुह्मी या मसलतींत आहा कीं काय? तेव्हां सखारामपत बापूंनीं उत्तर केलें कीं, 'महाराज, ही मसलत मजला ठाऊक नाहीं.' तेव्हा रा० रामचंद्र शिवाजी यास बोलावून आणिलें कीं, तुह्मी या मसलतींत आहात ह्मणोन वर्तमान समजलें. ही बातमी सखारामपंत बापू यानीं सांगितली. त्यावरून बापूंचें व रामचंद्र शिवाजी यांचें वाकडें येऊन मग रामचंद्रपंतानीं सखारामपत बापूचे व श्री० भाऊसाहेबाचे मनात कित्येक प्रकारें वैमनस्य येऊन वाकडेपणा आणून विरोध व्हावयास मूळ प्राप्त झालें. असो. स्वारी करावी हा पक्का विचार करून श्रीमंत दादासाहेबास श्रीमत नानासाहेबानीं बोलावून सांगितलें कीं, तुह्मी हिंदुस्थानचे स्वारीस जावें. असें दादासाहेबासी बोलले. मग श्रीमतानी रात्रीस खोलींत येऊन निद्रा केली. दुसरे दिवशीं दादासाहेब जाऊन विनति करून बोललें कीं, पूर्वीं मी हिंदुस्थानास गेलों, स्वारीचा खर्च कर्ज कोट रुपयेपर्यंत आला

व लोकांचें देणें साठ लक्ष रुपये झालें, याशिवाय खासगीकडीस चाळीस लक्ष मिळून दोन कोट रुपये लागले. याचा ज्या काळीं निर्वाह होईल त्या काळीं हिंदुस्थानात मोहीम करूं. हें वर्तमान श्रीमंतीं ऐकून दुसरे दिवशीं भाऊसाहेबास सांगितलें कीं, दादासाहेब स्वारीहून घरास आले त्याचे तुह्मीं स्वारी आकार करून मजला समजाविलें पाहिजे. त्याजवरून भाऊसाहेबीं हिशोबाचा आकार करून कार्तिक शु ॥ १० चे दिवशीं श्रीमंत महाराज रा० नानासाहेब देवघरात स्नानसंध्या करतेसमयीं भाऊसाहेबानीं जाऊन विनंति केली कीं, हिशोब आणिला आहे. मग समजावून सांगितले कीं, स्वारीचा वगैरे खासगीकडे असे मिळोन तीन कोट ( खर्च ) झाले, पैकीं जामदारखान्यातील ऐवज जाऊन बाकी दोन कोट रुपये सावकाराचें निखालस देणें निघालें. मग नानासाहेबीं उत्तर केलें कीं, उत्तम आहे. भाऊसाहेब बोलले कीं, स्वारीस जाऊन पैका मिळवून घरास आणावा किंवा कर्ज घेऊन घरास यावें ? अशी कोठें चाल पाहिली नाहीं. हें वर्तमान चाललेलें मातोश्री गोपिकाबाई यानीं ऐकून उत्तर केलें कीं, 'दादासाहेब यानीं स्वारी तरी करून कर्ज घेऊन घरास आले. ज्यानीं आजपर्यंत घर सोडून स्वारी केली नाहीं यासी काय बोलावें !' असे उत्तर श्रीमंत भाऊसाहेब यानीं ऐकून तें मनात वैषम्य आणिलें आणि ह्मणाले कीं, राहणें नीट नाहीं. स्वारी करावी हाच मनात निश्चय आणून कार्तिक वद्य ९ स श्रीमंत रा० नानासाहेब यांचे पायीं मस्तक ठेवून निरोप मागितला कीं आज्ञा स्वारीची द्यावी. त्याजवरून नानासाहेबीं उत्तर दिलें कीं, 'बहुत योग्य. ज्यापेक्षा जावयाची मर्जी, त्यापेक्षा नको ह्मणत नाहीं.' मग रा० रामचंद्र शिवाजी यास बोलावून आणिलें कीं, स्वारीची तयारी करावी. अगोदरच मशारनिल्हे मसलतींत वागत होते. मग सिद्धता करावयास लागले. तमाम सरदारास बोलावू पत्रें लिहिलीं,

व सरजामी लोकास साडणीस्वार पाठवून आणविलें कीं स्वारी हिंदुस्थानात जावयाचा बेत आहे, व इतल्लाही केला व पायदळ अशास सर्वांस ताकीद करून सांगितलें कीं तयारी करावी. या मसलतीकरितां खजिनाऐवज आमदारखान्यातील कोट रुपये व सावकारी कर्ज दोन कोट रुपये एकूण तीन कोट रुपये घेऊन कार्तिक व॥ १३ स मुहूर्त पाहून गारपिरावर डेरे द्यावयास आज्ञा झाली. डेरे दिले. झाडून कुल सरदार व हुजुरात व खासी पागा व उष्ट्रखाना व पीलखाना वगैरे सरजाम जेथील तेथें कायम करून डेरे गारपिरीं दिले. झाडून लोक तयार होऊन आपआपले मिसळीनें राहते झाले. समागमें सरदार लोक वगैरे घेऊन सर्वांस खर्चास देऊन बदोबस्त करून मार्गशीर्ष शु॥ १ चे दिवशीं श्रीमंत नानासाहेब यांचे भेटीस श्रीमंत भाऊसाहेब जाऊन पायावर मस्तक ठेविलें, आणि बोलले कीं, दादासाहेब यानीं काबूलपर्यंत मुलूख काबीज करून आले, आतां स्वारीची आज्ञा मला व्हावी. असें भाऊसाहेब बोलतांच श्रीमंत रा० नानासाहेब एक घटकाभर दम धरून राहिले, कांहीं बोलवेना. मग भाऊसाहेबास पोटीं धरून बहुत खेद करावयास लागले. नेत्रांस उदक आलें. कांहीं बोलवेना. मग स्वस्थपणें धीर धरून राहून आज्ञा केली कीं, 'कार्यसिद्धि करावी, विजयी होऊन यावें. तुमचे खर्चाचा बदोबस्त बरचेवर मागाहून तुह्माकडे कुमक करून खजिना पाठवितों. जावें. कांहीं काळजी करू नये.' मग आज्ञा घेऊन श्रीमंत भाऊसाहेब गारपिरास डेरियास दाखल झाले. तेव्हां नानासाहेबांस असें वाटलें कीं जैसा श्रीरामचंद्र अयोध्येहून वनवासास गेला तैसा किंवा श्रीकृष्ण भगवान अक्रूर घेऊन मथुरेस गेला आणि जनलोकांस दुःख झालें, तसें नानासाहेबास वाटलें.

ह्या स्वारींत समागमें कुल सरदार व पागे पतके लोक ह्यांचा

जमाव प्रकार किती झाला त्यांची नावनिशी त्याजबरोबरील फौज-सुद्धां—तपशील:—

| मराठेमंडळ | | ब्राह्मणमंडळ | |
|---|---|---|---|
| ६०००० | मल्हारजी होळकर | २०००० | चिमणाजी गोपाळ |
| ४०००० | जनकोजी शिंदे | १०००० | नारोशंकर राजेबहाद्दर |
| ४०००० | दमाजी गायकवाड | १०००० | विठ्ठल शिवदेव |
| ३०००० | तुकोजी शिंदे | १०००० | गोविंदपंत बुंदेले |
| ३०००० | दत्ताजी शिंदे | १०००० | महिपतराव आत्माराम |
| २०००० | आपाजीराव जाधव | ५००० | विष्णु नरहर |
| १३००० | कर्नाटकचे देसाई | ५००० | जांभळे |
| १०००० | मल्हारजी देवकाते | ४००० | कृष्णाजी माणकेश्वर |
| १०००० | पर्वतराव कदम | ३००० | बाजीराव हरी सुभेदार |
| १०००० | जानोजी कात्रे | ३००० | विश्वनाथ हरी |
| १०००० | केदारजी बावळे | ३००० | उमाजी भुसकुटे |
| १०००० | सोकाजी भापकर | ३००० | बाळकोबा तात्या |
| १५०० | जावजी कोकाटे | २००० | नाना पुरंदरे |
| १५०० | नाईकजी घोटकर | १५०० | रामचंद्र शिवाजी |
| १५०० | अंताजीराव मोरे | १५०० | रायाजी नारायण |
| १५०० | दुलभाजी भापकर | १५०० | हणमंतराव शिंगाणे |
| १५०० | बयाजी पायगुडे | १३०० | हरी नागोजी |
| १४०० | मानाजी भोइटे | १३०० | बळवंतराव सासवडकर |
| १३०० | मानाजी पायगुडे | १००० | रास्ते याजकडून |
| १३०० | दयाळसिंग बाजारी | ६३० | किरकोळ पागे |
| १३०० | फिरंगोजी पवार | ५०० | दादोबा |
| १३०० | सोनाजी शेळके | ५०० | गोमाजी तळजाईकर |
| १३०० | सयाजी थोरात | ४०० | विठ्ठलराव गोपाळ |

१३०० बाजीराव पाचपुते
१००० पाटणकर
१००० हिरोजी शेळके
१००० सोमाजी हिरवे
२०० खंडेराव गायकवाड
१५० मानाजी रणनवरे
१४० नरसिंगराव पवार
१३४ बाबूराव पवार
४८० गोविंदराव आप्पा
४०० देवराव
३०० हैबतराव बल्लाळ
३०० वामनराव
३०० विठ्ठलराव अनंत
३०० महिपतराव चिटणीस
३०० विनायक रामाजी
२०० आपाजी माणकेश्वर

मुसलमानमंडळ

१०००० इब्राहिमखान गारदी
१०००० समशेरबहादूर

एकूण ४२४०३४ चार लक्ष चोवीस हजार चवतीस लोक. येणेंप्रमाणें फौज तयार करून व नामी सरदार लोक बोलावून शिवाय तोफखाना शंभर तोफा थोरल्या व लहान शंभर तोफा व जेजाला लहान थोर मिळून तीनशें, एकूण पांचशें तोफा सरंजाम एकंदर जुळविला होता. खासी स्वारी शके १६८१ मार्गशीर्ष शुद्ध १ रोजीं गारपिरावरून कुच करून चालिले. मार्गशीर्ष अखेर मुक्काम आंबेडपुरावर आले. पंधरा मुक्काम झाले. वरचेवर श्रीमंत राजश्री नानासाहेब ह्यांजकडे सांडणीस्वार रवाना करून पत्र पाठविलीं. श्रीमंताकडीलही पुण्याहून वरचेवर पत्रें येतात. खात्री नाहीं. वरचेवर कुमकेस पाठवितात. पुढें कुचदरकुच करून पैठण येथें गेले. तेथें दहा मुक्काम झाले. मुलखांत तमाम स्वारीखर्चाचा खड वगैरे राहणें करून ऐवज जमा करून लोकांस रोजमुरे देऊन घासदाणा वगैरे चारण जेथील तेथें बंदोबस्त करून चौकीपहारे पायदळ वीस हजार यांचा बंदोबस्त करून मोठे बंदोबस्तीनें जाते जाहले. पैठणाहून कुच करून हारड्याचे मुक्कामास आठवे रोजीं दाखल झाले, तेथें जाऊन वीस मुक्काम

करून राहिले. कारण कीं, सरदार व पागे व पतके यांचा जमाव करून कुल फौजेची गणती झाली. चार लक्ष चोवीस हजार चवतीस व तोफखाना लहान थोर मिळून पाचशें; यांशिवाय पायदळ वीस हजार असा कट्टा जमाव करून सरजाम जेथील तेथील कायम करून जागोजाग चौकीपहारे करून राहते झाले. कुल श्रीमंत भाऊसाहेब व रावसाहेब उभयता डेरियासी सर्वत्रास ताकीद करून चालले. हारड्याचे मुक्कामाहून कुच करून नर्मदापार होऊन गेले. जाते समयीं काहीं फौज बऱ्हाणपुराकडे राहिली होती ती येऊन मिळाली. नर्मदापार होऊन क्षिप्रा नदीचे पार गेले.

मजलदरमजल गेल्यावर मल्हारजी होळकर याचा तोफखाना तीनशें वगैरे जुजबी व पायगडची व झांशीवरील व नरवरावरील शेंसव्वाशें तोफा याविरहीत जेजाले पाचशें व बाणाच्या कैंच्या उंटावरील बावीस हजार याप्रमाणें भारी तोफखाना करून वीस हजार दारूगोळा सामान फेर फौज नामांकित असे सरदार नामांकित समस्त राजेरजवाडे यांस समागमें घेऊन चालले असता जाटाचे मुलुखांत जाऊन सुरजमल्ल जाट याची भेट घेऊन भरतपुरासही आगाऊ आंबेडपुराहून पत्रें श्रीमंतांचीं गेलीं होतीं. सर्वत्रांस कुमकीस बोलाविलें होतें ते येऊन पोहोंचले. फौज भारी झाली. कुल फौजेची गणती झाली ती किती लिहावी? वरचेवर श्रीमंताकडे सांडणीस्वार रवाना करून जाहलें वर्तमान लिहून पाठवितात. फौजेचा जमाव भारी झाला. खजिनाऐवज लौकर पावत नाहीं. खर्चाची तूर्त लष्करात तंगचाई झाली. ऐवज कोणीकडून येईनासा झाला. बहुत अडचण झाली. 'चारणा समागमें रा० गोविंदपंत बुंदेले अंतर्वेदींत त्या समागमें फौज दहा हजार देऊन चारण व रसद चालती केली. त्या योगेंकरून काहीं धारण लष्करांत सहा शेराची झाली. अशी धारण सोळा रोजपर्यंत झाली. सत्रावे दिवशीं

लष्करांत महर्गता होऊन गेली. शेरावर येऊन वेतली, कहीचा (?) बदोबस्त पेशजी गोविंदपंत बुंदेले यास सागितलेंच होतें. त्याप्रमाणें –बंदोबस्त राहून दररोज वाळली वैरण मात्र आणिवात. याप्रमाणें लष्कराची ओढ भारी बसली. खजिनाऐवज कोणीकडून येईना यामुळें ओढ बसली. असे कुचदरकुच मारून माळव्यात दाखल झाले. माळव्याहून कुचदरकुच करून चालिले. वरचेवर श्रीमताकडे सांडणीस्वार रवाना करून उत्तरें आणविलीं. खजिनाऐवज लौकर पाठवून द्यावा. श्रीमताकडील (पत्रे) वरचेवर भाऊसाहेबांकडे येतात कीं, खजिनाऐवज पाठवून देतों. त्याजवरून इकडून कांहीं खजिनाऐवज रवाना करून दिला. त्या दिवसापासून लष्करात अबादानी एक मासपर्यंत झाली. एक मासपर्यंत फौजेचा जमाव भारी झाला. ते कुचदरकुच होऊन चालिले. जातांना जाटाचे मुलखातून गेले. जाटासही समागमें घेऊन इमानप्रमाण देऊन बरोबर घेऊन उदेपूरचे राणे व जयनगरकर राजेरजवाडे यांच्या भेटी होऊन तमाम हिंदुस्थानातील जमाव समागमें घेऊन चालिले. तों गिलच्याकडील वर्तमान आलें कीं, गिलचे आपली हद्द सोडून कुच करून मजलदरमजल अटकेचे अलीकडे दहा कोस आले. हें वर्तमान श्री० रा० भाऊसाहेब यांस समजलें. याजवर आपल्या फौजेचा बंदोबस्त करून. लष्करांत ताकीद करून जिंकडील तिकडे बंदोबस्त राखून सूचना केली कीं, संभाळून असावें. अशी ताकीद करून वरचेवर सरदारांचे डेरियासी जाऊन सर्वत्रांचा बदोबस्त करून श्रीमत आपले डेरियास येऊन राजश्री मल्हारजी होळकर व जनकोजी शिंदे यांशी डेरियासी बोलावून मसलती विचार करून भाऊसाहेबीं मल्हारजी होळकरास व जनकोजी शिंदे यांसी विचारिलें कीं, पुढें कोणता विचार करून येथून कुच करून कोणीकडे जावें. त्याजवरून मल्हारजी होळकर व जनकोजी यांनीं उत्तर केलें कीं,

'महाराज, आह्मी शुद्ध मराठे, आह्मांस चाकरी जी सांगाल ती करू. आह्मांस मसलत काय, आह्मास महाराजाचे पाय सर्व विघ्नें निवारण करून यश संपादन करतील.' असें उत्तर भाऊसाहेबानीं ऐकून हास्यवदन करून बोलते झाले, 'तुह्मी उभयता आमच्या धुरा आहात.' असें ह्मणताच उभयतानीं उठोन पायावर डोई ठेवून श्रीमताचें समाधान करून आपले डेरियास गेले. वरचेवर बातमी ( येई ) कीं गिलच्याकडील जमाव भारी. कालवर्तमान ऐकिलें कीं, या आठ दिवसात यमुना पार होऊन मजलदरमजल येतात. तेव्हा हें वर्तमान नारोशंकर राजेबहादूर यांचे मुखें श्रवण करून मग कुचदरकुच करून चालिले. पाठीमागें श्रीमत पुण्याहून सरजाम वरचेवर पोहोंचते करीत गेले. यानींही कुच करून दिल्लीस जाऊन दाखल झाले. शके १६८२ इसवी तेथें मुक्काम वीस दिवस करून काहीं खर्चाची अडचण झाली, तेव्हां बादशाहीचे तख्तास हात लावून तख्त पाहून तख्त झाडून सोनेरी व रुपेरी झाडून पट्ट्या व खाब वगैरे ज्या होत्या त्या काढून पधरा लक्षाचा ऐवज केला. तेणेंकरून खर्चाचा काहीं बदोबस्त झाला व लष्करांत अबादानी झाली. परतु अमर** झाला. मग नारोशंकर यास सातशें स्वारानिशीं दिल्लीचे बदोबस्तास ठेविलें. मग आपले लष्कराचा बंदोबस्त करून निघावें तों दिल्ली शहरचे सोदे कितीएकानीं लष्करचे लोकाचीं धन्नें व घोडीं व वस्तभाव अशीं घेऊन लष्करचे लोक उघडे बोडके करून वाटेस लावले. अशी गत झाली. मग सोदे लोकाचें पारिपत्य करून टाकिलें आणि दिल्लींत नारोशंकर याचे मदतीस मीरखान टोंका अठराशें स्वारानिशीं ठेवून दिला. असा दिल्लीचा बदोबस्त करून दिल्लीहून कुच करून दिल्लीपलीकडे बारा कोसावर कुंजरपुरास जाऊन मुक्काम केला. पूर्वी श्रीमत दादासाहेबही कुंजरपुरावर दहा मुक्काम करून होते, परतु कुंजरपूरचें ठाणें हस्तगत झालें नव्हतें. कुंजरपुरामध्यें

कुकुमशाहा व सेवाखान पठाण बारा हजार स्वारानिशीं ठाणें बळ-कावून बसले होते. ही बातमी ऐकून कुंजरपुराकडे फौज रवाना केली. कुकुमशाहा लढाईत मारला गेला. सेवाखान याचें डोकें कापून कुंजरपुरीं भाल्यास लाविलें, आणि बदोबस्त केला. कुकु-मशाहाचे खजिन्यातील ऐवज दहा लक्षाचा काढून लोकास रोजमुरा दिला. दिवसेंदिवस लष्करात महागाई होत चालली. खजिना-ऐवज कोणीकडून येईनासा झाला. खर्चाची ओढ झाली. चारणही मिळेनासें झालें. धारणही महाग झाली. चार शेराची धारण लष्क-रात झाली. तो बातमी आली कीं, गिलच्याकडील कुल फौजेची गणती नामी नामी सरदार व कितीएक लोक करून अटकेअली-कडे उतरोन तेराशें नावा अटकेंत घालून अटकेअलीकडे आले. हें वर्तमान श्रीमंतास साकल्य समजलें. गिलच्याचे फौजेमधील एकं-दर सरदार व लोक याचा वितपशील:—

| | | | |
|---|---|---|---|
| २०००० | सुजातदौला | ६०००० | अबदालीशाहा |
| २०००० | नजीबखान रोहिला | १०००० | खासपागा |
| १०००० | लंगडा पठाण | २०००० | पायदळ |
| १०००० | शेख हुसेनअली | १०००० | अलिमशहा |
| २०००० | किरकोळ फौजा | ३००० | नूरमहमद |
| | | ५००० | बुराणअलीशाहा. |

एकूण १८८०००

येणेंप्रमाणें सरंजाम गिलच्यांकडील, शिवाय तोफा लहान थोर मिळून दीडशें; असा सरजाम घेऊन अटकेअलीकडे उतरला आहे. अशी बातमी कळल्यावर भाऊसाहेब यानीं छातीचा कोट करून सर्व लोकास मिळवून ताकीद करून जिकडील तिकडे बदोबस्त करून क्षेत्रास जाऊन तेथें दर्शन करून माघारें यावें, तों लष्करात चारण यावयाची व रसदही आणावयाची तजवीज करून त्या कामावर राजश्री गोविंदपंत बुंदेले यास सांगून अंतर्वेदीमध्यें चारणाचे बदोबस्तास

दहा हजार फौज देऊन चारण लष्करांत आणविलें. रसदही चालती झाली. तेणेंकरून लष्करांत धारण सवगाईची झाली. चाराही घोड्यांस मिळू लागला आणि तमाम रसदवाल्यास बोलावून वस्त्रें आदिकरून दिलीं. आणि ताकीद केली कीं चारण वीस हजार बोलावून आणावे. त्यांचे बदोबस्तास बाळोजी पलाटे यानें हजार फौजेनिशीं राजश्री गोविंदपंत बुंदेले यांजसमागमें चारणाकरितां देऊन बदोबस्त करून आणीत चालले. इकडे दिल्लीकडे रा० नारोशंकर व मीरखान टोंका व रा० बाळोजी पलाटे याचे बंधु हयबतराव पलाटे असे रखवालीस ठेविले. जे दिवशीं श्रीमंत भाऊसाहेब दिल्लींत जाऊन पोहोंचले ते दिवशीं किल्ल्यांत झगटले. तो दिल्लीचे किल्ल्यांत गारदीखान कुराण पढत होते. बादशहाचे तसलमात किल्ल्यात कोणी नाही. दिल्लीचा किल्ला काबीज केला. परंतु यत्न कांहीं केल्या चालेना. आनून पठाणानीं मार दिल्हा तेव्हां उलट करून आतील बारारों पठाण कापून काढिले. बाकी राहिले त्यांनीं दांतीं तृण धरून उभे राहिले त्यांस जिवानिशीं सोडून हत्यारांनिशीं बाहेर काढून दिलें. आणि आपलें ठाणें बसविलें. किल्ल्यात मराठे लोक जाऊन लुटालूट करू लागले, तेव्हां आपलेकडील लोकांचा बदोबस्त करून नारोशंकर यासी ठेवून निघाले. कुंजरपुरचें पारिपत्य केलें. नंतर तमाम संस्थानांकडे पत्रें रवाना करून खंडण्याचे साडणीस्वार वगैरे रवाना करून खंडण्याचे करार मेदार करून ऐवज आणविला त्याचा तपशील:—

| | |
|---|---|
| १०००० भरतपूरवाले. | ५०००० शहागडवाले. |
| ५०००० जयनगरवाले. | ५०००० होळकराचे मामलतींतून. |
| ६०००० उदेपूरवाले. | ३०००० रामसिंग (?) याजकडून. |
| ३०००० झांशीकडून | २५००० नरवरकर. |
| ३०००० श्रीनगरकर. | ८१४००० किरकोळ |

एकूण ९०२५०००

घेथर्णेप्रमाणें खडण्या करार ऐवज जमा करून व आणखी दोन मः रुपये मिळवून तमाम सरदार यास रोजमुरे देऊन बंदोबस्त करून मुलखात ठाणीं दबलीं होतीं तीं घेऊन बंदोबस्त करून कुचदरकुच करून मजलदरमजल जाते झाले. तों वर्तमान आलें कीं, गिलच्या सोनपताचे पलीकडे अठरा कोसांवर बागपता (?) पाशीं आला. हें वर्तमान रा० मल्हारजी होळकर यानीं श्रीमताचे डेरियासी जाऊन निवेदन करून सांगितलें, आणि ह्मणू लागले कीं यमुना नदी उतरून येणार. याजकरिता महाराजानीं कुच करून तेथें असावें. त्यासी श्रीमत भाऊसाहेब यानीं उत्तर केलें कीं, यमुना नदी भरपूर चालली यांसी काय करावें? त्याजवरून मग सालिमगडाजवळ पहिली दीडशें नाव अटकावून ठेविली होती. कारण कीं गिलच्या नदी उतरून अलीकडे येईल असें ह्मणोन नावा अटकावून ठेविल्या होत्या त्या आणविल्या. नावा दीडशें आणून एकूण साडेतीनशें (?) नावा नदींत घालून उतरावयास आरंभ केला. अठरा दिवस लष्कर उतरत होतें. तों ईश्वरकरणी—नदीचें पाणी उतरलें. गळ्या इतकें झालें. कुल लष्कर व तोफखाना झाडून उतरून यमुना नदी उतरून बारा कोसावर गरनाळ्याचे मैदानात मुक्काम झाला. तों बातमी आली कीं, गिलच्याकडील मातबर सरदार वगैरे पागे पतके निवडक होऊन ऐशीं हजार फौज तयार होऊन सोनपतचे अलीकडे आली आणि सुजातदौला व नजीबखान रोहिला असे तयार होऊन आपली जागा सांभाळून आले. इकडे गरनाळ्याच्या मैदानात आह्माकडील फौजेलाही समागमें रा० गोविंदपंत बुंदेले व मीरखान टोंके पठाण दहा हजार फौजेनिशीं गरनाळ्याच्या मैदानात येऊन गांठ घातली. तेव्हां राजश्री गोविंदपंत बुंदेले यानीं लंगड्याशीं गांठ घालून युद्ध केलें. त्यात लंगडा पठाण याचा मोड करून दरोबस्त लुटून फस्त करून त्याजकडील थोडी

माणसें पाडाव करून आणिलीं. पायदळ अगदीं कापून काढिलें. तहत बगरेची संख्या राहिली नाहीं. गोविंदपतीं तुबळ मार देऊन लंगडा पठाण माघारा सारून कहीचा (?) बंदोबस्त करून आपल्या फौजेंत आणली. लंगडा लुटला हें वर्तमान गिलच्यानें ऐकून लंगड्याचे कुमकेस सुजातद्दौला याजकडील फौज तयार करून पाठविली. तों गोविंदपतीं पुनरपि गाठ घालून अस्तमानीं लुटून टाकली आणि रात्रौ मुक्कामीं आले. हें वर्तमान श्रीमतीं कळून बहुत मर्जी खुष होऊन गोविंदपतांस खर्चास देऊन वस्त्रें वगैरे संतोष मर्जी होऊन राहिली. तेणेंकरून लष्करांत सवंगाई आठ शेरांची धारण झाली. तों प्रहर दिवसा अबदाली गिलच्यानें वीस हजार फौज पाठवून रसद बंद केली. चारणही बंद झाली. खजिनाऐवज कोणीकडून येईनासा झाला. हें वर्तमान श्रीमंतास कळल्यावर त्यानीं त्याचे फौजेचे बंदोबस्तास राजश्री गोविंदपंत व मीरखान टोंके असे पंचवीस हजार फौजेनिशीं पाठविले. गोविंदपतास सांगितलें कीं गिलच्याचे फौजेचें पारिपत्य करावें. त्यावरून गोविंदपतीं गाठ घालून लढाईस प्रारंभ केला. तों चारण आपलेकडे येत होते तों दरम्यान गिलच्याकडील फौजेच्या पांच हजाराच्या टोळ्या करून रवाना करून चारणासीं गांठ घातली. चारणवाले गिलच्याकडील फौजेनें पुढें घालून न्यावयास लागले. तो बातमी गोविंदपत यांस समजली. त्याजवर मीरखान टोंके यांस रवाना चारणाच्या तोंडावर करून दिल्हें. चारण सभाळून आणिलें. तों गिलच्याकडील फौजेनें गोविंदपताशीं गाठ घातली. तिसरा प्रहर झाला. लढाई थोर झाली. मारामार करून गिलच्याकडील फौज माघारी सारून कित्येक लोक जखमी करून पराभवातें पावबून माघारे लाविले. व गोविंदपतीं चारण संभाळून आणिलें. गिलच्याकडील फौजही आपले मुक्कामास गेली. ते दिवशीं गोविंदपंतांनीं गिलच्यांकडील लोकाचा मोड करून

संभाळून आले, परतु दिवसेंदिवस महागाई होत चालली. आपले लष्करांत जमाव तीन लक्षाचा भारी झाला. गिलच्याकडील लष्करात सवगाई अकरा शेराची धारण. आपल्या लष्करांत तीन शेराची धारण. तेव्हां विचार करून मसलत केली कीं, गिलच्याकडील रसद बद करून टाकावी. कोणीकडून रसद न पोहोंचे असें करावें. या कारणास्तव एक वेळा मातबर फौज पाठवून गिलच्याकडील रसद बंद करून दिली. तेणेंकरून त्यांच्या लष्करांत दोन शेराची धारण झाली. दाणा मिळेनासा झाला. वैरणही मिळेनासें झालें. असें तीन रोजपर्यंत धान्य मिळत होतें. पुढें कांहीं धान्य अगदींच मिळेनासें झालें. दररुपयास एक शेर झालें. परतु तेंही कोठें मिळेना. मोठा आकात झाला व लष्करांत घोडीं मरूं लागलीं. कांहीं उपाय चालेना. मुसलमान लोक घोडीं कापून खाऊं लागले व तोफखान्याचे बैल कापून खाऊं लागले. असें झालें. तेव्हा हें वर्तमान खासा अबदाली यास कळलें. लष्कर खराबीस आलें. पुढें उपाय काय? गनीमाचे लष्करांत सवंगाई. चार शेरांची धारण आपल्या लष्करात कांहीं केल्यानें दाणे मिळेनात. यासी कोणता उपाय करावा. तेव्हा एक वेळा खासा अबदाली यानीं सुजातदौला यास बोलावून आणलें कीं पुढें मसलत कशी करावी. आपल्या लष्करात महर्गता. मुसलमान लोक घोडे खाऊ लागले आहेत. रसद गनीमांनीं बद केली चारण कोणीकडून येईनाशी झाली. यत्न करिता एक वेळ मातबर फौज पाठवून चारण व रसद आपले लष्करांत आणावी. तेणेंकरून कांहीं सवगाई होईल. त्यावरुन नजीबखान रोहिला तीस हजार फौजेनिशीं रवाना करून गरनाळ्याचे मैदानात पाठविला. गिलच्याची व गोविंदपताची गाठ पडली. त्यांची व याचीं लढाई जुंपली. पुढें सुजातदौला यानें कुमकेस दहाहजार फौज रवाना केली, पहिली तीस हजार व हलीं दहाहजार मिळोन चाळीस हजार फौज झाली. तिची व यांची लढाई झाली. मारामार हाणा-

ह्मण करीत वीस हजार चारण आपले लष्कराकडे रवाना केलें. मग गोविंदपंतांनीं वेढा घातला. याची व त्याची मोठी मारामारी होऊन गिलच्याकडील पाच हजार लोक कामास आले. नजीबखानानें गोविंदपतासी गाठ घातली. मागाहून श्रीमतानीं कुमक इब्राहिमखान गारदी दहा हजार फौजेनिशीं पाठविलें. कुमक चागली झाली. त्याची लढाई भारी झाली. इब्राहिमखानानें ते दिवशीं बहुत शर्थ करून नजीबखानाकडील व गिलच्याचे लष्करातील नामी नामी सरदार जखमी करून कित्येक ठार केल. कित्येक पळोन लष्करात गेले. ते दिवशीं खराबी बहुत झाली. आपलेकडील जें चारण त्यानीं नेलें होतें ते गोविंदपतानीं गाठ घालून वीस हजार चारण सभाळून आणलें आणि रसद बंद केली. व आपलेकडील बद झालेली चालती केली. लष्करात सवगाई पाच शेराची झाली. हें वर्तमान अबदालीस गेलें कीं नजीबखान रोहिला कुच करून माघारा आला. चारण सभाळून गोविंदपतीं नेलें. इकडे गोविंदपत आल्यावर अबदालीनें आपल्या लष्करात ताकीद करून सांगितलें कीं, उदईक पन्नास हजार फौज नजीबखान रोहिला या समागमें देऊन गनीमाचे लष्करांचें चारण इकडे घेऊन यावें, व रस्ता बद करून गोविंदपंतासी गाठ घालून लुटून फस्त करून टाकावा. अशी ताकीद करून लोकास सांगितलें.

इकडे रा० गोविंदपत व इब्राहिमखान गारदी चारण संभाळून आले, हें वर्तमान श्रीमत भाऊसाहेब यानीं ऐकून उभयतावर खुश होऊन ते दिवशीं श्रीमंतानीं गोविंदपतासी मोत्याची कंठी व तुरा व शिरपेंच वस्त्रें बक्षीस देऊन तीं त्याचे डेरियास रवाना केलीं. याच अन्वयें इब्राहिमखान गारदी यास देऊन पुनरपि त्यास आपले जागेवर जाण्यास सांगितलें. दुसरें वर्तमान ऐकिलें कीं, गिलच्या सोनपतावरून बागपतापाशीं आला आहे. हें वर्तमान मल्हारजी होळकर व जनकोजी शिंदे याचे मुखें ऐकिलें. व तशी बातमीही आणविली.

तेव्हां आपल्या लष्कराचा बंदोबस्त तमाम सरदारास बोलावून सांगितलें कीं, उदईक येथून कूच करून गिलच्याच्या तोंडावर चालून जावें, त्यापेक्षा फौजेचा बंदोबस्त करून पागेपतकी कोणते रीतीनें कसे चालावे याची नेमणूक करून तपशीलवार उजवे बाजूस डावे बाजूस, अघाडीस पिछाडीस ऐशा रीतीनें जाण्याची रीत आहे त्या अन्वयें चालावें. मल्हारजी होळकर उजवे बाजूस त्याची फौज ? ? हजार, डावे बाजूस जनकोजी शिंदे, उत्तरेकडे दमाजी गायकवाड, दक्षिणेचे अंगें यशवंतराव पवार, पश्चिमेचे अंगे यशवतराव (?); यांचे पिछाडीस होळकर यांची पतकी; पिछाडीस गुलबाजी भापकर, शिंदे याचे पिछाडीस कृष्णाजी माणकेश्वर, त्याचे डावे बाजूस अंताजीराव मोरे, उजवे बाजूस दयाळसिंग, हैबतराव बल्लाळ व आपाजी पायगुडे व मानाजी पायगुडे व फिरंगोजी पवार, व मानाजी काइटे व शिवाजी अंताजी, हिरोजी पवार, व आपाजीराव माणकेश्वर व सोनाजी शेळके व हणमतराव शितोळे व खंडेराव गायकवाड, हिरोजी शेळके इंदापूरकर, व नरसोजी जाधव, संभाजी थोरात व मानाजी रणनवरे व विठ्ठल शिवदेव विंचूरकर व राणोजी पवार, बाबूराव गायकवाड, याजखेरीज कितीएक लहानथोर पतकी सरदार जिकडील तिकडे नेमिले. तोफखाना पहिला चारशें व हल्लीं आणखी आणविला पांचशें, एकूण नऊशें तोफा समागमें अघाडीस मल्हारराव होळकरास सांगून बंदोबस्त करून जिकडील तिकडे सांगितलें. त्याजवरून होळकर यांनीं आपली मिसल संभाळून, तशीच मिसल शिंदे यांनीं व सोनाजी भापकर लोणीकर यांनीं आपली जागा संभाळून राहिले. उजवी बाजू, डावी बाजू, अघाडी पिछाडीस पुढें इब्राहिमखान गारदी, दहा हजार पायदळ, तोफा पुढें घालून तोफांचा सरंजाम गोलदाज यांचा व अघाडीचा बंदोबस्त करून पंचवीस हजार फौज व पिछाडीस

पंचवीस हजार फौज असा जमाव करून लाख फौज जमा करून खासी स्वारी मुक्कामावरच होती. श्रीमंत राजश्री रावसाहेबीं भाऊसाहेबास विनंति केली कीं, मजला आज्ञा यासमागमें जावयाची व्हावी. तेव्हा रावसाहेब मुक्कामींच राहिले. इतका सरजाम सरदार लोक याजसमागमें करून दारूगोळा जेथील तेथें कायम राहून चालिले. मुक्कामीं खासी स्वारी व विश्वासराव व बळवतराव* सासवडकर राहिले.

इकडे रसद गिलचे याजकडील फौजेनें गाठ गोविंदपंतांशीं घालून अगदीं धारण लुटून नेली. तेणेंकरून महर्गता लष्करात झाली. अडीच शेर धान्य झालें. आणखी चारणाचे बंदोबस्तास आणखी काहीं सरजाम पाठवून दिला. लंगडा पठाण लुटून फस्त करून दवडविला. काहीं तट्टें वगैरे सरजाम गोविंदपंतानीं आणविला व त्याजकडील दहा हत्ती आणिले आणि लंगडा पठाण पराभवातें पाववून माघारे आपले मुक्कामीं आले. गोविंदपंतीं चारण संभाळून नेलें. हें वर्तमान खासा अबदाली बादशाहा यासी कळल्यावर मग सुजातदौला आणखी सरजामी सरदार यांसी बोलावून सांगितलें कीं धारण रसद गनिमांनीं बंद केली. आपण गनिमाकडील बंद करण्याविषयीं येथून काहीं कुमक लंगडा पठाण याजकडे पाठवून द्यावी. त्याजवरून चाळीस हजार फौज गरनाळाचे मैदानात पाठविली. गोविंदपंताची व लंगडा पठाण याची गांठ पडली. उभयतांचा युद्धप्रसंग होऊं लागला. मारामार हाणाहाण खणाखणी बहुत झाली. गोविंदपंताच्यानें धीर धरवेनासा झाला. दोन तीन वेळ जखमा लागून घोड्यावरून पडले. पुनः आणखी रामा मोतदार यानें अवसान देऊन घोड्यावर बसविलें. तों इकडील फौजेचे लोकानीं तुबळ मार

* हे बळवतराव सासवडकर भाऊसाहेबांचे सुप्रसिद्ध कारभारी बळवतराव मेहेंदळे कीं काय ?

गिलच्याचे फौजेस दिले. तेही मारामार करीत फौजेंत मिसळले. गोविंदपतानीं शिकस्त केली. लंगड्या पठाणानें त्याची गाठ घालून आणि बहुत नेटानें जवळ येऊन गोविंदपतासी धरून डोकें कापून भाल्यास लावून आपले लष्करात नेलें!*"

---

* गोविंदपत बुंदेले यांनी पानिपतच्या मोहिमेमध्यें शत्रूची रसद बंद करण्याचे कामीं जी कामगिरी बजाविली तिचा उल्लेख पंडित काशीराज ह्यानींही आपल्या वर्णनामध्यें केला आहे. तो येणेंप्रमाणें.—

"The Bhow had before given orders to Govind Pundit, who had the command and collections of Korah, Kurrah, Etawa, Shekoabad, and the rest of the Doab, as well as Kalpee, and other districts across the Jumna, as far as Saghur, to collect all the forces he possibly could, and to cut off all communication for provisions from the rear of the Shaha's army Govind Pundit having got together ten or twelve thousand horse, advanced as far as Mirhet, in the rear of the Shah, and so effectually cut off all supplies, that the Shaha's army was in the greatest distress for provisions, coarse flour selling for two rupees for seer, and the troops consequently very much dissatisfied. The Shah therefore detached Attai Khan, nephew to the great Vizier, with a *Dusta* consisting of two thousand chosen horse, and ordered him to march day and night, till he should come up with Govind Pundit, and having cut off his head, to bring it to the presence. He set out accordingly, being joined by eight or ten thousand of the irregulars, and having marched about forty coss during night, at day break they fell like lightening upon the camp of Govind Pundit, where having no intelligence of the Durranies' approach, they were seized with terror and amazement, and fled on all sides. Govind Pundit himself attempted to escape upon a Turki horse but being old, and not a very expert horseman, he was thrown off in the

गोविंदपंतांनीं शत्रूची रसद बंद करण्याबद्दल जिवापाड परिश्रम केले व दुराणीच्या फौजेशीं अनेक लढाया मारून आपल्या शौर्यानें तिची अगदीं दाणादाण उडवून दिली. हें पाहून श्रीमंत भाऊसाहेब ह्यास गोविंदपंताच्या पराक्रमपटुत्वाची चांगली खात्री झाली, व त्यांनीं मोठ्या संतोषानें त्यांस व त्याच्या साह्यकारी सरदारास बहुमूल्य जिनसा बक्षिस देऊन त्याचें योग्य अभिनंदन केलें. गोविंदपंताच्या दक्षतेमुळें व रणपटुत्वामुळें शत्रूंच्या सैन्याची रसद अगदीं बंद होऊन त्याच्या लष्करांत महर्गता झाली, व लोक उपाशीं मरू लागले. त्यामुळें अहमदशाहा अबदालीस फार त्वेष येऊन त्यानें गोविंदपंताचें पारिपत्य करण्याकरितां अताईखान नामक एक प्रबल सरदार पाठविला. त्यानें मराठ्याच्या सैन्यावर मोठ्या कपटानें हल्ला केला, नंतर त्याचें व गोविंदपंताचें तुमुल युद्ध सुरू झालें. गोविंदपंताचा वृद्धापकाळ झाला असल्यामुळें त्याच्या अंगीं घोड्यावर बसून शत्रूशीं एकसारखें युद्ध करण्याची शक्ति राहिली नव्हती, तरी त्यांनीं मोठ्या निकरानें शेवटपर्यंत शत्रूशीं सामना दिला. गोविंदपंताचा शिर-

---

pursuit and Durranies coming up, cut off his head and carried it to camp, where, it was recognized for the head of Govind Pundit."

"After plundering the enemy's camp, and driving away their scattered troops on all sides, Attai Khan returned to the Shaha's camp, the fourth day from that on which he was detached, and presented his Majesty with the head of Govind Pundit. The Shah was highly pleased with this effectual performance of his orders, and bestowed a very honourable *Khilat* on Attai Khan. After this action, the Durrany army was constantly supplied with provisions."

—*An account of the Battle of Panipat, by Casi Raja, Asi. Res. Vol. III. P.* 108.

रछेद करण्याकरितां चवताळलेले दुराणी स्वार त्यांच्यावर जोरानें चालून आले, परंतु त्यानीं आपल्या समशेरीच्या विचित्र प्रभावानें त्यांची वाताहत केली. त्या झटापटीमध्यें गोविंदपंतास अनेक जखमा होऊन त्यांच्या अंगातून रक्तस्राव होऊं लागला, व त्यांची शक्ति अगदीं क्षीण होऊन ते तीन वेळ घोड्यावरून खालीं आले. तथापि ते आपल्या राभा मोतद्दाराकडून सावरून धरवून पुनः घोड्यावर स्वार झाले, व एक पाय जाया झाला असतांही शत्रूशीं लढू लागले. ह्या युद्धामध्यें गोविंदपंतांनीं आपल्या पराक्रमाची अगदीं सीमा करून सोडली. अखेर शत्रूचा जमाव मोठा असल्यामुळें व त्यानीं प्रथमपासून कपटप्रयोग आरंभिल्यामुळें गोविंदपंताच्या सैन्याची दाणादाण होऊन अखेर त्यांच्यावर दुराणीच्या फौजेनें चाल केली व त्याचा शिरश्छेद करून आपला मनोरथ परिपूर्ण केला!*

---

* गोविंदपंतांच्या मृत्यूसंबधानें भाऊसाहेबाच्या बखरीमध्यें जी हकीकत प्रसिद्ध झाली आहे तिच्यामध्यें व वर दिलेल्या हकीकतीमध्यें बरीच तफावत आहे भाऊसाहेबाच्या बखरीमध्यें तत्संबधानें पुढील मजकूर लिहिला आहे:—

"गोविंदपंत बुंदेले खजिना आणावयास बुंदेलखंडांत पाठविले होते. त्यांनीं काहीं दिवसगत लाविली म्हणून त्यांजवर कोपायमान होऊन ढालाईत व दहा हजार रुपये मसाला करून पाठविले. मग गोविंदपंत बुंदेले यानीं वीस लक्ष रुपये घेऊन (ते) दिल्लीस आले. तो खजिना आणून दिल्लीस राहिला. परंतु लष्करात पोंचेना. रुपयांचा तोटा आणि धारण पांच शेर, सात शेर झाली. यत्न नाहीं. मग भाऊनीं विचार केला कीं, 'अंतर्वेद प्रांतीं फौजा पाठवून भागीरथीचे पुलावरून दुराणीस रसद येती ती मना करावी' म्हणोन मनसबा करून गोविंदपंत बुंदेले व पाराजीपंत वाघ यांस हातरोखा बरोबर पाठवून अति आग्रहें अंतर्वेदींत घालविलें. गोविंदपंत यांचे आयुष्याची सीमा सरत आली. म्हणोन त्यास तैशीच बुद्धि निर्माण झाली. तारखीपारखीनें रहावें तें न करितां मुक्काम

करीत खडण्या घेत चालिले. ते सैता गुजर (हा हरिद्वाराजवळचा एक लुटारू जहागीरदार होता. त्यानें प्रथम गोविंदपत बुंदेल्यांस भागीरथी उतरून पलीकडे जाण्याची चोरवाट दाखविली होती. परंतु तो पुढें शत्रूस सामील झाला) यानें तिकडील सूत्र ठीक करून गोविंदपत यास खडणीचे नादीं लावून गोंविलें. तों नजीबखान रोहिला याचा सासरा व बुंदेखान रोहिला व उमरावगीर सुजातद्दौला याजकडील व महमदखान लगडा याचा भाऊ असे पधरा हजार फौज निवड करून गोविंदपत बुंदेले याजवर पाठविले. अविधानीं मोंगलाई मसलत करून होळकरांची निशाणें लावून गेले. तों गोविंदपंत यांनीं दुरून पाहिलें. फौजेची गडबड झाली. जीनबंदी लोकानीं केली तों जाल्या आपण उठेनात. ते लोकास ह्मणू लागले कीं, 'नारोशंकर यांची फौज आली, निशाणें त्यांचींच आहेत.' असें ह्मणतात. तों ते जवळ दम बाधून येऊन एकाएकीच याजवर अविधांनीं घोडे घातले. ते समयीं गोविंदपत यानीं गडबड करून पळू लागले तों ते सरमिसळ यांतच झाले. गोविंदपत यांस घोड्यावर बसावयाचा सराव थोडकाच होता. कोस अदकोस पळाले तों गोविंदपत बुंदेले घोड्यावरून खालीं आले. तेवेळेस कोणी मातवर मनुष्य होते त्यानी दम बांधून, घोड्यावरून उड्या टाकून घोडियावर घातलें. पुढें आणखी कोसपर्यंत संभाळीत गेले तों त्यांची दाटी भारी झाली. तमाम शिरें कापीत सुटले. तेवेळेस मागती गोविंदपत घोडियावरून खालीं आले, तेव्हां पाय जाया झाला उठावयाचीही हिमत हरली. लोकास उडी टाकून कोढावयास अवसान पुरेनासें झालें. जवळ पुत्र होता तो टाकून गेला तेथें दुसऱ्यावर शब्द काय ठेवावा. ते समयीं त्यांस गोविंदपत पाडाव सापडले. खाशांच्या गांठी पडल्या. त्यास गोविंदपत आजीज होऊन बहुतकरून काकुळतीस आले कीं, 'मजला प्राणदान देणें, क्रोड रुपये देतों' ह्मणोन बोलले. तेव्हां ते केवळ दैत्य, त्यांस करुणा कैंची? तात्काळ शिरच्छेद करून, धड तेथें टाकून शिर घेतलें. ते समयीं दीड हजार मराठ्यांचीं शिरें कापिलीं. 'मुरगी मारी बचडे दाणादाण' तसे जिकडील तिकडे

ही बातमी मुसलमान सैन्याचा अधिपति अताईखान ह्यास समजतांच त्यास अत्यंत हर्ष झाला व त्यानें तें शिर भरजरीच्या रुमालांत घालून नजीबखान रोहिल्यास समर्पण केलें. नजीबखानानें तें अहमदशाहाकडे पाठविलें. गोविंदपंतासारख्या मराठ्याच्या अग्रणी सरदाराचें शिर आपल्या सैन्यानें कापून आणिलें हें पाहून त्यास अत्यंत धन्यता वाटली व तो विजयानंदानें तेव्हांच फुगून गेला. नंतर त्यानें विजयोत्सवाच्या भरामध्यें श्रीमंत भाऊसाहेब पेशवे यांचा अपमान करण्याच्या हेतूनें तें शिर एका उंची रुमालांत घालून आपल्या वकिलाबरोबर भाऊसाहेबांकडे पाठवून दिलें, व त्यांस असें पत्र लिहिलें कीं, 'तुमचे गोविंदपंत पुढें तुह्मास स्वर्गीं जागा पहाण्यास गेले आहेत, आणि तुह्मास न्यावयासी शिर पाठविलें आहे. होय न होय हें पहावें.' हें पत्र व शिर येताच भाऊसाहेबांचें अंत:करण दुःखानें विव्हल झालें, व अपमानानें अगदीं खवळून गेलें. अहमदशाहाच्या दर्पोक्तीचा व मानभंगाचा हा प्रकार पाहून श्रीमंताच्या कचेरींतील सर्व सरदारांच्या मुखश्रिया लोपून गेल्या. सर्व फौजेंत ही बातमी कळतांच तिची हिंमत अगदीं खचून गेली. श्रीमंतानीं मोठें धैर्य धरून त्या पत्रास समर्पक उत्तर पाठविलें कीं,

---

पळाले मग त्यांनीं गोविंदपंत बुंदेले यांचें शिर घेऊन आपले फौजेंत गेले. नजीबखान रोहिला यानें परम संतोष मानून रुमालांत शिर घेऊन अबदुल्अलीस नजर केलें." ह्या हकीकतींत बरीच अतिशयोक्ति असावी असें उघड दिसून येतें. शत्रूच्या लबाडीमुळें कदाचित् गोविंदपंतांची नजरचूक झाली असेल, परंतु त्यांच्यासारख्या रणशूर योद्ध्याच्या हातून शत्रूस क्रोड रुपये देऊन प्राणदान मागण्याइतकें भीरुत्वाचें वर्तन झालें असेल अथवा त्यांस घोड्यावरही बसतां येत नसेल असें त्याच्या एकंदर चरित्रावरून संभवनीय दिसत नाहीं. शत्रूची रसद बंद करण्याचे कामीं गोविंदपंतानीं जी उत्तम कामगिरी बजावली त्याच्या संबधानें ह्यांत मुळींच उल्लेख आलेला नाहीं !

'तो जागा सर्वत्रांचा आहे. त्याशिवाय दुसरी गति कोणती आहे? प्रस्तुत तुम्ही थोर, खंदाराचे पातशाहा, तुम्ही तेथे जाल तेव्हा तुमचे स्वरूपाप्रमाणें मान झाला पाहिजे ह्मणोन तुमचे मेजवानीस गोविंद-पंत बुंदेले साहित्यास गेले आहेत.' भाऊसाहेबाचें हें उत्तर मोठें चातुर्याचें व मार्मिक होतें, परंतु आमच्या महाराष्ट्रीयाच्या दुर्दैवानें सर्व विपरीत प्रकार होऊन तें निरर्थक झालें, ही अत्यंत दुःखाची गोष्ट होय!

गोविंदपंत मारले गेल्यानंतर पेशव्यांच्या बाजूस अपयश येण्यास प्रारंभ झाला असें ह्मटलें तरी चालेल. गोविंदपंतानीं रसद सभा-ळण्याचें काम फार उत्कृष्ट रीतीनें करून सैन्यास वेळोवेळीं जो पुरवठा केला, तो अगदीं अप्रतिम होता ह्यांत शंका नाहीं. त्याचा वध झाल्यानंतर रसद पोहोचविण्याचें काम कोणाच्याही हातून चांगल्या तऱ्हेनें झालें नाहीं. त्यामुळें सैन्यामध्यें अतिशय महर्गता होऊन लोकांचे व जनावरांचे फार हाल झाले, व त्या योगानें मरा-ठ्याच्या अंगीं अत्यंत शौर्य असूनही तें व्यक्त करण्याचें सामर्थ्य रहावें तसें राहिलें नाहीं. ह्या कारणामुळें व भाऊसाहेबाच्या इतर कांहीं चुकामुळें मराठ्याची जी भयंकर हानि झाली ती वर्णन करणें अशक्य आहे.

गोविंदपंताच्या मृत्यूनंतर पेशव्याच्या सैन्याचें व दुराण्याचें घन-घोर युद्ध झालें, त्याच्या पूर्वभागाची संक्षिप्त हकीकत आमच्या जव-ळील जुन्या बखरीमध्यें पुढें लिहिल्याप्रमाणें दिली आहे:—

"श्रीमंतानीं मल्हारजी होळकर यांजकडे सांगून पाठविलें कीं गोविंदपंत प्राणास मुकले, मीरखान टोंके व बाळोजी पलाटे यांनीं चारण संभाळून आणिलें. असें वर्तमान जनकोजी शिंदे यांजकडे व इतर पागे यांजकडे पाठविलें. दिवसेंदिवस कलह वळावत चालला. तुम्ही जाऊन गिलच्यास हात दाखवावा तरीच परिणाम

शुद्ध आहे. आतां कांहीं कोणता अवकाश करूं नये. त्याजवरून होळकरानीं पत्र पाठविलें कीं, मजला स्वामीआज्ञा प्रमाण. आज कुच करून जातों. मार्गशीर्ष शुद्ध १ ते दिवशीं कुच करून बागपतानजीक मुक्कामास गेले. फौजेची निवड करून जिकडील तिकडे पागेपतके निवडून गोलाचागच्छ इब्राहिमखान गारदी दहा हजार पायदळ व बाकी तोफखाना असा कट्टा सरजाम जेथील तेथें कायम करून प्रथम झुंजावयास तोंड मल्हारजी होळकर यानीं लावून युद्धास आरंभ केला. गिलच्याकडील फौजेंत सुजातद्दौला पंचवीस हजार व नजीबखान रोहिला पचवीस हजार शिवाय पागेपतके मिळून पंचवीस हजार एकूण गिलच्याकडील पंचाहत्तर हजार अशी अबदालीशाहानें रवाना केली. सोनपताचा मुक्काम सोडून बागपतास आले. आपल्याकडील फौजेची गणती लाखपर्यंत आली, शिवाय तोफखाना. असा सरजाम तयार करून दोन कोसाचे अंतरानें उभे राहिले. पुढें बातमी आली कीं, सुजातद्दौला व नजीबखान रोहिला एक कोसाचे अंतरानें आले. हें वर्तमान होळकरास समजलें. यावर तेही तयार होऊन गेले. त्याची याची गांठ बागपताचे मैदानांत पडली. प्रथम तोंड होळकरानीं लाविलें. तिकडीलही सुजातद्दौल्यानें लाविलें. त्याची यांची लढाऊगी होऊं लागली. तोफखान्यास इब्राहिमखान गारदी यानें सरबत्ती दिली. तिकडील गिलच्याकडील नामी नामी सरदार हजार खराब करून दहा हजार पठाण कापून काढले. पंचवीस हजार फौज जायबंदी केली. जनकोजी शिंदे यानीं मर्दुमकी जशी ह्मणावी तशी केली. तसाच सोनाजी भापकर व दमाजी गायकवाड व आटोळे व हिराजी शेळके यानीं खुब तऱ्हेची मर्दुमकी करून सुजातद्दौला माघारा दबडिला, व नजीबखान रोहिला यासी जखमा लागल्या. ते दिवशीं एकी घटकेचा अवकाश होता तर

**** जाहाला असता. यश मराठे यानीं मिळविलें. ज्याचें नाव शिपाईगिरी ह्मणावी तशी केली, आणि गिलच्याचा मोड करून सुजातद्दौला फौजेसुद्धां बादशाहाकडे घालविला आणि आपले लष्करचे मुक्कामावर येऊन जेथील तेथें पागेपतके हुशार होऊन श्रीमंताकडे पत्रें रवाना झालीं कीं सुजातद्दौला याचा मोड करून माघारा गोटात घालविला. हें वर्तमान सांडणीस्वारासमागमें लिहून पाठविलें. श्रीमतानीं मल्हारजी होळकर व जनकोजी शिंदे यांजकडे खर्चास ऐवज पाठविला. तेव्हां लोकाचें समाधान करून खर्चास देऊन कोणी कोणी जखमी झाले होते त्यांस खर्चास दिलें. व ज्यांचे घोडे मेले त्यास घोडे दिले. कोणाकोणास कंठी, चौकडे देऊन श्रीमंताचे लष्करांत शहाजणें वाजू लागलीं. गिलच्याकडील लूट सांपडली. जिकडे तिकडे मोहोराच्या थैल्या सापडल्या. खजिन्याऐवज श्रीमताकडे रवाना केला. सुजातद्दौला आपले मुक्कामास गेला. जाऊन बादशाहाची भेट घेतली. बादशाहानें डेरियास नेऊन जेवू घातलें. तदनंतर अबदालीस मसलत बहुत पडली कीं भाऊसाहेब दिवसेंदिवस वळावत चालले. आमची खराबी बहुत झाली. नामी नामी सरदार पडले, यास विचार काय करावा. अबदालीचे अनुमतें नजीबखान रोहिला यासी घेऊं, परंतु या मसलतींत सुजातद्दौला नाहीं. अबदालीचे अनुमतेंच कारभार झाला. इकडे श्रीमताचे लष्करात वकील रवाना करावा आणि सलोख्याच्या बोली करण्याकरिता वकिलास पाठवून समागमें सरजाम हजार देऊन व अंबारीचे हत्ती देऊन बादशाहानें वकिलास रवाना केला. वकील श्रीमंतास येऊन भेटला. परंतु सुजातद्दौला या बोलींत नाहीं ह्मणून (सलोख्याचा विचार न ठरतां) आणखी सरंजाम कुमकेस घेऊन जमाव करून मल्हारजी होळकर याचे तोंडावर रवाना करावयाची आज्ञा झाली. नजीबखान रोहिला व कुल-

झाडून नामी सरदार असे सडया फौजा करून गोलचागोल जमावासुद्धां आला. यांची व इकडील फौजेची गांठ पडली. लढाईस आरंभ झाला. पुनः मल्हारजी होळकर व जनकोजी शिंदे यानीं श्रीमंताकडे पत्र रवाना करून दिलें कीं, कालचे लढाईस सुजातद्दौला याची खराबी बहुत झाली, बादशाहापाशीं जाऊन सांगितलें. 'या समयीं आह्मावर गुजरली. तुमची कुमक आली नाहीं. कुमक आली असती तर गनिमाची फौज मोडून पराभव करून पाठविली असती.' मग बादशाहानें समागमें लोक देऊन इकडे रवाना करून दिले. हें वर्तमान श्रीमंत भाऊसाहेबास कळलें. मग होळकराकडे सांगोन पाठविलें कीं, तुह्मी आपली जागा संभाळून राहणें. फौजेचे तोंडावर जाऊन गांठ घालावी. अशी निक्षून बजाह ताकीद करून सांडणीस्वार रवाना केला, परंतु लष्करांत महर्गता भारी झाली. रसद बंद झाली. खजिनाऐवज कोणीकडून पोहोंचेना. वरचेवर श्रीमंत नानासाहेब याजकडे पत्रें पाठविलीं कीं लहानथोर लढाया दोनचार जाहल्या. गिलच्याची मसलत भारी आहे. वरचेवर पत्रें पाठवून बातमी आणवितात. गिलच्याकडील लष्करांत महागाई बहुत झाली. दीड शेराची धारण झाली. इकडे भाऊसाहेबांचे लष्करांत शेराची धारण झाली. तेव्हां चारण आणावयाचा बंदोबस्त करावयास चारण बोलावून आणिलें, आणि कौल देऊन समागमें पंचवीस हजार फौज व इब्राहिमखान गारदी व हिरोजी झोळके व गायकवाड व लक्ष्मणराव बावळे व अंताजी कृष्णाजी व राजश्री बाळकोबातात्याचे पतके असे चारणासमागमें देऊन कुरुक्षेत्राचे रोखे फौजा जाऊन पहिली तेथील कांहीं फौज व तोफखाना समागमें घेऊन चालले."*

---

* येथें ही बखर समाप्त झाली ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे. ह्यापुढचा भाग आह्मांस अद्यापि मिळाला नाहीं.

नंतर शत्रूच्या पक्षाची व मराठी सैन्याची गांठ पडून जो घन घोर संग्राम झाला त्याचें निराळें वर्णन करण्याची आवश्यकता नाहीं. रघुनाथ यादवकृत पानिपतच्या बखरीमध्यें ह्या समयाचें जें वर्णन दिलें आहे तें येथें दिलें ह्मणजे ह्या महारणाचें हुबेहूब चित्र डोळ्यापुढें उभें राहतें:—

"विश्वासरावसाहेब व भाऊसाहेब ह्या उभयतांनीं तैलाभ्यंग करून .........रणरंगाचीं पीत वस्त्रें घेतलीं. शिरपेंच व तुरे व चौकडे व बाजूबंद व मोत्यांच्या कंठ्या व शस्त्रास्त्रें ठायीं ठायीं बांधून तरकसकमाना हातीं घेऊन सज्ज झाले. नंतर निशाणबारदारांनीं निशाणें घेऊन नगारा नौबती करून एकदाच गर्जना केली. तेव्हां भूमंडळ नादेंकरून तुंबळ जहालें. तेणेंकरून रणरंगधीरांस विरश्रीचीं स्फुरणें आलीं. (व सर्व सरदार लोक युद्धास सिद्ध झाले.).. ...हें पाहून इराणी दुराणी व दिल्लीपदबादशाहाकडील, व सुजातद्दौले व मनसूरअल्ली यांनीं आपले गोट सोडून फौजेचा पुस्तपन्हा राखून, त्यानींही तीन टोळ्या करून लढाई प्रसंगास खासा इराणी मध्यभागीं सत्तर हजार फौजेनिशीं, व डावेकडे मनसूरअल्ली चाळीस हजार फौजेनिशीं, व उजवीकडे सुजातद्दौले व हस्तनापुरचा [illegible] फतखा, येणेंप्रमाणें दीड लक्ष फौजेनिशीं उभे राहिले .. ..... युद्धास लोक जमले. दारुण संग्राम झाला. हौद्यास हौदे, राउतास राऊत, एक मेळ झाला. सुतरनाले, बाणाच्या कैंच्या व करोलाच्या गोळ्या व गरनाळा व तोफांचा मार एकदाच झाला. एकच रणधुमाळी दोन्ही सैन्यात माजली. धुरेंकरून दिनमणीचा अस्त झाला असा भास पडला. येथे हीच गर्जना उठली. उमास घ्यावयास अवकाश पडेना. पुढचा पाय पुढें केल्यास कोणी हटेना. एकापरीस एक आगळे, इराणीची जात अरबुज, आपपर ह्मणावयाचा नाहीं. महाबळी, महापराक्रमी, मोंगल, पठाण व रोहिले, रांगडे, व रजपूत,

व पंजाबी, बिलदे, माळवी व कांठेवाडी वगैरे जातींचे त्यांनीं सग्रा-माची सीमा केली. बहुत मराठे दळ खपलें. रक्तोदकाचे पाट रण-भूमीवर वाहू लागले. बीभत्स शरीरें दिसों लागलीं. देहाभिमान कोणास उरला नाहीं. चौफेर लढाईची वेहद होऊन गेली. थोर थोर अमिराचे हौदे जाहले. इराणी हावभरी होऊन नीट फौजेंत चालून घेतलें. तेव्हा मराठी फौज कच खाऊन माघारी सरली. हें पाहताच भाऊसाहेबानीं आपला अंबारीचा हत्ती फौजेंत लोटला. तेव्हा डावी टोळी विश्वासरावसाहेबाची होती. ती बेजरब उठली. उजवेकडून जन-कोजी शिंदे कमरग्यांत शिरून मोठी मारामार जहाली. शरसंधान अगदींच राहिलें. निमचे व समशेरी चालू लागल्या. तीन चार तास-पर्यंत एकच घाई शस्त्रसंधानाची झाली. मुर्द्यांवर मुर्दे पडू लागले. वीराच्या नजरा फिरोन गेल्या. आपपर कोणी ओळखेनासें झालें. वीर रणामध्यें माजले. रणमद चढला. खाशाखांशांचे हौदे एकास एक लागून जोरांवारीनें लढों लागले. केवळ दशाग्नि शताग्नीशीं मारू लागले. ते समयीं सदाशिवपंत अंबारींतून उतरून दोहों हातीं पट्टे घेऊन, नीट फौजेंत चालून घेतलें. तेव्हां नामी नामी सरदार व धारकरी नांवाविनावाचे यानीं जीवित्वाची तमा न धरिता बेला-शक हैदोसच केला."

ह्याप्रमाणें घनघोर युद्ध झालें. पहिल्या प्रथम मराठ्यानीं 'हर हर महादेव' करीत अपार रणावेशानें रामरावण याच्या युद्धा-समान तुमुल युद्ध केलें, व अबदालीची फौज शिकस्त खाऊन मागे पळाली. तें पाहून इराणीस त्वेष उत्पन्न होऊन त्यानें मागें ठेवलेले निवडक लोक पुढें काढले व 'या अल्ला! या खुदा! या रहिमान!' असा देवाचा धांवा करून रणवाद्यें वाजवीत तो मराठ्यावर चालून आला. मराठ्यानींही त्यांशीं तोंड देऊन मोठ्या निकराची लढाई केली. जनकोजी शिंदे, यशवंतराव पवार, विश्वासराव,

भाऊसाहेब, इब्राहिमखान गारदी, इत्यादिकांनीं आपापल्या शौर्याची कमाल केली. पर्जन्यवृष्टीप्रमाणें तोफा, बंदुका व बाण यांचा वर्षाव होऊं लागला. दोन्ही सैन्यें हातघाईवर आलीं. तो इतक्यांत विश्वासराव गोळी लागून मरणोन्मुख झाले हें वर्तमान भाऊसाहेबास समजताच ते हत्तीवरून खालीं उतरले. त्यामुळें सर्व मराठे सैन्यांचा धीर खचून सर्वत्र गोंधळ झाला. समशेरबहाद्दर, शिंदे वगैरेंनीं शेवटपर्यंत निकरानें युद्ध केलें. परंतु मराठ्यांच्या सैन्याची एकदां फळी फुटून लोक पळूं लागले. त्यामुळें जिकडे तिकडे हाहाःकार होऊन शत्रुपक्षानें त्याच्यावर वारंवार जबरदस्त हल्ले केले. त्यामुळें मराठे सैन्याची अगदीं वाताहत होऊन त्याच्या पक्षास पूर्ण अपयश आलें. नंतर पळापळ आणि कत्तल सुरू झाली. मराठ्यांचे मल्हारराव होळकर, विठ्ठल शिवदेव विंचूरकर, नाना फडनवीस, महादजी शिंदे वगैरे कांहीं पुरुष पळून आले. बाकी सर्व नामांकित सरदार त्या महारणामध्यें मृत्यु पावले. येणेंप्रमाणें महाराष्ट्रावर भयंकर अनर्थ कोसळून त्यांत त्याच्या वैभवाची पूर्ण आहुति पडली, सर्व देश शोकसागरांत बुडून गेला व त्याची कधींही भरून न येण्यासारखी भयंकर हानि झाली ! *

---

* पानिपतच्या अपजयास पुष्कळ गोष्टी कारण झाल्या त्यांचा विचार करण्याचें हें स्थल नाहीं; तथापि त्यांतील मुख्य मुख्य येथे दिल्या तरी चालतील १ भाऊसाहेबाचा गर्विष्ठ स्वभाव व अविचारी वर्तन. २ मराठ्यांच्या पद्धतीप्रमाणे सडे जाऊन युद्ध करण्याचें सोडून देऊन बरोबर मुलेंमाणसें घेण्याचे कामीं झालेली ढोबळ चूक. ३ पूर्वीच्या मराठी पद्धतीप्रमाणें छापे घालून व शत्रूस चोहोंबाजूंनी वेढून युद्ध करावयाचें सोडून सैन्यासभोंवतीं केलेला खदक. ४ सुरजमल्ल जाट व मल्हारराव होळकर याची मसलत न ऐकतां दिल्लीचें तक्त फोडण्याचे कामीं केलेली राजकीय चूक. ५ सुजातद्दौल्यावर विश्वास ठेवल्यामुळें त्यानें केलेला विश्वासघात. ६ शेवटच्या

दक्षिणेंतून श्रीमत नानासाहेब पेशवे हे भाऊसाहेबाच्या मदतीस पन्नास हजार सैन्य जमा करून तें रवाना करण्याकरिता नर्मदा उतरून सिरोंज पावेतों आले होते. तों त्याना हें पानिपतच्या भयंकर संग्रामाचें अत्यंत दुःखकारक वर्तमान पौष शुद्ध १३ स समजलें. दिल्लीहून औरंगाबादेस जाणारा कोणी कासीद (सावकारांचीं पत्रें नेणारा इसम) त्यांस भेटला. त्याजवळ 'दोन मोती गलत दसबीस आसरफीत फरकात खुर्देकु रुपयाको गणत नहीं!' * असें संदिग्ध वाक्य लिहिलेली एक चिठी होती. ती पाहताच नानासाहेबाचें अंतःकरण दुःखानें चूर झालें. व त्याच्या मनास विद्युदाघातापेक्षा जास्त भयंकर धक्का बसला. पुढें लवकरच त्यास पानिपतच्या महारणातून पळून आलेली माणसें भेटलीं व तेथील युद्धाची साद्यंत हकीकत कळली. त्या योगानें त्याचें दुःख अनावर होऊन ते 'भाऊ! भाऊ!' असा एकसारखा शोक करू लागले! पानिपतच्या भयंकर अनर्थानें झालेली सर्व राष्ट्राची शोकमय स्थिति पाहून व प्रत्यक्ष सर्व राज्याची ज्याच्यावर मदार, असे मुख्य मुख्य आधारस्तंभ नाहींसे झाले हें ऐकून नानासाहेबाचें हृदय शून्य झालें

---

दिवशीं विश्वासरावाचे मृत्यूचें वृत्त ऐकताच अगदीं धीर सोडून एकदम अंगीकारलेली उतावळेपणाची वृत्ति, इत्यादि अनेक गोष्टींमुळें पानिपतच्या रणांत मराठ्यांस कधींही पुसला न जाणारा अपयशाचा डाग लागला असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं.

* हे त्या चिठीतले जसेच्या तसे शब्द मोडी लिहिलेले एका जुन्या बखरीमध्यें आमच्या दृष्टीस पडले. हे मोडीमध्यें असल्यामुळें ते अशुद्ध लिहिले गेले आहेत तरी ते लक्षांत ठेवण्यासारखें असल्यामुळें आह्मीं जसेच्या तसेच येथें दिले आहेत. ह्यांचा अर्थ उघडच आहे —'दोन मोत्यें गळालीं, दहावीस मोहोरा हरपल्या व रुपये व खुर्दा किती संपला त्याची गणतीच नाहीं!

असेल, ह्यात आश्चर्य तें काय? ह्या दुर्धर विघ्रानें शिवछत्रपतींनीं बीजारोपण केलेला व बाजीरावानीं वाढविलेला मराठीराज्य-सत्तेचा प्रचंड वृक्ष धाडकन खालीं पडला! महाराष्ट्रवैभवाच्या-अत्युच्च शिखरावर प्रचंड वज्राघात झाला, आणि पारतंत्र्य-स्थितीचा तेथें उगम होऊन सर्व राष्ट्र काहीं वेळपर्यंत रुदन-स्वरानीं भरून गेलें! ह्यापेक्षा ह्या हृदयद्रावक प्रसंगाचें जास्त वर्णन काय करावें? आंग्ल कवि स्कॉट ह्यानें फ्लॉडनफील्ड येथील महारणासंबधाचें जें वर्णन केलें आहे तें फक्त विशेषनामांचा फेरफार केला ह्मणजे पानिपतच्या महाप्रसंगास अगदीं बरोबर लागू पडतें.

"*Nerbudda* heard the ceaseless plash,
  While many a broken band,
Disorder'd, through her currents dash,
  To gain the *Deccan* land;
To town and tower, to down and dale,
To tell red *Panipat's* dismal tale,
And raise the universal wail.
Tradition, legend, tune, and song,
Shall many an age that wail prolong.
Still from the sire the son shall hear
Of the stern strife and carnage drear,
  Of *Panipat's* fatal field,
Where shiver'd was *Maharastra's* spear
  And broken was her shield."

# भाग ६ वा.

## बाळाजी गोविंद व गंगाधर गोविंद ह्यांच्या कारकीर्दी.

(सन १७६१ ते १७७५ पर्यंत.)

पानिपतच्या दारुण प्रसंगानें मराठी राज्यावर भयंकर आघात होऊन त्याच्या एकजीव झालेल्या सत्तेचे शतशः तुकडे झाले असें ह्मटलें तरी चालेल. त्यांत विशेषतः दूरातरावर असलेल्या भागांचा फारच नाश झाला व त्याचा पुनः मराठी राज्यसत्तेशीं दृढ संयोग झाला नाहीं. तथापि गोविंदपंताच्या पुत्रानीं आपल्या बापाप्रमाणें मराठी राज्याचा अभिमान बाळगून ह्या बिकट प्रसंगीं फार उत्तम कामगिरी बजाविली व बुंदेलखंडांतील मराठ्यांची राज्यसत्ता कायम ठेविली ही विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. ह्याकरिता प्रथम बाळाजी गोविंद व गंगाधर गोविंद ह्यांच्या कारकीर्दीचें पर्यालोचन केलें पाहिजे.

गोविंदपंत बुंदेले ज्या वेळीं श्रीमंताच्या विनतीप्रमाणें स्वसैन्यानिशीं अंतर्वेदप्रांतीं गेले त्या वेळीं त्याच्या बरोबर बाळाजी गोविंद हेही गेले होते. व त्याच्या पाठीमागें प्रांताचा बंदोबस्त करण्याकरिता गंगाधर गोविंद हे जालवण प्रांतीं राहिले होते. ते आपल्या वडिलाप्रमाणेंच शूर असून त्यांनीं पुष्कळ वेळां बुंदेले जमीनदारांचे पुडावे मोडले होते व गोविंदपंताच्या पश्चात् काल्पी वगैरे-

कडील उत्तरेची बाजू संभाळिली होती. दक्षिणेकडे सागर वगैरे प्रांत गोविंदपंताचे जामात विसाजी गोविंद चांदोरकर याच्याकडे सोंपविले असून त्यानीं तेथें आपला अंमल बसविला होता. ह्या उभयतांजवळ सैन्य नसून तें सर्व दिल्लीकडे गेलें होतें. त्यामुळें वास्तविक रीतीनें ह्या प्रांतांत सैन्यबळ चांगलेंसें राहिलें नव्हते व त्याचें विशेष कारणही नव्हतें. परंतु दिल्लीकडे एकदम गहजब उडून सर्व मराठ्यांचा अकल्पित नाश झाला व तें वृत्त चोहींकडे पसरलें मात्र, तोंच ठिकठिकाणीं दबून बसलेले बुंदेले राजे व मुसलमान पठाण एकदम आपला फायदा करून घेण्यास तयार झाले, आणि त्यानीं मराठ्यांच्या ताब्यांतील मुलुखावर आपला अंमल बसविण्याचा एकसारखा सपाटा चालविला. लखनौच्या नबाबानें अंतर्वेद इलाख्यापासून प्रयागापावेतों सर्व प्रांतात आपलीं ठाणीं बसविलीं. त्या पलीकडे हरिद्वारापावेतों रोहिल्याचीं ठाणीं बसलीं. बुंदेलखंडांतील बऱ्याच भागांतील संस्थानिक स्वतंत्र होऊन त्यानीं पुष्कळ ठिकाणचा मराठ्यांचा अंमल उठविला. येणेंप्रमाणें सर्वत्र मराठी सत्तेचा भंग होऊन हतवीर्य झालेल्या मराठे ठाणेदारांना आपला प्रांत रक्षण करण्याची शक्ति राहिली नाहीं.

गोविंदपंताचे चिरंजीव बाळाजी गोविंद हे पानिपतच्या महारणांतून जीव बचावून बुंदेलखंडात आले, तों तेथील बहुतेक गांव बुंदेले संस्थानिकानीं बळकावून तेथील मराठ्यांचा अमल नाहींसा केला असें त्यांच्या दृष्टोत्पत्तीस आलें. तेव्हां त्यानीं आपले धाकटे बंधु गंगाधर गोविंद ह्याची भेट घेतली व ते उभयतां सिरोंजेस आले. तों त्यास श्रीमंत नानासाहेब पेशवे हे जानोजी भोंसल्यासह सिरोंजपर्यंत येऊन नुकतेच पुण्याकडे परत गेल्याचें वर्तमान कळलें. गोविंदपंतासारखा मातब्बर सरदार पानिपतच्या लढाईंत बळी पडला ही दुःखद गोष्ट श्रीमंतास अगोदर कळली होती व श्रीम-

तांकडून त्याच्या चिरंजीवास दुःखपरिमार्जनार्थ एक पत्रही रवाना झालें होतें. हें पत्र सिरोंज मुक्कामीं गंगाधरपंतास पोहोंचलें. त्यामध्यें गोविंदपंतांच्या स्वामिनिष्ठेबद्दल पेशव्यांनी उद्गार काढून त्यांच्या मृत्यूबद्दल अत्यंत खेद प्रदर्शित केला होता व त्याच्या चिरंजीवास धीर देऊन एकंदर प्रांताचा सुरेख बंदोबस्त करून गोविंदपंताचा नावलौकिक राखावा अशा आशयाचा मजकूर लिहिला होता. हें अस्सल पत्र आह्मी जसेंच्यातसेंच येथें देतों.

"राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री गंगाधर गोविंद
स्वामी गोसावी यासीः--

सेवक बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार विनंति उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहित जाणें. विशेष गोविंद बल्लाळ स्वामिकार्यावर कामास आले ह्मणून विस्तारें श्रमी होऊन लिहिलें तें कळलें. ऐसियास ईश्वरइच्छेस उपाय नाहीं. ईश्वरतंत्रानुरूप जें होणें तें होतें. गोविंदपंत मातबर मनुष्य. त्याचा लौकिक होता तदनुरूपच त्याचा परिणाम जाहाला. तुह्मीं सर्वप्रकारें विवेक करून मामलियाचा बंदोबस्त करणें. एक गोविंदपंत मात्र गेले. परंतु त्याचे वेळेचे सर्वही आहेत. तुह्मी व राजश्री बाळाजी गोविंद एकत्र होऊन गोविंद बल्लाळ याचे बंदोबस्तास न्यून न पडे, जमीदार वगैरे लबाडी करू न पावत तें करणें. वर्तमान वरचेवर लिहित जाणें. जाणिजे. छ. १६ जमादिलाखर. *स्वामिसेवेवर ह्यातारपणीं कामास आले, त्यांचें सार्थक झालें. त्यांनीं इतके दिवस इमानेंइतबारें सेवा केली तरीं ईश्वर तुह्मांस उत्तमच करील. लेंकराप्रमाणें जाणतो. सर्वप्रकारें आपलें समाधान विवेकें करून बंदोबस्त उत्तम प्रकारें राखून असणें. पुढील कामाचे व नांवाचे मजकुराचें

* येथून सर्व मजकूर श्रीमंतांचे हातचा आहे.

बाबूराव लिहितील तशी तदूद करून ठेवणें, ह्मणजे सेवेचा मजरा आहे. छ. १७ जमादिलाखर बहुत काय लिहिणें हे विनति."

अशा प्रकारचें श्रीमंतांचें पत्र आल्यानंतर बाळाजी गोविंद व गंगाधर गोविंद ह्यास आपल्या ताब्यांतील नाहींसा झालेला प्रांत मिळविण्याची पुनः उमेद आली व त्यांनीं मोट, गुलसराई व करारा वगैरे जीं ठाणीं कायम होतीं त्याचा चांगला बंदोबस्त करून सागर वगैरे प्रांतातील बंडें मोडण्यास प्रारंभ केला. सागर प्रांताची मामलत बिसाजी गोविंद चांदोरकर यांजकडे होती. परंतु दिवसें-दिवस प्रमत्त झालेले बुंदेले त्याशीं फार मग्रूरीनें वागून त्यांच्या ताब्यां-तील किल्ले व प्रांत बळकावूं लागले होते. पन्नाच्या राजाचा दिवाण बेणीहुजरी ह्यानें हटाप्रांत काबीज करून तेथील किल्ल्यास मोर्चे लाविले होते. अशी स्थिति पाहून बाळाजी गोविंद ह्यानीं बिसाजी गोविंद व काशीपतकाका ह्यांस जानोजी भोंसल्याचें साह्य घेऊन मोर्चे उठवावे असा हुकूम केला. तेव्हां त्यानीं भोंसल्यास पांच लक्ष रुपये देऊ करून त्याचें साह्य घेतलें. नंतर त्यानीं हट्यावर हल्ला करून मोर्चे कापून काढले आणि बेणीहुजरीचा पराभव करून पन्नापर्यंत त्याच्या फौजेचा पाठलाग केला. व जे प्रांत बुंदेल्यानीं बळकाविले होते ते त्याच्याकडून परत घेतले.*

---

* जानोजी भोंसले ह्या मोहिमेमध्यें बाळाजी गोविंदांचे कमाविसदार बिसाजी गोविंद ह्याच्या साह्यास गेले होते व त्यानीं बुंदेल्यांचे मोर्चे उठ-विले असें त्यांनी पेशव्यास लिहिलेल्या पत्रांतही लिहिलें आहे:— 'मंडले प्रांताचा बंदोबस्त करून सागराच्या सुमारास आलों तों राजश्री बिसाजी गोविंद कमाविसदार दिम्मत रा० बाळाजी गोविंद हे भेटीस येऊन निवेदन केलें कीं, बुंदेलखंडांत बुंदेले यांनीं जमाव करून तमाम ठाणीं घेतलीं. एक सागर व हटें राहिलें, त्याजमध्यें हट्यास मोर्चे लाविले आहेत. तें घेतल्यानें तर सागरास लागतील ह्मणजे बुंदेलखंडाचा अमलच उठतो,

त्यामुळें बुंदेल्यांस मराठ्यांचा पुनः दरारा वाटूं लागून पेशव्याच्या सुभेदारांचा अंमल सरळ रीतीनें चालू झाला.

पानिपतच्या महारणाशीं मराठ्यांची उत्तर हिंदुस्थानांतील सर्व सत्ता नाहींशी झाली होती ती पुनः प्रस्थापित करण्याचे कामीं पेशव्यास बाळाजी गोविंदाप्रमाणें दुसरे सरदार विठ्ठल शिवदेव हे विशेष साहाय्य झाले. ग्वाल्हेर, अहीरवाडा वगैरे सर्व प्रांत जाट राजानीं बळकाविला होता व बुंदेलखंडाचा बहुतेक भाग बुंदेले राजे व दिल्ली आणि लखनौ येथील वजीर ह्यांनीं दाबिला होता. तथापि विठ्ठल शिवदेव व बाळाजी गोविंद ह्यानीं मराठी राज्याचा पूर्ण अभिमान बाळगून त्या प्रांतामध्यें मराठ्याचा अंमल संस्थापित करण्याकरिता भगीरथ प्रयत्न केले. नानासाहेबाच्या मृत्यूनंतर पेशव्याच्या गादीवर त्याचे पुत्र माधवराव हे अधिष्ठित होऊन रघुनाथरावांच्या सल्लामसलतीनें राज्यकारभार पाहूं लागले होते. त्यानाही पानिपतच्या अपयशामुळें महद्दुःख झालें असून त्यांत झालेली भयंकर हानि भरून काढण्याची फार इच्छा होती. रघुनाथरावदादा हे पानिपतच्या दुःखानें एकसारखे जळत होते व आपल्या शौर्यप्रभावानें दिल्ली, लाहोर इत्यादि पुनः काबीज करीन अशी त्यांस हिम्मत होती. परंतु दक्षिणेंतील अनेक राजकारस्थानें, निजामाची गडबड, भोंसल्याची चळवळ, आणि सैन्याची उणीव वगैरे गोष्टी आड येऊन त्यांना आपला हेतु कांहीं दिवस लांबणीवर टाकणें भाग पडलें. परंतु त्यांनी विठ्ठल शिवदेव व बाळाजी गोविंद ह्यास वारंवार पत्रें लिहून स्वपराक्रमानें तिकडील प्रांत सर करावे असें प्रोत्साहन दिलें, व नारोशंकरास त्याच्या मदतीस पाठविले. त्यानीं एका पत्रामध्यें विठ्ठल शिवदेव ह्यांस असें लिहिलें होतें कीं,

---

यासी साहित्य केलिया मुलूख रहातो. नाहीतर नाहीं यास्तव यां प्रांतीं येऊन हस्तीचे मोर्चे कापून काढिले.'—पत्रें यादी वगैरे. पृ. ३४०.

'नारोशंकर व तुह्मीं एकविचारें राहून करावयाचें तें करणें. हल्लीं सर्व अखत्यार मल्हारनिल्हेवरी व तुह्मांवरी आहे. रोजकरी यांस ऐवज नसला तरी नर्मदापार येऊन माळव्याचा घाट चढून गेल्यावरी सरकारचे महाल आहेत तेथील ऐवज बेधडक घेणें आणि झांशी, ग्वाल्हेर, सागर, कोटा वगैरे किल्ले कायम रहात तें करणें. किल्ले राखिले ह्मणजे तुह्मीं फार केलें (असें होईल).' अशा प्रकारें दम देऊन सुजाउद्दौला व दिल्लीचा बादशाहा ह्याच्याशीं राजकारणें साधून मराठ्याचा झालेला तोटा भरून काढावा अशी योजना केली होती. ह्याच समयास त्यांनीं महादजी व केदारजी शिंदे ह्यास त्याच्या हाताखाली पाठविलें होतें. श्रीमताच्या आज्ञेप्रमाणें विठ्ठल शिवदेव व बाळाजी गोविंद ह्यानीं आपलें कर्तव्य उत्तम प्रकारें बजावण्यास मागें पुढें पाहिलें नाहीं, हें निराळें सांगावयास नकोच. विठ्ठल शिवदेव ह्यानीं ग्वाल्हेर वगैरे काबीज करून तेथें आपला अंमल बसविला व बाळाजी गोविंद ह्यानीं बुंदेलखंडांतील बहुतेक प्रांत पुनः परत मिळविण्याचा यत्न करून तेथें मराठ्याचा अमल पुनः चालू केला.

अशा रीतीनें बुंदेलखंडामध्यें मराठ्यांची सत्ता पुनः प्रस्थापित होऊं लागली न लागली तोंच इकडे पुण्याच्या दरबारांत बराच घोंटाळा सुरू झाला. कै० नानासाहेब पेशव्यानीं मृत्युसमयीं आपले वडील चिरंजीव माधवराव ह्यांस गादीचे धनी ठरवून सर्व राज्यकारभार रघुनाथरावाकडे दिला होता हें वर सांगितलेंच आहे. परंतु माधवराव फार चपल व पाणीदार असल्यामुळें ते आपल्या मातुश्री गोपिकाबाई ह्यांच्या संमतीनें स्वतःच राज्यसूत्रें चालवूं लागले. त्यामुळें राघोबादादांस राग येऊन त्यांच्यामध्यें व माधवरावांमध्यें वितुष्ट उत्पन्न झालें. माधवराव अल्पवयाचे असून सर्वांवर जरब चालवूं लागले, त्यामुळें आत्मप्रतिष्ठाप्रिय सखारामबापूस व इतर कित्येक गर्विष्ठ सरदारास तें

असह्य होऊन ते राघोबादादास जाऊन मिळाले. माधवरावानींही त्याची मोठीशी पर्वा न बाळगतां त्रिंबकरावमामा पेठे, गोपाळराव पटवर्धन, हरीपंत फडके, बाळाजी जनार्दन (सुप्रसिद्ध नाना फडनवीस) ह्यास निरनिराळे अधिकार देऊन त्यांच्या सल्लामसलतीनें राज्यकारभार चालू केला. त्यामुळें पुणेदरबारात दुफळी होऊन निजाम, भोंसले वगैरे स्वार्थपटु मंडळींस अनायासें आपला फायदा करून घेण्यास ही चांगली संधि सापडली. ह्या वेळीं झालेली फूट हीच पेशवाईची टोलेजंग इमारत रसातळास जाण्यास मूळकारण झाली हें चतुर वाचकांस निराळें सांगावयास नकोच.

राघोबादादा व माधवराव ह्यांचा बेबनाव होतांच राघोबादादानीं आपल्या तर्फेचे सखारामपंतबापू, निळकंठ महादेव पुरंदरे, जीवनराव खासगीवाले, अंताजी माणकेश्वर यांचे पुत्र वगैरे मंडळी आपल्याबरोबर घेऊन, ते आपले समानशील व रणशूर मित्र विठ्ठल शिवदेव विंचूरकर ह्यांच्याकडे गेले व तेथें त्यानीं पेशवाईचा अधिकार मिळविण्याबद्दल खलबतें सुरू करून पेशव्याचे प्रतिस्पर्धी जानोजी भोंसले आणि निजामाचा औरंगाबाद येथील सुभेदार मुरादखान ह्यास आपल्या कटांत सामील करण्याचा यत्न चालविला. नंतर त्यानीं सैन्य वाढवून पुंण्यावर चाल केली. ही गोष्ट माधवरावास कळतांच त्यांनींही आपले सरदार व मुत्सद्दी एकत्र करून स्वसैन्यानिशीं राघोबादादाच्या फौजेवर उलट चाल केली. उभय पक्षांच्या सैन्याच्या गाठी घोडनदीजवळ पडून तेथें बरीच मोठी लढाई झाली. तींत माधवरावाचें सैन्य अल्प असल्यामुळें त्यांचा पराभव झाला व राघोबादादानीं त्यास कैद केलें. माधवराव मोठे चतुर व प्रसंगावधानी असल्यामुळें ते आपण होऊनच राघोबादादास शरण गेले व त्यानीं सर्व कारभार त्यांच्या स्वाधीन केला. नंतर राघोबादादा पुण्यास आले व त्यांनीं आपल्या मुत्सद्दी मंडळीस अधिकारारूढ करून आपण राज्य-

कारभार चालू केला. ह्याच संधीस राघोबाच्या विरुद्ध असलेले कित्येक सरदार निजामास जाऊन मिळाले. मोरोबा फडणीस, रामचद्रराव जाधव, गोपाळराव पटवर्धन, भवानराव प्रतिनिधि अशी मोटमोठी सरदारमंडळी निजामाकडे गेली. निजामास पेशवाईचा लोप व्हावा अशी इच्छा होतीच, तशांतून त्यांस विठ्ठल सुंदर नांवाचे एक महत्वाकांक्षी दिवाण भेटले होते, त्यास पुण्यपत्तनची पेशव्यांची गादी नष्ट करून स्वतःच पेशवे होण्याची भारी हांव होती. त्यामुळें त्यानीं निजामास चढीस लावून पेशव्याकडून फुटलेले सरदार आपल्या पदरीं ठेवून घेतले, व भोंसल्याची मदत घेऊन पेशव्यांशीं उघड रीतीनें वैरभाव सुरू केला. इकडे राघोबादादा जरी राजकारणामध्यें मोठेसे कुशल नव्हते तरी तरवारबहादुरीमध्यें पूर्ण वस्ताद होते. त्यानीं मल्हारराव होळकर व दमाजी गायकवाड ह्याचें सैन्य घेऊन माधवरावांसहवर्तमान निजामाच्या मुलुखांत व भोंसल्याच्या मुलुखांत धामधूम चालविली. ह्या प्रसगीं माधवरावानीं राघोबादादांस शहाणपणाची सल्ला देऊन त्यांच्याकडून जानोजी भोंसल्यास व इतर मराठे सरदारास आपल्याकडे वळवून घेण्याचा प्रयत्न करविला. जानोजीस गुप्त रीतीनें बत्तीस लाखांचा प्रांत देऊ असें अभिवचन दिलें. त्यामुळें तो लोभी सरदार तेव्हांच निजामाच्या सैन्यांतून अलग झाला. नंतर पुढें निजामाची व पेशव्यांच्या फौजेची राक्षसभुवनाजवळ गांठ पडून मोठी हातघाईची लढाई झाली. तींत विठ्ठल सुंदर हे मोठ्या निकरानें लढत असून त्यानीं दादासाहेबांचा अंबारीचा हत्ती हस्तगत केला, आणि अघाडीच्या मराठी फौजेची फार दाणादाण करून सोडिली. हें पहतांच माधवराव पेशवे हुजुरातीचे लोक बरोबर घेऊन अघाडीस आले व त्यांनीं निजामाच्या फौजेवर मोठ्या जोरानें हल्ला करून तिचा अगदीं पराभव केला. त्यांत निजामाचे दिवाण विठ्ठल सुंदर ह्यास गोळी लागून ते ठार

झाले व निजाम भयभीत होऊन पळाला. नतर त्यानें राघोबादादांस शरण जाऊन त्यांच्याशीं तह केला. ह्या युद्धामध्यें तरुण माधवरावांचें पराक्रम उत्तम रीतीनें व्यक्त झाल्यामुळें राघोबादादांनीं त्यांच्यावर खुष होऊन पेशवाईचा सर्व राज्यकारभार त्यांच्या हवालीं केला. तदनंतर माधवरावांनीं सखारामपंत बापूस काहीं दिवस कारभारावर ठेवून आपल्या पसतीस पडलेल्या योग्य मुत्सद्द्यांस व सरदारांस त्यांच्या पूर्वीच्या अधिकारावर कायम केलें. गोपाळराव पटवर्धनास मिरज दिली व नाना फडनविसाकडे फडणिसीची दरख सोंपविली.

अशा प्रकारें पुणेदरबारात फेरफार झाल्याचें वर्तमान बुंदेलखंडातील पेशव्याचे सुभेदार बाळाजी गोविंद व गंगाधर गोविंद ह्यांस त्याच्या पुणेदरबारांतील वकिलानें कळविलें व आणखीही काहीं राजकारणें उपस्थित झालेलीं विदित केलीं. तेव्हां ते उभय बंधु पेशव्यांस भेटून बुंदेलखंडाच्या सुभ्याची योग्य व्यवस्था करण्याकरिता पुण्यास येण्यास निघाले. त्याप्रमाणें त्यांनीं पुण्याचे वकील बाबूराव नरसी ह्यांस अगाऊ पत्रें पाठविलीं. बाबूराव नरसी ह्यांनीं हें वर्तमान श्रीमंतास विदित केलें. तेव्हा श्रीमंतास फार आनंद होऊन त्यांनीं ह्या उभय बंधूच्या आदरपूर्वक भेटी घेण्याचें ठरविलें. बाळाजी गोविंद व गंगाधर गोविंद ह्यांनीं 'सरकारचे नक्ष्याचीं कामें बहुत केलीं' (असून ते) सरदारीयोग्य, पुरुषार्थी' असल्यामुळें श्रीमंतांनीं त्यांस एक कोस सामोरें जाऊन मोठ्या समारंभानें पुण्यास आणिलें. ह्या वेळीं बाळाजी गोविंद व गंगाधर गोविंद ह्याजबरोबर पांडुरंगपंत शेवड्ये, राघो धोंडदेव खांडेकर, त्रिंबकपंत नाना मुजूमदार, माधवराव लक्ष्मण खेर, लक्ष्मीनारायण भटजी, फडणीस, चिटणीस, आणखी संभावित गृहस्थ वगैरे पुष्कळ लोक होते. त्या सर्वांचाही श्रीमंतांनीं चांगला आदरसत्कार केला. त्यांनीं बाळाजी गोविंद व गंगाधर गोविंद ह्यांस सर्व परिवारासह

पुण्यास वर्षभर ठेवून घेतलें व बुंदेलखडासंबंधी सर्व राजमामल्यांचा उलगडा केला. नतर त्यांनीं त्याच्यावर प्रसन्न होऊन त्यास जगत्‌राजाकडून मिळालेल्या सर्व प्रांताची सनद करून दिली व सर्व बुंदेलखडाचा सुभा त्याच्याकडे कायम केला. त्याचप्रमाणें त्याचा भरदरबारामध्यें फार सत्कार करून त्यांस उंची पोषाख, मोत्यांची कंठी, मोत्याचा तुरा, जडावाचा शिरपेंच, हत्ती, घोडे, वगैरे देऊन मुतालकीचे शिक्के दिले, व त्यांनीं राजे जगत्‌राज व राजे हिरदेसा ह्याच्याकडून मिळविलेल्या सर्व प्रांतांचा कारभार करून पुण्यास दरसाल सात लक्ष रुपये फेंचवीत जावेत असा ठराव केला. ह्याप्रमाणें पुण्याच्या दरबारची कामगिरी करून व बुंदेलखडाच्या सुभेदारीची वंशपरंपरेची सनद घेऊन उभय बंधु परत बुंदेलखडात आले. पेशव्यानीं जातेसमयीं बाळाजी गोविंद ऊर्फ थोरले बाबासाहेब ह्यांस सागर प्रांतीं रहावें व गंगाधर गोविंद ऊर्फ धाकटे बाबासाहेब ह्यानीं जालवण--काल्पीकडील प्रांत संभाळावा असा हुकूम केला. त्याप्रमाणें ते आपल्या कामावर येऊन रुजू झाले व त्यांनीं आपापल्या प्रांताची सुरेख व्यवस्था केली. ह्या उभय सरदारानीं बुंदेलखंडाची व्यवस्था आपल्याकडे घेतल्यामुळें माधवरावांची तिकडची काळजी दूर होऊन त्याना हैदर व निजाम ह्याच्या कारस्थानात आणि पुण्याच्या राज्यकारभाराची सुधारणा करण्यांत आपलें सर्व लक्ष घालता आलें असें ह्मटलें तरी चालेल.

माधवरावांचा व रघुनाथरावांचा सलोखा झाल्यानंतर रघुनाथरावानीं उत्तर हिंदुस्थानांत ह्मणण्यासारखी एकच मोहीम केली. ह्या मोहिमेमध्यें विठ्ठल शिवदेव विंचूरकर, शिंदे, होळकर व बुंदेलखंडचे सुभेदार गंगाधर गोविंद हे हजर होते. ही मोहीम ह्मणजे गोहदच्या जाट राण्यावरील होय. हा राणा पेशव्याचा अंकित असून त्यास ह्या वेळीं पेशव्यांचा मुलूख बळकावण्याची दुर्बुद्धि झाली

होती. ह्मणून त्याचें पारिपत्य करण्याकरितां रघुनाथराव उत्तर हिंदुस्थानांतील सर्व सरदारांनिशीं गोहदच्या किल्ल्यावर चालून गेले. महादजी शिंद्याचा व गोहदच्या राण्याचा गुप्त स्नेहभाव असून त्याजवळ लढाऊ फौजही पुष्कळ होती. त्यामुळें प्रथम मराठ्यांचा हल्ला सिद्धीस न जातां त्यांचे पुष्कळ लोक जाया व जखमी झाले. तेव्हां राघोबादादानीं किल्ल्यास मोर्चे लावून राण्याची पुरी खोड मोडली. ह्या युद्धामध्यें गंगाधर गोविंद ह्यांनीं पेशव्यांस उत्कृष्ट साह्य केलें. त्यांनीं गोहदच्या किल्ल्यावर एकदम तुटून पडून राण्याच्या फौजेची दुर्दशा करून सोडली व मोठ्या युक्तीनें राण्यास हस्तगत करून मल्हारराव होळकराच्या स्वाधीन केलें. नंतर तो मल्हाररावांच्या मध्यस्थीनें आपले दोन्ही हात बांधून पेशव्यांस शरण आला व कृतापराधाबद्दल त्यांची माफी मागून तह करण्यास राजी झाला. तेव्हा राघोबादादांनीं त्याजबरोबर तीन लक्ष खडणीचा ठराव करून व युद्धाचा खर्च घेऊन त्यास सोडून दिलें. अशा रीतीनें मोहीम फत्ते झाल्यानंतर राघोबादादांनीं गोहद मुक्कामींच आपल्या डेऱ्यामध्यें मोठा विजयोत्सवाचा दरबार भरविला व ज्यानीं पराक्रम केले होते त्यां सर्वांस कित्येक बहुमूल्य वस्त्रालकार व सन्मान देऊन त्यांचा योग्य गौरव केला. ह्याच समयीं गंगाधर गोविंद ह्यांनीं फार पराक्रम केल्यामुळें त्यास राघोबादादानीं उंची पोषाक, रत्नालकार, चौघडा आणि जरीची लगी (?) वगैरे बक्षीस देऊन त्याचें फार फार अभिनंदन केलें. नंतर गंगाधर गोविंद काल्पीस गेले व राघोबादादा दक्षिणेमध्यें परत आले.

गोहदची मोहीम झाल्यानंतर पुढें उत्तर हिंदुस्थानात बऱ्याच घडामोडी सुरू झाल्या. मराठ्यांचे शूर सरदार मल्हारराव होळकर मृत्यु पावले. अयोध्येचा नबाब सुजाउद्दौला, दिल्लीचा शहाअलम बादशाहा व बंगालचा नबाब मीरकासीम ह्यांच्यामध्यें अनेक उला-

ढाली सुरू झाल्या. दिल्लीचा वजीर नजीबखान हा अतिशय बलाढ्य होऊन दिल्ली, आग्रा वगैरे सर्व प्रांतामध्यें आपला अधिकार चालवूं लागला. शहाअलम बादशाहा बक्सार येथील लढाईमध्यें अपयश पावून इंग्रजाच्या आश्रयानें अलहाबाद, व कोरा प्रांताचें उत्पन्न घेऊन अलहाबादेस राहिला. तिकडे राजपुतान्यातील जयपूर, जोधपूर, वगैरे ठिकाणच्या रजपूत संस्थानांमध्यें कलह सुरू होऊन 'बळी तो कान पिळी' अशी स्थिति होऊन गेली. भरतपूरचा जाट राजा सुरजमल्ल हा मृत्यु पावून त्याच्या मुलांमध्यें गादीविषयीं तंटे सुरू झाले. अशा संधीस उत्तर हिंदुस्थानात पुनः स्वारी करून पानिपतच्या युद्धांत झालेलें नुकसान भरून काढावें. अशी कल्पना माधवराव पेशव्याच्या डोक्यात येऊन त्यांनीं विसाजी कृष्ण बिनीवाले ह्या हुशार सरदाराबरोबर भरपूर सैन्य देऊन त्याची तिकडे रवानगी केली व त्याच्या साह्यास रामचंद्र गणेश कानडे, महादजी शिंदे, तुकोजी होळकर वगैरेंची योजना केली. नंतर त्यांनीं तिकडे अनेक राजकारस्थानें सुरू करून पुनः मराठ्यांचा अंमल संस्थापित करण्याचा प्रयत्न चालविला. पानिपतच्या घनघोर संग्रामामध्यें सर्व मुसलमान एकत्र करून मराठ्यांचा नाश करण्याचे कामीं नजीबखान रोहिल्यानें अत्यंत परिश्रम केले होते, त्यामुळें मराठ्यास त्याचा मनस्वी द्वेष उत्पन्न होऊन त्यांनीं रोहिलखंडावर मोठ्या त्वेषानें स्वाऱ्या केल्या व रोहिले लोकांना कमाऊनच्या पहाडात जीवरक्षणार्थ पळवून लावून निम्में रोहिलखंड पादाक्रांत केलें; दिल्लीवर चढाई करून तेथें आपला पूर्ण अंमल बसविला, शहाअलम बादशाहास इंग्रजांच्या तांब्यातून आपल्याकडे वळवून दिल्लीच्या तक्तावर अधिष्ठित केलें; सुजाउद्दौल्याचा नक्षा जिरवून त्यास गोगलगाय करून सोडिलें; आणि फरुकाबादच्या नबाबास जर्जर करून त्यापासून पूर्वी मराठ्यास मिळालेले साडेसोळा महाल परत

घेतले. येणेंप्रमाणें सन १७६९ पासून सन १७७२ पर्यंत तीन चार वर्षांत जीं अनेक पराक्रमाचीं कामें केलीं त्यावरून मराठ्याची शक्ति पुनः प्रज्वलित होऊन त्याचें अद्वितीय शौर्य उत्तम प्रकारें चमकू लागलें ह्यात शंका नाहीं. ह्या समयाचा इतिहास ह्मणजे दुर्दैवानें वैभवसर्वस्व नष्ट होऊन अगदीं अपकर्ष पावलेल्या महाराष्ट्रीयांच्या अपार धैर्याचें, विचित्र उत्साहाचें, आणि अप्रतिम स्वाभिमानाचें उत्तम प्रदर्शनच होय असें ह्मटलें तरी चालेल. महाराष्ट्रावर सन १७६१ सालीं दुःखाचा पर्वत कोसळला, व त्याची अगदीं शोचनीय स्थिति झाली तरी तें राष्ट्र तितक्यातूनही न डगमगतां विलक्षण जोम धरून वर निर्दिष्ट केलेल्या प्रसगीं पुनः उत्कर्ष पावलें ही गोष्ट लक्षात घेतली तर महाराष्ट्रीयाच्या अंगीं अति निकृष्टावस्थेंतही जीव धरून राहण्याची अद्भुत शक्ति आहे असें सिद्ध होतें. आणि हेंच राष्ट्राच्या जीवंतपणाचें उत्तम लक्षण होय.

ह्या सर्व प्रसगीं बुंदेलखंडाचे सुभेदार बाळाजी गोविंद व गंगाधर गोविंद ह्यानीं आपलें कर्तव्य उत्तम प्रकारें बजाविलें, परतु लवकरच ह्या उभय बंधूंमध्यें कलहास प्रारभ होऊन बुंदेलखडामध्यें अनेक राजकीय उलाढाली सुरू झाल्या त्यांचें सक्षिप्त विवेचन करणें अवश्य आहे.

बाळाजी गोविंद व गंगाधर गोविंद हे पुणेदरबारांतून सुभेदारीची सनद घेऊन बुंदेलखडात परत गेले व तेथील प्रातात आपला अमल पूर्ववत् बसवूं लागले, ही हकीकत वर सागितलीच आहे. हे स्वप्रातीं परत गेल्यानतर कांहीं दिवसांनीं त्याचे पुणेदरबारातले वकील बाबूराव नरसी हे मृत्यु पावले. तेव्हां त्यांच्या जागेवर पेशव्यानीं त्याचे चिरजीव दिनकर बाबूराव ह्याची नेमणूक केली. हे गृहस्थ मोठे राजकारणपटु व चतुर असून त्यानीं अल्पावकाशामध्यें आपल्या वडिलाप्रमाणें पेशव्यांच्या दरबारात छाप बसविली. त्यांचें व

सुभेदार बाळाजी गोविंद ह्यांचें सूत्र जुळून बुंदेलखंडाचा राज्यकारभार सुरळित रीतीनें चालू झाला. परंतु इकडे बाळाजीपंत व गंगाधरपत ह्याचें वैमनस्य उत्पन्न झालें. हे उभय सरदार आपल्या बाना प्रमाणेंच निस्सीम स्वामिभक्त असून मोठे रणशूर होते. तथापि बाळाजीपंतास सुभेदारीचा सर्व हक्क प्राप्त झाल्यामुळें कित्येक विघ्नसंतोषी कुटिल लोकानीं त्याच्याविषयीं गंगाधरपताचें मन कलुषित केलें. गंगाधरपत किंचित् हलक्या कानाचे व मत्सरी असल्यामुळें त्यानीं बाळाजीपताच्या विरुद्ध होऊन बुंदेलखडाचा सर्व कारभार आपणास मिळविण्याचा प्रयत्न आरभिला. त्यास त्याचे मेहुणे विसाजी गोविंद चांदोरकर हे साह्य होऊन दोघानीं पेशव्याकडे व त्याच्या प्रबल सरदारांकडे कारस्थानें सुरू केलीं. बुंदेलखंडामध्यें अगोदर दगेखोर लोक फार असल्यामुळें तेथें शातता राहणें फार कठिण होते. तशात उभय बधूंमध्यें कलह सुरू होताच बुंदेले जमीनदारास अनायासें दंगा करण्यास उत्तम संधि सापडली व त्यांनीं पेशव्याच्या प्रांतावर हल्ले करून जिकडे तिकडे धुमाळी उडवून दिली. त्यामुळें सरकारचा वसूल वेळेवर येईनासा झाला व विसाजी कृष्ण बिनीवाले वगैरे सरदारांच्या खर्चास बाळाजी गोविंदांकडून ऐवज पोहोंचेनासा झाला. त्यामुळें बाळाजीपंतासबधानें तक्रारी होऊ लागल्या. ही गोष्ट गंगाधरपंतास व त्यांच्या मन्त्रिमडळास इष्ट वाटून त्यानीं पेशव्याकडे व विसाजी कृष्णाकडे स्वतः मामलत मिळण्याचा प्रयत्न चालविला. श्रीमत माधवरावसाहेब पेशवे हे न्यायी, धूर्त व पाणीदार असल्यामुळें त्यांच्यापुढें कोणाचीही लटपट चालत नसे, एवढेंच नव्हे, पण सर्व सरदार व सर्व प्रांताचे अधिकारी त्यांच्यापुढें चळचळां कापत असत. बाळाजीपताकडून दरसालचा हिशोब बरोबर येत नाहीं असें कळताच पुणेदरबारांतून त्याच्याकडे जरूरीचीं पत्रें रवाना झालीं व गंगाधरपंतास जाबसाल

करण्याकरितां जरूर पुण्यास पाठवावें असा हुकूम आला. त्या वेळीं बाळाजीपतानीं पुण्याचे वकील दिनकरराव ह्यास तिकडील हकीकतीचें एक सविस्तर पत्र लिहिलें. तें वाचलें ह्मणजे त्यावेळच्या बुंदेलखंडाच्या स्थितीचें चित्र हुबेहूब नेत्रापुढें उभें राहतें. तें पत्र येणेंप्रमाणें:—

"चिरंजीव राजश्री दिनकरराव यांस प्रती बाळाजी गोविंद. आशीर्वाद उपरी येथील कुशल ता. छ १९ सकल यथास्थित जाणून स्वकीय कुशल लिहित जाणें. विशेष हुजुरास मुजरद कासीद जोडीबरोबर पत्र आलें कीं तुह्मी मामलतीवर गेल्यापासून सालोसालचा हिशेब दप्तरीं लागला. नाहीं. याजकरितां तुह्मास येणें ह्मणून एक दोन वेळ लिहिलें असता आला नाहीं. तरी हल्लीं गंगाधर गोविंद यास जलदीनें पाठवणें ह्मणून पत्र आलें. त्यास सरकारी आज्ञेस उजूर आहे असा अर्थ नाहीं. परंतु यदा इकडे दगा बहुत झाला आहे. धामोणी प्रांतीं धामोणीवाले यानें दगा केला आहे व किरकोळ मवासेही चोरीछुपीनें गाव मारतात गुरेंढोरें नेतात. तसाच कनार प्रांतीं गुजर वगैरे यानींही जागोजाग उपद्रव आरंभिला आहे. गोहदवाल्याचे धामधुमीमुळें ग्वाल्हेर प्रांत खराबीस आला व पुढें तो दाबीत चाललाच आहे. थोरले फौजेचें भय काडीमात्र कोणी बाळगीत नाहींत. याजकरितां आपलाले जाग्यांत सावधपणें राहून बंदोबस्त केला पाहिजे. आह्मी असल्याचा दाब निराळा आहे. हे मोकळे राखून आल्यास सर्व एकसरून दुंडी करावयास चुकणार नाहींत. ही अडचण. राजश्री विसाजी कृष्ण यानींही सालमजकुरींचा अजमास व गुदस्तचे हिशेब घेऊन जलदीनें बोलाविलें आहे. हुजूर न्यावयास आले आहेत. त्यानीं लष्करांत चलावयाची निकड बहुत केली आहे. तिकडेही न जाता गत्यंतर नाहीं. गेलेंच पाहिजे. सालमजकूरचे रसदेचा भरणा करून दिला तरी जाण्याचें स्वष्ट लागलेंच

आहे. जावें लागेल. याजकरितां लष्करांत जाऊन आल्यानतर श्रावण आषाढ मासीं इकडील सर्व बंदोबस्त करून हुजूर येतों. असें मोत्रम आह्मीं श्रीमतांस लिहिलें आहे. तुह्मींही सविस्तर समजावून विनति करणें. वरकड इकडील वर्तमान तरी पातशाहानीं फरुकाबादे- नजीक नबीगजावर बहुत दिवस मुक्काम करून राहिले होते. त्यास न्यावयास राजश्री महादजीबावा शिंदे आले. त्यांनीं पातशाहा- जवळ रोहिले यांचें पारिपत्य करावयाचे वगैरे करारमदार करून त्यास दिल्लीस नेलें. राजश्री विसाजीपंत व होळकर पुढें हिंद्रा नदी- वर सामोरे येऊन पातशाहास घेऊन दिल्लीस गेले. तख्तरूढ होऊन हल्लीं रोहिल्यावर जावयाची मसलत ठरवून सर्व अंतर्वे- दींत यमुनापार उतरले आहेत. जाबतेखान सुकतालची मजमुदी करून राहिला आहे. नबाब अहमदखां पठाण वारलियावर त्याचा लेंक मुजफरजग यास नबाबी देऊन आपले जाग्याचा बंदोबस्त करून आहेत. नबाब सुजातद्दौले बंगाल्यास होते. ते पातशाहा नबीगजाहून कुच करून दिल्लीकडे नेलियावर प्रयागास गेले. तेथून आपला चेला फिरगी याकडे पाठविला. फिरग्यानीं आपले- कडून सुमरे (?) साहेब वगैरे मातबर सरदार जमावसुद्धा पाठविले ते काशीस येऊन दाखल जाले आहेत. त्याच्या व नबाबाच्या भेटी- नतर काय मजकूर होईल पहावें. वरकड सर्व आपलाले जागीं अहून आहेत. शिंद्याकडून राजश्री बाळारावही नबाब सुजातद्दौला याजकडे गेले आहेत. याप्रमाणें प्रस्तुत इकडील वर्तमान आहे. पुढें होईल तें लिहून पाठवूं. वरकड आलाहिदा पत्रीं लिहिलें आहे त्याजवरून कळेल. इकडील खरचा व मामलतीचा मजकूर सर्व कच्चा तुह्मांस कळावा ह्मणून लिहिला आहे. तुह्मास माहितगारी असली ह्मणजे जसा प्रसंग दिसेल तसा तुह्मी जाबसाल कराल. वरकड चिरंजीवांनीं लष्करांत त्रिंबकराम जोशी याचे विद्यमानें राजश्री विसाजीपंताजवळ

आपले नांवें मामलतीचा विचार करून घ्यावा असें सूत्र लावून बोल्वीत आहेत. तसें तेथें हुजूरही लिहितात असें ऐकितों. याजकरितां तुह्मी या शोधांत राहून तेथें कोणास काय लिहितात, सरकारपावेतों लाववावें, सरकारात बोलावें, असें काहीं कोणास लिहितात कीं काय तें ध्यानांत ठेवून ठिकाण पाडावें. ठिकाण न पडे तरी शोधात असावें. आणि जसें तुह्मास आढळत जाईल तसें वरचेवर आह्मास लिहीत जाणें. बोडसे यंदा राजश्री रघुनाथराव हरी यानीं घेतलें. याजकरितां बोडसेवाले अष्टभय्या मिळोन दुंडी केली आहे. आमचे परगण्यास उपद्रव लागतो. हा उपद्रव केवळ आमचे मुलुखाजवळ आहे. याचा बदोबस्त झाला पाहिजे. तेव्हा आह्मास श्रीमतानीं येण्याविशीं लिहिलें आहे त्यास हें टाकून येता मामल्याची खराबी होईल व लष्करांतही जावयाचें याजकरितां सर्व तुह्मीं श्रीमतास निवेदन करणें. साराश आह्मीं येथील प्रकार तुह्मास कळावा ह्मणून यांत लिहिला आहे. वरकड तुह्मास तेथें समयोचित जो जाबसाल जसा पडेल तसा युक्तायुक्त पाहून करणें. बहुत काय लिहिणें लोभ असों दिजे हे आशीर्वाद."*

हें पत्र गेल्यानंतर दिनकर बाबूराव यानीं श्रीमतास सर्व मजकूर विदित करून कशी तरी वेळ संभाळून घेतली, परतु इकडे गंगाधरपत व बाळाजीपत याचें उघड वैर सुरू होऊन गगाधरपंत एक वर्षभर काल्पीस जाऊन स्वस्थ राहिले. व प्रांताचा बदोबस्त वगैरे करावयाचें सोडून गुप्तपणें विसाजी कृष्ण बिनीवाले ह्यांच्याकडे

* हें पत्र थोरले माधवरावांच्या कारकीर्दीतलें, महादजी शिद्यांनीं रोहिल्यांचा पराभव करून शहाअलम बादशाहास गादीवर बसविलें त्या समयाचें आहे ह्या पत्रावरून माधवरावसाहेबाचा ठिकठिकाणच्या सुभेदारावर कसा दाब होता व पुणेदरबारचीं राजकारणें कशी चालत असत हें दिसून येतें.

संधान लावून बुंदेलखंडाची सुभेदारी मिळण्याचे यत्न करूं लागले. त्यामुळें बाळाजीपंतास अतिशय त्रास झाला. ते स्वभावतः फार गरीब असल्यामुळें त्यानीं गंगाधरपंतास काल्पी, जालवण वगैरे महाल देऊन त्यांच्याशीं तडजोड करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. परंतु गंगाधरपंत कुटिल मंत्रिमंडळाच्या आधिन झाल्यामुळें त्यास मान्य होईनात. दिवस धामधुमीचे असल्यामुळें बाळाजीपंतास चोहोंकडून फार पेंच बसू लागले व त्याची अतिशय ओढाताण होऊं लागली. सख्ख्या बंधूचें साह्य कमी झाल्यामुळें प्रांताचा बंदोबस्त सुरळीत चालेनासा झाला. काशीपंतकाका ह्मणून त्याचे एक चुलते कांहीं प्रांतांवर मामलतदार होते, त्यानीं अव्यवस्थित कारभार करून तिकडून प्रांताची खराबी केली, व कर्जाचा डोंगर तयार करून ठेविला. सागरचे मामलतदार विसाजी गोविंद ह्यानींही बेइमानी केली. अशा प्रकारें सर्व तऱ्हेनें बाळाजीपंताची ओढाताण झाली व लष्करांतून विसाजी कृष्ण याचे तगादे येऊं लागले. तेव्हा ते त्यास भेटण्याकरिता तिकडे गेले. परंतु त्याचेंही मन दूषित झालें असल्यामुळें तेही त्याच्याशीं सरळपणानें वागले नाहींत. अशी संकटप्रचुर स्थिति प्राप्त झाली तरी बाळाजी गोविंदानीं बिलकुल न डगमगता आपल्या पुण्याच्या वकिलास साद्यंत हकीकत कळवून पेशव्याची मर्जी अनुकूल करून घेण्याचा प्रयत्न केला. ह्या वेळीं त्यानीं पुण्याच्या वकिलास जें पत्र लिहिलें आहे तें फारच महत्वाचें आहे. ते येणेंप्रमाणें:—

"चिरंजीव राजश्री दिनकरराव यासीं प्रति बाळाजी गोविंद, आशीर्वाद उपरी, येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित जाणें विशेष:—सांप्रत तुह्मांकडील पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं तर सविस्तर तपशीलवार लिहून पाठविणें. वरकड इकडील वर्तमान सविस्तर पेशजी कासीद जोडी रवाना केली त्याजबरोबर लिहिलें आहे त्याज-

वरून कळो येईल. गतवर्षापासून चिरंजीवांनीं* फट खाऊन वरीसभर काल्पीस बसले. सर्व अंगानिराळें टाकिलें. आह्मी कोणी एक तट खावा तर सरकारची मसलत, देशकाल कळत नाहीं. देण्याचे पेंच भारी. ऐशा कित्येक गोष्टी-नजरेंत घेऊन विचार करून बदोबस्त केला. सर्व ओझें अंगावर घेऊन चालविलें. आणि चिरजीवासही अनेक प्रकारें सागणें तें सांगितलें. परतु त्यांच्या ध्यानांत एकही गोष्ट न आली. निदान यंदां आश्विनमासीं काल्पीहून निघोन लष्करांत चालले. तेव्हाही आह्मीं उत्तरगडच्या मुक्कामीं जाऊन पंधरा वीस रोज राहून आणखी सागितलें कीं,. तुह्मी लष्करात न जाणें. सर्व तुमच्या स्वाधीन करून देतों. तुह्मास कळेल तें करणें. आमचा तिळमात्र आग्रह नाहीं. लष्करात जाऊन गोष्ट चढीस लावावी आणि लौकिक करून घ्यावा यात जीव काय आहे ? तुह्मी लष्करांत तरी जाऊन मामलतच करणार. तेच मामलत आमचे आह्मी होऊन स्वाधीन करून देतों. याप्रमाणें ह्मणत असतां निदान लष्करांत निघोन गेले. आह्मास व वडिलासीं† सरदारांचीं बोलावणीं श्रावणापासून आलींच होतीं कीं हिशेब घेऊन जलदीनें येणें. त्यास हिशेबाच्या कारकुनास पर्जन्यामुळें सागर प्रांतींहून यावयासी दिवसगत लागली. तेहीं दूसरियास रायपुरास हिशेब येताच आह्मीही वडीलसुद्धा निघोन सकुराबादेस आलों तों चिरजीवानीं गुदस्तां सात लाख रसद सकट कबूल केली होती. त्याजवर यानीं सालमजकुरीं दोन लक्ष जाजती कबूल करून नवांवर मामलत चुकवून सरकारचीं पत्रें आह्मास पाठविलीं कीं 'सकुराबादेस तुह्मी आलां त्यास मामल-

---

* चिरजीव ह्मणजे बाळाजी गोविंदाचे धाकटे बधु गगाधर गोविंद हे होत

† वडील ह्मणजे बाळाजी गोविंदाचे चुलते काशीपतकाका. ह्यांच्याकडे पेशव्यांच्या कांहीं प्रांताची मामलत होती.

तीचा जात्रसाल यांनीं फडशा केला. तुह्मी माघारे जाणें, उभयतां एकविचारें कामकाज करणें, तुमची खावदगिरी. हे कामकाज करतील. सालमजकुरीं रुपया महालास घेऊन वरातदारास व कर्जदारास दिल्हे असतील त्याजपासून माघारा घेणें. न घेतल्यास सरकारचे ढालाईत गारदी लावून घेतला जाईल.' याप्रमाणें पत्रें घेऊन पाठविलीं त्यास आह्मीं विचार पाहातां, ज्यास जो रुपया देवविला तो माघारा कैसा येतो. पुन्हा कजियाच, ऐसा दिसून आला. दुसरें, चिरंजीवानीं सरकारचीं पत्रें व ढालाईत घेऊन लष्करांतून भारी जप्ती सागर प्रांतास व कोंच कुनार प्रांतास पाठवून बदोबस्त केला. सर्वत्र उग्रिमता दिसोन आली. विसाजी गोविंद याजकडे सागर, खेमलासें पंचमहला आजी वीस वर्षें एकसतत कमावीस त्याजकडे, त्याचा हिशेबठिशेब रुजुवातीनें मनास आणावयाअन्वयें करून विसाजी गोविंद यासी दूर करून मामलेदार संवत् १८२७ साचे सालीं पाठविला त्याशीं ठाणींदुर्गीं न देतां फिरोन राहिले. गोळी वाजवून बखेडा केला तो आजी दोन वर्षें बखेड्याखालीं घालोन नुकसानी केली. शिबंदीखर्च जाजती पडोन निखालस अमल होऊं न पावला. बदमामली केली. चाकर आपला. कोणास सागताही न ये आपले खावंदगिरीस बाट लागतो, यास्तव आजपर्यंत वाढत आले. शेवट चिरंजीवांनीं ही गोष्ट नजरेस न घेता त्याची पेहरवी करून, सरकारचीं त्यास पत्रें कीं सागर प्रांताचा बदोबस्त करणें ह्मणोन परभारी पत्रें त्यास घेऊन पाठविलीं. राजश्री बिसाजी कृष्ण यानीं जें करणें तें दूरवर नजर देऊन करावें. तेही गोष्ट त्यांजपासून न घडली. यानीं सागावें त्याप्रमाणें त्यानीं ऐकावें. हें अप्रस्तुत दिसोन आलें. आह्मीं करावें तें सिद्धीस जाऊं न द्यावें हें मानस. ज्या विसाजी गोविंदाकडे सागर, खेमलासें दोन महाल होते त्यास संपूर्ण सागर प्रांत सांगितला. त्यानें हरामखोरी बजिन्नस केली असतां त्याच्या मनो-

द्यानुरूप सध्याच बडोन आलें. आतां तर त्यास असान चार बोटें राहिलें. त्याचें कर्म काय, त्यास सांगतो काय, हें कोणी ध्यानास न आणिलें. मामलत चढीस लावून घर बुडायाची कांहीं गोष्ट राहिली नाहीं. असो. इतका प्रकार त्याच्या ध्यानात देऊन सकुराआदेस वडिलानीं व आह्मीं विचार केला कीं सालमजकुरीं महाली वसूल घेतला तो कर्जदारास , वगैरे फौजेस दिल्हा आहे. त्याचा बखेडा पुढें पडेल. तेव्हा सरकारचे टालाईत येतील त्यासी कजीये करीत बसावें यात जीव काय आहे. त्यास लष्कर नजीक आहे तेथें चिरंजीवही आहेत. जो जाबसाल होणें तो राजश्री विसाजीपंतदादाच्याच विद्यमानें फडशा करून घ्यावा, पुढें कोण रीतीनें राहावयासी सागतात तेंही ऐकावें. या अर्थी कुच करून मजलदरमजल कोळेनजीक लष्कर होतें तेथें गेलों. लष्कराआलीकडे दो कोसांवर मुकाम केला. तों चिरंजीव लष्करातून विदा होऊन आमच्या मुक्कामास कुच करून आले. भेट झाली. तों चार घटका मध्यें गेल्यानतर सरकारचिठी आली कीं तुह्मी कुच करून माघारें जाणें, लष्करात न येणें, ह्मणोन आली. तेव्हाच आह्मास प्रकार कळला. तदनतर, विचार करिता लष्करानजीक आल्यानतर सरदाराची भेट न घेता माघारें फिरावें हें उत्तम नव्हे ऐसीयास हरामखोरी आह्मापासून कांहीं घडली नाहीं. भेट घ्यावी. चार गोष्टीं विचारणें त्या विचारून पुढें तदनुरूप करावें हें ध्यानात घेऊन प्रात कालीं भेटीस गेलों. वातमी आणविली तों डेऱ्यात बसले होते. आह्मी भेटीस आलोंसें कळतांच परसाकडेचा बहाणा करून उठोन गेले. आह्मी डेऱ्यात चार घटका उगीच बसलों. तदनतर बाहेरोन आले. भेट जाहाली. प्रथमदर्शनींच कांहीं बोलावें तर उत्तम दिसत नाहीं ह्मणोन डेऱ्यास आलों. रा॰ गोपाळ संभाजी, गोविंद रावजी आह्माकडील कारकून या उभयतासु सागितलें कीं रा॰ दादास विचारणें. आह्मी आलों

त्यास आपल्या कित्येक बदोबस्तीच्या गोष्टी आपल्यास विचारून घ्यावयाच्या आहेत. पुढें आपण सांगितल्याप्रमाणें करूं. परंतु आमच्या चार गोष्टी ऐकून घ्याव्या ह्मणोन विचारावयासी सांगितलें. त्यांनीं त्यास विचारिलें. त्याचें उत्तर केलें कीं आह्मास पचाईत करणें नाहीं. पचाईत खावद पुण्यास करतील. असें कठोर भाषण केलें आणि सध्याकाळीं हुजूर पागेचा कारकून व पंचवीस स्वार पाठविले. त्याजबरोबर सागून पाठविलें कीं तुह्मी कुच करून उभयतां जाणे. रा० काशीपत लष्करांत येतील. याप्रमाणें कारकुनानें सांगितलें. तेव्हा सर्व अर्थ ध्यानांत आला. सावधगिरी आमची हें लौकिकात मात्र. परंतु त्यास जें कर्तव्य तेंच ते करणार, मग आमचे काय प्रयोजन ? तेथील रग ध्यानास आणिला. सरदाराची मर्जी ठिकाणीं नाहीं. तेव्हा वडिलानीं कुच केलें. ते लष्करात गेले. आह्मी निघोन गगातीराकडे आलों. वडील लष्करात चालिले. तेव्हा चिरजीवानीं वडिलासी करार केला कीं सालमजकूरच्या वसुलापैकीं दोन लक्ष रुपये रद्द कर्जांत घ्यावे. बाकी वसूल माघारा घ्यावा. कनार पूर्ववत्प्रमाणें ठेवावी. याप्रमाणें करार केला असतां चिरजीव राय पुरास येताच्च कनारेस अमलदार पाठवून महालाची जमी केली. दोन लक्ष द्यावे त्याचाही प्रकार कळतच आहे. ऐसा प्रकार झाला. प्रस्तुत येथें ऐकण्यात असें आलें आहे कीं, वडिलांचा शाहापूर अंबरपूरचा हिशेब सरकारात विल्हेस लागणें. त्या बहाण्यानें वडिलाचा अटकाव लष्करात चार महिने करावा. यानीं येथील सालमजकूरचा वसूल मनास आणून यादी जमा करून तेथें पाठवून फडशा करून घेतल्यानतर मग उलगडा वडिलाचा करावा. ऐसा प्रकार दिसोन आला. याप्रमाणें लष्करांतूनही वडिलाचें लिहून आलें होतें. त्यास येथील प्रसंग या रीतीचा आहे. तो तपशीलवार तुह्मास लिहिला आहे. आह्मी प्रस्तुत श्रीगंगास्नानानिमित्त

गंगातीरीं नानाहू(?)च्या घाटास आलों आहों. वडील लष्करांतून येत तोपर्यंत येथें राहावें. ते आल्यानंतर त्याच्या आमच्या विचारें जें पुढें कर्तव्य तें करावें ऐसें आहे. त्यास तुह्मीं तेथील प्रसंग मनास आणून आह्मास लिहिणें. राजश्री सखारामपंतबापू यांची ममता रा० विसाजी कृष्ण याजकडे कैसी आहे. अंतःकरणममता किंवा गैरममता आहे त्याचा शोध पुर्ता मनास आणून ममता विशेषात्कारें असल्यास तुह्मीं वर्तमान सांगितल्यास काय ध्यानास येणार? तेव्हा सांगणें वृथा आहे. नच सांगावें. ममता त्याच्या ठायीं नसल्यास कार्याकारण वर्तमान सांगावें, कीं गैरजीस खावंदांच्या ठायीं असताकरून ही दशा केली. असो. आपल्यास खावंदापाशीं येणें. तेथील आज्ञा होईल त्याप्रमाणें करणें. इतरासी प्रयोजन काय? त्यास येविशींचा तेथील गरबद यथास्थित ध्यानांत घेऊन करणें. वडिलांचा गुंता लष्करांत करतील यांत संदेह नाहीं. त्यास तेथें बनल्यास राजश्री सखारामपंतबापूंचें एक पत्र रा० विसाजी कृष्ण यांसीं पाठवावें कीं रा० काशीपंताचा सत्वर उलगडा करून बिदा करणें. लष्करांत त्यांचा गुंता न करणें. ऐसें पत्र मिळाल्यास उपराळ्याचें घेऊन पाठवावें. व विसाजी कृष्ण यांचे बंधु विठ्ठलपंत पुण्यांत आहेत त्यास वर्तमान सांगून त्याचें एक पत्र घेऊन पाठवावें कीं काशीपंताची बिदा सत्वर करून द्यावी. कोणेविशीं गुंता न करितां आपले आपण बिदा करावी. कोणाच्या सांगितल्यावर न जावें. ऐसें एक पत्र त्यांचेंही घेऊन जलदीनें पाठविणें. तेथील प्रकार कैसा आहे. आह्मी देशास आल्यानें यथास्थित घडोन येई ऐसा मजकूर प्रसंगोचित मनास आणून आह्मास लिहिणें. वरकड विसाजी कृष्ण आह्माविशीं तेथें सरकारांत काय लिहितात यांचाही शोध वरचेवर मनास आणून लिहिणें. चिरंजीव तेथें काय कोणास लिहितात तेंही वरचेवर मनास आणून लिहिणें. होळकर, विसाजी

कृष्ण एकचित्त, शिंदे निराळे. यांत कलह. याजविशीं तेथें श्रीमताची मर्जी कोणाकडे कैसी आहे तें तपशीलवार लिहिणें. शिंद्यांनीं मीरबक्षीगिरी पातशाहापासून श्रीमंत राजश्री धाकटे रावसाहेबांच्या नावें करून घेतली. होळकराचे व विसाजीपंताचे मानस जाफतेखानास मीरबक्षीगिरी द्यावी. कांहीं नजराणा घ्यावा. याप्रमाणें येथें आहे. त्यास श्रीमताची मर्जी कोणाकडे प्रसन्न आहे तें तपशीलवार लिहून पाठविणें. बहुत काय लिहिणें लोभ असों दिजे हे आशीर्वाद."*

हें पत्र वाचलें म्हणजे बुंदेलखडातील पेशव्याच्या सुभेदारांची स्थिति उत्तम प्रकारें व्यक्त होऊन त्याच्यावर पेशवे सरकारचा कसा दरारा होता व त्याना त्याची मर्जी प्रसन्न करण्याकरिता किती जपावें लागत असे हें कळून येतें.

बाळाजी गोविंदाविषयीं श्रीमंत माधवरावसाहेब यांचा चांगला ग्रह असल्यामुळें व त्याचे पुण्याचे वकील दिनकरराव हे त्याच्या संबधानें हरएक प्रकारची तरफदारी करून त्याची उणीव सभाळून घेत असल्यामुळें त्याच्या प्रतिपक्षाचें कांहींएक चाललें नाहीं. उलट अशा स्थितींतही बाळाजी गोविंदानीं बुंदेलखडाचा अंमल कायम ठेविला व अनेक राजकारणें झालीं तरी पेशव्याशीं इमानेंइतबारें

---

* हें पत्र वाचलें म्हणजे गंगाधरपंताची सर्व कारस्थानें व्यक्त होतात व पुण्याच्या दरबाराची मर्जी सभाळण्याकरितां त्या वेळी पेशव्याच्या सुभेदाराना कशी काळजी घ्यावी लागत असे तें दिसून येतें. ह्या पत्राच्या शेवटीं शिंद्यानीं पातशाहापासून मीरबक्षीगिरी धाकटे रावसाहेबांकरिता घेतली म्हणून लिहिलें आहे. पण ह्या वेळीं धाकटे रावसाहेब जन्मासही आले नसून थोरले माधवरावांची कारकीर्द सुरू होती. मग धाकटे रावसाहेब म्हणजे माधवरावसाहेबांचे बधु नारायणराव हे असावेत असें वाटतें. ह्यावरून महादजी शिंद्यांस पेशव्याच्या दरबारांत आपली छाप बसविण्याची इच्छा पहिल्यापासून होती असें सिद्ध होतें.

वागून आपल्या वडिलांची कीर्ति सभाळली ह्यामुळें श्रीमंतांची त्याच्यावर अधिक मेहेरबानी जडली.

इतक्यात महाराष्ट्राच्या दुर्दैवानें ह्या तरुण पेशव्यांवर राजयक्ष्मा-नामक रोगानें आपला अंमल बसवून त्यांचा थेऊर येथें अंत केला. त्यानीं मृत्युसमयीं दादासाहेब, नारायणरावसाहेब, सखारामबापू, नाना फडनवीस, हरिपंततात्या फडके, बाबूराव केशव वगैरे मंडळीस आपल्या राज्यव्यवस्थेचीं सहा कलमें लिहून दिलीं तीं येणेंप्रमाणें:—

"१. आमचेमागें नारायणरावसाहेब यांनीं राज्यकारभार थेऊर अथवा सिद्धटेकीं राहून करावा. पुण्यास दादासाहेब राहतील. आपण राहूं नये, आणि दादासाहेबास कैद करू नये.

२. विसाजी कृष्ण बिनीवाले यास हिंदुस्थानचे मोहिमेस पाठविलें. त्यानीं भाऊसाहेबाचे गर्दीच्या बदला रोहिल्यांशीं लढून फत्ते करून ते माघारे पुण्यास येत आहेत. त्यास सुवर्णाचीं पुष्पें करवून तीन कोस सामोरें जाऊन भेटी घेऊन सन्मानेंकरून पुष्पें उडवीत शहरात आणावें.

३. कर्नाटकची मोहीम करून टिपूचें पारिपत्य करून श्रीरंगपट्टण वगैरे जागा खाली करावी.

४. सखारामबापू याचे हातें राज्यकारभार सर्व द्यावा. दुसरा कारभारी करूं नये.

५. गोविंदपंत बुंदेले यानीं हिंदुस्थानांत सरकारचा नक्षा ठेविला. त्याचप्रमाणें त्यांचे चिरंजीव बाळाजी गोविंद व गंगाधर गोविंद यानीं ठेविला आहे. त्यास जोंवर पेशव्यांचा वंश आहे व गोविंदपंतांचा वंश आहे तोंवर त्यांचे सुभ्याची घालमेल करूं नये.

६. आमचा अंतकाळ झाल्यावर आमची स्त्री सौ० रमाबाई सहगमनाचा विचार निश्चयात्मक करून आहे, त्यास तिजला कोणीं

स्वकीय परकीय मोहात घालूं नये. जो विचार आहे तोच यथा-विभवानुसार समारंभ करून करवावा. त्यांत व्यत्यय न होय*."

वरील कलमावरून माधवरावसाहेबांचें राजकारणपटुत्व व गोविंदपंत बुंदेल्यांच्या वंशाविषयींचा अभिमान चांगला व्यक्त होतो.

माधवराव पेशव्याचा काळ झाल्यानतर पेशवाईचीं वस्त्रें त्यांचे धाकटे बंधु नारायणरावसाहेब ह्यास मिळालीं. व राज्यकारभार सखारामबापू व नाना फडनवीस ह्यांच्या अनुमतानें सुरू झाला.

इकडे बुंदेलखंडामध्यें जास्त जास्त भानगडी उपस्थित झाल्या. बाळाजी गोविंदाचे अंतर्वेदींतील मामलेदार पद्माकरपंत हे पुण्याच्या दरबारीं वेळेवर हिशेब देईनातसे झाले, व बाळाजी गोविंदावर टोलवाटोलवी करू लागले. तेव्हां त्यांचा उलगडा करण्याकरिता श्रीमतांनीं बुंदेलखंडाचे वकील दिनकर बाबुराव ह्यास तिकडे जाण्याविषयीं आज्ञा दिली. तिकडे सुजाउद्दौला व इतर राजे लोक ह्यानीं गडबड चालविली होती. त्यामुळें बाळाजीपंतासही त्याचें येणें पथ्यकरच होतें. त्यानींही त्यास जरूरीचें पत्र पाठवून, पुढील मजकूर लिहिला होता. 'गोहदवाला जाट व आटेर(?)चा राजा गच्छ करून गेले. मीरनईम व मुसामहत जरवेंत आणिल्यावर काढून' दिल्हे ते अंतर्वेदींत गेले, तों त्याचे वस्तु मसलत सिद्ध न झाली ह्मणून

---

* गोविंदपंत बुंदेले यांच्या कैफीयतीमध्यें हीं सहा कलमे दिलीं आहेत. परंतु ह्या मृत्युपत्राची अस्सल प्रत आह्मास मिळाली नसल्यामुळें त्याबद्दल विशेष काही लिहितां येत नाही. तरी त्यावरून थोरल्या माधवरावसाहेबांचें गुणग्राहकत्व, स्वराज्योत्कर्षेच्छा वगैरे गुण आपोआप व्यक्त होतात. ज्या रोहिले लोकांनीं पानिपतच्या महारणामध्यें मराठ्याचा सर्वस्वी नाश केला, त्याचें पारिपत्य करणाऱ्या सरदारावर सुवर्णाचीं पुष्पें उधळून अभिनंदन करावें अशी इच्छा करणारा पुरुष किती बाणेदार व किती देशभक्त असला पाहिजे हें रसिक वाचकांस निराळें सांगावयास नको.

नबाब सुजाउद्दौला याची इतराजी झाली, त्यामुळें ते अंतर्वेदींत ऐरच्यावर मुक्काम करून राहिले. तों सुजाउद्दौल्यानें रोहिल्याची लढाई मारली. मुल्लाहफज मारला गेला. मातबर यश मेळविलें. याजमुळें मीरनईमास बळ झालें. त्यास आणखी नबाबाकडील मदतही येणार. यास्तव फिरोन अलीकडे उतरावयाचा विचार आहे. यास्तव तुम्हीं सरदारास सविस्तर सांगोन इकडील उपराळियास जलदीनें फौजा रवाना करीत असें करणें. नाहीं तर हल्लीं त्याचा रोंख अलीकडे उतरावयाचा झालियास जागा सोडून निघावें असें प्राप्त होईल. यास्तव सरदारास उत्तम प्रकारें त्याचे चित्तात इकडील संकट यावयाजोगें समजावणें, आणि तिकडील वर्तमान मुत्सद्दी याकडील व श्रीमतांकडील व सरदाराकडील वर्तमान साद्यंत वरचेवर लिहीत जाणें. आणि तेथील उलगडा करून इकडे सत्वर यावयाचें करणें.' ह्याप्रमाणें पत्र आल्यानतर दिनकर बाबुराव यानीं पुण्याचे वकिलीवर केसो शंकर कान्हेरे ह्याची नेमणूक करून व दरबारची परवानगी घेऊन ते सन १७७३ सालीं बुंदेलखडात आले.

दिनकर बाबुराव बुंदेलखंडात गेल्यानंतर त्यानीं प्रथमतः पुणेदरबारच्या हुकुमाप्रमाणें बाळाजी गोविंद व गंगाधर गोविंद ह्याचीं मनें साफ करून उभयताचा सलोखा करण्याचा प्रयत्न केला. पेशव्यांचा ह्या उभय बंधूवर चांगला लोभ असल्यामुळें, क्षुल्लक निमित्ताच्या योगानें त्याच्यामध्यें वितुष्ट येऊन बुंदेलखंडाच्या सुभ्याचें काम सुरळीत चालेनासें झालें, असें त्यांच्या दृष्टीस पडताच त्यानीं त्यांस ताकीदपत्रें पाठविलीं होतीं. नाना फडनविसानीं एका पत्रामध्यें असेंही लिहिलें होतें कीं, 'तुह्मां उभयता बंधूमध्यें चित्ताची ऐक्यता नाहीं. यामुळें सरकारची नुकसानी व तुह्मासही उत्तम नाहीं. ऐशास उभयतां एकविचारें राहून मामलत्याचा बंदोबस्त यथास्थित राखावा हें उत्तम आहे. उपरी घराऊ बोभाटा सर-

कारांत न ये तें करावें. सारांश उभयता विरुद्ध नसावें.' परतु दिवसें-दिवस अविचाराचें प्राबल्य जास्त जास्त होत जाऊन गोष्ट फार विकोपास गेली. सुजाउद्दौला वगैरे शत्रु बुंदेलखंडावर पुनः स्वाऱ्या करू लागले, बुंदेले राजानीं दुंडी माजविली, आणि प्रांतोप्रांतींच्या कमाविसदारास फूस लावून ते वसूल दाबूं लागले. अशा स्थितीमध्यें दिनकररावअण्णासारखाच चतुर व वजनदार मनुष्य पाठविल्यावाचून काम सुरळीत चालत नाहीं असें वाटून त्याची पुणेदरबारांतून रवानगी झाली होती. त्याप्रमाणें दिनकररावांनीं उभय बंधूस समजुतीच्या गोष्टी सांगून ताळ्यावर आणिलें.

दिनकररावांनीं उभय बंधूचें ऐक्य केल्यानंतर बुंदेलखंडातील प्रांतोप्रांताच्या कमाविसदाराचे हिशोब तपासून त्यांची शिलक बाकी वसूल करण्यास प्रारंभ केला. जे कमाविसदार शिरजोर होऊन प्रांतामध्यें बंड फितुरी करीत होते त्यांची खोड मोडली, व सरकारच्या मामलत्याचें काम सुरळीत चालेल अशी व्यवस्था केली. तात्पर्य त्यांच्या हुशारीमुळें सर्वत्र शांतता होऊन पुनः मराठ्याचा कारभार सुरळित चालू झाला.

इतकें करून दिनकरराव मोकळे होतात न होतात, तों पुनः उत्तरेकडून करेरा, गुलसराई वगैरे प्रांतावर सुजाउद्दौल्यानें सैन्य पाठवून युद्धास सुरवात केली. परतु ह्या वेळीं उभय बंधु एकत्र झाल्यामुळें त्यानीं दिनकररावअण्णाच्या सल्लामसलतीनें सुजाउद्दौल्याच्या सैन्यावर उलट चाल करून त्याचा पुरा मोड केला; व त्याला बुंदेलखंडातून हाकून लाविलें. ह्यावरून ऐक्याचा महिमा कसा आहे तें व्यक्त होतें.

सुजाउद्दौल्याचें पारिपत्य केल्याची हकीकत बाळाजी गोविंद ह्यांनी व दिनकररावअण्णा ह्यांनीं पुण्यास कळविली. त्या योगानें पुणेदरबारास फार संतोष होऊन, पेशव्याचे कारभारी बाळाजी

जनार्दन ऊर्फ नाना फडनवीस व सखाराम भगवत ह्यानीं उभयतांस छ० २२ व० छ० १० रजब सवत् १८३१ चीं अभिनदनपर पत्रें लिहिलीं. त्यात उभयतांची चित्तशुद्धि झाली हें पाहून फार आनद प्रदर्शित करून सुजाउद्दौल्याचें पारिपत्य केल्याबद्दल त्यांस शाबासकी दिली; आणि दिनकररावास उभय बंधूच्या देखरेखीवर ठेवून 'उभयताची निखालसता करून सरकार कामकाज एकविचारें करीत ती गोष्ट करावी' असें पुनः लिहून पाठविलें. ह्यावरून गोविंदपताच्या उभय चिरजीवावर पुणेदरबारची केवढी मेहेरबानी होती हें चांगलें कळून येत.

सुजाउद्दौल्याचें पारिपत्य केल्यानतर बुंदेलखंडात लवकरच अनुपगीर गोसाव्याचें बंड उद्भवलें. त्यामुळें दिनकररावअण्णास देशीं परत न येता बुंदेलखडातच राहणें भाग पडलें. ह्या बंडामध्यें त्यांनीं व बाळाजी गोविंदांनीं आपलें शौर्य उत्तम प्रकारें प्रकट करून गोसाव्याचा अगदीं पराभव केला व पेशव्याकडून वाहवा मिळविली. त्याची सक्षिप्त हकीकत येणेंप्रमाणें:—

राजा इंद्रगीर ह्या नावाचा एक गोसावी झांशी येथें काहीं सैन्य जमवून प्रमत्त झाला व त्यानें सन १७४५ मध्यें मोट परगणा जिंकून घेऊन तेथें किल्ला बाधला व हळहळू गोसाव्याचें सैन्य जमवून जवळच्या प्रातात धुंडावे करू लागला. अल्प काळामध्यें त्यास बरेंच यश येऊन त्यानें ११४ गाव जिकले. हें वर्तमान झांशीचे सुभेदार नारोशकर ह्यास कळताच त्यानीं त्याच्यावर १७४९।५० मध्यें स्वारी करून त्यास तेथून हाकून दिलें. नतर तो अलहाबादेस गेला. तेथें त्यानें आपली जमात दाखवून अयोध्येचा वजीर सुजाउद्दौला ह्याच्याकडे प्रवेश केला. त्यानें त्यास आपल्या पदरीं नौकरीस राहण्याबद्दल विचारिलें, परतु इंद्रगीर हा मोठा अभिमानी असून स्वतःस राजा ह्मणवीत असे. त्यामुळें त्यानें

त्यास आपल्या दोन शर्ती पाळीत असाल तर नौकरी पत्करतों असें सांगितलें. त्या शर्ती अशा होत्या कीं, 'मी नबाबाच्या बरोबर असलों तरी नगारा वाजवीन व मी भरदरबारांतही मुजरा करणार नाहीं.' सुजाउद्दौल्यानें त्याच्या पराक्रमावर दृष्टि देऊन ह्या शर्ती कबूल केल्या व त्यास आपल्या पदरीं नौकरीस ठेविलें. त्याप्रमाणें तो सन १७५२ पर्यंत सुजाउद्दौल्याच्या सैन्याचा अधिपति असून सर्व मोहि-मींमध्यें हजर असे. पुढें तो मृत्यु पावला व त्याच्या जागीं अनु-पगीर ह्या नांवाचा त्याचा एक चेला अधिष्ठित झाला. हा गोसावी आपल्या गुरूप्रमाणेंच शूर असून फार कावेबाज, स्वार्थसाधु व विश्वासघातकी होता. ह्यानें सन १७६३ मध्यें बक्साराच्या लढाई-मध्यें बरेंच शौर्य गाजविलें होतें. पुढें त्या लढाईंत सुजाउद्दौ-ल्याचा मोड झाल्यानतर तो बराच स्वतंत्र झाला व गोसाव्यांची फौज जमवून बुंदेलखडात लूटमार करू लागला; आणि उघडपणें पेशव्याच्या मुलुखावर स्वाऱ्या करून तो जिंकण्याचा प्रयत्न करूं लागला. मोट, करेरा, गुलसराई वगैरे बळकट किल्ले बाळाजी गोविंदाच्या ताब्यात होते त्यास त्यानें वेढे घातले. गोसाव्यांचें सैन्य प्रचड होतें व त्यास अयोध्येच्या नबाबाचें व इंग्रजांचें साह्य होतें. त्यामुळें बाळाजी गोविंद व दिनकरराव ह्यास मोठी काळजी उत्पन्न झाली. तथापि त्यानीं बिलकूल न डगमगतां एक एक किल्ला प्रत्येकानें आपापल्याकडे घेऊन गोसाव्यांशीं टक्कर देण्याचा निश्चय केला. दिनकररावअण्णा हे गुलसराईच्या बदोबस्तास गेले, बाळाजीपंतांनीं गोसाव्याच्या तोंडावर चालून जाऊन त्यास शह दिला, व इतर सरदारांनीं एकत्र होऊन फार सुरेख नाकेबदी केली. तात्पर्य ह्या वेळीं बुंदेलखंडातील मराठ्यानीं मोठ्या हिंमतीनें जी कामगिरी बजावली ती त्यास भूषणप्रद होय ह्यांत शंका नाहीं.

हा प्रसग मोठा आणीबाणीचा असून पुणेदरबारात अनेक तटे-

बखेडे सुरू झाले होते. पेशवाईच्या गादीकरिता हपापलेल्या राघोबा-दादानें आपल्या पुतण्याचा वध करून राज्यप्राप्त्यर्थ हजारों भानगडी चालविल्या होत्या. पेशवाईचा अभिमान बाळगणारें मुत्सद्दीमंडळ राघोबास भीक न घालून स्वतंत्र राज्यकारभार चालवूं लागलें होतें, व पेशव्याचा अंमल सर्व हिंदुस्थानभर पूर्ववत् कायम ठेवून पेशवाईची गादी राज्यव्यवहारशून्य व ब्रह्महत्या करणाऱ्या नीच कुलांगारास न देण्याचा त्यांचा पुरा निश्चय ठरला होता. तेव्हा अशा वेळीं त्याना दूरदूरचे सुभे सुरक्षित ठेवण्याची किती जरूरी होती हें उघडच आहे. बुंदेलखडाचे सुभेदार बाळाजी गोविंद व त्याचे वकील दिनकररावअण्णा हे नाना फडनविसांच्या बाजूचे असल्यामुळें त्यानीं त्याचा अभिमान बाळगून ह्या वेळीं बुंदेलखडाचें रक्षण करण्याचे कामीं अगदीं शर्थ केली ह्यात शका नाहीं.

अनुपगिराचें सकट येताच दिनकररावानीं पुण्यास सविस्तर हकीकत कळविली व शिंदे होळकर वगैरे सरदाराचें साह्य पाठविण्याबद्दल विनति केली. त्या वेळीं सखारामबापूंनीं छ० ४ सफरचें जें पत्र लिहिलें आहे त्यात पुढील मजकूर लिहिला आहे'—'अनुपगीर गोसाव्याचे मनसबियाचा प्रकार व सरकारच्या फौजा लौकर येऊन पोहोंचाव्या येविशींचा वगैरे मजकूर विस्तारें लिहिला तो कळला ऐशास राजश्री बाळाजीपंत यानीं फौजेपुढें त्याचे तोंडावर जाऊन शह दिल्हा आहे. उत्तम केलें. प्रस्तुत त्याखेरीज तिकडे सरकारची फौज सरदार नाहींत त्यापक्षीं त्यानीं हिंमत धरून असावें. सरकारचा नक्षा राखावा (हेंच) उचित आहे. होळकराकडील वांबळे फौजसुद्धा तिकडे आले आहेत. त्यानीं येऊन सामील व्हावें येविशीं अहिल्याबाईस लिहिलें आहे. वांबळे लौकरच येऊन पोहोंचतील, व सरकारातून फौजा रवाना होतील. येविशीं बाळाजीपतास सरकारचे पत्र विस्तारें पाठविलें आहे, त्याजवरून कळेल.' ह्याप्रमाणें

बाळाजीपंत व दिनकररावअण्णा ह्यांस पुण्याहून आश्वासन पत्रें गेलीं होतीं.

त्याचप्रमाणें 'शिंदे होळकरांच्या फौजेची कुमक देण्याबद्दल त्या त्या सरदारांस पुणेदरबारांतून हुकूम सुटले व त्याच्या फौजा बुंदेलखडांत रवाना झाल्या. इकडे बाळाजी गोविंद ह्यानीं आपलें सर्व सैन्य जमवून सरदारांच्या फौजा येईत तोंपर्यंत शत्रूच्या तोंडावर चालून जाऊन मोठ्या हिय्यानें आपला टिकाव धरिला. अनुपगीर गोसाव्याची फौज फार प्रबल असून त्याच्या निरनिराळ्या सरदारानीं गुलसराई, करेरा वगैरे किल्ले हस्तगत करण्याच्या उद्देशानें मोठ्या जोरानें पुढें चाल केली होती, व गुलसराईच्या किल्ल्यास सिंगरगीर व प्राणसिंग वगैरे गोसाव्यांनीं शह दिला होता. त्या किल्ल्याचें संरक्षण करण्याकरिता बाळाजी गोविंदानीं दिनकररावअण्णाची योजना केली. दिनकररावअण्णा मोठे शूर व हिंमतदार होते, परंतु गोसाव्यांची फौज फार असल्यामुळें तिच्याशीं टक्कर देऊन किल्ल्याचें संरक्षण करणें त्या वेळीं अशक्य झालें होतें. कारण किल्ल्यामध्यें मराठ्यांची फौज फार थोडी असल्यामुळें तो गोसाव्यास सहज हस्तगत करिता येण्यासारखा होता. अशा बिकट प्रसंगीं बाळाजी गोविंदानीं दिनकररावास धीर देऊन व त्यास वरचेवर कुमक पाठवून गुलसराई किल्ल्यावरील शत्रूचा मोर्चा उठविण्याकरिता झांशीचे सुभेदार रघुनाथराव हरी नेवाळकर ह्याचें साह्य घेतलें आणि आपण स्वतः शत्रूच्या फौजेवर दुसऱ्या बाजूनें चाल केली. ह्या बिकट प्रसंगीं दिनकररावअण्णास त्यानीं जीं पत्रें लिहिलीं आहेत त्यावरून गुलसराईचें संरक्षण करण्याविषयीं त्यांचा केवढा बाणा होता व तो सिद्धीस नेण्याविषयीं दिनकररावअण्णानींही किती परिश्रम केले हें दिसून येतें. गोसाव्याच्या फौजा गुलसराईवर चालून आल्या हें वर्तमान दिनकररावअण्णानीं त्यास कळविलें त्या वेळीं बाळाजी गोविंदानीं असें पत्र लिहिलें कीं, 'सिंगरगिर गोसावी

हजार दोन हजार स्वार व दोन तीन हजार प्यादे तोफासुद्धां येरछेच्या घाटें उतरून येरछेच्या तळावर गुलसराईच्या रोखें मुक्काम केला आहे. एक दोन रोजीं कुच करून येणार ह्मणोन लिहिलें, त्यास येथून चिरंजीव राजश्री गंगाधरपंतबाबाकडे तिकडे अविलंबे यावयाविसीं दोन तीन पत्रें गेलीं आहेत, ते तिकडून अविलंबेंच निघोन येतील. आणि आह्मी झांशीकरासुद्धा कुच करून येत असों. तुह्मीं उत्तम प्रकारें बंदोबस्त करून किल्ल्याची मजबुदी यथास्थित करणें. रात्रंदिवस सावध राहणें. गोलदाज व बाणदार आणविणें त्यास येविसीं दिवाणजीस सांगितलें आहे. तपास करून तांबडतोब पाठवितों. वरकड जमिन्याची वगैरे सावधता उत्तम प्रकारें करावी. किल्ल्यांतील प्यादे यांची रजावंदी चांगली करून बंदोबस्त करणें. सध्या प्रसंग विलक्षण आहे. यास्तव जे आहेत त्यांची खातरजमा चांगली करणें. आह्मी अविलंबे तिकडे येत असों. झांशीकराचा मुहूर्त प्रतिपदेचा आहे. यास्तव दोन रोज लागतीलसें दिसतें. आह्मी तों निघणारच, परंतु त्यास समागमें घ्यावयाचें, यास्तव दोन दिवस लागतील. सारांश अविलंबें येत असों. बातमी पक्की राखून वरचेवर इकडे लिहीत जावें.' ह्याप्रमाणें पत्र येतांच दिनकररावअण्णांनीं मोठ्या बंदोबस्तानें राहून किल्ल्याचें संरक्षण केलें. इकडे बाळाजी गोविंदही शत्रूच्या तोंडावर दुसऱ्या बाजूनें चालून गेले. तों मध्यतरीं गोसाव्यांनीं गुलसराई किल्ल्यावर हल्ला करून युद्धास सुरवात केली. दिनकररावअण्णांनींही आपल्या फौजेचा सुरेख बंदोबस्त करून त्यांच्याशीं सामना केला. गोसाव्यांची व मराठ्यांची गुलसराईच्या किल्ल्यापुढें फार जंगी लढाई झाली. गोसाव्यांचें सैन्य फार प्रबल असल्यामुळें प्रथम त्यांनीं मराठ्यांवर चढाई केली, परंतु दिनकररावअण्णांनीं मोठ्या रणोत्साहानें गोसाव्यांवर जोरदार मारा करून त्यांचा पूर्ण पराभव केला, व त्यांचे सव्वाशें लोक

कापून आपल्या तरवारीस तृप्त केलें. दिनकररावअण्णाचें हें अद्भुत शौर्य अवलोकन करितांच गोसावी पळून गेले व मराठ्यांची फत्ते होऊन गुल्सराईचा किल्ला त्यांच्या ताब्यात राहिला.

बाळाजी गोविंद ह्यांस हें दिनकररावअण्णांच्या मर्दुमकीचें आनंद-वृत्त कळताच परम संतोष झाला. त्यांनीं दिनकररावअण्णास अभिनंदनपर पत्र लिहून ज्या लोकांनीं गोसाव्यांचें पारिपत्य केलें त्यांची फार वाहवा केली. आणखी असें लिहिलें कीं, 'पागेनें शर्त केली लोकांचें समाधान चांगलें करणें. प्राणसिंगाचें पारिपत्य उत्तम प्रकारें केलें. लोकांनीं हिंमत धरून मर्दुमी केली. शाबास त्यांची*!' ह्याप्रमाणें बाळाजीपंतांनीं, गुलसराईच्या रक्षणार्थ पराक्रम गाजविलेल्या लोकांची योग्य तारीफ करून त्यांस योग्य बक्षीस देवविलें व दिनकररावअण्णास गुलसराईस राहण्याबद्दल सांगितलें.

इकडे दिनकररावांच्या ह्या पराक्रमाचें वर्तमान रीतीप्रमाणें पुण्याच्या दरबारांत रवाना झालें. तेथें खऱ्या गुणांची किंमत जाणणारी मुत्सद्दी मंडळी राज्यकारभार चालवीत असल्यामुळें त्यांना फार आनंद झाला व त्यांनीं दिनकररावअण्णाच्या शौर्याची वाहवा करून असाच शूर पुरुष त्या प्रांतीं असणें अवश्य आहे असें समजून त्यांना गुलसराईस राहण्याबद्दल परवानगी दिली. ह्या समयीं नाना फडनवीस व सखारामबापू हे पेशवाईचीं सर्व सूत्रें चालवीत होते. त्यांनीं दिनकररावअण्णांस दरबारांतून जें पत्र पाठविलें तें येणेंप्रमाणें:—

"राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री दिनकरराव

स्वामीचे सेवेशीं:—

पोष्य बाळाजी जनार्दन साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीयें कुशल लिहीत जावें. विशेष तुह्मीं पत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहालें. 'अनुपगीर गोसावी काल्पीहून मोटेस

* बाळाजी गोविंद यांचें अस्सल पत्र. आश्विन शुद्ध ९ संवत् १८३२.

येऊन गुलसराईवर सिंगरगीर चेला पांचशें राऊत देऊन पाठविला. तो वेत्रवती उतरून अलीकडे येऊन उपसर्ग करावयास लागला. तेव्हा राजश्री *व्यंकटराव याची पागा मात्र येथें होती. त्यास लोकांनीं करार करून गांठ घातली. लढाई चागली झाली. शेंसव्वाशें माणूस कापून काढले. गोसावी पळोन गेले. याजमुळें दहशत चागली बसली आहे. गुलसराई या प्रांतीं जागा नामी, मजबूत, सरजामही चागला आहे. येथें आह्मास राहणें प्राप्त' ह्मणोन तपशिलें लिहिलें तें कळलें. ऐशास गोसावी यांचे फौजेचें पारिपत्य केलें, सलाबत बसविली, मोठें काम केलें. संतोष जाहाला. याचप्रमाणें जागा जागा नतिजा दिल्ही यास शत्रु जरब खाऊन पुढें येणार नाहीं. वरकड गुलसराई स्थल मजबूद व तुह्मी सरंजाम चागला करून राहिला हें उत्तम केलें. बहुत खबरदारीनें राहावें. इकडून उभयतां सरदारांकडून रा० बापूजी होळकर फौजेसह रवाना केले ते झांशीपावेतों जाऊन पोहोचले. उपराळा करतील. तुह्मींही वरचेवर मशारनिल्हेस लिहीत जावें. रा॥ छ० १६ जिल्काद बहुत काय लिहिणें लोभ असों दिजे हे विनंति."

ह्याचप्रमाणें सखारामबापूंनींही दिनकरराव अण्णांस निराळें पत्र लिहिलें आहे. अशा रीतीनें दिनकररावानीं मर्दुमकी गाजवून व पुणेंदरबाराची शाबासकी मिळवून त्यांच्या परवानगीनें गुलसराईस वास्तव्य केलें. ते पुढें तेथें तसेच राहिले. हेच सांप्रतच्या गुलसराई संस्थानचे मूलसंस्थापक होत.

दिनकररावअण्णांनीं गुलसराईचा बंदोबस्त आपल्या शिरावर

* गुलसराईची मामलत गोविंदपंत बुंदेल्यांचे बंधु काशीपंतकाका खेर याच्याकडे होती. पुढें ते वारल्यानंतर त्यांचे चिरंजीव व्यंकटराव हे मामलतीचा कारभार पहात असत त्यांच्या हाताखालीं थोडीशी पागा होती तिचेच आधिपत्य घेऊन दिनकररावअण्णांनी गोसाव्याशी युद्ध केलें.

घेतल्यानंतर मग बाळाजी गोविंदांनीं शिंदे होळकरांच्या साह्यानें अनुपगीर गोसाव्याच्या पारिपत्यार्थ मोटेवर स्वारी केली. त्या समयाच्या हकीकतीचीं पत्रें ते वरचेवर दिनकररावअण्णास पाठवीत असत, व गोसाव्याच्या फौजेंतील खबर कळवीत असत. झांशीचे सुभेदार रघुनाथराव, शिंदे व होळकर ह्यांच्या फौजा समीप आल्या व अनुपगीर गोसाव्याचा भाऊ उमरावगीर ह्याजवर अयोध्येच्या नबाबाची इतराजी होऊन त्याच्या लष्करात घोंटाळा झाला, त्या समयीं त्यांनीं दिनकररावअण्णास पुढील पत्र लिहिलें:—

"चिरंजीव राजश्री दिनकरराव यासी प्रती बाळाजी गोविंद आशीर्वाद उपरी येथील कुशल जाणें, विशेष: आज करारियाहून पत्रें राजश्री रघुनाथ हरी याचीं आली. शिंद्याकडील फौज रणोदेस दाखल जाहाली. एक दोन रोजीं करारियासीं पोहोंचतील. राजश्री बापूजी होळकर याजकडील पत्रें आलीं. ते भारी सरजामानिशी आले, फौज व तोफखाना व पेंढारखाना वगैरे वीस हजार भरणा आहे. मजलदरमजल येत आहेत. सुरजेस दाखल झाले. फौजा यावयास संदेह नाहीं बापूजी होळकरानीं लिहिलें आहे कीं, 'आह्मी पधरा रोजात पोहोंचतों. तोंपयेत झांशी व गुलसराई जतन करणें. आह्मी येऊन पोहोंचलों हें जाणून दम धरणें. किल्ल्यातील सरदारास लिहिणें कीं, जुमामर्दी सीरछले राखणें. आतां आमची येण्याविशीं ढील नाहीं. इतके दिवस श्रम केले तसें थोड्याकरिता न गडबडणें,' ऐसे कितेक तपशीलें वर्तमान लिहिलें आहे. आज सवसुखाचे फौजेंतून बातमी आली कीं उमरावगीर याजवर चौकी नबाबानें पाठविली. त्यास उमेरावगीर पळोन अनुपशहराकडे गेला. त्याच्या पाठीवर फौज धावली आहे. उमरावगिराचा दिवाण धरला. कबिले धरले. याप्रमाणें पक्की बातमी आली, यात संदेह नाहीं. अनुपगिरावर कमाल इतराजी आहे. याचें पारिपत्य करणार

हें अनुपगिरासही कळलें. *सबसुखराय घरास गेला. त्यास कासिदावर कासीद बोलावयासी गेले आहेत. गडबड गोसाव्याच्या लष्करांत मोठी आहे. ईश्वरकृपेंकरून शत्रूचें पारिपत्य अनायासेंच होत आहे. आपल्याही फौजा आल्या. आतां बहुत दिवस न लागत. त्रिंबकराव शिवदेव याची फौज सिरोंजेनजीक आली. तेही आपल्या खास परगण्याचा बदोबस्त करून येणार. सारांश फौजा आल्या यांत सशय तिळमात्र नाहीं. नबाबापाशीं फिरंगी आहेत. त्यास कलकत्त्याहून ताकीद आली कीं, आपला व मराठ्यांचा दक्षिणेंत सल्ला होत आहे. यमुनापार नबाब जाईल तर जाऊं न देणें आणि तुह्मी न जाणें.' ऐसें पत्र फिरग्यास आलें. हें वर्तमान श्रीहून बाजीपंत काकिर्डे यानीं लिहिलें आहे. सारांश सर्व यथास्थित प्रकार दिसतो. तुह्मीं कोणे-विशीं फिकीर न करणें. आह्मी जलद उपराळाही करितों. सर-जामही पोहोंचवितों व रोजमुऱ्याचाही ऐवज पाठवितों. तुह्मी कोणे-विशीं फिकीर न करणें. सविस्तर पत्र काल लिहिलेंच आहे त्याज-वरून कळेल. मिति माघ व॥ ३ सोमवार अर्धरात्र सवत् १८३२ बहुत काय लिहिणें. इ० इ०"

येणेंप्रमाणें शिंदे होळकर वगैरे सरदाराच्या फौजा एकत्र होऊन अनुपगीर गोसाव्याचें पारिपत्य करण्याकरिता काल्पीवर चालून गेल्या व गोसाव्यांच्या व त्यांच्या अनेक चकमकी होऊन अखेर गोसाव्यांचा अगदीं पराभव झाला. त्याचा मुख्य नायक अनुपगीर गोसावी हा सुजाउद्दौल्याकडे पळून गेला, आणि पुष्कळ गोसावी मराठ्याचे पराक्रम व सामर्थ्य अवलोकन करून शिंद्याच्या लष्करात सामील झाले. त्यामुळें गोसाव्याच्या सैन्याची अगदीं दुर्दशा उडून कांहीं दिवसपर्यंत त्यांची गडबड बंद राहिली. पुढें अनुपगीर हाही शिंद्याच्या फौजेमध्यें नोकरीस राहिला. परतु लवकरच त्याचें व महा-

* हा अनुपगीर गोसाव्याचा मुख्य दिवाण होता.

दर्जी शिंदे यांचें वांकडें येऊन तो बुंदेले राजे व मराठे ह्यांच्यामध्यें उपस्थित झालेल्या कलहामध्यें अंतर्भूत होऊन इसापनीतींतील दोन मांजराचा खवा खाणाऱ्या माकडाप्रमाणें आपल्या वशांत बराच प्रांत ओढून आपणास 'राजा हिंमतबहादूर' असें ह्मणवूं लागला. व इंग्रजास अनुकूल होऊन सर्व बुंदेलखंडाचें स्वातंत्र्य गमावण्यास कारण झाला. तो वृत्तांत क्रमशः येईलच.



## भाग ७ वा.

# बाळाजी गोविंद व गंगाधर गोविंद यांचा मृत्यु,
आणि
# बुंदेलखंडांतील घडामोडी.

थोरले माधवराव साहेब मृत्यु पावल्यानंतर पेशव्यांच्या दरबारांत जो कलहाग्नीचा प्रवेश झाला त्यानें महाराष्ट्राच्या स्वातंत्र्याची पूर्ण होळी झाली असें ह्मटल्यास कांहीं हरकत नाहीं. सन १७६१ मध्यें महाराष्ट्रवैभवाचा सर्वस्वीं नाश होऊन त्याची स्वातंत्र्यज्योति लुप्तप्राय झाली होती, परंतु सुदैवानें माधवरावासारखा विचित्र कर्तृत्वशक्तीचा पुरुष पेशव्यांच्या कुलामध्यें निर्माण झाल्यामुळें त्यांनीं तसल्या विनाशकालाच्या भयंकर झपाट्यांतून तिचें रक्षण केलें, आणि स्वराज्याचा अभ्युदय करून मराठ्यांना पुनः वर डोकें काढा-वयास लाविलें. परंतु त्यांच्यावर अकालिक मृत्युपाश पडून ते नश्वर जगांतून नाहींसे झाले व त्यांच्याबरोबर महाराष्ट्राच्या उत्कर्षाची सर्व वाढ खुटली. त्यांच्या मागून त्यांचे बंधु नारायणराव हे पेशव्यांचे गादीवर आरूढ झाले. परंतु त्यांचा लवकर वध होऊन रघुनाथराव पेशव्यांचीं कृष्णकारस्थानें, बारभाईंची मसलत व 'गर्भ'—श्रीमंतांची कारकीर्द वगैरे अनेक गोष्टी घडून आल्या. तेवढ्यामध्यें राष्ट्रांतील जूट व ऐक्यभाव ह्यांची वृद्धि न होतां सरदार मंडळींतील परस्पर द्वेष व अनावर स्वातंत्र्येच्छा, मुत्सद्दी मंडळींतील मत्सर व महत्वाकांक्षा, इत्यादि विनाशकारक परि-णाम होऊन राज्यांत फूट उत्पन्न झाली, व स्वार्थसिद्ध्यर्थ नकाप्रमाणें

ध्यानस्थ बसलेल्या श्वेतद्वीपस्थांस अनायासें चंचुप्रवेश करण्यास मार्ग सापडला. राज्यलोभानें वेडावलेला राघोबा दूरवर विचार न करितां सुरत येथील इंग्रज गव्हरनराची मदत मागावयास गेला, त्यामुळें त्यास राघोबाचा पक्ष स्वीकारून मराठ्याच्या दरबारात ढवळाढवळ करण्यास व आपला इच्छित हेतु तडीस नेण्यास उत्तम संधि प्राप्त झाली. त्या संधीचा त्यानीं कसा फायदा करून घेतला, स्वार्थीकरिता कशीं कृष्णकारस्थानें निर्माण केलीं, आणि शेवटीं आपली वाणिज्य-वृत्ति सोडून देऊन ह्या कलहाच्या साधनानें* हिंदुस्थानची राज्यप्राप्ति कशी करून घेतली, हें ब्रिटिशराज्यसत्तेच्या संस्थापनेचा जो कोणी खरा इतिहास अवलोकन करील त्यास सकृद्दर्शनींच समजून येईल. ह्या विषयाचें स्थूलमानानें देखील निरीक्षण करण्याचा हा प्रसंग नसल्यामुळें पेशव्यांच्या दरबारांतील भानगडी, शिंदे होळकरांचीं भांडणें, नागपूरकर भोंसल्याची फाटाफूट, वगैरे गोष्टींचें येथें विवरण करिता येत नाहीं, तथापि रघुनाथराव इंग्रजाकडे गेल्यामुळें त्याच्या-संबधानें जें युद्ध सुरू झालें त्याचा धक्का बुंदेलखडांतील मराठी राज्यसत्तेस प्रथम बसला ही विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. ज्याप्रमाणें घड्याळाचें मुख्य चक्र अत्यल्प गतीनें फिरत असलें तरी सभोंवतालचीं लहान लहान चक्रें तेव्हांच जोरानें फिरूं लागतात, त्या-प्रमाणें पुणें येथील महाराष्ट्रराज्याची मध्यवर्तिनी सत्ता जरी विलबानें

---

* इंग्रज लोकांनीं हिदुस्थानचें राज्य कसें मिळविलें हें फिलिप फ्रान्सिस ह्यानें पुढील एका वाक्यांत स्पष्ट लिहिलें आहे.—

"From factories to forts, from forts to fortifications, from fortifications to garrisons, from garrisons to armies, and from armies to conquests, the gradations were natural, and the result inevitable; where we could not find a danger, we were determined to find a quarrel"

—*Philip Francis' Speech on Indian Affairs*, 1787

नाश पावली तरी तिच्यावर अवलंबून असणाऱ्या इतर राज्यशाखांस तिच्या अल्पस्वल्प आंदोलनाचा तेव्हांच धक्का बसला. बुंदेलखंडातील राज्यसत्तेची बळकटी सर्वस्वीं पुण्याच्या दरबारावर अवलंबून होती, परंतु ह्या वेळीं ती पार नाहीशीं झाली असें ह्मटलें तरी चालेल.

पुण्यात दोन पक्ष प्रबल होऊन ज्या वेळीं युद्धाचा प्रसंग आला त्या वेळीं कलकत्तेकरांनीं कर्नल लेस्ली ह्याच्या हाताखालीं सैन्य देऊन त्यास मुंबईकराच्या मदतीस पाठविलें. हें सैन्य नेहमींच्या वहिवाटीप्रमाणें जलमार्गानें यावयाचें, परंतु ह्या वेळीं तें यमुना उतरून बुंदेलखंडातून पाठवावें असा कलकत्तेकरांनीं बूट काढला. बुंदेलखंडात मराठ्यांची सत्ता ह्या वेळीं अगदीं नष्ट न होतां बाळाजी गोविंद, गंगाधर गोविंद व दिनकरराव-अण्णा ह्यांच्या जोरावर ती अद्यापि जिवंत राहिली होती. परंतु तेथेंही छत्रसालाचे पन्ना, चरखारी वगैरे ठिकाणचे वंशज परस्परामध्यें भांडत असल्यामुळें व बुंदेलखंड प्रांताच्या संस्थानाकडे पुणें-दरबारचें कमी लक्ष असल्यामुळें बेबंदशाही कारभार झाला होता. अशा समयास बुंदेलखंड सर करून उत्तरेकडून दक्षिणेमध्यें जाण्यास खुला मार्ग करावा असा कलकत्तेकराचा मोठा खोल मतलब होता. तेव्हां त्यांनीं प्रथम यमुनातीरानें सैन्य पाठवून काल्पी घेण्याचा बेत केला. पूर्वापर इतिहास पाहिला ह्मणजे काल्पी हें मध्यहिंदुस्थानचें नाकें असल्यामुळें त्याच्यावर प्रत्येकाचा डोळा होता, असें दिसून येतें. मुसलमानांनीं उत्तरेकडून बंगाल्यांत प्रवेश करण्याच्या वेळीं तें नाकें हस्तगत केलें. मराठ्यांनींही उत्तर सर करून मुसलमानावर चढ करण्याकरितां तें काबीज केलें. व आतां इंग्रजांनीं त्याच विजयी मराठ्यास पादाक्रांत करण्याकरिता, काल्पीचा मनसबा काढला होता. ह्या बंगालच्या सैन्याचा प्रमुख अधिकारी कर्नल लेस्ली असून तो मोठा धाडसी पुरुष होता. त्यास आपल्या

जिवाची मुळींच पर्वा नसून आपल्या स्वदेशबांधवांचें कल्याण व्हावें अशी फार इच्छा होती. त्यामुळें त्यानें बुंदेलखडात इंग्रजांचा प्रवेश होण्यास कांहीं साधनें नसतांही तिकडून सैन्य नेऊन काल्पी हस्तगत करण्याचा निश्चय केला. तो हळू हळू कुच करीत सन १७७८ मध्यें यमुना ओलांडून काल्पीस शह देण्याकरितां पुढें सरसावला.

ह्या वेळीं बुंदेलखडातील काल्पी, जालवण वगैरे प्रांत बाळाजी गोविंद व गंगाधर गोविंद याच्या ताब्यात असून त्यांच्या अंगांतील वीर्य सर्वस्वीं लोपलें नव्हतें. कोणीही आला व त्यानें तोंडात मारून प्रांत काबीज केला इतकी त्यांची निर्बल स्थिति अद्यापि झाली नसून आपला प्रांत रक्षण करण्याची त्यांच्या अंगात थोडी तरी धमक होती. तेव्हा त्यांनीं कर्नल लेस्ली साहेबास सरळ वाट न देता आपल्या प्रांताचें रक्षण करण्याचा निश्चय केला यांत नवल तें काय? बाळाजी गोविंद व गंगाधर गोविंद ह्यांनीं लेस्लीचें सैन्य येताच त्याची जागोजाग नाकेबंदी केली व जी त्रेधा उडविली ती सांगता सोय नाहीं.*

* ह्यासंबधानें त्यावेळच्या ईस्ट इंडिया कंपनीच्या एका नोकरानें पुढील उल्लेख केला आहे:—

"This district (Bundelcand) was possessed by Gangadhar Punt, the commander of the Mahratta force in that part of Hindostan he had received orders from Nana to use all his endeavours to prevent the progress of the English march He had with him his brother Balajee, whose dominions were further to the west, and through which the route of the detachment lay. This man had great power and influence over his brother, and through the whole country, his cunning was great, and he laid the scheme of obstructing us by every way preferably to arms &c &c"

—*An Account of Bombay* P 218

कर्नल लेस्ली ह्यानें काल्पी ओलांडून पुढें जाण्याचा पुष्कळ यत्न केला परंतु तो सफल होईना. तेव्हा त्यानें बाळाजी गोविंदाशीं स्नेहभावाचें बोलणें सुरू केलें. परंतु पुणेंदरबारच्या हुकुमाप्रमाणें त्याजबरोबर सलोखा करणें इष्ट नसल्यामुळें ह्मणा किंवा परक्यास आपल्या राज्यातून जाऊं देणें हें राजकारणास विघातक वाटल्यामुळें ह्मणा त्यांनीं त्याच्या ह्मणण्याचा मुळींच विचार केला नाहीं. त्यामुळें लवकरच उभय पक्षामध्यें लढाई सुरू होऊन काल्पीच्या किल्लेदारानें इंग्रज सैन्याची पाचावर धारण बसविली. अखेर त्याच्या त्रासास कंटाळून त्यानीं काल्पीवर हल्ला केला व तेथील समरांगणामध्यें उभय पक्षाचें खडाजंगी युद्ध झालें. कर्नल लेस्ली ह्यानें मराठ्यांचा बेजरब मार खाऊन मोठ्या धैर्यानें त्याच्यावर चढाई केली व आपल्या युद्धकौशल्यानें त्याच्या सैन्यास हुलकावण्या दाखवून काल्पीचा किल्ला सर केला. परंतु मराठ्यांनीं काल्पीचा किल्ला गेला ह्मणून आपला बिलकूल धीर न सोडता इंग्रज सैन्यास पुढें जाऊं न देण्याचा निश्चय केला व त्याप्रमाणें त्यानीं कडेकोट बंदोबस्त केला. त्यामुळें मराठ्यांची भीति वाटून इंग्रज सैन्यास चार महिने काल्पीस मुक्काम करावा लागला. त्यायोगानें कलकत्तेसरकारची मसलत सिद्धीस न जाऊन त्यास खर्चाचे पेंच बसूं लागले, व गव्हरनर जनरलच्या कौन्सिलमध्यें हें सैन्य परत बोलावण्याबद्दल वादविवाद सुरू झाला. गव्हरनर जनरलचे कौन्सिलदार मि० फ्रान्सिस ह्यानीं तर साफ सांगितलें कीं, "बुंदेलखंड हा अपरिचित प्रदेश, सध्याचे पावसाळ्याचे दिवस, तेव्हां अशा वेळीं त्यांतून सैन्य नेणें ह्मणजे मोठें धोक्याचें काम आहे. ह्या सैन्यावर बंगालचें सुरक्षितत्व अवलंबून आहे. किंबहुना त्यावर सर्व हिंदुस्थानातील ब्रिटिश सत्तेची मदार आहे. आणि मराठे लोक तर शक्तिमान् असल्यामुळें आपल्या देशांतून परकें सैन्य मुकाट्यानें कधींही जाऊं न देता त्याची त्रेधा

उडवून दिल्यावांचून राहणार नाहींत." इतकेंच नाहीं परतु त्यांनीं असें देखील सांगितलें कीं, "बुंदेलखडांतील सर्व मराठे सरदारांनीं एकत्र होऊन परक्या लोकाच्या सैन्यास अडथळा कां न करावा हें मला समजत नाहीं. कारण **इंग्रज सैन्य आपल्या प्रांतांतून जाऊं न देणें ह्यांतच त्यांचें हित आहे"** परतु गव्हरनर जनरल वारन हेस्टिंग्ज ह्यानीं असें सांगितलें कीं, "ज्या मराठे सरदारांनीं आपल्या सैन्यास अडथळा केला आहे त्याचा मुलूख काल्पीपासून फार थोडा उरला आहे. तीन चार दिवसाची किंवा फार तर एक आठवड्याची मजल मारली कीं, बुंदेलखडाची मर्यादा सपेल व पुढें मराठ्यांच्या अंमलांत नसलेला प्रांत लागेल. बुंदेलखडांतून पुढें गेले कीं, भोपाळची हद्द लागेल. तेथील पठाणसंस्थानिक मराठ्यास चौथ मात्र देत आहे तरी तो त्यांचा ताबेदार नसून आपणास अनुकूल आहे. नतर त्याच्या मुलुखांतून पुढें गेलें कीं पेशव्यांच्या हद्दीपर्यंत नागपूरकर मुधोजी भोंसल्याचा सर्व प्रांत आहे. हा सरदार अतिशय बलाढ्य असून नांवाचा मराठा आहे. त्याच्यावर पेशव्याचा अंमल नसून पुणेंदरबारचे मुत्सद्दीही त्यांस स्वतत्र मानितात. त्याच्याकडून अगदीं अंतःकरणपूर्वक मदत मिळण्याबद्दल मला अभिवचन मिळालें आहे, एवढेंच नव्हे पण त्यानें कर्नल लेस्लीस व मला सैन्य घेऊन येण्याबद्दल अनेकवेळ पाचारणही केलें आहे. त्याचीं सर्व राजकारणें मला माहीत असल्यामुळें त्याच्यावर माझा पूर्ण भरवसा आहे. अशा रीतीनें आपल्या सैन्याच्या संरक्षणाची खात्री असल्यामुळें इतरांच्या अडथळ्याची फारशी भीति बाळगण्याचें कारण नाहीं.*"

* ही सर्व हकीकत 'Selections from State Papers, Foreign Department. Vol. II.' ह्यामध्यें आली आहे. तिच्यावरून वारन हेस्टिंग्जनें भोंसले वगैरे मराठे सरदार कसे फोडले होते व ब्रिटिश सत्ता स्थापित करण्याकरितां कसे अचाट प्रयत्न चालविले होते हें चांगलें दिसून

ह्याप्रमाणें सर्व जबाबदारी आपल्या शिरावर घेऊन गव्हरनर जनरलनें कर्नल लेस्ली ह्यास बुंदेलखडातून पुढें प्रवेश करावा असा हुकूम केला. आणि पुण्याच्या दरबारीं नाना फडनवीस व सखाराम-बापू ह्यास आमचें सैन्य बुंदेलखंडातून मुंबईकराच्या मदतीस जात आहे तें सुरक्षित जाऊं देण्याबद्दल आपल्या सुभेदारास ताकीद द्यावी असें विनतीपत्र पाठविलें. तथापि कर्नल लेस्लीचा बुंदेल-खडामधून पुढें प्रवेश झाला नाहीं. त्यास पांच महिने काल्पीस कुचबत पडावें लागलें व बारा लक्ष रुपयाचा व्यर्थ खर्च झाला. अखेर कलकत्तासरकारानें त्यास परत बोलावून त्याच्या जागीं कर्नल गॉडर्ड ह्याची योजना केली. त्यानें बुंदेलखडात अनेक राजकारणें लढवून निरनिराळे बुंदेले संस्थानिक वश करून घेतले. त्यात पन्नाच्या राज्यातील कलिंजरचा किल्लेदार काईमजी चोबे हा पन्नाचा दिवाण बेणीहुजुरी याचा नाश करण्याच्या उद्देशानें इंग्र-जास जाऊन मिळाला व त्यानें केन नदीवरून पन्नाच्या राज्यातून इंग्रज फौजेस मार्ग दिला. बुंदेले संस्थानिक फितल्यामुळें बाळाजी गोविंद व गंगाधर गोविंद ह्याचा निरुपाय झाला. त्यानीं होईल तितका प्रयत्न करून इंग्रज सैन्य पुढें जाऊं न देण्याची खटपट केली, तथापि, सर्व आकाश फाटल्याप्रमाणें स्थिति होऊन सभोंवतालचे सर्व राजे इंग्रजांस मिळाले व त्यांचें तें सैन्य खुद्द बाळाजी गोविंदांच्या सागर प्रांतानजीक येऊन ठेपलें. कर्नल गॉडर्ड हा मालथोण, खेमलासा, भिलसा ह्या मार्गानें हुसगाबादेकडे आला. त्यास बाळाजी गोविंद *

---

येऊन कोणासही भोंसले आदिकरून मराठे सरदारांच्या कृतघ्नपणाबद्दल दुःख वाटल्यावाचून व इंग्रजांच्या खोल मसलतीबद्दल विस्मय वाटल्यावांचून राहणार नाहीं!

* ग्राटडफच्या इतिहासामध्यें 'सागर येथील मराठा सरदार बाळाजी-पंत यानें गॉडर्डच्या सैन्यास बराच अडथळा केला' ह्मणून लिहिलें आहे तो बाळाजीपंत ह्मणजे सुभेदार बाळाजी गोविंद हेच होत.

ह्यानीं आपलें सर्व सामर्थ्य खर्च करून पुढें येऊं न देण्याबद्दल पुष्कळ प्रयत्न केला. परंतु अखेर भोपाळचा नबाब, नागपूरकर भोंसले, बुंदेले राजे ह्यांनीं सर्व बाजूनीं वाट मोकळी करून दिल्यामुळें त्या स्वदेशाभिमानी सरदाराचा उपाय हरला जाऊन महाराष्ट्रराज्यसत्तेचा विध्वंस करणारें हें इंग्रजी सैन्य नर्मदातीरीं येऊन पोहोंचलें. ह्या समयीं बाळाजी गोविंदानीं आपल्या शहाणपणानें इंग्रजाच्या ताब्यात बुंदेलखंडांतील कोणताही प्रांत जाऊं दिला नाहीं एवढेंच नव्हे पण काल्पीचा किल्लाही परत घेतला हें येथें सांगणें अवश्य आहे. कर्नेल गॉडर्डचें सैन्य बुंदेलखंडांतून गेल्यामुळें मराठ्याचें अतोनात नुकसान झालें. व बुंदेलखंडात अस्वस्थता उत्पन्न होऊन दंगेधोपे सुरू झाले. त्यामुळें बुंदेलखंडातील मराठी सत्तेचा जोर कमी होण्यास फार दिवस लागले नाहींत. कर्नेल गॉडर्ड हा नर्मदा उतरून गुजराथेंत शिरला व त्यानें शिंद्यापासून भडोच वगैरे प्रांत सर केला, आणि अखेर मराठ्यास शह देऊन गुजराथेंत धुमाकूळ करून सोडलें वगैरे गोष्टी महाराष्ट्रदेशाचा इतिहास वाचणारांस अवगत आहेतच.

वरील हकीकत घडून आल्यानंतर बाळाजी गोविंद ह्यांस सागर प्रांतीं पुनः युद्ध करण्याचा प्रसंग आला. सागर प्रांताचा सर्व बंदोबस्त विसाजी गोविंद चांदोरकर ह्यांच्याकडे सोंपविला असून त्यांच्याजवळ सैन्यही बरेंच होतें. परंतु कर्नेल लेस्ली हा प्रबळ सैन्यानिशीं बुंदेलखंडात प्रवेश करून दक्षिणेकडे जाण्याच्या उद्देशानें काल्पीपर्यंत आला, त्या वेळीं बाळाजी गोविंदानीं प्रांताचें रक्षण करण्याकरितां व पुणेंदरबारचें राजकारण साधून इंग्रजी फौजेस प्रतिबंध करण्याकरिता सर्व सैन्य एकत्र केलें. त्या वेळीं सागरचेंही सैन्य तिकडे नेण्यांत आलें. तेवढी संधि साधून गढमंडळा येथील गोंड राजानें पुंडावा करून स्वतंत्र होण्याचा प्रयत्न

चालविला. गढमंडळा येथील गोंड राजा मराठ्यांचा अगदीं अंकित असून त्याचें राज्य त्यांच्या कृपेमुळेंच कायम राहिलें होतें. पूर्वीं गोविंदपंत बुंदेल्यांनीं गोंड राजा निजामसा ह्याच्यावर मोरो विश्वनाथ डिंगणकर, दादो नारायण महाजनी, बापूजी नारायण देसाई ह्यांस पाठवून गढाप्रांत काबीज केला होता. त्या वेळीं निजामसाचे दोन पुत्र सुमेरसा व नरहरसा हे शरण आले, ह्मणून वडील पुत्र सुमेरसा ह्यास राज्यतिलक लावून गादीवर बसविलें, व त्या प्रांताचा एकदर कारभार मोरो विश्वनाथ डिंगणकर ह्यांच्याकडे सोंपविला. परंतु राजा सुमेरसा हा अतिशय क्रूर व विश्वासघातकी निपजून त्यानें आपल्या वृद्ध आईचा वध केला, व मराठ्यांशीं वैर आरंभिलें. त्या वेळीं मोरोपंतांनीं त्यास कैद करून हट्याजवळील जटाशंकराच्या किल्ल्यांत कैदेंत ठेविलें व सुभेदाराच्या परवानगीनें त्याचा धाकटा भाऊ नरहरसा ह्यास गादीवर बसविलें. आणि त्याचा कारभार गंगागीर गोसावी ह्याजकडे सोंपविला. संवत् १८३८ पर्यंत तो सुरळीत चालला, परंतु पुढें नरहरसा हाही आपल्या वडील बंधूच्या वळणावर जाऊन मराठ्यांचा अंतस्थ रीतीनें द्वेष करू लागला. मराठ्यांचा सागर येथें सुभा असल्यामुळें तेथें त्यांचें भरपूर सैन्य होतें व जबलपुरास दुसरी छावणी असून तेथेंही चांगला सरंजाम होता. खुद्द मोरो विश्वनाथ हे मंडळा येथें आणि बापूजी नारायण हे नर्मदेच्या पलीकडील प्रांताची व्यवस्था करण्यास तत्पर असत, त्यामुळें त्याचें कांहींएक चाललें नाहीं. पुढें ज्या वेळीं सागरचें सैन्य काल्पीकडे गेलें, त्या वेळीं त्यास उत्तम संधि सांपडून त्यानें गोंडवणातील सर्व गोंड लोक अतिशय गुप्त रीतीनें जमा केले. खुद्द विसाजी गोविंद व दादो नारायण हे कांहीं पागलोकांनिशीं गढ्यास होते, परंतु त्यांनाही दाद लागू न देता त्यानें त्याच्यावर श्रावण वद्य प्रतिपदा संवत् १८३९ रोजीं छापा घातला. राजा

नरहरसा व त्याचा दिवाण गंगागीर ह्यांनीं एका रात्रीमध्यें सात हजार गोंड जमा केले. त्याची व विसाजीपंताच्या घोडेस्वारांची लढाई झाली; परंतु गोंड लोक फार शूर व धाडसी असल्यामुळें विसाजीपंतांच्या स्वारांचा पराभव होऊन ते जबलपुरास पळून गेले, व विसाजीपंत व दादो नारायण ह्याचा त्या गर्दींत शेवट झाला. त्यामुळें गोंड राजास फार आनंद होऊन त्यानें मराठ्यांचीं ठाणीं लुटून त्याचे बळकट किल्ले सर करण्यास प्रारंभ केला. सैन्याचा बंदोबस्त नसल्यामुळें तेजगडचा किल्ला एकदम त्यास मिळाला. नंतर त्यानें मंडळा येथील किल्ल्यास मोर्चे लाविले. अशा रीतीनें गोंड राजाची पुडाई सुरू होतांच मराठ्यांच्या ठाणेदारानीं ती मोडण्याचा प्रयत्न चालविला; परंतु सैन्याची मदत नसल्यामुळें गोंड लोकांपुढें त्याचा टिकाव निघेनासा झाला. बापूजी नारायण ह्यांनीं चवरागडास मोर्चे लाविले, परंतु त्याच्यावर गोंड लोकांचा छापा पडतांच ते नर्मदा उतरून बल्हईस आले. जबलपूर येथें असलेला तोफा-सरजाम व फौज घेऊन विसाजीपंताचे दिवाण अंताजी राम खांडे-कर हे दमोईस गेले. विसाजीपंताचे काका कृष्णाजी अनंत ह्मणून होते त्यांनीं नवीन फौज तयार करून ती बाळाजी गोविंद ह्यांच्या हुकुमानें केसो महादेव चांदोरकर ह्यांच्या हाताखालीं देऊन तेजगडास पाठविली. तेथें त्याची व राजा नरहरसा व गंगागीर ह्यांची लढाई झाली. तींत गोंड राजाचा शूर सरदार सहादतखान पठाण छपोरवाला हा मारला गेला. राजानें व त्याच्या दिवाणानें पुष्कळ वेळपर्यंत टिकाव धरिला, परंतु मराठ्यांच्या सैन्यापुढें त्याचा निरुपाय होऊन अखेर त्यास पळ काढणें भाग पडलें. मराठ्यांनीं किल्ल्यास मोर्चे लावून तो हस्तगत केला, तेव्हां गोंड राजा तेथून चवरागडास पळून गेला.

हें वर्तमान बाळाजी गोविंद ह्यांस काल्पीस कळतांच त्यांनीं

आपले चिरंजीव रघुनाथराव ऊर्फ आबासाहेब ह्यांजबरोबर निरनिराळे कामदार नेमून देऊन त्याची सागरच्या सुभेदारीवर योजना केली व प्रांताचा जरूर बंदोबस्त करण्याकरितां त्यांच्याबरोबर पुढील गृहस्थ दिले:—

१ लक्ष्मीनारायण भटजी दिवाण.

२ कृष्णाजी त्रिंबक मजूमदार याजकडून
रामचंद्र कृष्ण व लक्ष्मण कृष्ण लघाटे.

३ फडणिसांकडून वासुदेव गणेश बांकणकर.

४ चिटणिसांकडून तुकोबा परभू.

५ पोतनिसांकडून केसो भिकाजी.

ह्यांखेरीज आणखी गृहस्थमंडळीही कांहीं होती. त्यांनीं पागापतकें बरोबर घेऊन ताबडतोब श्रीनगराहून हट्यास कुच केलें व तेथील बंदोबस्त करून ते तेजगडास आले. नंतर प्रांतोप्रांतीं ठाणीं बसवीत बसवीत गोंड राजाचें मुख्य ठिकाण जें मंडळा त्याच्यावर त्यांनीं हल्ला केला. तेथें मोरो विश्वनाथ आपल्या फौजेसह येऊन त्यांस मिळाले. आबासाहेबांनीं मोठ्या पराक्रमानें, मंडळा येथील किल्ला जिंकून घेतला, व तेथील ठाणें कायम केलें. नंतर जबलपुरास येऊन नर्मदा दक्षिणतीरची सर्व ठाणीं बसविलीं. अशा रीतीनें आबासाहेबानीं सागर प्रांतात आपला अमल फार लवकर बसविला, आणि गोंड राजास धरण्याकरितां चवरागडावर चाल केली. मध्यंतरीं पाटण येथें त्याची व गढाचे मामलेदार मोरो विश्वनाथ ह्याची मोठ्या समारभानें भेट झाली. त्या वेळीं त्यांनीं त्यास गढा प्रांताची मुखत्यारी देऊन त्याच्या हाताखालीं पुढील सरदार व दरखदार नेमून दिले.

१ सरदार केसो महादेव व बापूजी नारायण.

२ दरखदार सरकारचे.

१ मुजूमदार लक्ष्मण कृष्ण लघाटे.

१ फडणिसाकडील कारकून.

१ मोरोपंताचे खासगी दिवाण धोंडो रामचंद्र नावलेकर व पोतनीस, चिटणीस वगैरे.

ह्या मंडळीस बरोबर घेऊन मोरो विश्वनाथ ह्यांनीं चवरागडास मोर्चे लाविले. त्याच्या साह्याकरिता लक्ष्मीनारायण भटजी हे तेजगडाहून तेथें येऊन दाखल झाले. उभयतांनीं किल्ल्यावर मारा करून गोंड सैन्याचा पराभव केला. राजा नरहरसा व त्याचा दिवाण हे किल्ल्यामध्यें दबा धरून बसले होते. त्यास त्यांनीं सहकुटुंब कैद करून सागरास श्रीमंत आबासाहेब यांच्याकडे रवाना केलें. आबासाहेबांनीं त्या नीचाच्या सर्व अपराधाची क्षमा करून त्यास त्याच्या राणीवशासह पंचमहालातील कुरईचे किल्ल्यात नजरकैदेंत ठेविलें, आणि गंगागीरास हत्तीचे पायीं बांधून देहान्त शिक्षा केली, व गोंड राजाचा सर्व प्रांत खालसा करून त्याची व्यवस्था मोरोपंत यांजकडे सोंपविली. ह्याप्रमाणें आबासाहेबांनीं विजय संपादून व प्रांताचा उत्तम बंदोबस्त करून वडिलास भेटण्याकरिता काल्पीस कुच केलें. बाळाजी गोविंद ह्यांस एकुलता एकच पुत्र असल्यामुळें त्याच्या शौर्यपराक्रमाची कीर्ति ऐकून त्यांना अत्यंत हर्ष झाला व त्यांनीं आबासाहेबांची मोठ्या वात्सल्यानें भेट घेतली, व बरेच दिवस त्यांना आपल्या सन्निध ठेवून घेतलें.

आबासाहेब काल्पीस गेल्यानंतर संवत् १८५४ मध्यें मोरोपंत डिंगणकर ह्यांचा काळ झाला, व त्यांचे चिरंजीव विश्वासराव ह्यांनीं सागरचा राज्यकारभार चालविला. मोरोपंत हे बाजीरावसाहेबांच्या वेळचे जुने मुत्सद्दी असून कट्टे स्वामिभक्त, व रणशूर होते. ह्यांच्या शौर्याच्या अनेक कथा सागर प्रांतामध्यें अद्यापि प्रचलित आहेत. ह्यांच्याकडे सागर प्रांताच्या सर्व सैन्याचें आधिपत्य होतें. ह्यांनीं

गढामंडळाच्या राजाचें बंड मोडून गोंड लोक आपल्या मुठींत ठेविले होते; व तेथील राजाच्या युद्धामध्यें त्यांनीं अनेक मूल्यवान् वस्तु लुटून आणिल्या होत्या. त्यापैकीं गोंड राजाच्या हत्तीवरची रेशमी झूल इंदूर येथील गव्हरनर जनरलच्या एजंटच्या कोठीमध्यें मुख्य दरबारच्या छतास लाविली आहे! असो. मोरोपंत वारल्यानंतर पुनः तेथें दगा सुरू झाला होळकराचा पठाणसरदार मीरखान ह्यानें सागरास कोणी पराक्रमी मनुष्य राहिला नाहीं असें पाहून शहरास वेढा घातला. तेव्हा त्याची व सागरच्या सैन्याची लढाई झाली. तींत लक्ष्मण कृष्ण मुजूमदार व बबाजी शिवदेव ह्यांस जखमा लागून सागरसैन्यातील पुष्कळ लोक ठार झाले. हें वर्तमान बाळाजी गोविंदास समजताच त्यानीं पुनः आबासाहेबास सागरास पाठविलें. तेथें मीरखानाची फौज पुष्कळ असल्यामुळें त्यानीं नागपूरकरांचे फौजेचे सेनापति सुभेदार विठ्ठलपंत, नाना घाटगे व कंपूचे अधिकारी बेणीसिंग यांजकडे बळवंतराव धोंडदेव पुसाळकर नामक वकिलास पाठविलें. त्यानीं, नागपूरकरास मंडळा व चवरागड हे दोन किल्ले, तेजगड व त्याखालील प्रांत, व रोख तीन लाख रुपये द्यावयाचा ठराव करून त्याचें सैन्य मदतीस बोलाविलें. नंतर उभये सैन्याची लढाई होऊन मीरखान पठाणाचा पूर्ण पराभव झाला, व नागपूरचें सैन्य जबलपुरास परत गेलें. अशा रीतीनें सागर प्रांतावर आलेलें संकट दूर करून आबासाहेब पुनः राज्याची नीट व्यवस्था करूं लागले. तों इकडे काल्पीकडे बाळाजी गोविंद ह्यांची प्रकृति बिघडून ती फार अस्वस्थ असल्याचीं पत्रें येऊं लागलीं. तेव्हा आबासाहेबानीं आपल्या मातुश्री सौ० लक्ष्मीबाईसाहेब ह्यास तिकडे रवाना केलें; व मागून काहीं दिवसानीं सागरची व्यवस्था लक्ष्मण परशुराम ह्यांच्याकडे सोंपवून आपणही वडिलांच्या भेटीस जावें असा विचार केला. ते मजल दरमजल कुच करीत तेहेरी

संस्थानाजवळ बाणपूर ह्मणून गाव आहे तेथें येऊन दाखल झाले. तों तेथें त्यास बाळाजी गोविंद ह्याचा अंत होऊन सौ० लक्ष्मीबाईसाहेब ह्यानीं सहगमन केल्याचें वृत्त समजलें. त्यामुळें त्यांस अत्यंत दु:ख होऊन ते बारा दिवस तेथेंच राहिले आणि पुढें लक्ष्मण परशुराम ह्यास सागरास पाठवून आपण काल्पीस गेले.

बाळाजी गोविंद हे मोठे कर्तृत्ववान्, दृढनिश्चयी व बाणेदार पुरुष होते. त्यानीं आपल्या बापाच्या पाठीमागें बुंदेलखंडांत मराठ्याचा अंमल कायम ठेवण्याबद्दल भगीरथ प्रयत्न केले. त्यांच्या कारकीर्दींत बुंदेलखंडावर अनेक संकटें आलीं. खुद्द पाठचा भाऊ बिघडला. आणि विघ्नसंतोषी लोकांनीं अनेक कुलगडीं उपस्थित केलीं, तरी त्यानीं यत्किंचित्‌ही न डगमगता सर्वांवर आपली छाप कायम ठेवून गोविंदपंतांच्या लौकिकाप्रमाणें पेशव्याच्या दरबारीं आपला इतबार राखिला व यजमानाची सेवा एकनिष्ठपणें बजावली ह्यांत कांहीं शंका नाहीं. पुणेंदरबारचे कारभारी नाना फडनवीस, सखाराम बापू ह्याचा त्याच्यावर पूर्ण लोभ असून ते त्यांना चांगला मान देत असत. पानिपतचा भयंकर संग्राम झाल्यानंतर बुंदेलखंडावर एकामागें एक जीं अनेक अरिष्टें आलीं, त्यांतून मराठी राज्यसत्तेचा बचाव करणें फार कठीण काम होतें. परंतु तें मोठ्या युक्तीनें व हिंमतीनें बाळाजीपंतांनीं शेवटास नेलें, ह्याबद्दल त्यांची प्रशंसाच केली पाहिजे. अयोध्येचा नबाब, रोहिले, इंग्रज, बुंदेले, वगैरे अनेक शत्रु उत्पन्न झाले असून त्या सर्वांनीं चोहोंकडून घेरलें असतां आपली शहामत कायम राखणें हें लहानसान काम नव्हे. प्रत्यक्ष बंधु वैरी झाला असताही केवळ आपल्या सौजन्यानें व क्षमाशीलत्वानें त्याचें मन वळवून त्यास आपला चटका लावून सोडणें हेंही फार अवघड आहे. बाळाजी गोविंद ह्यांच्या ठिकाणीं स्वाभिमान व स्वराष्ट्रहितैषिता किती होती हे कर्नल लेस्लीच्या राजकारणात

चागलें व्यक्त झालें. असो. एकंदरींत बाळाजी गोविंद ह्यानीं आपली कारकीर्द वडिलाप्रमाणेंच संस्मरणीय केली ह्यांत शंका नाहीं.

बाळाजी गोविंद व गंगाधर गोविंद ह्या उभय० बधूमध्यें मध्यतरीं थोडेंसें वितुष्ट आलें होतें, परंतु पुढें तें सर्व नाहींसें होऊन उभयताचीं मनें अगदीं स्वच्छ झालीं होतीं. त्या उभयतास राज्यप्रकरणीं त्याचे चुलतबधु दिनकर बाबुराव ह्यानीं उत्तम प्रकारें साह्य केल्यामुळें त्याचा त्याच्यावर पराकाष्ठेचा विश्वास असे. ह्मणून त्यानीं आपला वृद्धापकाळ झाला व आपले एकुलतेएक पुत्र अल्पवयस्क असल्यामुळें त्याना राजकारणाचें विशेष ज्ञान नाहीं, असें पाहून दिनकर बाबुराव ह्यांच्याकडे सर्व राज्यकारभार सोंपविला, आणि आपल्या उभय चिरजीवास त्याच्या स्वाधीन केलें. त्या समयीं दिनकररावअण्णास त्यानीं जें पत्र लिहिलें तें येणेंप्रमाणें:—

"चिरजीव राजश्री दिनकरराव यासी प्रति—

बाळाजी गोविंद व गंगाधर गोविंद आशीर्वाद उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणें, विशेष. तुमचा आमचा एकघरचा प्रकार चालत आल्याप्रमाणें वडिलांमागें ती० कैलासवासी बाबुरावजीकाकानीं श्रीमताचे दरबारचे साधनेंकरून देशी वतनें, गाव वगैरे व इकडील राज्यप्रकरणीं बदोबस्त राखिला. त्यामागें तुह्मी पुण्यात श्रीमताजवळ राहून बदोबस्त ठेवून असता लखनौवाल्याकडील फौजा येऊन या प्रातीं उपद्रव केला व ती० कै० काशीपतकाकांचा अंतकाळ झाला त्या समयीं एकदाच अनेक बखेडे प्राप्त झाले. तेव्हा तुह्मास देशींहून बोलावून एकविचारें अनेक बखेडे दूर केले. आज पचवीस वर्षें वहिवाटीची माहिती करून दिल्ही. आता आमचा वृद्धापकाळ, शरीराचें शाश्वत नाहीं, व पुण्यात रावसाहेबाचा* काळ झाल्यापासून कारभारी शिंदे होळकर याचा

---

* रावसाहेब ह्मणजे श्रीमत सवाई माधवराव पेशवे हे होत. ह्याचा काळ झाल्यापासून पुण्यास सर्व घोंटाळे झाले हें उघडच आहे.

आपसात बखेडा झाला आहे. कोणे थरास गोष्ट जाईल हें न कळे. ऐसा समय कठीण दिसतो. तरी राज्य वगैरे कामांचा बंदोबस्त यथास्थित ठेवाल हा भरवसा तुमचा आहे. आमचें राज्य व देशी वतनें वगैरे आहेत. यांसी प्रसंगोपात्त दायाद्दार तुमचें घर समजोन पदरची कारभारी मंडळी समक्ष एकविचारें चिरंजीव राजश्री आबा व चिरंजीव नाना याचे हात तुमचे हातांत दिले असत. यास तुह्मीं वडीलपणें साभाळून वडिलार्जित नांवलौकिक चालत आल्याप्रमाणें पुण्याचे संबंधानें यथास्थित ठेवावें. तुह्माकडे या प्रातीं आला तेव्हां गुलसराई किल्ला वगैरे सरजाम देऊन व देशी वतनें, वाडे, वाग वगैरे आह्मीं चालविले त्याप्रमाणें हमेशा चालविणें, ह्मणोन व राज्यसंबधें ती० कै० काशीपतकाकाचे विद्यमानें लाखों रुपयाचे पेंचात आला त्याचे कागदहिशेब तुह्माजवळ आहेत त्याचा निकाल क्रमेकरून देण्याचेंही उभयतां चिरंजीवास सांगितलें आहे. तुह्मावर पेंच तो आह्मांवर आहे. तो दूर होईल. साराश एकघरचा विचार मानून खातरजमेनें राज्य वगैरे बदोबस्त ठेवावा. तुमचे सल्लेबाहेर कोणी वर्तणार नाहीं. मिति मार्गशीर्ष शुद्ध ७ सवत् १८५५ मुक्काम इटोरा. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद."

ह्या पत्राखालीं बाळाजी गोविंदांचे चिरजीव, रघुनाथराव बल्लाळ ऊर्फ आबासाहेब व गंगाधर गोविंद याचे चिरंजीव गोविंदराव गंगाधर ऊर्फ नानासाहेब ह्या उभयताच्या मान्यता घातलेल्या आहेत. त्या येणेंप्रमाणें:—

"अपत्यसमान रघुनाथराव बल्लाळ व गोविंदराव गंगाधर सा० न० वि० उपरी उभयता वडिलांनीं एकत्र होऊन कारभारी मडळी-समक्ष पुढील कर्तव्य सागून आह्मास आपले हवालीं केलें असे, तरी सदरीं लिहिल्याप्रमाणें आह्माकडून हमेशा पार पडेल. आह्मास आपण वडिलाप्रमाणें मान्य आहा. राज्य व वतनांत एकदर घरो-

ऱ्याचे प्रकारें दायाद आपले घरास जाणितों. आणीक कोणाचा दाया नाहीं. तेव्हां उभयता एकविचारें आपले सल्लेबाहेर होणार नाहीं. लोभ असों दीजे हे विज्ञापना."

ह्याप्रमाणें उभयतांनीं सर्व भार दिनकररावअण्णावर सोंपविला होता. त्याप्रमाणें बाळाजीपंतांच्या पश्चात् सुमारें नऊ महिनेपर्यंत कारभार चालला. तों गंगाधर गोविंद हेही आपल्या बंधूच्या मागें परलोकवासी झाले. त्यामुळें दोन कर्ते पुरुष थोड्या अंतरामध्यें निवर्तल्यामुळें जिकडे तिकडे एकच हाहाःकार झाला.

गंगाधर गोविंद हेही मोठे राजकारणी पुरुष असल्यामुळें काल्पी, जालवण ह्या प्रांतांत त्यांचा चांगला दाब असून त्यांनीं तिकडील सर्व कारभार फार चांगल्या रीतीनें चालविला होता. ते शौर्यगुणांतही परिपूर्ण असून त्यांचा प्रताप बुंदेले लोकास पूर्ण माहीत झाला होता. गोहदच्या राण्यावरील मोहिमेमध्यें त्यांनीं अटकेपर्यंत भरारी मारणाऱ्या रणपटु पेशव्यास आपल्या पराक्रमानें आनंदित करून त्याजकडून शाबासकी मिळविली होती. अशा पराक्रमी पुरुषाचा कीर्तिनाद बुंदेलखंडामध्यें दुमदुमत राहावा ह्यांत आश्चर्य तें काय? अद्यापि तद्देशीय कवि गंगाधररावाचें गुणवर्णन गात असतात. तें ऐकून प्रत्येक महाराष्ट्रीयाचें अंतःकरण आनंदानें उचंबळून जातें.

कवित्त.

देवनको देव दिव्य गंगाधर जैसो
तैसो गंगाधर भूमिदेव भूतल संचारोहै ।
विधिको तनय जो गोविंदको तनय
जो विरद दुहुको दुजराजन उचारोहै ॥
लीलाधर कहिये कहानो जस कीरत
बढाई कहवे को हारो बदन हजारों है ।
काम क्रोध लोभ मोह चारो बलवंत
तामे काम उनजारो इन लोभको उजारो है ॥ १ ॥

दीरघ सुडोल द्रग नाहन की तोल
सिरमोर जे गने हे चार चौंसट कलनके ।
लीलाधर सुखद सुहाए दुजराजन पे
जलधर होत दानसिरकी झलनके ॥
गंगाधर पंडित प्रचंड भुजदंड तेरे
वीर हनुमंतको अखंडित बलनके ।
दाछिन के वाहन दिल्लीदलके डहाहन
सुजसके चाहन विधाहन खलनके ॥ २ ॥

असो. बाळाजी गोविंद व गंगाधर गोविंद ह्यांनीं मराठेशाहीचा अभिमान बाळगून बुंदेलखडांत पेशव्यांचा नक्षा कायम ठेवण्याकरिता अनत श्रम केले तत्प्रीत्यर्थ अनेक युद्धें करून सर्व बाजूनीं वेष्टिलेल्या शत्रुवर्गाचें पारिपत्य केलें; प्रमत्त बुंदेल्यांचा गर्व हरण केला, रोहिल्याची, सुजाउद्दौल्याची व अनुपगीर गोसाव्याची खोड मोडली, बुंदेलखंडांत चचुप्रवेश करणाऱ्या इंग्रज अधिकाऱ्याचा कावा लक्षात घेऊन त्याना हाकून दिलें आणि सदैव पुण्यपत्तनस्थ पेशवे सरकाराशीं इमानेंइतबारें वागून मराठ्याचें वैभव बुंदेलखडात कायम ठेविलें, व आपणांस मोरोपंत कवींनीं ह्मटल्याप्रमाणें:—

राजे पंडित यांचें भूषण नाहींच कीर्तिहुनि अन्य ॥

असें कीर्तिभूषण प्राप्त करून घेतलें, असे पुरुष आम्हां महाराष्ट्रीयांस भूषणप्रद होत ह्यांत शका नाहीं.

बाळाजी गोविंद व गंगाधर गोविंद ह्यांच्यावर फार थोड्या अतरानें मृत्यूचा घाला पडल्यामुळें बुंदेलखडातील मराठी राज्यसत्तेचे दोन मुख्याधारस्तंभ ढांसळून पडल्यासारखे झालें, असें ह्मटलें तरी चालेल. पुण्यास पेशवाईचा घोंटाळा होऊन तेथें बेबदशाही झाली होती. अशा वेळीं बुंदेलखडांत तरी मराठी सत्तेचीं सूत्रें बळकट धरणारा सूत्रधार असावयास पाहिजे होता. पण दुर्दैवानें सर्वस्वाला नाश

व्हावयाचा असल्यामुळें सर्व विपरीत प्रकार व्हावा हें उघडच आहे. बाळाजी गोविंद व गंगाधर गोविंद ह्याच्या मागें त्याचे पुत्र रघुनाथराव आबासाहेब व गोविंदराव० नानासाहेब हे बुंदेलखडाच्या सुभ्याचे मालक झाले. परतु ते अल्पवयी असल्यामुळें सर्व भार गुलसराईचे मामलतदार दिनकररावअण्णा ह्यांच्यावर येऊन पडला. तेव्हां त्यांनीं उभय बंधूस काल्पीस ठेवून घेऊन सर्व सुभ्याचा कारभार आपल्या देखरेखीखालीं चालविला. सागर प्रांताची व्यवस्था लक्ष्मण परशुराम ह्याचेकडे होती, परतु त्यास त्यांनीं काल्पीस नेलें व काशीहून विनायकराव गणेश चांदोरकर ह्यास बोलावून आणून सागर प्रात त्याच्याकडे सोंपविला व केसो महादेव चांदोरकर ह्याच्याकडे त्याची दिवाणगिरी दिली. ह्याप्रमाणें कारभार सुरू केला.

पुढें दोन वर्षांनीं संवत् १८५९ च्या भाद्रपद वद्य प्रतिपदेस आबासाहेब ह्याची प्रकृति बिघडून त्यांचा काल झाला. त्यामुळें पुनः सर्व घोंटाळा झाला. सागर प्रातांत बाळाजी गोविंद रहात असत, तेव्हा तो प्रात त्याच्या अंमलात असे व जालवण गंगाधर गोविंद ह्याच्या ताब्यात असे. वस्तुतः पेशव्याच्या वेळीं बाळाजी गोविंद व गंगाधर गोविंद ह्यांस निराळे प्रांत स्वतंत्रपणें वांटून दिले नव्हते, त्यामुळें बुंदेलखडाचा कारभार दोघांच्याही नावानें चालत असे. पुढें त्याच्यामध्यें वितुष्ट आल्यानंतर पुण्याहून दिनकररावअण्णा बुंदेलखंडात गेले व त्यांनीं आपसामध्यें प्रांताचे विभाग करून कलह मिटविला. तेव्हापासून सागर व जालवण असे निरनिराळे भाग झाले, पण पेशव्यांच्या दरबारांत तो एकच सुभा समजला जात असे. नतर ते दोघेही निवर्तले त्या वेळीं त्यानीं गुलसराई परगणा दिनकररावअण्णांस देऊन उभयतांनीं आपापले पुत्र त्याच्या स्वाधीन केले. त्याप्रमाणें दिनकररावांनीं उभयतांची योग्य प्रकारें व्यवस्था केली. पुढें आबासाहेब निवर्तल्या-

नतर त्याच्या दोन स्त्रिया रखमाबाई व लक्ष्मीबाई अशा होत्या, त्या सागरास होत्या. त्यानीं पेशव्यांची जहागीर ज्येष्ठ बधूच्या नांवें चालायाची असल्यामुळें निराळा दत्तक पुत्र घेऊन स्वतत्र कारभार चालविण्याचा विचार केला. त्या वेळीं झांशीचे सुभेदार शिवराव भाऊ व गुलसराईचे दिनकररावअण्णा ह्यांच्या विचारानें आबासाहेबांचे धाकटे बधु गोविंदराव नानासाहेब ह्यांनी आपणास पुत्र होईल तो त्यास दत्तक देऊन त्यास मालक करू व सर्व राज्यकारभार त्याच्या नांवें चालवू असें कबूल केलें. व त्याप्रमाणें सर्व राज्यव्यवस्था नानासाहेबानीं आपणाकडे घेतली. बाईसाहेबाकडील कामदार दिनकररावअण्णा व लक्ष्मणपतबापू आणि नानासाहेबाकडील कामदार कान्हो मल्हार खांडेकर, याप्रमाणें ठराव होऊन सागरची व्यवस्था सुरू झाली.



## भाग ८ वा.

# बुंदेलखंडांतील मराठी राज्यसत्तेचा ऱ्हास.

बाळाजी गोविंद ह्याचे चिरंजीव आबासाहेब हे मृत्यु पावल्यानंतर गंगाधर गोविंद ह्याचे चिरंजीव गोविंदराव नानासाहेब हे बुंदेलखंडांतील पेशव्यांच्या सुभ्याचा सर्व कारभार जालवण प्रांतीं राहून पाहू लागले. परंतु त्यास रीतीप्रमाणे पेशव्यांच्या दरबारांतून सुभेदारीचीं वस्त्रें लवकर मिळालीं नाहींत. ह्या वेळीं पुणेंदरबारांत सर्व गोंधळ झाला होता. श्रीमंत सवाई माधवराव कैलासवासी होऊन त्यांच्या जागीं राव बाजींची स्वारी अधिष्ठित झाली होती. शिंदे, होळकर, पटवर्धन वगैरे सर्व सरदारमंडळींत कलह उत्पन्न होऊन सर्व अनियंत्रित कारभार चालला होता. अटकेकाट शहाणे मुत्सद्दी नाना फडनवीस हे दुर्दैवचक्रांत सांपडून अधिकारच्युत झाले होते. व मराठी राज्याचीं सूत्रें राज्यव्यवहारशून्य लोकांच्या हातांत गेलीं होतीं. त्यामुळें ठिकठिकाणच्या सुभ्यांवर पेशव्यांचा दाब कमी होऊन ते अगदीं स्वतंत्र झाले. परंतु बुंदेलखंडांतील गोविंदपंतांच्या वंशजानीं आमल्या धन्याशीं कधींही बेइमानगिरी केली नाहीं. वस्तुतः ह्या वेळीं बुंदेलखंडांतील सागर, जालवण वगैरे प्रांत त्यांच्या ताब्यांत होते व त्याच्यावर त्यांचा पूर्ण अंमल चालला होता. तथापि पेशवेसरकारच्या मान्यतेवाचून आप-

णास सुभेदारपद स्वीकारिता येणार नाहीं असा त्यांचा अद्यापि दृढ भाव होता. परंतु पुणेंदरबारांत सर्व अव्यवस्था झाल्यामुळें स्वामिनिष्ठेची किंमत तेथें मुळींच राहिली नव्हती. त्यामुळें तिकडून नानासाहेबांच्या हेतूप्रमाणें सुभेदारीचीं वस्त्रें लवकर आलीं नाहींत व लबाड लोकांच्या प्रयत्नानें अनेक भानगडी सुरू झाल्या. त्यावेळीं नानासाहेबांनीं पेशवे सरकारास अनेक विनंतीपत्रें पाठविलीं व झांशीचे सुभेदार शिवरावभाऊ ह्यांच्या मार्फतही निरोप पाठविले. तरी तेथें लवकर दाद लागेना. तेव्हां त्यांनीं श्रीमतांस पुढील पत्र लिहिलें:—

"श्रीमत राजश्री———————पंतप्रधान

स्वामीचे सेवेशीं:—

विनति, सेवक गोविंदराव गंगाधर कृतानेक सा० नमस्कार विज्ञापना ता० आ० शुद्ध ५ पर्यंत मुकाम जालवणीं स्वामीचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष. बहुत दिवस आज्ञापत्र सादर होऊन सेवकाचा परामर्श होत नाहीं, तेणेंकरून चित्त सापेक्षित आहे. तरी स्वामींनीं कृपावंत होऊन पत्रद्वारें सेवकास सनाथ केलें पाहिजे. यानंतर इकडील वृत्त साहेबांचे चरणसेवेशीं लिहीत गेलों आहें त्यावरून विदित होऊन बंदोबस्ताविशीं आज्ञा झाली पाहिजे. खासगत वर्तमान लिहून पत्रें फार पाठविलीं, परंतु उत्तर न आलें. पत्रें पावलीं नसतील हा संशय. त्यावरून राजश्री शिवरावभाऊ याजपाशीं हाद्र सर्व सांगितलें आहे. त्यानीं विनंति लिहिली आहे. त्यावरून श्रुत होऊन सेवकाची स्थापना करणार स्वामी समर्थ आहेत. हें सस्थान कैलासवासी श्रीमंत बाजीराव साहेबांनीं स्थापिलें. सहस्रावधि ब्राह्मणांचें पालग्रहण करणें हीच दृष्टि खावंदाकडून राहिली. पासष्ट वर्षें त्याचप्रमाणें खांवदांनीं कृपादृष्टि ठेवून निर्वाह

केला. तसा पुढें व्हावा. मी केवळ आशांकित आहें. आधार फक्त स्वामींचे चरणाचा आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.''

हें पत्र गेल्यानतर पेशवेसरकारानीं गोविंदरावांस सुभेदारीचीं वस्त्रे व आज्ञापत्र पाठवून बुंदेलखडचे सुभेदार कायम केले. तदनंतर नाना गोविंदराव ह्यानीं दिनकररावअण्णा व नारो भास्कर ह्याच्या साह्यानें आपल्या प्रांताचा उत्तम राज्यकारभार चालविला. नाना गोविंदराव हे आपल्या वडिलाप्रमाणेंच शूर व राजकारणपटु होते. त्यांनीं अल्पवेळामध्यें बुंदेलखंडामध्यें आपला उत्तम प्रकारचा बस बसवून प्रांताचा सुरेख बदोबस्त केला व सर्वत्र शांतता उत्पन्न केली. परतु लवकरच बुंदेलखडामध्यें युद्धास प्रारंभ होऊन त्या शांततेचा भग झाला व त्याच्या बरोबरच परकीय सत्तेचा प्रवेश होऊन तेथील मराठ्याची सत्ता अस्त पावली. तो प्रकार येणेंप्रमाणें:—

पुणेंदरबारात बाजीराव पेशवे गादीवर बसल्यापासून दिवसें-दिवस जास्त तटेबखेडे सुरू झाले, व त्याचा परिणाम युद्धापर्यंत येऊन पोहोंचला. शिंदे व होळकर ह्यांच्यामध्यें कलह उत्पन्न झाला. इतर मुख्य मुख्य मराठे सरदार आपसांमध्यें भाडू लागले. पेश-व्याच्या दरबारामध्यें मुख्य यजमान मूर्ख व पाजी असल्यामुळें हलकट लोकांचें वर्चस्व होऊन अनन्वित कृत्यें होऊं लागली व त्या योगानें पेशवाईचा दाब कमी होऊन चोहोंकडे बेबदशाही झाली. ह्याच समयास बाजीरावानीं बाळोजी कुंजराच्या मसलतीनें विठूजी होळकरास हत्तीच्या पायाशीं बांधून ठार मारिलें. त्यामुळें यशवंतराव होळकरास त्यांचा मनस्वी राग येऊन त्यानें पुण्यावर हल्ला केला व पुणें जाळून लुटून फस्त केलें. तेव्हां बाजीराव होळकराच्या भीतीनें पळून महाडास गेले व तेथून सुवर्णदुर्गास येऊन वसई मुक्कामीं आले. आणि तेथें इंग्रजांच्या हातापाया पडून मला गादीवर बसवा म्हणून विनंविणी करू लागले. इकडे यशवंतराव

होळकरानें अमृतरावास पेशवाईचीं वस्त्रें देऊन सर्व राज्यकारभार आपणाकडे घेतला होता, तेव्हा त्याचें पारिपत्य केल्यावाचून बाजीरावास गादी मिळण्याची आशा नव्हती. इंग्रजास तरी मराठ्यांचें स्वातन्त्र्य हरण करून आपला वरचष्मा कायम करण्यास अशीच संधि पाहिजे होती, व त्याप्रमाणें गव्हरनर जनरल लॉर्ड वेलस्ली हा एकसारखा प्रयत्नही करीत होता.* तों अनायासें ही उत्तम संधि

---

* ह्यासंबधानें एका इंग्रज इतिहासकारानें त्या वेळची वस्तुस्थिति लिहिली आहे ती अवश्य वाचण्यासारखी आहे.

"In 1801 the Mahratta Chiefs were quarrelling among themselves. Scindia, the greatest in territorial strength, and Holkar, the most restless and warlike in spirit, distrustful of each other, alternately menaced the Peishwa, of whose traditional pre eminence both were jealous, and whose enfeebled authority they sought to overthrow Lord Wellesley, bent on turning their enmities to account, and bringing them all into gradual dependence upon English aid, negotiated separately with each in turn, and by the adroit use of subtlety and daring, he succeeded ere long in drawing or driving them all into a state of dependency. His instructions to Colonel Close recite how "the Peishwa in 1798 preferred danger and independence to a more intimate connection with the British power, which could not secure him the protection of our arms without at the same time establishing our ascendency in the Mahratta empire,' how the Peishwa had reluctantly been forced into the war against Tippoo, how, when it was over, a proposition for a subsidiary force was made to him, which he refused, how hostile a disposition this manifested; how "the inference to be deduced from these considerations was, that until irresistibly compelled by the exigency of his affairs to have recourse to the assistance of the

प्राप्त झाली. तेव्हां त्यांनीं बाजीरावास गादीवर बसविण्याचें अभिवचन देऊन मराठ्यांचें सर्व स्वातंत्र्य, मराठ्याचा सर्व अभिमान व मराठ्याचें सर्व वैभव नष्ट करणारा वसई मुक्कामचा तह ठरावांत आणिला. ह्या तहानें 'ईश्वरी सत्तेनें पेशजीपासून दोस्तीचा मार्ग सरकार कंपनी इंग्रजबहादूर व सरदार राव पंतप्रधान बहादूर याजमध्यें मजबूत होता तो दृढतर केला' व 'सूर्य चंद्र आहेत तोंपावेतों श्रीमंत बाजीराव रघुनाथ पंतप्रधान बहादूर यांचे दौलतीची वृद्धि अधिकोत्तर व्हावी' अशी शाब्दिक योजना केली.! परंतु मुख्य हेतु मराठी साम्राज्य रसातळास घालून त्याच्या ठिकाणीं कंपनी सरकारचें सार्वभौमत्व स्थापन करावें असाच होता. तदनुरूप पुढें सर्व गोष्टी अमलांत आल्या, हें इतिहासवाचकास निराळें सांगावयास नकोच.

ह्या वसईच्या तहानें शिंदे, होळकर, भोंसले वगैरे सर्व सरदार बाजीरावानीं मराठ्याच्या सार्वभौम सत्तेची व सुखकर स्वातंत्र्याची राखरांगोळी केली ह्मणून जळजळूं लागले. कारण आपसामध्यें कितीही दुही माजली तरी सर्व सत्ता परक्याच्या हातीं देणें त्यास इष्ट वाटलें नाहीं. त्यामुळें ते वसईचा तह कबूल करण्यास सिद्ध नव्हते. इंग्रजास तर त्या तहाअन्वयें शिंदे, होळकर, आणि भोंसले

company; Baji Rao would never be induced to enter into any engagements which, in his apprehension, would afford to the British Government the means of acquiring an ascendency in the Mahratta empire," and how it was "his object to avoid that degree of control and ascendency which it was our interest to establish. Their increased distractions constituted a crisis of affairs favourable to the success of negotiations at Poona, and for the complete establishment of the interests of the British power in the Mahratta empire." —*Empire in Asia*, p. 240.

ह्याची शक्ति हरण करून त्यांच्यावर आपलें वर्चस्व स्थापन करण्यास उत्तम मार्ग झाला व त्याप्रमाणें ते प्रयत्न करूं लागले. पेशव्यांनीं इंग्रजांचें सैन्य मुणंदरबारीं ठेवलें ही गोष्ट त्यांना अतिमहत्वाची वाटली व त्यामुळेंच त्याना सर्व मराठे सरदारांचें आधिपत्य आपल्याकडे आलें असें वाटूं लागलें. परंतु शिंदे, होळकर वगैरे सरदाराच्या अंगीं अद्यापि स्वातन्त्र्याचें पाणी चमकत होतें त्यामुळें ते इंग्रजांस दाद देईनात. तेव्हा त्याची शक्ति हरण करण्यासाठीं आपोआप युद्धप्रसंग उत्पन्न झाला. त्यांत इंग्रज अधिकाऱ्यांनीं आपल्या चातुर्याची, राज्यकारस्थानाची, आणि केव्हां केव्हां युद्धशास्त्रशौंडत्वाची सीमा करून त्यास जेरीस आणिलें. साराश, हिंदुस्थानातील मराठी सत्तेचा सर्वस्वी नाश होण्यास वसईचा तह मुख्य कारण झाला ह्यात शंका नाहीं.

ज्या तहाच्या योगानें पेशव्यांची सार्वभौमसत्ता नष्ट झाली, शिंदे-होळकरादि सरदारांचें स्वातंत्र्य लोपलें, त्याचा परिणाम बुंदेलखंडावरही कांहीं तरी झाला पाहिजे हें उघड आहे. व त्याप्रमाणें तो तेथेंही झालाच. इंग्रजांस पूर्वींपासून बुंदेलखंडांत प्रवेश करून तो राजकीय दृष्ट्या अत्यंत मजबुतीचा टापू आपल्या ताब्यात आणावा अशी इच्छा होती. ती त्यानीं वसईच्या तहांत एक पोटकलम घालून तृप्त करून घेतली. वसईच्या तहाच्या योगानें इंग्रजास जो मुलूख मिळाला त्यांतील सावनूर आणि बंकापूर असे दक्षिणेकडील दोन तालुके व सुरतेजवळचा ओलपाड परगणा त्यानीं बाजीरावांस परत दिला व त्याच्या ऐवजीं बुंदेलखंडावरचा हक्क आपणाकडे घेतला. ह्या वेळीं बुंदेलखंडाचा वसूल ३६,१६००० रुपये होता. बाजीरावास परत दिलेल्या तालुक्याचें उत्पन्न १९,१६००० रुपये होतें. तेव्हा ह्या जास्त उत्पन्नाच्या ऐवजीं त्यांनीं आणखी सैन्य पेशव्यांच्या संरक्षणास देण्याचें कबूल केलें. 'हा वसईच्या तहांतला गोटठराव

ता० १६ डिसेंबर सन १८०३ रोजीं बाजीरावानें मान्य केला आणि उत्तर हिंदुस्थानांतील यमुनेकडील संरक्षणाचें उत्तम साधन व उत्पन्नाच्या मानानें केवळ सोन्याचा तुकडा जो बुंदेलखंड प्रांत तो इंग्रजाच्या स्वाधीन केला.

वसईच्या तहाच्या योगानें पेशव्यांकडून बुंदेलखंडातील प्रांताचा हक्क मिळाल्यानंतर इंग्रजास त्या प्रांतांत प्रवेश करण्यास फार श्रम करावे लागले नाहींत. तेथील बुंदेले राजे परस्परांशीं भांडत असल्यामुळें त्यांच्यामध्यें जुटीची शक्ति मुळींच नव्हती. पेशव्यांचे जालवणचे सुभेदार बाळाजी गोविंद व गंगाधर गोविंद हे मृत्यु पावल्यामुळें त्यांचाही दरारा नाहींसा झाला होता. इकडे बुंदेलखंडांतील पूर्वेकडचा बांदा वगैरे प्रांत पेशव्यांचे सरदार अलीबहादर ह्यानीं पुणेदरबारच्या हुकुमानें जिंकून तेथें मराठ्याचा स्वतंत्र सुभा संस्थापित केला होता ते अलीबहादरही कालिंजरच्या वेढ्यामध्यें ह्याच समयास मृत्यु पावले. त्यामुळें त्या सुभ्यामध्यें तटे उपस्थित होऊन तिकडूनही बुंदेलखंडांतील मराठी राज्यसत्तेचें पुष्टीकरण न होतां उलट शक्तिहरण होण्यास एक नवीन कारण झालें. हें नीट लक्षांत येण्याकरितां अलीबहादरांनीं बुंदेलखंड जिंकून बांदा येथें पेशव्यांचा सुभा कसा व केव्हां संस्थापित केला व तिकडे काय काय वर्तमानें झालीं त्याची हकीकत प्रथम सांगितली पाहिजे.

सन १७९० च्या सुमारास ज्या वेळीं बुंदेले राजांमध्यें परस्पर भांडणें सुरू असून बुंदेलखंडात सर्वत्र झोटिंगपातशाही सुरू झाली त्या वेळीं पुणेदरबारचे चतुर प्रधान नाना फडनवीस ह्यानीं समशेरबहादराचे चिरंजीव अलीबहादर यांस बुंदेलखंड सर करण्याकरितां पाठविलें. ह्या वेळीं उत्तर हिंदुस्थानात महादजी शिंद्याचें प्रस्थ फारच वाढलें असून त्यानीं स्वपराक्रमानें दिल्लीपर्यंत आपला

अंमल संस्थापित केला होता. शहाअलम बादशाहाचा कट्टा शत्रु जो गुलामकादर त्यास ठार मारल्यामुळें दिल्लीदरबारांत त्याचें फारच स्तोम माजून त्यांस बादशाहाकडून 'यारवफादार सीपेसाकर, रुस्तमे हिंद महादजी शिंदे फर्जंद अर्जमंद अलिजाबहादर मुजफरजंग' इत्यादि मोठमोठ्या किताबती मिळाल्या होत्या; व खुद्द बादशाहा त्याचा अंकित झाल्यामुळें त्याजकडून वकीलमुतलकीची व मीरबक्षीगिरीची सनद श्रीमंत पेशवे सरकारास देऊन पुणेदरबारात नाना फडनविसावर आपलें वर्चस्व स्थापन करण्याचा त्याचा विचार चालला होता. अशा शिरजोर झालेल्या सरदारावर पेशव्याचा कांहीं तरी दाब राहिला पाहिजे ह्मणून नानानीं अलीबहादरास बुंदेलखंडातील प्रांत सर करण्याच्या मिषानें तिकडे पाठविलें होतें व शिंदे होळकरादि सरदारास आणि झांशी, जालवण येथील सुभेदारास त्यांना साह्य करण्याबद्दल पत्रें पाठविली होतीं.

अलीबहादर ह्यांनीं उत्तर हिंदुस्थानात पोहोंचताच पेशव्यांच्या हुकुमानें आपलें सैन्य वाढवून व शिंदे होळकरादि सरदारांच्या बेबनाव आहे असें पाहून स्वतंत्रपणानें बुंदेलखंडातील प्रांत सर करण्याचा विचार केला. ह्याच समयास शिंद्याच्या लष्करांतून अलग झालेला गोसावी अनुपगीर हिंमतबहादर हा अलीबहादरास येऊन मिळाला. शिंद्यानीं त्यास पकडण्याकरिता एक सैन्याची टोळी पाठविली, परंतु ज्या अर्थी त्यानें पेशव्याच्या जरीपटक्याचा आश्रय केला त्या अर्थी अलीबहादरानीं त्यास शिंद्याच्या ताब्यात दिलें नाहीं. त्यावरून शिंद्यानीं अलीबहादरास वडीलपणाच्या नात्यानें सांगून पाठविलें कीं, "तुह्मी बऱ्या बोलानें हिंमतबहादरास आमच्या स्वाधीन करा; नाहींपेक्षा तुमच्यासारख्या लेंकराचा आमच्यापुढें निभाव लागणार नाहीं.' त्यावर अलीबहादर ह्यांनींही मोठ्या बाण्यानें असें उत्तर पाठविलें कीं, 'आपण आमच्या

वडिलाच्या हातचीं माणसें, तेव्हां आमच्याकडे लेंकुरपणा आहेच. तथापि ज्या अर्थी हिंमतबहाद्दरानें श्रीमंतांच्या जरीपटक्याचा आश्रय केला आहे, त्या अर्थी त्याची योग्यता आह्मास सभाळली पाहिजे.' * हें ऐकून पाटीलबावास त्यांचा मनस्वी राग आला. त्या वेळीं अलीबहाद्दर यानीं आपल्याबरोबर आलेली मुत्सद्दी मडळी सदाशिवपंत अवसरकर पुरदऱ्याचे दिवाण, आपाजीपंत दामले खासपथकाचे दिवाण, व भिकाजीपंत पाळदे इत्यादिकांस बोलावून सल्ला घेतली. तेव्हा त्यानींही हिंमतबहाद्दरासारखा बुंदेलखंडातील माहितगार व कारस्थानी मोहरा आपल्या हातीं सापडला आहे, त्या अर्थी त्यास श्रीमताच्या परवानगीवाचून शिंद्याच्या स्वाधीन करूं नये, असेंच सांगितलें व त्यास होळकरांनीं आपली अनुमति दिली. त्यामुळें शिंद्याचा व अलीबहाद्दर आणि होळकर ह्याचा जास्त बेबनाव झाला. इकडे हिंमतबहाद्दरानें बुंदेलखंडामध्यें कांहीं मुलूख बळकाविला होता, परंतु तो त्याच्याकडे राहण्याचा कांहीं मार्ग नव्हता. तेव्हा त्यानें अलीबहाद्दरास बुंदेलखंड सर करून देण्याचीं गोड गोड अभयवचनें देऊन त्याचें मन आपल्याकडे वळवून घेतलें. अलीबहाद्दरांसही त्याचें साह्य पाहिजे होतेंच. तेव्हां उभयतानीं मिळून चाळीस हजार सैन्य जमा केलें व प्रथंम नांद्याचा जहागीरदार कोणी नोनी अर्जुनसिंग ह्मणून होता त्याच्यावर चाल केली. त्यांची व अलीबहाद्दर याच्या

---

* विंचूरकर घराण्याच्या इतिहासामध्यें हिंमतबहाद्दर गोसावी हा शिवाजी विठ्ठल विंचूरकर ह्यांच्या ताब्यात असलेल्या जरीपटक्याखालीं गेला व त्यानीं त्यास अभय दिलें, अशा अर्थाचा मजकूर लिहिला आहे, पण त्यास दुसरा आधार नाहीं. होळकरांची कैफीयत व दुसरे कित्येक इंग्रजी ग्रंथ ह्यांवरून तो अलीबहाद्दरांकडे गेला असाच मजकूर आढळतो; व तोच जास्त संभवनीय दिसतो.

सैन्याची नऊगाव व अजयगड ह्यांच्यामध्यें मोठी लढाई होऊन तींत तो मारला गेला, व मराठ्यांच्या सैन्यानें त्याचें डोकें कापून तें अलीबहाद्दरांस अर्पण केलें. नतर अलीबहाद्दर व हिंमतगीर गोसावी ह्यांनीं बुंदेलखडांतील निरनिराळ्या राजांवर स्वाऱ्या करून प्रांत काबीज करण्याचा सपाटा चालविला. अलीबहाद्दरांनीं देवगांवच्या रोखें गढ्यावर चढाई केली व हिंमतबहाद्दरानें निराळें सैन्य घेऊन चरखारीवर चाल केली. तेथें त्यांच्याशीं बिजावरचा राजा बीरसिंगदेव ह्यानें लढाई केली, परतु तींत तो मारला गेला. नतर अलीबहाद्दरांच्या सैन्यानें छत्रपूरचा कुंवर सोनीशहा ह्याच्या पुरणमल्ल नांवाच्या सरदाराचा पराभव केला. हिंमतबहाद्दराच्या हाताखालच्या दुर्गागीर गोसाव्यानें मुरवालच्या गंभीरसिंग दुवा नामक एका बुंदेल्या पुढाऱ्याचा पराभव केला. अशा रीतीनें हिंमतबहाद्दर व अलीबहाद्दर ह्यानीं सर्व बुंदेलखंड अगदीं हालवून सोडलें. हिंमतबहाद्दरानें कर्नल मिसेलब्याक नामक एक वलदेजी साहेब आपल्या सैन्यावर मुख्य नेमिला होता; त्याचा बुंदेल्यांनीं राघोलीच्या लढाईंत पराभव केला. तरी हिंमतबहाद्दरानें आणखी सैन्य देऊन त्यास बुंदेल्यांवर पाठविलें. इकडे अलीबहाद्दरांनीं कोठीच्या राजावर स्वारी करून त्यास ठार मारिलें व पन्नाच्या राजाचा दिवाण बेणीहुजुरी याचा समाचार घेण्याकरितां त्याजवर चाल केली. मराठी सैन्याची व बेणीहुजुरीचा मुलगा राजधरहुजुरी ह्याची दुर्गाताल येथें अगदीं हातघाईची लढाई झाली. तींत बुंदेल्या सैन्याचा पराभव होऊन राजधरहुजुरी मोठ्या शर्थीनें पळून गेला.

अशा प्रकारें अलीबहाद्दरास एकसारखा विजय प्राप्त झाल्यानतर त्यांनीं बांदा येथें आपली राजधानी केली व पेशव्याच्या हुकुमानें नवीन मिळालेल्या प्रांताचा राज्यकारभार चालू केला.

पुण्याहून त्यांच्या साह्याकरितां नाना फडनविसांनीं गोरे* ह्या नांवाचे कारभारी पाठवून दिले होते. त्यांनीं तेथें आपला उत्कृष्ट अंमल

* गोरे ह्यांचे वंशज अद्यापि बादा येथें व इंदूर संस्थानात आहेत. ह्या घराण्यांतील कित्येक पुरुषांनी बुंदेलखंडात फार पराक्रमाचीं कामें केली. ह्याच घराण्यांतील अण्णासाहेब गोरे व त्यांचे चिरंजीव पांडुरंगरावतात्यासाहेब ह्यांनीं चरखारी संस्थानांत दिवाणगिरीचें काम करून फार उत्तम लौकिक संपादन केला. तात्यासाहेबासंबधानें पुढील माहिती मिळते. चरखारी संस्थानचे दिवाण अण्णासाहेब गोरे हे सन १८६७ मध्यें मृत्यु पावले व त्यांचे जागीं तात्यासाहेब यांची योजना झाली. ते अत्युत्तम राज्यकर्ते होते. त्यांनीं चरखारी संस्थानांत फार चांगल्या सुधारणा केल्या. त्यांच्या पूर्वी संस्थानामध्यें रस्ते, दवाखाने किंवा शाळागृहें नव्हतीं. तीं ह्यांनीं संस्थापित केलीं. चरखारी येथील स्टेट स्कूल हें बुंदेलखंडातील सर्व शाळागृहांमध्ये उत्कृष्ट आहे व त्याचें सर्व श्रेय तात्यासाहेबांकडे आहे. त्याचप्रमाणें त्यांनीं अनेक पुलाचें व जयसागर नामक तलावाचें फार सुंदर काम केलें आहे. त्यावरून ते शिल्पविद्येमध्यें (Engineering skill) परिपूर्ण होते असें दिसतें त्यांची कारकीर्द सर्व लोकांस फार सुखकर झाली. परंतु संस्थानांतील आपमतलबी व लुच्चे लोकांस आणि खुद्द तेथील अज्ञान व तरुण राजास ती प्रिय झाली नाहीं. तेव्हां त्यानीं पोलिटिकल एजंटकडे संधान बांधून राजास मुखत्यारी मिळविली व तात्यासाहेबाचा अधिकार कमी करण्याचा प्रयत्न केला त्या वेळी तात्यासाहेबानीं स्वाभिमानानें दिवाणगिरीचा राजीनामा दिला. व संस्थानच्या कुटिल लोकांचें पारिपत्य न करितां त्या सर्वांस क्षमा केली. ते नेहमीं पुढील दोहा ह्मणत असत:—

क्षमा बडन को उचित है ओछन के उत्पात ।<br>
कहा विष्णु को घट गयो भृगुने मारी लात ॥ १ ॥

ह्याचा अर्थ 'थोर लोकांनीं हलक्या लोकांच्या कृत्तीबद्दल क्षमाच केली पाहिजे. भृगूनें विष्णूस लाथ मारली त्या वेळीं विष्णूनें काय केलें?' ह्या थोर गृहस्थाची कीर्ति चरखारी संस्थानाचे लोक फार गात असतात.

बसवून सुरेख व्यवस्था केली. नतर अलीबहाद्दरांनीं आपणांस नवाब असा किताब धारण केला, व नाना फडनविसांच्या साह्यानें पेशवे सरकाराकडून बांदा प्रांताची सनद मिळविली. अलीबहाद्दर हे मोठे शूर असल्यामुळें त्यांनीं आणखी सैन्य जमवून व अनेक मराठे सरदार पदरीं बाळगून बुंदेलखंडांतील पूर्वभागांत मराठ्यांची सत्ता वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न केला. यशवंतराव नाईक ह्मणून एक त्यांचा शूर मराठा सरदार होता, त्यास त्यांनीं दहा हजार सैन्य देऊन रेवाच्या राज्यावर पाठविलें. त्या मोहिमेमध्यें तो एकाएकीं मारला गेला. तेव्हां बुंदेल्यांस पुनः मोकळीक सांपडून त्यांनीं लूटमार करण्यास प्रारंभ केला. परतु अलीबहाद्दरांनीं अजयगडास वेढा घालून तेथील प्रचंड किल्ला सहा आठवड्यांत काबीज केला व जेतपुरावर स्वारी करून तें शहर हस्तगत केलें. अशा रीतीनें अलीबहाद्दरानीं आपली पराक्रमशक्ति बुंदेल्यांस उत्तम प्रकारें दाखवून त्यांस चळचळ कांपावयास लाविलें. ह्यामुळें पुणेदरबारांत त्यांच्या शौर्याची जास्त जास्त वाहवा होऊन त्यास तिकडून विशेष प्रोत्साहन मिळालें. त्यामुळें त्यानीं पुनः मोठ्या उमेदीनें बघेलखंडावर चाल करून रेवाच्या राजापासून बारा लक्ष रुपये खंडणी घेतली व हिंमतबहाद्दराच्या मध्यस्तीनें तेथील राजास जीवदान दिलें. येणेंप्रमाणें एकसारखे विजय मिळविल्यानतर अलीबहाद्दरांनीं कलिंजरचा बळकट किल्ला तेथील चौबे जहागीरदाराकडून घेण्याचा निश्चय केला. चौबे जहागीरदार महा प्रबल असल्यामुळें तो मुकाट्यानें अलीबहाद्दरास शरण येईना. तेव्हा अलीबहाद्दरांनीं कलिंजरच्या किल्ल्यास वेढा दिला, व त्या राजास जर्जर करून सोडण्याचा प्रयत्न केला. परतु तो किल्ला अजस्र व दुर्भेद्य असल्यामुळें तो कांहीं केल्यानें हस्तगत होईना. तेव्हां हा बाणेदार वीर किल्ल्यापुढें मोर्चे लावून सतत दोन वर्षे तेथें मुक्काम करून राहिला, आणि शेवटीं सन १८०२ मध्यें तेथेंच

त्याचा अंत झाला. अलीबहाद्दर ह्यास समशेरबहाद्दर व झुल्पिकारअली असे दोन मुलगे होते. पैकीं वडील मुलगा समशेरबहाद्दर ह्या वेळीं पुण्यास असल्यामुळें अलीबहाद्दरचा मेहुणा गनीबहाद्दर ह्यानें हिंमतबहाद्दर गोसाव्याच्या साह्यानें झुल्पिकारअलीस गादीवर बसवून बांदा येथें स्वतंत्र राज्यकारभार चालविला.

अलीबहाद्दर मृत्यु पावल्यानंतर पेशव्याचा त्या सुभ्याशीं नाममात्र संबंध राहून त्याची सर्व सत्ता अलीबहाद्दराचा मेहुणा गनीबहाद्दर, हिंमतबहाद्दर गोसावी, व सबसुखराय वगैरे पुंड लोकांच्या हातांत गेली होती. ती परत घेण्याकरितां अलीबहाद्दराचा मुलगा समशेरबहाद्दर हा पुण्याहून बुंदेलखंडात गेला व सैन्य जमवून आपल्या बापाचा प्रांत हस्तगत करूं लागला. समशेरबहाद्दर हा आपल्या बापाप्रमाणेंच शूर असल्यामुळें व त्यास सर्व मराठे सरदारांचें साह्य मिळाल्यामुळें त्यानें कलिंजरच्या किल्ल्यास वेढा घालून गनीबहाद्दरास पकडून कैद केलें, व त्याची सर्व संपत्ति हस्तगत करून स्वतः नबाबाचीं वस्त्रें धारण केलीं. नंतर त्यानें गनीबहाद्दरास साह्य असलेल्या हिंमतबहाद्दरप्रभृति मंडळीची खोड मोडण्याचा निश्चय केला. तेव्हां तो स्वार्थपटु गोसावी समशेरबहाद्दरास भिऊन इंग्रजाकडे गेला व त्याना बुंदेलखंडांत सैन्य घेऊन या ह्मणजे तुह्मांस मराठ्याच्या ताब्यांतील सर्व प्रांत मिळवून देतों असें ह्मणू लागला. त्यावरून इंग्रज अधिकाऱ्यांनीं मि० जॉन मिसेलब्याक ह्याच्या मध्यस्तीनें त्याच्याशीं दोस्तीचा तह केला. त्यामध्यें त्यानें, 'माझा दर्जा व मानमरातब कायम ठेवावा, अयोध्येच्या नबाबाकडून माझा भाऊ राजा उमरावगीर ह्यास बंधमुक्त करावें; माझ्या कुटुंबाकरितां अंतर्वेदींतील सिकंदरा व बेंदकी हे दोन परगणे जहागीर द्यावे, माझ्या रिसाल्याकरितां बुंदेलखंडातील वीस लक्षाची जायदाद द्यावी, इंग्रजांस युद्ध-

प्रसंगीं मदत करण्याकरिता मी एका पायावर तयार आहें, तेव्हां मला आणखी सैन्य ठेवण्यास कांहीं खर्च लागला तर तो द्यावा, नवीन प्रांत काबीज केल्यानंतर तेथील राजे लोकांशीं व जहागीरदारांशीं जेवढे तह वगैरे होतील ते माझ्या मध्यस्तीनें व्हावेत; व जर पेशव्यांशीं तह वगैरे झाला तर माझी जहागीर कायम ठेवावी,'* वगैरे स्वतःस फायदेशीर होणारीं सर्व कलमें इंग्रजाकडून कबूल करवून त्यास साह्य करण्याचें मान्य केलें. इंग्रजास असा कोणी तरी स्वदेशभूमीशीं कृतघ्न होऊन स्वार्थलोभानें मदत करणारा पाहिजे होताच. तेव्हां त्यानीं हिंमतबहाद्दरास 'महाराजा हिंमतबहाद्दर' अशी किताबत देऊन त्याचें सर्व म्हणणें कबूल केलें हें निराळें सांगावयास नकोच.†

हिंमतबहाद्दर हा इंग्रजास अनुकूल झाल्यानंतर कर्नल पॉवेल नामक एक सेनापति स्वसैन्यानिशीं बुंदेलखंडात आला व त्यानें हिंमतबहाद्दराच्या साह्यानें समशेरबहाद्दराच्या सैन्याशीं युद्ध केलें. समशेरबहाद्दरास मदत करण्याकरिता जालवणचे सुभेदार नाना गोविंदराव ह्यांनी आपली फौज पाठविली होती. परंतु हिंमतबहाद्दरासारखा मराठ्याचा पूर्ण माहितगार सरदार विरुद्ध पक्षास मिळाल्यामुळें समशेरबहाद्दरास कोणत्याही लढाईंत यश आलें नाहीं. त्यामुळें त्याचा निरुपाय होऊन तो ब्रिटिश सरकारचा पोलिटिकल एजंट क्यापटन बेली ह्यास शरण आला, व सालीना चार लाख रुपये

* Aitchison's Treaties, Vol. V

† हिंमतबहाद्दर हा सन १८०४ मध्यें मृत्यु पावला त्यास एका बेगमेपासून नरेंद्रगीर ह्या नावाचा मुलगा झाला होता. तो लहान असल्यामुळें हिंमतबहाद्दराचा भाऊ उमरावगीर हा त्याच्या १३ लक्षांच्या जहागिरीचा कारभार पहात होता. पुढें इंग्रजांनी ती जहागीर खालसा केली, व त्यांच्या वंशजास पेनशनें करून दिलीं.

पेनशन घेऊन त्यानें आपला सर्व प्रांत ब्रिटिश सरकारच्या ताब्यात दिला.*

अशा रीतीनें बुंदेलखंडांतील बलाढ्य पुरुष हस्तगत झाल्यानतर इंग्रज अधिकाऱ्यानीं पेशव्याचे सुभेदार नाना गोविंदराव व झांशीचे सुभेदार शिवरावभाऊ ह्यांना आपल्या अमलाखालीं आणण्याचा प्रयत्न चालविला. काल्पीचा बळकट किल्ला अद्यापि नाना गोविंदरावांच्या ताब्यात होता; परंतु तो त्याच्याकडून सहज रीतीनें हस्तगत होण्याची आशा नव्हती. तेव्हां त्यानीं त्यावर हल्ला करून तो जिंकण्याचा प्रयत्न केला. नाना गोविंदरावांच्या किल्लेदारानें काल्पीचें उत्तम संरक्षण करून इंग्रज सैन्याशीं तुमुल युद्ध केलें, व आपल्या शौर्याची पराकाष्ठा करून सोडली. पण अखेर अनेक कारणामुळें त्यांच्या शौर्याचा निरुपाय होऊन त्यांना आपला किल्ला इंग्रजांच्या ताब्यांत देणें भाग पडलें! समशेरबहादुराच्या युद्धामध्यें गोविंदरावाच्या सैन्याची फार हानि झाली होती. तशात काल्पीचा किल्ला गेल्यामुळें त्याच्या अंगीं इंग्रजांशीं टक्कर देण्याचें सामर्थ्य राहिलें नव्हतें. त्यातून सभोंवतालचे सर्व बुंदेले राजे हिंमतबहादुराच्या हितमंत्रानें इंग्रजास अनुकूल झाल्यामुळें व झांशीचे सुभेदार

---

* समशेरबहादुर हा चार लक्ष रुपये पेनशन घेऊन बांदा येथें रहात असे. पुढें तो मृत्यु पावल्यानतर त्याचा भाऊ झुल्पिकारअली ह्यास चार लक्ष रुपये पेनशन व बांदाचा नबाब ही कितापत चालत असे तो सन १८५० साली मृत्यु पावला. त्याच्या पश्चात् त्याचा मुलगा अलीबहादुर हा नबाब झाला. तो १८५७ च्या बंडामध्यें, तात्या टोपी, झांशीची राणी वगैरे बंडवाल्यांकडील प्रमुख मंडळीस सामील होऊन इंग्रजाबरोबर लढत होता परंतु पुढें तो शरण आला तेव्हा त्यास वर्षाचे ३६००० रुपये पेनशन करून इंदुरास नजरकैदेंत ठेविलें होतें. त्याचे वंशज अद्यापि इंदुरास असून 'बांदेवाले नबाब' ह्या नांवानें प्रसिद्ध आहेत.

शिवरावभाऊ हेही ब्रिटिश सरकारचे दोस्त झाल्यामुळें नानांस आपलें स्वातंत्र्य गमावून कृपाळु इंग्रज सरकारच्या संरक्षणाखालीं जाणें भाग पडलें. तेव्हां त्यांनीं ता. २३ आक्टोबर सन १८०६ रोजीं बांदा येथें इंग्रजांचे मुखत्यार क्यापटन जॉन बेली ह्यांजबरोबर दोस्तीचा तह ठरविला. त्यांतील सारांश येणेंप्रमाणें:—

१. नाना गोविंदराव ह्यांनीं कंपनी सरकारचा स्नेहभाव मान्य करावा आणि ब्रिटिश सरकारच्या किंवा त्यांच्याशीं दोस्ती बाळगणाऱ्या संस्थानिकांच्या मुलुखास उपद्रव देऊं नये व ब्रिटिश सरकारच्या शत्रूस आश्रय देऊं नये.

२. नाना गोविंदराव ह्यांनीं ईस्ट इंडिया कंपनीस व तिच्या वारसदारास काल्पीचा किल्ला, शहर व जिल्हा आणि यमुनेच्या उजव्या तीरावरील काल्पी व रायपूर ह्यांच्यामधील सर्व गांवें व त्यांचे वंशपरंपरेनें चालत आलेले हक्क द्यावेत.

३. ब्रिटिश सरकारचा कोणी अपराधी नानांच्या मुलुखांत आला तर तो ताबडतोब पकडून ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या स्वाधीन करावा.

४. ब्रिटिश सरकारानीं काल्पीच्या मोबदला नाना गोविंदरावास तितक्या किंमतीचा मुलूख व बेटवा नदीच्या पूर्वेचीं व कोंच जिल्ह्याच्या सरहद्दीपर्यंतचीं सर्व गांवें द्यावींत. नानांनीं कोंच जिल्ह्यातील ब्रिटिश अधिकाऱ्यास लागेल तें साह्य करावें. व आपल्या मुलुखातून जाणाऱ्या ब्रिटिश सैन्यास लागेल ती सामुग्री व वाटाडे वगैरे द्यावेत.

५. ज्या अर्थी नाना गोविंदराव ह्यास त्यांच्या ताब्यांतील मुलुखाचे स्वतंत्र मुखत्यार कबूल केलें आहे, त्या अर्थी त्यांच्या अंतर्बाह्य प्रदेशामध्यें असलेल्या शत्रूच्या विरुद्ध ब्रिटिश सरकारच्या मदतीवर त्याचा कोणताही हक्क नाहीं, व ब्रिटिश सरकाराचाही नानावर ह्या तहात नमूद केलेल्या गोष्टींपेक्षा दुसरा कोणताही हक्क नाहीं.

६. नानांचे भाऊबद, कर्जदार किंवा नौकर हे त्यांच्या विरुद्ध ब्रिटिश सरकाराजवळ कांहीं तक्रार करतील तर ती खरी असो वा नसो, तिच्या संबधानें ब्रिटिश सरकारानें पचाईत करूं नये. त्याचा विचार नाना गोविंदराव आपल्या मर्जीप्रमाणें करतील.

७. पन्ना येथील हिऱ्यांच्या खाणींतला तिसरा हिस्सा पेशवे सरकारानीं नाना गोविंदराव ह्याच्याकडे सोंपविला असून अलीबहाद्दरांची ह्या प्रातांत सत्ता झाली तरी तो चालत आला आहे, त्या अर्थी ब्रिटिश सरकाराकडे जर त्या खाणीचा कांहीं भाग आला, तर त्यांनीं नानाच्या हिश्शास कोणत्याही प्रकारें अडथळा करू नये.

८. नाना गोविंदराव ह्यांचे ब्रह्मावर्त, काल्पी, रायपूर किंवा बनारस येथें जे वाडे व बागा असतील त्यांच्यावर ब्रिटिश सरकारची मालकी नसून ती सर्व नानाची व त्यांच्या नातेवाईकांची खाजगी मिळकत समजून तिच्यावर त्यांचा हक्क राहील.

९. नाना गोविंदराव यांच्या ताब्यांत सागरसह बुंदेलखडातील जे प्रात आहेत व त्यांतील जे हक्क आहेत, ते ह्या तहानें मान्य केले असून त्यावर ह्यापुढें कंपनी सरकार किंवा त्याचे वारसदार कधींही आपला हक्क चालविणार नाहींत, व नाना गोविंदरावांच्या व त्यांच्या वारसदारांच्या प्रांतांस कधींही उपद्रव करणार नाहींत.

१०. ह्या दहा कलमाचा तह बांदा येथें गव्हरनर जनरलचे एजंट क्याप्टन जॉन बेली व नाना गोविंदराव याचे वकील भास्करावअण्णा पंडित व राव कृष्णराव ह्यांच्यामध्यें ठरला जाऊन परस्पराच्या सही शिक्क्यांनिशीं तहाचे कागद परस्परांस दिले आहेत. ते गव्हनर जनरल ह्यांच्याकडून मान्य होऊन आल्यानतर अमलात येतील. ता० २३ आक्टोबर १८०६ संवत् १८६३.

हा तह मंजूर झाल्यानतर नाना गोविंदराव हे जालवण येथें राहून आपल्या प्रांताचा राज्यकारभार करू लागले. ह्यानतर पेश-

त्याच्या दरबाराचा त्याच्याशीं विशेष संबंध राहिला नाहीं; तथापि त्यानीं त्याचें सेव्यसेवकाचें नातें सोडिलें नाहीं. जालवणचे प्रमुख सुभेदार नाना गोविंदराव व झांशीचे सुभेदार शिवरावभाऊ हे इंग्रज सरकारचे दोस्त झाल्यानंतर बुंदेलखंडांत ब्रिटिश सत्ता स्थापन होण्यास फारसा विलंब लागला नाहीं.

सन १८०६ सालच्या तह झाल्यानंतर सन १८१७ पर्यंत नाना गोविंदरावानीं आपला कारभार सुयंत्रित चालविला होता, परंतु सन १८१७ सालीं इंग्रजानीं बाजीरावाकडून बुंदेलखंडचें सर्व स्वामित्व आपल्याकडे घेऊन नाना गोविंदरावांशीं पुनः दुसरा तह केला. तो येणेंप्रमाणें:—

ज्या अर्थी ब्रिटिश सरकार व श्रीमंत पंतप्रधान पेशवे ह्याच्यामध्यें ता० १३ जून १८१७ रोजीं झालेल्या तहाअन्वयें नाना गोविंदराव व त्यांच्या ताब्यांतील मुलूख यांजवरील सार्वभौम स्वामित्वाचा हक्क पेशवे सरकाराकडून ब्रिटिश सरकारास देण्यांत आला आहे, त्या अर्थी नानाकडून खंडणी घेणें व युद्धाचे वेळीं नौकरी घेणें व वंशपरंपरेनें चालत असलेल्या नानाच्या मुलखावरील त्यांचा योग्य हक्क ठरविणें वगैरे सर्व अधिकार ब्रिटिश सरकाराकडे आले आहेत. परंतु काहीं शर्तीवर ते सोडून देण्यास ब्रिटिश सरकार कबूल आहे. व त्याप्रमाणें परस्पराच्या संमतीनें पुढील तह ठरविण्यात येत आहे.

१. क्याप्टन जॉन बेली व नाना गोविंदराव ह्याच्यामध्यें ता० २३ आक्टोबर सन १८०६ मध्यें जो तह झाला आहे त्याचीं सर्व कलमें ह्या तहात झालेल्या फेरफाराखेरीज पूर्णपणें मंजूर आहेत.

२. ब्रिटिश सरकार ह्या तहाच्या योगानें नाना गोविंदराव, त्यांचे वारस व कायममुक्काम ह्याच्याकडून लढाईच्या वेळीं फौजेची मदत किंवा वार्षिक खंडणी घेण्याचा आपला हक्क सर्वस्वीं सोडून देत आहे व नाना गोविंदराव, त्यांचे वारस व कायममुक्काम हे सांप्रत

त्यांच्या ताब्यांत असलेल्या सर्व प्रांतांचे वंशपरंपरेचे मालक आहेत असें मान्य करीत आहे.

३. ब्रिटिश सरकार आणखी असेंही मान्य करीत आहे कीं, नानांच्या प्रांतावर कोणी परशत्रूनें स्वारी केली तर त्यांचें त्यानीं रक्षण करावें. ज्या वेळीं नानाच्या प्रांतावर अशा तऱ्हेचा कांहीं वादग्रस्त हक्कासंबधानें किंवा कोणत्याही कारणामुळें परशत्रूकडून स्वारी होण्याचा संभव असेल, त्या वेळीं त्यानीं ब्रिटिश सरकारास अगोदर सूचना द्यावी, ह्मणजे ते मध्यें पडून तडजोड करतील, व ती त्यांच्या न्यायीपणावर व समदृष्टीवर लक्ष देऊन नानानीं मान्य करावी.

४. नाना गोविंदराव ह्यानीं महोबा परगण्यांतील कुंडा महाल, चुरखी परगण्यांतील यमुनेच्या काठचीं कांहीं गांवें इ० इ० ब्रिटिश सरकारांत सर्व हक्कांसह द्यावीं.

५. ब्रिटिश सरकाराशीं दोस्तदारीनें वागणाऱ्या कोणत्याही राजाविरुद्ध किंवा संस्थानिकांविरुद्ध नानास कधीं तक्रार करण्याचें कारण उत्पन्न होईल, तर नानांनीं ब्रिटिश सरकारास तें कळवावें व ते त्याचा जो निकाल करतील तो त्यानीं मान्य करावा, आणि त्यांनीं आपण होऊन त्याच्यावर स्वारी करूं नये किंवा त्याचें पारिपत्य करूं नयें.

६. नाना गोविंदराव ह्यांनीं ब्रिटिश सरकारच्या संमतीवांचून व माहितगारीवाचून कोणत्याही परराष्ट्राशीं पत्रव्यवहार ठेवू नये.

७. ब्रिटिश सरकार व नाना गोविंदराव ह्याच्या राज्यातील सरहद्दीचे वादाचा निकाल करण्याकरितां नानानीं आपल्या सरहद्दीवरच्या सर्व अमलदारांस पोलिटिकल सुपरिंटेंडेंटच्या हुकुमाप्रमाणें चालण्याची परवानगी द्यावी. ह्मणजे वारंवार नानाकडे त्यासंबधानें पत्रव्यवहार करून विलंब लागण्याचें कारण पडणार नाहीं. त्याच-

प्रमाणें नानाच्या प्रजेनें ब्रिटिश प्रजेचा कांहीं अपराध केला असेल तर त्याचा पोलिटिकल सुपरिंटेंडट जो न्याय करतील तो त्यानीं पूर्णपणें लक्षात घ्यावा. नवीन सरहद्द ठरविण्यासंबधानें ह्यापुढें वाद उपस्थित होण्याचा संभव आहे ह्मणून तह झाल्या दिवशीं जो ज्याचा कबजा असेल त्याप्रमाणें उभय पक्षानीं सरहद्द ठरवावी.

८. सागर प्रांतात नाना गोविंदराव यांचे जे हक्क आहेत त्यांस अपाय करण्यासारखा ब्रिटिश सरकारानें सागरचे व्यवस्थापक विनायकराव किंवा बाईसाहेब ह्याच्याबरोबर तह करू नये. उलट त्यांनीं आपल्या मध्यस्तीनें नाना गोविंदराव व सागरचे व्यवस्थापक ह्यांच्यामध्यें असलेल्या तंट्याची समाधानकारक तडजोड करावी.

९. ज्या वेळीं ब्रिटिश सरकारास नाना गोविंदरावाच्या राज्यातून आपलें सैन्य पाठविण्याचा किंवा तेथें तें ठेवण्याचा प्रसंग येईल त्या वेळीं ते आपल्या मर्जीप्रमाणें व्यवस्था करतील व त्यांस नानानीं आपली पूर्ण संमति द्यावी. अशा प्रसगीं ब्रिटिश सैन्याचा मुख्य सेनापति नानाच्या अंतस्थ राज्यकारभारामध्यें मुळींच पडणार नाहीं. ब्रिटिश सैन्यास नानाच्या हद्दींत असताना जें सामानसुमान लागेल तें नानाच्या अधिकाऱ्यानीं व प्रजेनें पुरवावें, व त्याचा बाजारभावाप्रमाणें आकार घ्यावा.

१०. हा दहा कलमांचा तह ब्रिटिश सरकारतर्फे मुखत्यार जॉन बौचॉप व नाना गोविंदराव ह्याच्या तर्फे वकील आबा बळवतराव ह्यामध्यें जालवण येथें ता. १ नोव्हेंबर सन १८१७ रोजीं ठरला जाऊन त्याच्या इंग्रजी, पर्शियन व हिंदी भाषेंतील नकला सहीशिक्क्यानिशीं देण्यात आल्या व गव्हरनर जनरल मार्किस ऑफ हेस्टिंग्ज ह्याच्या सहीकरिता व नाना गोविंदरावाच्या सहीकरिता त्या पाठविण्यांत येऊन त्यांच्या मजुरीनें तो तह मान्य झाला.

हा तह झाल्यानंतर पुणें येथें इंग्रज आणि पेशवे ह्यांचे युद्ध

सुरू होऊन त्यांत महाराष्ट्रराज्यसत्तेचा समूळ नाश झाला! मराठ्याचा वैभवसूर्य अस्तास गेला आणि त्याच्या पायामध्यें पारतन्त्र्यशृंखला अडकून त्याना दारिद्र्याचें दुःसह दुःख भोगण्याची पाळी आली! तथापि दुःखात सुख इतकेंच कीं, त्यांना कृपाळु इंग्रज सरकारचें राज्यछत्र प्राप्त झाल्यामुळें भावी उन्नतीची आशा वाटण्यास काहीं तरी जागा राहिली!! अस्तु.

सन १८१८ सालीं राव बाजींनीं सर जॉन मालकम साहेबाच्या हातावर पेशवाईचें उदक सोडून ब्रह्मावर्त क्षेत्रीं आठ लक्ष रुपये पेनशन घेऊन राहण्याचें कबूल केल्यानंतर नाना गोविंदराव हे फार दिवस वांचले नाहींत. ते सन १८२२ मध्यें मृत्यु पावले.

नाना गोविंदराव हे सर्व बुंदेलखंडात प्रसिद्ध असून ब्रिटिश सरकारामध्येंही त्यांची फार योग्यता असे. त्यानीं आपल्या कारकीर्दीत दिवाण नारो भास्कर व गुलसराईचे दिनकररावअण्णा ह्याच्या सल्लामसलतीनें राज्यव्यवस्था फार चांगल्या प्रकारें करून प्रजेस सुखी व संतुष्ट केलें होतें. त्यामुळें त्याच्या मृत्यूनें सर्व प्रजेस अत्यंत दुःख झालें. खुद्द बुंदेलखडचे पोलिटिकल एजट मोदीसाहेब ह्यानाही फार वाईट वाटलें, व त्यानीं नाना गोविंदरावाचे अल्पवयी चिरंजीव व जालवणच्या गादीचे मालक बाळाजी गोविंद ह्यास दुखवट्याचें पत्र लिहून असें कळविलें कीं, 'तुमचे तीर्थरूप नाना गोविंदरावसाहेब यास वैकुंठवास झाला, तेणेंकरून बहुत दुःख व मोठा आफसोस जाहाला! परंतु सृष्टीचा क्रम समजता विवेकाशिवाय दुसरा उपाय नाहीं. यास्तव विवेक करून जरूर करून आपणास लिहिण्यात येतें कीं, ईश्वरी इच्छेवर नजर देऊन सरकार कंपनी अंग्रेजबहाद्दर यांची नाना गोविंदराव याचे दौलतीचे औरस सरदार याजवर मेहेरबानगी आहे. हें समजोन दिलजमई करून स्वस्थ-

चित्तानें राज्याचें कामकाज करावें' * मोदीसाहेब हा थोर मनाचा मनुष्य असून जालवणच्या गादीसंबंधानें त्याच्या मनांत फार पूज्य-बुद्धि वसत असल्यामुळें त्यानें हिंदुस्थान सरकाराकडे नाना गोविंद-रावाचें मृत्युवृत्त लिहून पाठविलें, व त्यांत नाना गोविंदराव ह्यांनीं शेवटपर्यंत ब्रिटिश सरकाराशीं स्नेहभावानें व एकनिष्ठेनें जें उत्तम वर्तन केलें, त्याचें दिग्दर्शन करून त्यांच्यामागें त्यांचे चिरंजीव बाळाजी गोविंद ह्यांस गादीवर बसविण्याची शिफारस केली. त्या-प्रमाणें हिंदुस्थान सरकाराकडून ता० ७ माहे मार्च सन १८२३ रोजीं, बाळाजी गोविंद यांच्या नांवें फार नम्रतेचें व प्रेमभावाचें पत्र आलें. त्यांत नाना गोविंदरावांच्या मृत्यूबद्दल फार दुःख प्रदर्शित करून व त्यांच्या जागीं बाळाजी गोविंदास जालवणच्या गादीचे मालक कबूल करून त्यास सनद व राज्याधिकाराचीं वस्त्रें पाठविलीं. त्या पत्रामध्यें 'ब्रिटिश सरकाराशीं ज्याप्रमाणें तुमचे वडील उमेद व बक्षीस व मेहरबा-नगी सरकाराकडून होणेकरितां नजरमजबुती, ताबेदारी, व खैर-खवाई ठेवीत होते तशी सरकार कंपनीचे निसबतीस तुह्मीं ठेवावी. हमेशा इतलाह कीं तुह्मीं पेश पोंचविणें व आहदनाम्यामाफक तफावत न पडतां शर्तो बजावून आणणें व तमामी अनेक प्रकारची युक्त ताबेदारी आहे ती बजावीत जावी. ज्यांत सरकारचे अहलका-रांची बक्षीस व मेहेरबानगी तुह्मावर होईल व त्याचे तर्फेनें जो बंदो-बस्त निसबत इलाखे जालवणचा ठराव जाहला आहे त्यात कोण-तीही तफावत पावणार नाहीं. उमेद आहे कीं, दोस्तास हमेशा खुषखबरी खैरीयत मिजाज दोस्तीचा मिळाला समजोन आपली खैर आफीयत लिहून संतोषवीत असावें,' अशी विनति केली होती.

* ता० २९ माहे आक्टोबर सन १८२२ रोजीं पोलिटिकल एजट-कडून आलेल्या खलित्याचा तर्जुमा.

हें पत्र मोदीसाहेबांनीं बाळाजी गोविंद यास सादर करून त्यास झालवणच्या राज्यावर मोठ्या समारभानें अधिष्ठित केलें. बाळाजी गोविंदाचें वय ह्या वेळीं अगदीं लहान होतें ह्मणून संस्थानचा सर्व कारभार नाना गोविंदरावांचे विश्वासू व माहितगार दिवाण नारो भास्कर व गुलसराईचे दिनकररावअण्णा ह्याच्यावर सोंपवून राज्याचा उत्तम बदोबस्त होईल अशी तजवीज केली.

नाना गोविंदरावाच्या मृत्यूबद्दल अनेक बुंदेले राजे व संस्थानिक ह्याच्याकडून दुःखप्रदर्शक पत्रें आलीं होतीं. झालवणच्या संस्थानिकाचे खरे स्वामी श्रीमंत बाजीरावसाहेब पेशवे हे दुर्दैवाच्या विचित्र गतीनें राज्यसूत्रें सोडून ह्या समयीं ब्रह्मावर्तास गंगातीरीं अर्घ्यप्रदान करीत बसले होते. त्याचा नाना गोविंदरावावर फार लोभ असल्यामुळें व तेही त्याच्याशीं, विपद्ग्रस्त झाले तरी आपले प्रभु आहेत असें समजून पूज्यभावानें वागत असल्यामुळें त्याचें मृत्युवृत्त ऐकून त्यास फार वाईट वाटलें व त्यानीं नाना गोविंदराव ह्याचे चिरंजीव बाळाजी गोविंद ह्यास दुखवट्याचीं वस्त्रें व सात्वनपत्र पाठविलें. तें येणेंप्रमाणेः—

"राजश्रिया विराजितें राजमान्य राजश्री बाळाजी गोविंद
स्वामी गोसावीः—

पोष्य बाजीराव रघुनाथ प्रधान नमस्कार विनती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहित जाणें, विशेष. गोविंदराव गंगाधर यास देवाज्ञा झाल्याचें वर्तमान समजल्यावर चित्तास वाईट वाटलें. पूर्ववयात काल जाहाला. ईश्वरी नेमास उपाय नाहीं. तुह्मीं खेद करू नये. विवेकानें चित्ताचें सात्वन करावें. तुमचे पणजे गोविंद बल्लाळ यांजपासून सरकारची सेवा एकनिष्ठेनें कसी कसी होत आली हें लक्षात आहे. सांप्रत तुमचें वय लहान ह्मणोन चित्त व्यग्र होईल तें होऊं न देणें. हल्लीं तुह्मास वस्त्रें सणगें,

१ तिवट लाल. १ किनखाब लाल.

१ शालजोडी निबोली. २ महमुद्या.

एकूण पाच पाठविलीं आहेत. घेऊन पावलियाचें उत्तर पाठवणें जाणिजे. छ. ५ रबिलावल सु|| सलास आशरीन मयातेन व अलफ बहुत काय लिहिणें हे विनती."

ह्याच प्रसंगीं बाजीरावसाहेबानीं नारो भास्कर व दिनकरराव-अण्णा ह्यानाही स्वतंत्र पत्रें लिहून 'राजश्री बाळाजी गोविंद यांचें वय लहान, खेदेंकरून चित्त व्यग्र होईल. तरी तुह्मीं विचाराच्या मार्गें त्याच्या चित्ताचें सांत्वन करणें' असें सांगितलें होतें. त्याप्रमाणें दिनकररावअण्णा व नारो भास्कर ह्यानींही श्रीमंतास 'स्वामींनीं आज्ञापत्र सादर केलें तें मस्तकीं वंदन करून सनाथ झालों. स्वामींच्या आज्ञेप्रमाणें चिरंजीवाच्या समीप राहिलों आहें, व वरचे-वर सांत्वन करीत आहें' वगैरे आशयाचें उत्तर पाठविलें होतें. ह्यावरून श्रीमंत पेशवे राज्यहीन झाले तरी त्यांच्याविषयीं गोविंदपंताच्या वंशजानीं फार पूज्यबुद्धि बाळगिली होती हें सिद्ध होतें.

नाना गोविंदराव जालवणचा राज्यकारभार चालवूं लागल्या-नंतर सागर येथें पुढें जो प्रकार झाला तो येथें सांगणें अवश्य आहे.

सागर प्रांत बाळाजी गोविंद ऊर्फ थोरले बाबासाहेब ह्यांचे चिरंजीव रघुनाथराव आबासाहेब यांच्याकडे होता. ते निपुत्रिक वारले, त्यामुळें त्यांच्या पश्चात् सर्व मालकी नाना गोविंदराव यांची झाली. तथापि त्यांनीं आबासाहेबाच्या स्त्रिया रखमाबाई व लक्ष्मीबाई ह्यास, आपला मुलगा दत्तक देऊन त्यांच्याकडे तो प्रांत चालवूं असें अभिवचन देऊन दिनकररावअण्णा व झांशीचे सुभेदार शिवरावभाऊ ह्यांच्या मध्यस्तीनें त्या प्रांताचा सर्व राज्यकारभार आपणाकडे घेतला; व संवत् १८५७ चे अखेरीस त्यानीं बिना-

यक गणेश चांदोरकर यांस सागरचे स्वतंत्र सुभेदार नेमून त्यांस काल्पीहून सागरास पाठविलें. त्यांनीं आबासाहेबांच्या स्त्रियांच्या अनुमतानें सर्व सागर प्रांताचा कारभार चालविला. त्यांच्याजवळ पुढें लिहिलेले मुत्सद्दी होते.—

१ केसो महादेव कारभारी.

१ राघोपंत पंच बांकणकर.

१ फडणीस रघुनाथ काशी आंबेकर, पुढें मल्हार गंगाधर मराठे.

१ तोफखान्याची जिम्मा तुको गोविंद बर्वे व विष्णु कान्हो देसाई.

१ शिवरामपंत करमळकर.

१ बचाजी शिवदेव सप्रे.

१ रामचंद्र कृष्ण लघाटे*.

१ मुजूमदार लक्ष्मण कृष्ण लघाटे.

१ पोतनीस केसो भिकाजी दुवेध्ये व त्याच्या पश्चात् त्याचे चिरंजीव भय्यासाहेब.

१ चिटणीस अमृतराव परभु.

---

* लघाटे ह्यांचें घराणें गोविंदपंत बुंदेल्याबरोबर बुंदेलखंडांत आलें. ह्या घराण्याची संक्षिप्त माहिती रा. रा. धुंडिराज केशव लघाटे राहणार सागर ह्यानीं खालीं लिहिल्याप्रमाणें दिली आहे.—

घराण्याचे मूळपुरुष केशव रघुनाथ लघाटे हे असून त्यास गोविंद, विनायक, रामचंद्र, सदाशिव आणि गोपाळ असे पांच पुत्र होते पैकीं सदाशिव केशव हे आपले पुतणे कृष्णाजी रामचंद्र ह्यांस समागमें घेऊन गोविंदपंत बुंदेल्याच्या बरोबर पुण्याहून बुंदेलखंडांत आले. ह्या समयीं गोविंदपंताचा अमल काल्पीपासून अंतर्वेदपर्यंत होता. सदाशिव केशव हे फार पराक्रमी पुरुष असून त्यांनीं गोविंदपंतास वेळोवेळीं उत्तम साह्य केल्यामुळें त्यांस त्यांनीं अंतर्वेद इलाख्यांतील फुफुंद व सकुराबदा ह्या दोन परगण्याचें फडनविशीचें काम सांगितलें तें त्यांनीं दहा वर्षें केलें व नंतर संन्यास ग्रहण केला. तेव्हां गोविंदपंतांनीं त्याचे पुतणे कृष्णाजी रामचंद्र ह्यास अंतर्वेदींतील इटावा महालाची बक्षीगिरी व फडनविशी दिली. त्यांस सालीना पुढील तनखा मिळत असे.

ह्या मंडळीच्या साह्यानें व नाना गोविंदराव व दिनकररावअण्णा

| | |
|---|---|
| बक्षीगिरीचें वर्षासन .... .... .... | ४६०० |
| फडनविशीचें वर्षासन. .... .... .... | ८२०० |
| परगण्यावरील हक शेंकडा एक रुपयाप्रमाणें तेरा लक्ष जमाबंदीवर .......... | १३००० |
| स्वारावरील नेमणूक ........ .... | २००० |
| प्याद्यांवरील नेमणूक .... .... .... | ५००० |
| एकूण | ३२८०० |

हें काम त्यांनी संवत् १८३२ पर्यंत केलें. नंतर पुढें श्रीमंत नारायणराव पेशव्याचा वध होऊन पेशव्यांच्या दरबारात गोंधळ झाला. त्या वेळीं तो प्रांत लखनौवाल्या नबाबाकडे गेला, सबब कृष्णाजी रामचंद्र पुण्यास परत आले पुढें संवत् १८३६ मध्यें त्यांस मुजुमदारीची दरख मिळून ते सागरास गेले. त्या वेळीं सागरचे सुभेदार बाळाजी गोविंद ह्यांनी त्यांस बर्गी परगण्याचें काम दिलें व त्यांचे चिरंजीव रामचंद्र कृष्ण ह्यांस मुजूमदार नेमिलें ह्या कामगिरीबाबद त्यास सालाचे ८३७० रुपये मिळत असत. संवत् १८४२ मध्यें कृष्णाजी रामचंद्रांस देवाज्ञा झाली. ह्यांस रामचंद्र, लक्ष्मण, नारायण व वामन असे चार पुत्र होते. ते चौघेही कर्तृत्ववान् असल्यामुळें त्यांस सरकारी कामें मिळालीं, रामचंद्र कृष्ण हे बर्गीचें काम पाहू लागले, लक्ष्मणरावांची मुजुमदारीवर नेमणूक झाली, नारायणराव ह्यास हट्याचे किल्लेदार नेमिलें, व वामनराव हे फौजी सरदार झाले गढा प्रांत नागपुराकडे गेल्यावर रामचंद्र कृष्ण दरबारीं हजर राहून, मोरो विश्वनाथ सेनापतींची मुसाहबत करीत असत व ते वार-ल्यानंतर त्यांस नायब सेनापति नेमण्यांत आलें. त्याबद्दल त्यांस ३००० रुपये तनखा मिळत असे. संवत् १८५७ मध्यें विनायकराव चांदोरकर ह्यांस सुभायतीचीं वस्त्रें मिळाल्यानंतर त्यांनीं सर्व फौजेचें आधिपत्य व मुसाहबत मुलकी ही दोन्ही कामें रामचंद्र कृष्ण ह्यांस दिलीं. हे दोन्ही अधिकार त्यांनीं सुमारें १८ वर्षे चालविले. त्यास दरसाल

ह्यांच्या देखरेखीनें संवत् १८६१ पर्यंत राज्यकारभार चालला होता.

पुढें सवत् १८६१ सालीं गढाकोट्यवाले राजे मर्दनसिंग यानीं सागर प्रातात दुडी आरंभिली तेव्हा विनायकराव चांदोरकर हे फौज घेऊन पथरियास गेले. तेथून आणखी फौज पाठविण्याबद्दल जालवणास पत्रें लिहिलीं. त्याप्रमाणें तिकडून दिनकररावअण्णा हे निवडक लोक घेऊन विनायकरावाच्या साह्यास आले. नंतर गढाच्या राजाबरोबर जगी लढाई झाली. तींत विनायकरावास भाल्याची जखम झाली. राजानें शिकस्त केली, परतु दिनकरराव-अण्णांच्या शौर्यप्रभावापुढें त्याचा टिकाव न लागून तो शरण आला. तेव्हा त्याच्याशीं तह ठरवून दिनकरराव व विनायकराव हे सागरास परत आले.

ह्यानतर दौलतराव शिंदे पुण्यास होते, ते तेथून ग्वाल्हेरीकडे जाण्याकरिता सागरावरून गेले. त्या वेळीं त्याच्या व सागरचे सुभेदार विनायकराव व दिनकररावअण्णा ह्याच्या देवरी मुक्कामीं भेटी झाल्या. त्या वेळीं शिंद्यांच्या सरदारानीं दगलबाजी करून त्या

---

६४५६ रुपये मिळत असत पुढें संवत् १८७४ सालीं सागर प्रात इंग्रजाकडे गेला, तेव्हां त्यास पेनशन मिळालें हे गृहस्थ सर्व राज्याचे पूर्ण माहितगार व मोठे विद्याव्यसनी होते. ह्यांनीच गोविंदपंत बुंदेल्यांची कैफियत लिहिली आहे.

लक्ष्मण बापू लधाट्याकडे मुजुमदारीचें काम संवत् १८४२ पासून १८७३ पर्यंत होतें त्यांस २००० रुपये मिळत असत. त्याशिवाय सरंजामखर्च, व जमाबंदीवरील हक्क मिळत असत ह्यांस माधवराव, विसूदादा, दामोदर, व केशव असे चार पुत्र होते ह्यापैकीं वडील चिरंजीव माधवराव ह्यांनीं राज्य बुडण्यापूर्वी मुजुमदारीचें काम काही महिने केलें. पुढें दोन वर्षांनीं त्यास देवाज्ञा झाली व त्याची स्त्री सती गेली. केशव लक्ष्मण याचे चिरंजीव धुंडिराज केशव लधाटे हे सांप्रत सागर येथें आहेत.

उभयतास डेऱ्यामध्यें कैद केलें व तिकडे सागरास सैन्य पाठवून सर्व शहर लुटून किल्ल्यास मोर्चे लाविले. त्या वेळीं दिनकरराव-अण्णानीं मोठ्या चातुर्यानें आपली सुटका करून शिंद्याचे सेनापति जॉन बत्तीस ह्याच्या विद्यमानें कांहीं मामला ठरविला. नंतर शिंदे ग्वाल्हेरीस गेले. जॉन बत्तीस हे कांहीं दिवस सागरास होते. पुढें त्यांची व विनायकराव यांची दोस्ती होऊन तेही तिकडे निघून गेले. अशा रीतीनें मध्यंतरीं उत्पन्न झालेलें विघ्न टळल्यानंतर व सागर प्रांतात थोडीबहुत स्वस्थता झाल्यानंतर दिनकररावअण्णाही जालवणास गेले. नंतर सागराचा सर्व राज्यकारभार विनायकराव हेच पहात होते.

पुढें नाना गोविंदराव ह्यांस जालवण येथें पुत्र झाला. तो पुत्र सागरास रखमाबाईसाहेबास दत्तक द्यावयाचा असा पूर्वीचा ठराव होता, त्यामुळें त्याचें जन्मवृत्त कळतांच रखमाबाईसाहेबांनीं सागर येथें मोठा आनंदोत्सव केला व पांच हजार रुपये खर्चून शर्करा वांटली. परंतु तो पुत्र अल्पायु होऊन लवकर मृत्यु पावला! त्यामुळें रखमाबाईस परम दुःख झालें. नाना गोविंदराव ह्यास लवकरच दुसरा पुत्र झाला, परंतु तो एकुलता एक असल्यामुळें ते तो दत्तक देईनात. त्यामुळें रखमाबाईसाहेबाचें मन किंचित् निराश झालें. त्यामुळें त्यांच्या मनांत नाना गोविंदरावाविषयीं दुजाभाव उत्पन्न होऊन कार-भारी मंडळीच्या सांगण्यावरून त्यांनीं सागरचा जालवणाशीं असलेला संबंध तोडून टाकण्याचा प्रयत्न केला. विनायकराव चांदोरकर हे बाईसा-हेबांच्या तर्फे कुलमुखत्यार असून तेही जालवणाशीं संबंध न ठेवतां स्वतंत्र रीतीनें वागू लागले. त्यामुळें सागरचा बंदोबस्त कच्चा पडून त्या प्रांतांत सर्व बंडखोर लोक स्वाऱ्या करूं लागले. पन्ना येथील कोणी दौवा नांवाच्या सरदारानें हटे, दमोई वगैरे भागांत बंडावा माजविला व पेंढारी लोक उपद्रव देऊं लागले. विनायकरावांनीं

पन्नाच्या सरदारावर स्वारी करून मोठ्या शौर्यानें त्याचा पुडावा मोडून टाकिला व त्याची फौज लुटून पुष्कळ संपत्ति व कांहीं हत्ती पाडाव करून आणिले. विनायकराव हे देखील फार शूर व राजकारस्थानी पुरुष असून त्यांनीं आपल्याकडून होईल तितका सागर प्रांताचा उत्तम बंदोबस्त केला. परंतु बंडखोर लोकांचें प्राबल्य पुढें पुढें जास्त झाल्यामुळें सागर प्रांतांत स्वस्थता राहिली नाहीं.

सन १८१७ मध्यें बाजीराव पेशव्यानीं इंग्रजाबरोबर नवीन तह करून बुंदेलखंडावरचें सर्व स्वामित्व त्यांस दिलें. त्याप्रमाणें त्यांनीं सागर व जालवण प्रांतावर आपलें वर्चस्व स्थापन करण्याचा प्रयत्न केला; नाना गोविंदरावाशीं स्वतंत्र तह केला व त्यास जालवणचे वंशपरंपरेचे मालक ठरविलें. सागर प्रांत विनायकरावाच्या ताब्यांत होता ह्मणून त्याच्याशीं निराळा तह करून, त्यांनीं पेशव्यांची तीन लक्ष रुपये वार्षिक खंडणी व तीन हजार स्वाराचा शिबंदी खर्च द्यावयाचा जो ठराव होता त्याच्या ऐवजीं एक लाख रुपये खंडणी व सहाशें स्वार द्यावेत असा ठराव केला. परंतु त्याप्रमाणें त्याच्या हातून वर्तन झालें नाहीं, व त्यांनीं मराठ्याच्या शेवटच्या युद्धांत पेशवे व नागपूरकर भोंसले ह्यांच्या सैन्यास आपल्या प्रांतांत आश्रय दिला आणि पेंढाऱ्याशीं पत्रव्यवहार ठेविला, वगैरे सबबी लावून इंग्रज सरकारानें सागर प्रांत सन १८१८ साली खालसा केला. तथापि सागरच्या बाईसाहेबांस व विनायकरावास* २॥ लक्ष पेनशन करून देऊन

* विनायकराव चांदोरकर हे संवत् १८८२ मध्यें मृत्यु पावले. त्यांचे पुत्र मोरेश्वरराव ह्यांस सरकारांतून दहा हजार रुपये पेनशन मिळत असे ह्यांस झांशीचे सुभेदार रामचंद्रराव कृष्ण ह्यांची बहीण दिली होती. ह्यांची सागरास 'सागरचे सुभेदार' ह्या लुंकबानें प्रसिद्धि आहे. ह्यांस दोन पुत्र कृष्णराव व व्यंकटराव. हे दोन्ही पुरुष मध्यप्रांतांत फार नामांकित आहेत श्रीमंत कृष्णराव ह्यांची लॉर्ड विलियम बेंटिंक ह्यांनीं

त्याचा सर्व इतमाम राखण्याबद्दल आश्वासन दिलें, आणि सागर प्रांताची सर्व व्यवस्था मि० बौचॉप ह्यांच्याकडे सोंपविली.

पुढें रखमाबाईसाहेबांची प्रकृति फार अशक्त झाली. तेव्हां त्यांनीं आपल्या जवळचे कामदार गंगाधर मल्हार मराठे, फडणीस बळवंतराव कोठीवाले, भय्या पोतनीस, पांडुरंग शास्त्री, बाबाभट वगैरे मंडळीच्या विचारानें पथरिया येथील खेर घराण्यातील रामचंद्र बाबाजी खेर ह्याचा मुलगा आणवून त्यास पौष वद्य १२ संवत् १८९० रोजीं मोठ्या समारंभानें दत्तक घेतलें, व त्याचें नांव बळवंतराव रघुनाथ ऊर्फ बाबासाहेब असें ठेविलें. पुढें बाईसाहेबांचा चार वर्षांनीं काळ झाला.

श्रीमंत बळवंतराव बाबासाहेब यांचें दत्तविधान यथाशास्त्र झाल्यामुळें त्यास इंग्रज सरकारानीं बाईसाहेबांच्या खासगी दौलतीचे वारस ठरविलें व त्यांना दरसाल दहा हजार रुपये पेनशन सुरू केलें. हे गृहस्थ सन १८७८ मध्यें दिल्लीदरबारामध्यें हजर* असून त्यांना त्या वेळीं 'राव' असा किताब मिळाला होता. पुढें ते लवकरच परलोकवासी झाले त्यांचे चिरंजीव श्रीमंत रघुनाथराव हे सांप्रत जबलपूर येथें वास्तव्य करीत आहेत. त्यांना इंग्रज सरकाराकडून दरसाल ५००० रुपये पेनशन मिळत असून हे मध्यप्रांतांत **'सागरचे राजेसाहेब'** ह्या नावानें प्रसिद्ध आहेत.

सागर प्रांत सन १८१८ सालीं इंग्रज सरकारानें खालसा केल्यानंतर गोविंदपंत बुंदेल्यांच्या वंशजाचें स्वतंत्र असें जालवण संस्थान

---

*मन: भेट घेतली त्या वेळीं ते त्यांच्या गुणास इतके लुब्ध झाले की त्यांनी त्यांस 'राव' हा किताब व एक हजार रुपयांची जहागीर बक्षीस दिली श्रीमंत व्यंकटराव सुभेदार हे सागरचें एक भूषणच असून त्यांचा इंग्रज सरकारच्या दरबारात मोठा मान आहे. ह्यांचेच चिरंजीव श्रीमंत शंकरराव ह्यांनीं मोठ्या आनंदानें ह्या इतिहासाचे कामीं उत्तम साह्य केलें.

व तदंतर्गत गुलसराई अशीं दोन संस्थानें राहिलीं. सन १८४० सालीं जालवण संस्थान खालसा होईपर्यंत गुलसराई संस्थान स्वतंत्र मानिलें जात नसे. सबब प्रथम जालवण संस्थानच्या पुढील इतिहासाचें निरीक्षण करू व नंतर गुलसराईकडे वळू.

सन १८२२ मध्यें नाना गोविंदराव मृत्यु पावल्यानंतर त्याचे चिरंजीव बाळाजी गोविंद हे जालवणच्या गादीचे अधिपति झाले व त्यांचा कारभार पूर्वीचे जुने दिवाण नारो भास्कर व गुलसराईचे दिनकरराव-अण्णा हे पाहू लागले, हें वर सांगितलेंच आहे. ह्या वेळीं बाळाजी गोविंद यांचे वय अगदीं लहान होतें, परंतु ते मोठे पाणीदार व सद्गुणी असल्यामुळें ते उत्तम राज्यकर्ते निपजतील अशीं चिन्हें दिसत होतीं. त्यांच्या कारकीर्दीची विशेष माहिती उपलब्ध नाहीं, तरी त्यांच्या संबंधानें जालवणास अद्यापि जुन्या लोकांच्या मुखातून स्तुतिवाद ऐकूं येतात. त्यांच्या संबंधानें एका हिंदी कवीनें पुढील कवन लिहिलें आहे.—

**कवित्त.**

जनक ज्यों ज्ञानिनमें जामवंत स्वापदमें
ध्रुव जिमि ध्यानिनमें सुंदर विराजा है ।
पर्शराम बीरनमें राम रणधीरनमें
गंगाजल नीरनमें सिद्ध करत काजा है ।।
राजाराम कहे सदा वेद ज्यों विधाननमें
कुबेर धनमाननमें दूसरो न ताजा है
उदित उदार महाराज वीर बालाराव
राजनमें राजा दुजराजनमें राजा है ।। १ ।।

असो. असें चांगलें रत्न फार दिवस न लाभतां त्यावर काळाची झडप पडून तें सन १८३२ सालीं नाहींसें झालें. त्या वेळीं सर्व राज्यकारभार नारो भास्कर ह्यांच्या हातीं होता. त्यांचा व दिनकररावअण्णाचा बेबनाव होऊन बाळाजी गोविंदाच्या पश्चात् जालवण संस्थानामध्यें वारसाच्या संबंधानें तंटा उपस्थित झाला.

बाळाजी गोविंद ह्यांच्या पत्नी लक्ष्मीबाईसाहेब ह्यांनीं आपल्या बधूचा मुलगा दत्तक घेऊन त्याचें राव गोविंदराव असें नाव ठेविलें, व नारो भास्कर यांनीं स्वतंत्र राज्यव्यवस्था चालविली. परंतु तो दत्तक मान्य नसल्याबद्दल दिनकररावअण्णाचे चिरंजीव केशवराव ह्यांनीं तक्रार करून त्यावर आपला हक्क सांगितला. त्याचप्रमाणें बाळाजी गोविंदाची बहीण बाळाबाई हीही आपला हक्क सांगूं लागली. तेव्हा बुंदेलखंडचे पोलिटिकल एजंट मेजर ॲन्सले साहेब ह्यांनीं त्याबद्दल पृथक् पृथक् चौकशी करून राव गोविंदराव ह्याचें दत्तविधान मजूर करण्याबद्दल हिंदुस्थान सरकाराकडे खलिता पाठविला. त्याप्रमाणें तिकडून मान्यता मिळून राव गोविंदराव हे जालवणचे अधिपति झाले.

राव गोविंदराव ह्याचें वय अवघें सहा वर्षांचें असल्यामुळें सर्व राज्यकारभार त्याच्या मातुश्री लक्ष्मीबाईसाहेब ह्याच पहात असत. नारो भास्कर यांचा व त्याचा बेबनाव झाला व नारो भास्कर हे राज्यकारभारातून दूर होऊन एका गढीमध्यें संवत् १८९२ सालीं मारले गेले. तेव्हा संस्थानामध्यें पुढें फार बेबंदशाही होऊन प्रजा त्रस्त झाली*, प्रांतामध्यें दंगे धोपे सुरू होऊन वसूल नाहींनासा झाला, अशा प्रकारें संस्थानामध्यें कोणी राज्यव्यवहारचतुर पुरुष न

---

* ह्या संबंधानें बुंदेलखंड ग्याझिटिअरमध्ये पुढील मजकूर लिहिला आहे.

"In 1838 owing to the mismanagement of Govind Rao the Jalaun State yielded hardly one-fourth of the revenue it was established to yield in 1803. The country had become a wilderness, and the people were in the greatest distress, many had emigrated, so that the villages presented the appearance of having been devastated by some great calamity"

राहिल्यामुळें सर्व अव्यवस्था झाली, व मूर्ख लोकांचा भरणा होऊन सर्वत्र गोंधळ माजून गेला. तात्पर्य,

अबला यत्र प्रबला बालो राजा निरक्षरो मंत्री।
नहि नहि तत्र सुखाशा जीवितआशापि दुर्लभा भवति ॥ १ ॥

अशी जालवण संस्थानची स्थिति होऊन तेथें अगदीं बेबंदशाही झाली. तेव्हां बुंदेलखंडचे पोलिटिकल एजंट ह्यानीं हिंदुस्थान सरकारास जालवण संस्थानाचा कारभार आपल्या हातीं घेण्याबद्दल रिपोर्ट पाठविला. त्याप्रमाणें सन १८३८ मध्यें हिंदुस्थान सरकारानें जालवणची सर्व राज्यव्यवस्था आपल्या हाती घेतली व संस्थानचे मालक राव गोविंदराव हे वयात येततोंपर्यंत लेफ्टनंट आर. डूलन ह्यास जालवणचे सुपरिंटेंडंट नेमिलें. त्या वेळीं जालवण संस्थानामध्यें जालवण, कनार, महमदाबाद, इटोरा, रायपूर आणि महोबा हे मुख्य परगणे होते. त्या सर्वांवर निरनिराळे अधिकारी नेमून लेफ्टनंट डूलन ह्यानीं राज्यकारभार चालविला. तों सन १८४० मध्यें जालवणचे मालक राव गोविंदराव हे बांदा येथें मृत्यु पावले.

राव गोविंदराव हे अल्पवयी असून त्याच्या पाठीमागें कोणी वारस राहिला नाहीं. त्याचे वडील बाळाजी गोविंद ह्याची बाळाबाई नावाची एक बहीण होती, तिनें व गोविंदपंत बुंदेल्याचे पुतणे आणि गुलसराईचे सुभेदार दिनकररावअण्णा ह्याचे चिरंजीव केशवराव दिनकर ह्यानी जालवण संस्थानावर आपला हक्क सांगितला व तें कायम ठेवण्याबद्दल पुष्कळ प्रयत्न केला. परंतु ब्रिटिश सरकारास तें गिळकृत करण्याची इच्छा झाल्यामुळें त्यांनीं त्याचे सर्व हक्क अमान्य करून तें खालसा केलें. त्यामुळें रणशूर महाराष्ट्रवीर गोविंदपंत बुंदेले ह्यांच्या सकळ वंशाची परिसमाप्ति होऊन बुंदेलखंडांतील मराठ्याच्या राज्यवैभवाचें व शौर्यपराक्रमादि गुणांचें स्मरण मात्र कायम राहून तें

**सर्वं यस्य वशादगात् स्मृतिपथं कालाय तस्मै नमः ।**

अशा प्रबल कालाच्या अद्भुत कृतीचा एक मासला दाखवून प्रत्येक महाराष्ट्रीयाचें अंतःकरण दुःखानें व्याप्त करण्यास मात्र कारण झालें !

जालवण संस्थान खालसा केल्यानंतर ब्रिटिश सरकारानें राव गोविंदराव याच्या मातुश्री लक्ष्मीबाईसाहेब ह्यांस पेनशन करून दिलें. त्यांच्या वंशांतील कोणी दत्तक पुरुष अद्यापि अलहाबादेस आहेत, त्यास 'जालवणचे राजे' असें ह्मणतात. जालवण येथेंही दक्षिणी महाराष्ट्रीय लोकांची थोडीबहुत वस्ती असून ते 'दक्षिणी पंडित' ह्या नावानें प्रसिद्ध आहेत.

जालवण संस्थान खालसा केल्यानंतर गोविंदपंत बुंदेल्याच्या सरळ वंशाचें समूल उन्मूलन झालें, परंतु त्याचे पुतणे दिनकररावअण्णा ह्याच्या गुलसराई येथील जहागिरीवर ब्रिटिश सरकारची स्वार्थदृष्टि न वळून ती अद्यापि कायम राहिली आहे ही आनंदाची गोष्ट समजली पाहिजे. सांप्रत गुलसराई संस्थान हेंच मराठ्यांच्या बुंदेलखंडांतील सत्तेचें एक अत्यल्प चिन्ह अस्तित्वात आहे. ह्या संस्थानाकडून ब्रिटिश सरकारास सन १८५७ सालीं फार उत्तम प्रकारची मदत झाली व त्याच्यावर त्यांची फार कृपा जडली. त्याची संक्षिप्त हकीकत पुढील भागांत सादर करूं.

# भाग १ वा.

## गुलसराई संस्थान.

गुलसराई हें लहानसें संस्थान बुंदेलखंडामध्यें झांशीच्या वायव्येस ४० मैलांवर आहे. श्रीमत बाजीरावसाहेब पेशव्यास छत्रसाल राजाकडून जो मुलूख मिळाला त्यामध्यें पूर्वी हा एक लहानसा परगणा असून तो पेशव्याचे बुंदेलखंडचे सुभेदार गोविंदपंत बुंदेले ह्याच्या ताब्यांत होता. पानिपतच्या लढाईंत गोविंदपंताचा वध होऊन बुंदेलखंडातील मराठी राज्य-सत्तेचा बंदोबस्त कच्चा पडल्यानंतर अयोध्येचा नवाब व रोहिले लोक ह्यांनीं त्या प्रांतावर स्वाऱ्या केल्या. त्या वेळीं गोविंदपंताचे चिरंजीव बाळाजी गोविंद व गंगाधर गोविंद ह्यानीं आपल्या साह्यार्थ गोविंदपंतांचे बंधु व पुणेदरबारांतले वकील बाबूराव याचे चिरंजीव दिनकर बाबूराव ह्यांस तिकडे बोलाविलें. त्याप्रमाणें ते श्रीमंताची परवानगी घेऊन बुंदेलखंडांत गेले, व तेथें त्यानीं अनेक पराक्रमाचीं कामें करून मराठ्याची सत्ता कायम ठेवण्याबद्दल आपलें आयुष्य खर्च केलें. त्यांच्या कर्तृत्वाची हकीकत मागील भागामध्यें आलीच आहे. तेव्हां तिची पुनरुक्ति करण्याची आवश्यकता नाहीं.

दिनकररावअण्णा ह्यानीं अनुपगीर गोसाव्याचा पराभव करून गुलसराईचें उत्तम प्रकारें संरक्षण केलें. तेव्हांपासून ते तेथील सृष्टि-

सौंदर्यास व हवापाण्यास लुब्ध होऊन तेथेंच राहिले. ते स्वतः तलवारबहाद्दर व राजकारणकुशल असल्यामुळें त्याचें सर्व आयुष्य बुंदेलखडातील राजकारणामध्यें गेलें. त्यांनीं बुंदेलखडांतील मराठी राज्यसत्ता सुरक्षित ठेवून पुणेदरबारची मर्जी संपादण्याकरिता अनेक परिश्रम केले. त्याच्या अंगचे उत्तम गुण अनेक प्रसगीं प्रकाशित झाल्यामुळें पुणेदरबारांत त्याची फार योग्यता असे. सखारामबापू, नाना फडनवीस, वगैरे मुत्सद्दी मंडळीची त्यांच्यावर पूर्ण मर्जी असून महादजी शिंदे, तुकोजी होळकर वगैरे सरदार त्याच्याशीं अत्यत स्नेहभावानें वागत असत. गोविंदपत बुंदेल्याचे चिरजीव बाळाजी गोविंद व गंगाधर गोविद हे त्यांस अत्यत पूज्य मानून त्याच्या अनुज्ञेप्रमाणें वर्तन करीत असत. बुंदेलखडात पेशव्याचे दुसरे सुभेदार झांशीवाले हे प्रमुख होते. तेही दिनकररावअण्णाशीं अत्यत स्नेहभावानें वागून त्याच्या सल्लामसलतीनें चालत असत, एवढेंच नव्हे, पण झांशीचे सुभेदार शिवरावभाऊ हे दिनकररावअण्णास आपलें केवळ दैवत समजत असत.

दिनकररावअण्णानीं बुंदेलखडात येऊन जीं जीं पराक्रमाचीं कामें केलीं त्याची माहिती उपलब्ध नाहीं ही मोठी दु:खाची गोष्ट आहे. तथापि त्याची कारकीर्द विशेष महत्वाची झाली ह्यांत शका नाहीं. त्यानीं बुंदेलखंडात गेल्यापासून अनेक गढीवद बुंदेल्याचे पुडावे मोडले, गोसाव्याची खोड काढली, रोहिल्याचें पारिपत्य केलें आणि आपल्या प्रतापदिनकरानें, नष्ट होण्याच्या बेतात आलेली महाराष्ट्रराज्यसत्ता पुनः उज्वलित केली. प्रतिवर्षी नवीन गढ्या काबीज करून मराठ्याचा अमल वृद्धिंगत करण्याकडे त्याचें फार लक्ष असे. सवत् १८६४ व १८६५ मध्यें त्यानीं एकसारखें युद्ध करून २६ गढ्या काबीज केल्या! त्यावरून त्याच्या शौर्याची कल्पना करितां येईल. त्यांनीं पुष्कळ प्रात काबीज करून स्वतः

द्रव्यसंचय केला नाहीं, परंतु वेळोवेळीं पेशव्याच्या हुकुमाप्रमाणें त्यांच्या सैन्याच्या खर्चास अतोनात द्रव्य पुरविलें. बुंदेलखंडच्या सुभ्याचा वसूल करून पेशव्याचा वार्षिक ऐवज पाठविण्याचें काम केवळ दिनकररावअण्णांच्या जोरानें होत असे. ते कट्टे स्वामिभक्त व सत्यप्रिय असून तत्प्रीत्यर्थ प्राणाचीही पर्वा बाळगीत नसत. त्यांचे चुलते काशीपंतकाका ह्यांनीं बुंदेलखंडांतील कांहीं भागांची मामलत केली व तींत अतिशय कर्ज करून ठेविलें, पण दिनकररावअण्णांनीं तें सर्व कर्ज आपल्या अंगावर घेऊन श्रीमंताच्या वसुलांत एका पैचीही तफावत पडूं दिली नाहीं. संकटकाळीं न डगमगतां आपलें सत्व रक्षण करणें हें काम फार कठीण आहे. ह्यावरून दिनकररावअण्णांची योग्यता व्यक्त होते. दिनकररावअण्णावर कर्जाचे पेंच भारी झाले त्या वेळीं महादजी शिंदे, तुकोजी होळकर ह्यांनीं सावकार लोकांस ताकीदपत्रें लिहून त्यास कोणत्याही प्रकारें तगादा करूं नये ह्मणून लिहिलें, व त्याची बाजू संभाळिली.

दिनकररावअण्णांनीं जालवण व सागर संस्थानांसंबधानें मरेतोंपर्यंत काळजी बाळगिली व पेशव्याचा सुभा कायम राहण्याबद्दल प्रयत्न केला, परंतु त्या संस्थानांमध्यें अनेक भानगडी होऊन पुढें तटेबखेडे सुरू झाले, व तेथील दरबारांत अननुभवी तरुण लोकांचें प्राबल्य होऊन त्यांना आत्मप्रतिष्ठेपुढें दिनकररावअण्णाची पोक्त सल्लामसलत मान्य होईनाशी झाली. त्यामुळें दुर्दैवानें त्या संस्थानाचा लवकरच अंत झाला.

दिनकररावअण्णांचा सर्व बुंदेलखंडामध्यें अत्यंत मान असून त्यांचा शब्द कधींही कोणी खालीं पडींत नसत. ब्रिटिश सरकारचे अधिकारीही त्यांची खरी योग्यता जाणून त्यास फार मान देत असत. झांशी संस्थानचे सुभेदार शिवरावभाऊ हे मृत्यु पावल्यानंतर त्या संस्थानच्या वारसाबद्दल बराच घोंटाळा झाला, त्या वेळीं

दिनकररावअण्णांच्या वजनानें तें संस्थान कायम राहिलें. झांशी संस्थानिकांबरोबर दिनकररावांचा पूर्ण घरोबा असून ते त्याच्याविषयीं पराकाष्ठेची काळजी घेत असत व आपल्या वडीलपणाच्या नात्यानें समयविशेषीं योग्य सूचनाही करीत असत. एके प्रसंगीं झांशीचे तरुण सुभेदार रामचंद्रराव यानीं आपल्या संस्थानचे पिढीजात जुने नौकर विष्णुपंत डोंगरे ह्मणून कोणी होते, त्यास कामावरून दूर केलें व मन मानेल तशी चैन चालविली. त्या वेळीं डोंगरे यानीं दिनकररावअण्णास हा वृत्तांत उदासपणानें लिहिला. त्या वेळीं त्यानीं रामचंद्ररावास असें लिहिलें कीं, 'डोंगरे याच्या एकनिष्ठतेमुळें झांशी संस्थान कायम राहिलें, तेव्हां त्याच्यावर अवकृपा करू नये. तुमचें वय लहान आहे, त्यामुळें तुह्मास त्यांची योग्यता कळणार नाहीं, परंतु आह्मास त्या गोष्टी पूर्ण माहीत आहेत. तेव्हां आमच्या स्नेहधर्माप्रमाणें आमची अशी सूचना आहे कीं, डोंगरे यानीं वंशपरंपरा चाकरी केली, त्यांची आज्ञा पालन करून त्याच्या चाकरीचें सार्थक करावें. तरच तुमच्या सरदारीचा खरा धर्म तुह्मीं बजावला असें होईल, व तेंच ईश्वरास रुजू होईल.' असें लिहितांच रामचंद्ररावानीं अण्णांच्या शब्दास मान देऊन आपली चूक दुरुस्त केली.

दिनकररावअण्णा आपलें कर्तव्य उत्तम प्रकारें बजावून सन १८३२ मध्यें मृत्यु पावले. त्यास बाळकृष्णभाऊ व केशवरावभाऊ असे दोन पुत्र होते. ते दिनकररावअण्णाच्या सुशिक्षणामुळें व सदनुकरणामुळें त्याच्याप्रमाणें कीर्तिशाली निपजले. बाळकृष्णभाऊ हे अल्पवयांत मृत्यु पावले व केशवराव हे आपल्या अनेक सद्गुणानीं उत्तर हिंदुस्थानांत फार प्रसिद्धीस आले. सुप्रसिद्ध मुत्सद्दी राजा सर टी. माधवराव, नबाब सर सालरजंग, किंवा रावराजे दिनकरराव ह्यांची जशी योग्यता आहे, त्याचप्रमाणें उत्तर हिंदुस्थानामध्ये

केशवराव दिनकर ह्यांची फार योग्यता असून ते तिकडे आबालवृद्धास 'गुलसराईवाले राजेबहादूर' ह्या नांवानें प्रसिद्ध आहेत. त्यांची संक्षिप्त हकीकत आह्मी येथें सादर करितों.

राजेबहादूर केशवराव हे दिनकररावअण्णाचे द्वितीय पुत्र होत. ह्यांचा जन्म सन १७९३ मध्यें झाला. त्या वेळीं बुंदेलखंडामध्यें मराठ्यांची सत्ता उत्तम प्रकारें वसत असून दिनकररावअण्णा हेच मुख्यतः सर्व राज्यसूत्रें चालवीत असत. केशवराव ह्यांची बुद्धि बालपणापासून तेजस्वी असे. दिनकररावअण्णांस बाळकृष्णभाऊ ह्या नावाचे दुसरे चिरंजीव होते. त्या उभयतांस थोडेसे मोठे झाल्यानतर दिनकररावअण्णानीं त्यावेळच्या पद्धतीप्रमाणें लिहिणें, वाचणें, तलवार व भाला ह्याचे हात चालविणें, तिरंदाजी करणें, वगैरे विद्या शिकविल्या होत्या. त्यांत केशवरावाची गति विशेष असून तिरदाजीमध्यें त्याची फार प्रख्याति होती. बालपणापासून त्यास वेदविद्येचाही चागला अभ्यास असून चार वेद, न्याय, व्याकरण इत्यादिकामध्यें ते चांगले पारंगत झाले होते. संस्कृत भाषेची त्यास फार गोडी असून पुढें पुढें त्यानीं संस्कृत ग्रथाचें उत्तम भांडार जमविलें होतें. केशवराव बरेच मोठे झाल्यानतर दिनकररावअण्णानीं त्यास आपल्या हाताखालीं घेऊन राज्यकारभाराचें चागलें ज्ञान करून दिलें. बुंदेलखंडामध्यें ह्या वेळीं ब्राह्मण मुत्सद्यामध्यें झांशीचे सुभेदार शिवरावभाऊ व गुलसराईचे दिनकरराव हेच काय ते प्रमुख असत. त्यांच्या अनुशासनानें केशवरावासारखे कुशाग्रबुद्धीचे पुरुष राजकारणपटु निपजावेत ह्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. केशवरावांवर दिनकररावअण्णाची फार प्रीति असून ते त्यास सर्वोदित आपल्याबरोबर घेत असत. बुंदेलखंडातील बुंदेले नेहमीं दंगेधोपे करीत असल्यामुळें अण्णांस त्यांच्या बदोबस्ताकरितां नेहमीं युद्ध करावें लागत असे. त्या वेळीं ते आपल्या

उभय चिरंजीवास बरोबर घेऊन त्यांना समरांगणामध्यें युद्ध करावयास लावीत असत. त्या कारणामुळें बाळकृष्णभाऊ व केशवराव ह्यांच्या अंगीं युद्धकलेचें चांगलें ज्ञान प्राप्त होऊन ते शौर्यगुणामध्येंही प्रवीण झाले होते.

दिनकररावअण्णा हे राज्यकारभाराच्या दगदगीनें व वार्धक्यानें संवत् १८८९ (सन १८३२) मध्यें मृत्यु पावले. तेव्हां त्यानीं आपला सर्व कारभार आपल्या दोन्ही कर्त्या चिरंजीवावर सोंपविला होता. दिनकररावअण्णाच्या पश्चात् जालवण संस्थानात अंदाधुंदी होऊन तेथें केशवरावजींच्या व बाळकृष्णभाऊच्या राजनीतिनैपुण्याचा अथवा शहाणपणाचा कांहीं उपयोग झाला नाहीं! ह्मणून ते फक्त आपल्या गुलसराई परगण्याची उत्तम व्यवस्था करून तेथेंच रहात असत. त्या वेळीं बुंदेलखंडांत कलहाचें साम्राज्य माजून त्यानें गुलसराईंतही आपला प्रवेश करण्यास मागें पुढें पाहिलें नाहीं. त्यामुळें मध्यंतरीं बाळकृष्णभाऊंच्या मनात कांहीं वैषम्य उत्पन्न होऊन ते सात आठ महिने अयोध्येस परशुरामबावाचे मठात जाऊन राहिले होते. परंतु केशवरावानीं ज्येष्ठ भ्राता पितृसम समजून त्यांच्या अंतःकरणातील कलुषित नाहींसें केलें व त्यास गुलसराईस आणिलें. पुढें उभय बंधूनीं प्रेमभावानें व एकदिलानें राज्यकारभार चालविला. बाळकृष्णभाऊस कांहीं अपत्य नसल्यामुळें त्यानीं केशवरावजींचे तृतीय पुत्र आत्मारामबावा ह्यांस दत्तक घेतलें व मोठ्या समारंभानें त्याचें मौंजीबंधन केलें. नंतर पुढें त्यास पक्षघाताचा विकार होऊन ते कैलासवासी झाले.

बाळकृष्णभाऊच्या पश्चात् गुलसराईचा सर्व राज्यकारभार केशवरावाच्या अंगावर पडला. नंतर एक दोन वर्षांनीं जालवण संस्थानचे मालक राव गोविंदराव हे बांदा मुक्कामीं मृत्यु पावले, व त्याच्या पश्चात् जालवण संस्थान खालसा करण्याबद्दल ब्रिटिश सरकारांत

वाटाघाट चालू झाली. त्या वेळीं गुलसराई हा जालवणचाच भाग असल्यामुळें तोही त्यांत समाविष्ट होतो कीं काय अशी भीति पडली. केशवराव हे गोविंदपंत बुंदेल्याच्या सख्ख्या बंधूचे औरस नातू असल्यामुळें त्यांनीं जालवण संस्थानावर आपला हक्क सांगितला व गुलसराईची जहागीर वडिलार्जित खासगत असल्यामुळें तिचा जालवण संस्थानाशीं कांहीं संबंध नाहीं असें सिद्ध केलें. परंतु ब्रिटिश सरकारानें जालवणावरील त्यांचा हक्क अमान्य करून तें खालसा केलें व गुलसराईची जहागीर वार्षिक खंडणी घेऊन त्याच्याकडे चालू ठेविली.

केशवरावानीं ब्रिटिश सरकारची ही मेहरबानी समजून व निरुपायानें तेवढ्यांत संतुष्ट होऊन गुलसराईचा राज्यकारभार उत्तम रीतीनें चालू केला व इंग्रज सरकाराशीं स्नेहभावाचें वर्तन ठेवून वेळोवेळीं ब्रिटिश अधिकाऱ्यास उत्तम साह्य केलें. सन १८४१ मध्यें त्याची राजनिष्ठा व विक्रमशक्ति ब्रिटिश सरकारच्या पूर्ण अनुभवास आली. त्या वेळीं झांशीजवळच्या चिरगांव नामक संस्थानाचा बुंदेला ठाकूर राव बखतसिंग ह्मणून कोणी होता. तो ओरछाच्या राजाचा वंशज असून त्याची जहागीर अष्टभय्यापैकीं एक होती. तो प्रमत्त होऊन ब्रिटिश सरकारची सत्ता जुमानीनासा झाला व त्याचा करभार बंद करून पुंडाई करूं लागला. तेव्हां त्याची व इंग्रज अधिकाऱ्याची लढाई झाली. त्या प्रसंगीं केशवराव दिनकर ह्यानीं इंग्रज सरकारास उत्तम प्रकारचें साह्य करून मोठ्या शौर्यानें त्या राजाचें बंड मोडून टाकिलें. त्या वेळेपासून त्याच्या गुणाची इंग्रज सरकारामध्यें वाहवा होऊन त्यास फार मान मिळूं लागला, व मोठमोठे इंग्रज अधिकारी महत्वाच्या राजकीय प्रकरणांत त्याची सल्लामसलत घेऊं लागले. सन १८५२ सालीं लॉर्ड डलहौसी साहेबाच्या कारकीर्दींमध्यें ज्या वेळीं सर्वस्वापहाराची राज्यपद्धति (Anne-

xation policy ) सुरू झाली, त्या वेळीं गुलसराई संस्थानाच्या हक्का-बद्दल कांहीं भानगड उत्पन्न झाली. परंतु त्या वेळचे बुंदेलखंडचे पोलिटिकल एजंट बुशबी साहेब ह्यानीं केशवरावजींच्या वर्तनासंबंधानें व त्यांच्या घराण्याच्या मोठेपणासंबंधानें अनुकूल अभिप्राय दिल्यामुळें हिंदुस्थान सरकारचे सेक्रेटरी मि० आलन ह्यानीं, केशवराव ह्यानीं ब्रिटिश सरकारास अत्युत्तम साह्य केल्यामुळें त्यांच्या हक्कास ते हयात आहेत तोंपर्यंत बिल्कूल हात लावूं नये असा, ता० ८ आक्टोबर १८५२ रोजीं हुकूम पाठविला, आणि गुलसराई संस्थान कायम ठेविलें. त्याचा फायदा ब्रिटिश सरकारास सन १८५७ च्या बंडामध्यें अतिशय झाला.

दिनकररावअण्णाच्या मागें गुलसराई संस्थानचा सर्व राज्यभार केशवराव ह्यानीं फार दक्षतेनें व चातुर्यानें चालवून आपल्या वडिलांप्रमाणेंच बुंदेलखंडातील सर्व राजे लोकाशीं स्नेहभावाचें वर्तन ठेविलें, व त्यास वेळोवेळीं राज्यप्रकरणीं योग्य सल्लामसलत देऊन त्याच्या दरबारात मोठी प्रतिष्ठा मिळविली. सर्व बुंदेले राजे केशवरावास फार पूज्य मानून त्यांस वडिलाप्रमाणें लेखीत असत व त्याचा शब्द कधींही अमान्य करीत नसत. त्यामुळें सन् १८५७ सालचे बंडाच्या वेळीं, केशवरावाचें इंग्रज सरकारास अप्रतिम साह्य होऊन बुंदेलखंडातील इंग्रजांची सत्ता सुरक्षित राहिली असें म्हटलें तरी चालेल.

हिंदुस्थानचे गव्हरनर जनरल लॉर्ड डलहौसी ह्यानीं आपल्या कारकीर्दींत अनेक संस्थानें, जहागिरी व इनामउत्पन्नें अन्यायानें खालसा केलीं, त्यामुळें व राज्यपद्धतींतील इतर कित्येक जुलुमांमुळें हिंदुस्थानवासी प्रजाजन त्रासून गेले, व 'अतिनिर्मंथनादग्निश्चंदनादपि जायते' असा प्रकार होऊन कित्येक राजपुरुषानें व सैनिकानीं आपली राजनिष्ठा व नैसर्गिक सहनशक्ति विसरून जाऊन इंग्रजाविरुद्ध शस्त्र धारण केलें. झांशी, कानपूर वगैरे ठिकाणीं अतिभयकर

प्रलय होऊन इंग्रजराज्यसत्तेचा समूळ विध्वंस झाला. त्या महाप्रलयामध्यें ज्या कित्येक थोर पुरुषानीं इंग्रजास अत्युत्तम साह्य केलें, त्यांत केशवराव दिनकर हे अग्रणी होत. झांशीस प्रलय होऊन ज्या वेळीं जालवणाजवळच्या उरईच्या छावणींत इंग्रजाविरुद्ध बंड झालें व त्यास जालवणचे पूर्वीचे मुत्सद्दी व राजघराण्याशीं संबंध असलेलीं माणसें अनुकूल झाली, त्या वेळीं केशवरावानीं देशकालवर्तमान लक्षात घेऊन शिंदे सरकारचे सुप्रसिद्ध दिवाण राव राजे दिनकरराव ह्यांच्याप्रमाणें वर्तन केलें, व इंग्रज सरकाराची बाजू संभाळिली. ज्या वेळीं झांशीस घोर अनर्थ झाला, त्या वेळीं जालवणचे डेपुटी कमिशनर क्याप्टन ब्रौन ह्यानीं बुंदेलखंडांतील ब्रिटिशराज्यसत्ता कायम ठेवण्याकरितां गुलसराईहून केशवरावअण्णाची मदत मागितली. ती त्यानीं मोठ्या आनंदानें दिली. केशवराव हे जालवणचे पूर्ण माहितगार असून सर्व लोकामध्यें त्याचा चांगला मान असल्यामुळें त्याच्यावाचून जालवण प्रांताचें संरक्षण करण्यास कोणी समर्थ नाहीं, असें पाहून क्याप्टन ब्रौन ह्यानीं त्याच्यावर पूर्ण विश्वास ठेवून सर्व जालवण प्रांत त्याच्या ताब्यात दिला. त्या वेळीं केशवरावानीं गुलसराईचा बंदोबस्त आपले द्वितीय पुत्र जयरामपंत ह्यांच्याकडे सोंपवून ते, वडील चिरंजीव शिवरामपंततात्या, व कनिष्ठ चिरंजीव सीतारामरावनाना व बाळकृष्णभाऊ ह्यास बरोबर घेऊन जालवणास आले, व तेथील राज्यव्यवस्था पाहूं लागले.*

---

* केशवराव दिनकर ह्यांस जालवणचे कमिशनर ले० ब्रौन ह्यांनीं साह्यास बोलाविलें व त्यांच्या ताब्यात सर्व प्रांत दिला. त्या वेळीं सर्व लोक इंग्रजांचे विरुद्ध असून त्यांना केशवरावच आपले अधिपति व्हावेत अशी इच्छा होती. बंडवाल्यांनीं तर त्यांना आपल्या पक्षास मिळण्याबद्दल अनेक प्रकारच्या विनवण्या केल्याच; परंतु खुद्द ले० ब्रौनच्या हाताखालच्या

जालवण संस्थान ब्रिटिश सरकारानें खालसा केलें असल्यामुळे लोकांनीही त्याना प्रांतसंरक्षणाबद्दल जो साहेबांच्या सहीचा परवाना दिला, त्यांत देखील त्यास जालवणचें राज्य दिलें ह्मणून लिहिलें तथापि देखील केशवरावांनीं इंग्रजाचा विश्वासभंग केला नाही! ह्या संबधानें एका इतिहासकारानें पुढील हकीकत लिहिली आहे.—

"* * * Lieutenant Brown resolved on quitting Oorai He therefore wrote to the Goorserai chief (who held high testimonials from various Civil and Military officers), to come over to Oorai, and assist in keeping order there, and also in Calpee, Koonch, and other places in the Jaloun District and neighbourhood, till British reinforcements should arrive Authority for this purpose was delegated in a paper dictated by Brown to a native official, but the clerk is said to have wilfully misrepresented the extent of power to be conveyed, and the Deputy Commissioner being ignorant of the language, signed a letter constituting the Goorserai chief ruler of the Jaloun District."

—*Empire in India. Vol. II p* 319.

असा प्रकार झाला तरी केशवरावांनी जालवणचें राज्य आपण न बळकावतां इंग्रजांच्या तर्फेनें सर्व व्यवस्था केली, व जबलपूरचे कमिशनर ह्यांस ही सर्व हकीकत लिहून आपण इंग्रजाच्या आज्ञेप्रमाणें प्रांताचा बंदोबस्त करीत आहोंत असें कळविलें! त्याचे वडील पुत्र शिवरामपुततात्या ह्यांनीं त्या समयीं दुटप्पी वर्तन केलें व जालवणचें राज्य अनायासें आपल्या घरांत चालून आलें आहे तें मिळवावें असाही प्रयत्न केला! तथापि केशवरावांनी कोणत्याही अभिषास न भुलून आपला प्रामाणिकपणा सोडला नाहीं! खरोखर हें त्यांच्या निग्रही व एकनिष्ठ स्वभावाचें उत्तम उदाहरण आहे. ह्यावरून ड्यूक ऑफ बकिंगह्याम ह्यांनीं लॉर्ड फेअरफाक्स ह्यासंबंधानें जे उद्गार काढले आहेत ते केशवरावांस लाविले तरी चालतील, ते हे.—

'He might have been a king,
But that he understood
How much it was a meaner thing
To be unjustly great than honourably good."

तेथील राजघराण्यातील कित्येक लोक व इतर प्रजाजन असंतुष्ट होऊन गुप्त रीतीनें युरोपियन लोकांच्या विरुद्ध शस्त्र उचलण्यास प्रवृत्त झाले होते, परंतु केशवराव तेथें पोहोंचताच त्यांनीं सर्व प्रकारचा उत्तम बंदोबस्त करून युरोपियन लोकांचे प्राण वाचविले, व सर्व प्रांतांमध्यें आपला चांगला अंमल बसविला. ह्या समयीं केशवरावांचे तृतीय चिरंजीव आत्मारामबाबा हे पंढरपुरास गेले होते, ते शिंदे होळकरांच्या साह्यानें जालवणास सुरक्षित येऊन पोहोंचले; व त्यानीं आपल्या वडिलांस प्रांतसंरक्षणाचे कामीं उत्तम मदत केली. जालवण प्रांतांत बिलावा ह्मणून एक गाव आहे, तेथील ठाकूर लोकांनीं बंड केलें. त्या वेळीं त्यांच्या पारिपत्यार्थ आत्मारामबाबा हे त्यांच्यावर चालून गेले. त्यांच्याबरोबर त्यांचे अल्पवयी बंधु बाळकृष्ण-रावभाऊ हेही गेले होते. त्या उभयतांनीं चांगला पराक्रम करून बंडवाल्या ठाकुरांचा पराभव केला.

अशा रीतीनें केशवरावांनीं व त्यांच्या तरुण चिरंजीवांनीं जाल-वणाचा उत्तम बंदोबस्त केला. त्यामुळें तेथें युरोपियन लोकांची कसल वगैरे कांहीं एक न होता चांगली स्वस्थता राहिली. परंतु लवकरच बंडवाल्यांचे अध्वर्यु तात्या टोपे हे मुरारची फौज घेऊन जालवणावर चालून आले. त्याच समयीं केशवरावांची प्रिय पत्नी गोपिकाबाई ह्यास देवाज्ञा झाली, त्यामुळें त्यांच्यावर दुःखाचा पर्वतच कोसळला. तथापि त्यांनीं धीर न सोडतां तसल्या शोकपूर्ण स्थितीमध्येंही बंडवाल्याशीं टक्कर दिली. तात्या टोप्यांनीं केशवरावास इंग्रजांचा पक्ष सोडून देऊन आपल्या पक्षास मिळण्याबद्दल नाना प्रकारांनीं विनवणी केली, परंतु 'अंगीकृतं सुकृतिनः परिपा लयन्ति' ह्या सज्जनधर्माप्रमाणें त्यांनीं इंग्रजाशीं एकनिष्ठ वर्तन ठेवून बंडवाल्यांचें ह्मणणें अमान्य केलें. तेव्हां बंडवाल्यास मनस्वी राग येऊन त्यांनीं त्यांस वेढा घालून नऊ लक्ष रुपये खंडणी मागि-

तली. त्या समयीं केशवरावजींचा निरुपाय झाला. त्याचें बहुतेक सैन्य बंडवाल्यांस सामील झालें, व कांहीं कुंचच्या छावणीस इंग्रज अधिकाऱ्यांच्या साह्यास गेलें. त्यामुळें केशवरावास बंडवाल्याशीं लढाई करण्याचें सामर्थ्य न राहून त्याचा बंदिवास पतकरणें भाग पडलें! बंडवाल्यांनीं केशवरावास व त्याच्या तीन चिरंजीवास आणि माधवराव फडणीस नामक त्याच्या कारभाऱ्यास कैद करून काल्पीस नेलें व जालवण येथें कैलासवासी दुसरे बाळाजी गोविंद ह्याच्या ताईबाई नामक मुलीच्या पुत्रास जालवणचे सुभेदार करून विश्वासराव नामक गृहस्थाकडे सर्व राज्यकारभार सोंपविला, आणि नानासाहेब पेशव्याच्या नावानें द्वाही फिरविली.

केशवरावअण्णा हे कैद झाल्याचें वर्तमान गुलसराईस कळलें, तों तेथें एकच हाहाःकार होऊन त्याची सर्व प्रजा चिंताक्रांत झाली. केशवरावजींवर सर्व प्रजेची पूर्ण भक्ति असल्यामुळें त्याच्यावर आलेल्या विकट प्रसंगानें तीस अतिशय काळजी उत्पन्न व्हावी ह्यात कांहीं आश्चर्य नाहीं. केशवरावअण्णांनी तशाही महासंकटांतून मोठ्या शहाणपणानें आपली सुटका करून घेतली, आणि पुनः इंग्रज सरकारास उत्तम साह्य करून आपलें कर्तव्य परिपूर्ण केलें. केशवरावाची व त्यांच्या चिरंजीवाची बंडवाल्याच्या प्रतिबंधांतून मुक्तता झाल्याचें आनंदवृत्त गुलसराईस कळताच तेथें महोत्सव झाले व सर्व प्रजेनें आनंदध्वज उभारिले.

पुढें सन १८५८ च्या मार्च महिन्यात इंग्रज सेनापति सर ह्यू रोज हा विलायतेहून हिंदुस्थानात आला. त्यानें प्रबल सैन्यानिशीं बुंदेलखंडावर चाल करून झांशी, काल्पी, कुंच वगैरे ठिकाणीं बंडवाल्याचा पराभव केला. काल्पी व कुंच येथील युद्धामध्यें आत्मारामपंतबाबा व बाळकृष्णभाऊ हे हजर असून इंग्रजाच्या तर्फेनें लढत होते. अखेर बंडवाल्याचा पराभव होऊन इंग्रजास विजय प्राप्त

झाल्यावर सर रॉबर्ट ह्यामिल्टन ह्यानीं बुंदेलखंडांत आंग्लराज्यसत्ता पुनः संस्थापित केली. त्यास केशवरावअण्णाची उत्कृष्ट मदत होऊन बुंदेलखंडामध्यें सर्वत्र शांतता झाली. तात्पर्य, केशवरावअण्णांनीं बंडाचे वेळीं इंग्रज सरकाराशीं अप्रतिम राजनिष्ठेनें वागून आणि अनंत संकटें व राज्यप्राप्तीचीं अमिषें आलीं असताही त्यास न भिता व न भुलता आपलें कर्तव्य प्रामाणिकपणानें बजावून इंग्रज सरकारास चिर उपकारबद्ध केलें ह्यांत शंका नाहीं. ह्या त्याच्या व इतर राजनिष्ठ संस्थानिकांच्या उदाहरणावरून इंग्रज सरकारास एतद्देशीय संस्थानिकाचें संकटप्रसंगीं सर्वोत्कृष्ट साह्य होतें अशी पूर्ण खात्री झाली; व त्यांचीं राज्यें व संस्थानें कायम ठेवण्यात ब्रिटिश राज्याची मजबुती आहे हें अनुभवी मुत्सद्द्याचें मत प्रतीतीस येऊन महाराणीसाहेबाचा सुप्रसिद्ध जाहीरनामा व दत्तकाची परवानगी हें उत्तम फल हिंदुस्थानवासी प्रजाजनास प्राप्त झालें.

केशवरावअण्णानीं इंग्रज सरकारावर जे अगणित उपकार केले त्यांबद्दल इंग्रज सरकारानेंही कृतज्ञ अंतःकरणानें त्याचें अभिनंदन करून व त्यास अनेक बहुमान देऊन त्यांतून अंशतः उत्तीर्ण होण्याचा प्रयत्न केला. हिंदुस्थानचे गव्हरनर जनरल लॉर्ड क्यानिंग ह्यानीं केशवरावअण्णाच्या साह्याबद्दल त्याची फार तारीफ करून त्यास 'राजेबहाद्दर' ही पदवी व बहुमानाची खिलात पाठविली. झांशीचे कमिशनर क्याप्टन पिंकने ह्यानीं झांशी येथें सन १८५९ चे जून महिन्यात प्रचंड दरबार भरवून मोठ्या समारंभानें केशवरावअण्णास तो सन्मान समर्पण केला. खिलातीमध्यें त्यास १ हत्ती, १ घोडा, १ भाला, १ तलवार, १ बंदूक, १ मोत्याची कंठी, १ शिरपेंच, १ शेलापागोटें, १ उंची शालजोडी, १ किनखाब इत्यादि वस्त्रालंकार, शस्त्रें वगैरे देण्यात आलीं. ह्या समारंभात कमिशनर साहेबानीं दिनकररावअण्णाचे कृतोपकाराबद्दल फार आभार मानून

त्याचें सरकारतर्फे फार फार अभिनंदन केलें. त्या वेळीं केशवरावजींचे द्वितीय पुत्र जयरामपंतदादा ह्यानीं इंग्रजी भाषेमध्यें सुरेख भाषण करून इंग्रज सरकाराविषयीं आपली भक्ति प्रदर्शित केली. नंतर रीतीप्रमाणें दरबार बरखास्त होऊन व राजकीय भेटी वगैरे होऊन राजेबहाद्दर दिनकररावअण्णा हे गुलसराईस गेले व तेथें आपल्या संस्थानचा राज्यकारभार चालवूं लागले. दिवसेंदिवस त्यांची राज्यपद्धति प्रजेस अत्यंत प्रिय होऊन तिच्याकडून त्यास धन्यवाद मिळूं लागले. इंग्रज सरकारच्या दरबारांतही त्यांची फार प्रतिष्ठा वाढत जाऊन ते सरकारचे एक प्रियकर मित्र बनले, आणि वारंवार त्यांच्याकडून त्यांचा बहुमान होऊं लागला.

वायव्य प्रांताचे लेफ्टनंट गव्हरनर सर विलियम टॉमसन, आणि गव्हरनर जनरल लॉर्ड लॉरेन्स ह्यानीं अनुक्रमें सन १८६१ व १८६५ मध्यें झांशी व आग्रा येथें राजेबहाद्दराच्या आदरपूर्वक भेटी घेतल्या व वारंवार त्यांचा फार गौरव केला. लेफ्टनंट गव्हरनर मि० ड्रुमंड हे सन १८६६ मध्यें स्वतः गुलसराईस गेले व त्यांनीं राजेबहाद्दरांविषयीं फार पूज्यबुद्धि प्रदर्शित केली. राजेबहाद्दरांस ब्रिटिश सरकारच्या मुख्य प्रतिनिधींकडून अशा तऱ्हेचा आदर होत असल्यामुळें फार समाधान वाटलें, परंतु अद्यापि त्यांस त्यांच्या अप्रतिम साह्याचा योग्य मोबदला मिळाला नव्हता, त्यामुळें त्यास विशेष आनंद झाला नाहीं. राजेबहाद्दर केशवराव ह्यांच्या मनातून बुंदेलखंडातील मराठ्यांच्या राज्यसत्तेचें शेष चिन्ह जें गुलसराई संस्थान हें वंशपरंपरा चालून गोविंदपंत बुंदेल्याचें नांव कायम राहावें अशी फार इच्छा होती; परंतु ब्रिटिश सरकारानें सन १८५२ सालीं तें त्यांच्या हयातीपर्यंत चालेल असा संदिग्ध ठराव केला होता. तेव्हां त्याचा निकाल होऊन गुलसराई संस्थान सतत चालू रहावें एतदर्थ त्यानीं सरकारास विनंति केली. तिचा कमिशनर साहेबांनीं

योग्य विचार करून तें प्रकरण स्टेट सेक्रेटरींकडे पाठविलें. त्यांनीं कांहीं अटी घालून राजेबहादराची विनति तत्काल मान्य केली. त्यामुळें राजेबहादर केशवराव हे इंग्रज सरकारच्या कृपेबद्दल फार संतुष्ट झाले हें निराळें सांगावयास नकोच.

सन १८६९ मध्यें चक्रवर्तिनी महाराणी व्हिक्टोरिया याचे द्वितीय पुत्र ड्यूक ऑफ एडिंबरो हे आग्र्यास आले. त्या वेळीं वायव्य प्रांताचे लेफ्टनंट गव्हरनर सर विलियम म्यूर ह्यानीं राजेबहादराची व त्याची भेट करविली. त्या समयीं राज्ञीपुत्रानीं राजेबहादराच्या राजनिष्ठेबद्दल सार्वभौमिणीतर्फे अत्यंत आनंद प्रदर्शित करून त्यांचें फार अभिनंदन केलें. येणेंप्रमाणें त्याचा नांवलौकिक सर्वत्र प्रसिद्ध होऊन व त्याचा बहुमान होऊन ते वायव्य प्रांताचें एक भूषणच होऊन राहिले.

राजेबहादरास ब्रिटिश सरकाराकडून अगदीं शेवटचा बहुमान व बंडातील कामगिरीचा योग्य मोबदला सन १८७८ च्या दिल्ली येथील प्रचंड दरबारात मिळाला. त्या वेळीं ते आपल्या पुत्रांसहवर्तमान तेथें गेले होते. त्यांची लॉर्ड लिटन साहेबानीं आदरपूर्वक भेट घेऊन त्यांना सन्मानार्थ एक सुवर्णपदक दिलें व त्याच्या प्रत्येक चिरंजीवास बंडातील अत्युत्तम साह्याबद्दल एक एक गांव जहागीर देण्यात आला. राजेबहादरांचें वय ह्या वेळीं बरेंच होतें तरी त्यांची मूर्ति भव्य व तेजःपुंज दिसत असे. लॉर्ड लिटन साहेबांनीं त्यांची भेट घेतल्यानंतर असे आनंदोद्गार काढिले कीं:—"I have never seen such an old, healthy and loyal Raja" (राजेबहादरासारखा अतिशय वृद्ध, आरोग्यसंपन्न व राजनिष्ठ राजा माझ्या पाहण्यात एकही आला नाहीं.) लॉर्ड लिटन साहेबाच्या तोंडचे हे शब्द आहेत, तेव्हां त्यांची किंमत अधिक समजली पाहिजे.

दिल्लीदरबारांत राजेबहादराचा बहुमान होऊन तेथें त्यांच्या

व अनेक मोठमोठ्या संस्थानिकांच्या भेटी झाल्या. राजेबहादरांच्या ठिकाणीं नम्रता, सप्रेमता व वाङ्माधुर्य इत्यादि गुण असल्यामुळें त्यांच्या भेटीनें श्रीमंत महाराज अलिजाबहादर जयाजीराव शिंदे व महाराज तुकोजीराव होळकर ह्यास फार आनंद झाला. राजेबहादराचे पितामह गोविंदपंत बुंदेले व सुभेदार थोरले मल्हारराव होळकर ह्याचा अत्यंत स्नेहभाव होता. त्याचप्रमाणें त्याचे वडील दिनकरावअण्णा हे महादजी शिंदे व पहिले तुकोजी होळकर ह्याचे कंठमणि होते. तो पूर्वींचा स्नेहसंबंध मनांत घेऊन परस्परांच्या अंत:करणांत प्रेमरसाचे पाझर फुटले व परस्पराविषयींची आदरबुद्धि विशेष दृढ झाली. दिल्लीदरबारांतून आल्यानंतर महाराज जयाजीराव शिंदे ह्यानीं आपल्या पुत्रजन्ममहोत्सवाकरिता (सध्यांचे तरुण महाराज श्रीमंत माधवरावसाहेब) राजेबहादर यांना मुद्दाम ग्वाल्हेरीस नेलें व तेथें त्यांचा फार गौरव करून त्यांच्याविषयींची आपली पूज्यबुद्धि व्यक्त केली. राजेबहादर ह्यानींही शिंदे सरकारास पुत्ररत्न झाल्याबद्दल अत्यानंद प्रदर्शित करून बाळंतविड्याचा प्रेक्षणीय व थाटदार समारंभ केला. नंतर कांहीं दिवस उभयतांचा समागम होऊन राजेबहादर हे शिंदे सरकारची परवानगी घेऊन आपल्या संस्थानीं परत आले.

श्रीमंत महाराज जयाजीराव शिंदे ह्याच्याप्रमाणेंच इंदूर संस्थानचे अधिपति व गुणग्रहणपटु महाराज तुकोजीराव होळकर ह्यांनींही राजेबहादराविषयीं अत्यंत प्रेमभाव व्यक्त करून त्यांना उंची पोषाख, कंठी, शिरपेंच इत्यादि रत्नालंकार समर्पण केले, व त्यांच्याशीं बंधुत्वाच्या नात्यानें वर्तन ठेविलें.

राजेबहादर हे दिल्लीदरबारातून परत आल्यानंतर आपल्या संस्थानींच राहून गुळसराईचा राज्यकारभार चालवीत असत. गुळसराई संस्थानच्या सर्व प्रजेवर त्यांची अत्यंत प्रीति असल्यामुळें

व तिच्या हिताविषयीं ते नेहमीं काळजी बाळगीत असल्यामुळें ते आपल्या प्रजेस केवळ पित्याप्रमाणें वाटत असत. गुलसराई संस्थानचे सर्व अधिकार त्यांच्याकडे असल्यामुळें प्रजेस योग्य न्याय देण्याचे कामीं ते अतिशय दक्ष असत. त्यांची न्यायपद्धति इंग्रजी कायद्यांच्या अनुरोधाची नसून जुन्या चालीची असे. त्यांच्यापुढें कायद्यांचा कोटिक्रम व वकिली लपडाव मुळींच चालत नसून फक्त सत्यदेवतेच्या तंत्रानें खरा न्याय होत असे. त्यामुळें दीनाचें रक्षण व अपराधाचें शासन झाल्यावाचून रहात नसे. अशा तऱ्हेचा न्याय इंग्रजी पद्धतीस अनुसरून नसल्यामुळें केव्हां केव्हां लबाड लोकांस कायद्याच्या आड दडतां येऊन राजेबहादुरांच्या विरुद्ध तक्रार करण्यास जागा सापडत असे. परतु तेथेंही राजेबहादुरांनीं दिलेला न्याय पसत ठरून सत्याचा विजय होत असे. एके वेळीं एक फार मौजेची गोष्ट घडून आली. राजेबहादुराची न्यायपद्धति इंग्रजी न्यायपद्धतीप्रमाणें नसल्यामुळें वर वर पाहणाऱ्या एका युरोपियन अधिकाऱ्यास ती चमत्कारिक वाटली, व त्यानें त्यांच्या न्यायाची शैली व सत्यनिरीक्षण वगैरे गोष्टी लक्षात न आणितां वायव्य प्रांताच्या हायकोर्टाकडे तक्रार केली. राजेबहादुराचें वय ऐशींच्यावर असल्यामुळें हायकोर्टातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं त्याना न्याय करण्याचे सामर्थ्य नाहीं असें समजून वायव्य प्रांताच्या स्थानिक सरकारास त्यांच्या विरुद्ध लिहून पाठविलें, व असें कळविलें कीं, राजेबहादुरांचे दिवाणी फौजदारी अधिकार काढून घ्यावेत किंवा तेथें दुसरा कोणी इंग्रजी न्यायविशारद नेमावा. त्यावर लेफ्टनंट गव्हर्नर ह्यानीं त्याबद्दल चौकशी करून हायकोर्टाचे रजिस्ट्रार ह्यास असें उत्तर पाठविलें कीं, 'एकंदर खटल्याचा विचार करिता आह्मास आपण सुचविलेला उपाय योग्य वाटत नाहीं. गुलसराईचे राजेसाहेब हे उगीच सामान्य जमीनदार नसून अंशतः स्वतंत्र असे

एक संस्थानिक आहेत. त्याचा दर्जाही फार मोठा आहे. तेव्हां त्याच्या संस्थानांत न्यायाचें काम करण्याकरितां इंग्रजी न्यायपंडित नेमणें अगदीं अप्रशस्त आहे. त्याचप्रमाणें राजेसाहेबांचे अधिकार कमी करण्याची आवश्यकता नाहीं. त्यानीं जो न्याय केला आहे त्याच्या पद्धतीमध्यें काहीं दोष व अकारण विलंब लागला असावा असें दिसतें, परंतु त्यांत न्यायाची अफरातफर झालेली नाहीं, किंवा जुलूम वगैरे झाल्याचाही संशय घेण्यास जागा नाहीं. जे दोष दृष्टीस पडतात ते केवळ राजेसाहेबांच्या वार्धक्यामुळें (त्यांचें वय ८० वर्षांच्या वर असल्यामुळें) झाले आहेत. शिवाय त्यास अशा स्थितीमध्यें अलीकडचे कायद्यातील फेरफार आणि नवीन नियम माहीत असण्याचा संभव नाहीं. आणखी आमची अशी खातरी आहे कीं, राजेसाहेब अगदीं निःपक्षपाती व सरळ मनाचे असल्यामुळें त्यांच्या प्रजेस दुसऱ्या कोणाची कायदेशीर न्यायपद्धति न आवडता त्यांच्या हातून विनकायदेशीर पद्धतीनें परंतु खरा न्याय मिळालेला जास्त आवडेल.*'

'* हें उत्तर फारच महत्वाचें असल्यामुळें तें जसेंच्या तसेंच येथें देणें अवश्य आहे:—

"* · · In reply I am to state that after giving the case his careful consideration, the Lieutenant Governor is not of opinion, that the remedy proposed by the Hon'ble Court, could practically be carried out. The position of the Raja of Gurserai is one of great dignity. He is looked up to, almost as a semi-independent Chieftain, not as an ordinary land-owner, and it would be impossible to associate any Resident in his territory, on the Bench with him.

The Lieutenant Governor is of opinion that it would be inexpedient to do anything towards diminishing the power or lowering the position of the Raja, unless the necessity

ह्यावरून राजेबहाद्दर केशवराव ह्यांची योग्यता व लोकप्रियता व्यक्त होतेच, परंतु त्यापेक्षांही दुसरी महत्वाची गोष्ट अशी दिसून येते कीं, एतद्देशीय प्रजेस निव्वळ कायदेपडित बनलेल्या परदेशीय अधिकाऱ्यांच्या न्यायासनापुढें होणाऱ्या नमुनेदार न्यायापेक्षा अनुभवी व सत्यप्रिय एतद्देशीय लोकांनीं दिलेला साधा परंतु योग्य न्याय फार आवडतो*.

---

were very clearly proved. As the case stands at present, there would seem to be errors of procedure and unnecessary delays, but no miscarriage of justice or suspicion of mal-administration Such errors and delays, while they are certainly to be regretted, are to some extent excusable in the Raja's case whose great age (he is over 80) renders it difficult if not impossible for him to keep himself familiar with the latest rulings and changes in procedure. At the same time His Honour is convinced that the Raja *is upright and well-intentioned and that his people would rather have illegal procedure (and substantial justice) at his hands, than the best and most technical law at those of any one else.*"

—*Letter No* 166 *A.* *of* 1875 *from Mr. C A Elliot Secy to Govt. N. W. Provinces, to the Registrar High Court of Judicature, N W. Provinces*

असा अनुभव पुष्कळ वर्षांपासून आलेला आहे व तो युरोपियन लोकही मान्य करीत आले आहेत. मि. रम्बू स्टाचे ह्यांनीं सिलेक्ट कमिटीच्या ५ व्या रिपोर्टात असें स्पष्ट लिहिलें आहे कीं,

"An intelligent native is better qualified to preside at a trial than we can ever be. A native of common capacity will after a little experience, examine witnesses, and investigate the most intricate case with more temper and perseverance, with more ability and effect, than almost any European &c. &c."

—*Fifth Report of Select Committee. p.* 541.

राजेबहादुर केशव व दिनकर हे केवळ आपल्या चातुर्यानें व राज्यकार्यपटुत्वानें प्रजेस व सरकारास प्रिय झाले होते, एवढेंच नव्हे, तर त्यांचें खासगी वर्तन देखील इतकें शुद्ध व निर्मल होतें कीं, त्या योगानें त्याच्याविषयीं कोणाच्याही अंत:करणांत पूज्यबुद्धि उत्पन्न झाल्यावाचून राहत नसे. त्याचें शरीर जसें निरोगी व बळकट होतें तसें त्यांचें मन अत्यंत पवित्र व संयमनशील होतें. ते सुमारें ८० वर्षांचे झाले होते तरी ते उत्तम प्रकारें घोड्यावर बसून घोडा भरधांव सोडीत असत, व हातात काठी घेतल्यावाचून उंच उंच किल्ल्यांवर सहज चढत असत. इतकें उत्तम शरीरारोग्य त्याना ईशदयेनें प्राप्त झालें होतें, त्याचा त्यांनीं सद्वर्तनानें फार चांगला उपयोग केला. ते स्वतः धर्मनिष्ठ असून जुन्या पद्धतीनें वागत असत. राज्यकारभार आटोपून राहिलेला सर्व वेळ ते स्नानसंध्या, देवपूजा, काव्यशास्त्रावलोकन इत्यादिकात घालवीत असत. त्याच्या पदरीं विद्वान् शास्त्री पंडित असून त्यांच्याशीं नेहमीं मोठमोठ्या विषयावर वादविवाद करण्याची त्यांना चांगली संवय असे. संस्कृत ग्रंथांची त्याना फार आवड असून त्याचा त्यांनीं फार संग्रह केला होता. तात्पर्य, त्याचें जीवनचरित्र अनुकरणीय असून भर्तृहरीनें वर्णन केल्याप्रमाणें:—

धर्मे तत्परता मुखे मधुरता दाने समुत्साहिता
मित्रेऽवञ्चकता गुरौ विनयिता चित्तेऽतिगंभीरता ।
आचारे शुचिता गुणे रसिकता शास्त्रेऽतिविज्ञानिता
रूपे सुंदरता हरौ भजनिता सत्स्वेव संदृश्यते ॥ १ ॥

असे सर्व गुण त्यांच्या ठिकाणीं वसत होते असें म्हटलें असता क्वचितच अतिशयोक्ति होईल.

राजेबहादुर ह्यांनीं सुमारें बेचाळीस वर्षें राज्यकारभार केला व तितक्या अवधींत प्रजेस आपला चटका लावून सोडिला. त्यांच्या

कारकीर्दीचे स्तुतिपर पोंवाडे अद्यापि गुळसराईचे लोक गात असतात. त्यांच्या संबधानें कोणी कवीनें पुढील आर्या केलेली आहे.

केशवराव तयाचें तज्जनकाचेंहि नाम दिनकर तो ।

देतो प्रजाजनासी बहु सुख जैसें जगा सुदिनकर तो ॥ १ ॥

अशा रीतीनें राजेबहाद्दर केशवराव ह्यानीं सर्व लोकाकडून 'भले' ह्मणून घेऊन व आपली सुकीर्ति बुंदेलखंडात कायम ठेवून ता. २५ आक्टोबर सन १८८० रोजीं परलोकीं गमन केलें. त्या वळीं त्यांचे आतस्वकीय आणि सर्व प्रजाजन दुःखसागरात बुडून गेले व तें लहानसें टुमदार नगर शोकस्वरानीं भरून गेलें. त्या वेळचें वर्णन करण्यास कोण समर्थ आहे ?

राजेबहाद्दर केशवराव हे मृत्यु पावल्यामुळें बुंदेलखडातील प्रसिद्ध महाराष्ट्रपुरुषरत्नापैकीं शेवटचें उत्तम रत्नच नाहींसें झालें असें ह्मटलें तरी चालेल. त्यानीं आपली कारकीर्द फार उत्तम प्रकारची करून गोविंदपत बुंदेल्याच्या कुलाचा मोठेपणा व कीर्ति कायम राखिली; आणि महाराष्ट्रीयाच्या अगीं राजनिष्ठा, स्वाभिमान, राजकारणपटुत्व, सत्वशीलता, सदाचारप्रियता इत्यादि अनेक गुण कसे वास करीत असतात त्याचा उत्तम मासला दाखवून आपलें ऐहिक व पारमार्थिक कर्तव्य फार चागल्या रीतीनें बजाविलें ह्यात संदेह नाहीं. त्याच्यासारखे पुरुष बुंदेलखंडासच काय पण अखिल भरतखंडास ललामभूत होत.

राजेबहाद्दर केशवराव ह्यांस प्रथम कुटुंबापासून सात व द्वितीय कुटुबापासून दोन असे नऊ पुत्र झाले. त्यापैकीं वडील शिवरामपततात्या व जयरामपत हे त्याच्या हयातींतच मृत्युमुखीं पडल्यामुळें तिसरे चिरजीव आत्मारामबाबा हे गुलसराईच्या गादीचे अधिपति झाले. राजेबहाद्दरानीं सन १८६६ सालींच ब्रिटिश सरकारास विनति करून आत्मारामबाबाच्या नावें संस्थान पुढें चालविण्याची व्यवस्था केली होती. त्याप्रमाणें राजेबहाद्दराच्या पश्चात् आत्माराम-

बाबा ह्यांनीं गुलसराईचीं राज्यसूत्रें आपल्या हातीं घेतलीं. त्यांची कारकीर्द सुमारें तेरा चौदा वर्षे चालून ते नुकतेच गेल्या वर्षांत परलोकवासी झाले आहेत. त्याच्या पश्चात् त्याचे तीन पुत्र आहेत. राजेबहाद्दराचे दुसरे चिरजीव सीतारामराव नानासाहेब व बाळकृष्णराव भाऊसाहेब हेही मोठे कर्ते पुरुष असून बुंदेलखडात त्याचा मोठा लौकिक आहे. श्रीमत सीतारामराव नानासाहेब ह्यानीं ग्वाल्हेर संस्थानात अनेक महत्वाचीं कार्मे केलीं आहेत. व बाळकृष्णराव भाऊसाहेब ह्यानींही बिजावर वगैरे संस्थानात प्रधानपद धारण करून अनेक पराक्रम गाजविले आहेत. ह्याचे धाकटे बंधु कृष्णरावसाहेब व रघुनाथरावसाहेब हेही सद्गुणी आहेत. बाळकृष्णराव भाऊसाहेबाचे चिरजीव माधवरावसाहेब हे कै० जयरामपंतदादास दत्तक दिले आहेत. हे फार सुस्वभावी, रसिक आणि बुद्धिमान् असून अलहाबाद विश्वविद्यालयाचे एक नामांकित पदवीधर आहेत. त्याची योग्यता व विद्वत्ता लक्षात घेऊन त्यांस वायव्य प्रांताच्या लेफ्टनंट गव्हरनरांनीं डेपुटी कलेक्टराच्या जागेवर सन्मानपूर्वक नियुक्त केलें आहे. साप्रत ते बांदा येथें त्या महत्वाच्या हुद्यावर विराजमान असून आपलें कर्तव्य उत्तम रीतीनें बजावीत आहेत, आणि सर्व प्रजेस व सरकारास आपल्या अगच्या उत्तम गुणानीं फार प्रिय झाले आहेत.

असो. शेवटीं ज्या लोकोत्तर शौर्यशाली पुरुषानें आपल्या अद्वितीय गुणानी बुंदेलखडात मराठ्याची राज्यसत्ता वृद्धिंगत केली व मराठ्याचा वैभवदिनकर बुंदेलखंडात प्रकाशित केला त्याच्या कर्तृत्वाचें अत्यल्प स्मारक जें गुलसराई संस्थान तें ब्रिटिश सरकारच्या कृपेनें सदैव उत्तम स्थितींत असो व त्यात उत्पन्न होणारीं नररत्नें आपल्या अलौकिक तेजानें अखिल भरतखडास भूषणभूत होवोत अशी परमेश्वराजवळ सविनय प्रार्थना आहे.

# परिशिष्ट. अ.

## गोविंदपंत बुंदेल्यांचा वंशवृक्ष.

वेठ्ठलभट खेर नेवरेकर
(मूळपुरुष)

|

नरसोपंत

|

गोविंद

|

गणेश

|

गोविंद

|

बाळाजी

|

**गोविंदपंत बुंदेले**
(दत्तक मुरमाडकर खेर ह्याचे वंशांतील
बुंदेलखंडांतील पहिले सुभेदार संवत् १७८६–१८१७)

**बाळाजी गोविंद**
ऊर्फ
**थोरले बाबासाहेब**
(सागर संस्थानचे अधिपति
संवत् १८१७–१८५६)

|

**रघुनाथराव बाबासाहेब**
(संवत् १८५६–१८५८)

|

**बळवंतराव बाबासाहेब**
(दत्तक; रामचंद्र गणेश खेर पथरियावाले
यांचे चिरंजीव)

|

**रघुनाथराव**
(दत्तक; हे जबलपुरास असून यांस इंग्रज
सरकाराकडून सालीना ५००० रुपये
पोलिटिकल पेनशन मिळत असते)

**गंगाधर गोविंद**
ऊर्फ
**धाकटे बाबासाहेब**
(जालवण संस्थानचे अधिपति
संवत् १८१७–१८५८)

|

**गोविंदराव नानासाहेब**
(संवत् १८५८–१८७८)

|

**बाळाजी गोविंद**
(संवत् १८७८–१८८८)

|

**राव गोविंदराव**
(दत्तक; संवत् १८८८–१८९८
यांच्या पश्चात् जालवण संस्थान
खालसा झालें)

# परिशिष्ट. ब.

## गुलसराईवाले खेर ह्यांचा वंशवृक्ष.



**नरसिंहपत खेर बुरमाडकर** (मूळपुरुष)

- **गोविंदपंत** (ह्यांस विठ्ठलभट खेर नेवरेकर ह्याचे वंशात बाळाजी गोविंद यास दत्तक दिले हेच बुंदेलखंडचे पहिले सुभेदार होत)
- अताजीपंत
  - दिनकरराव
- रामाजीपंत
- विठ्ठलपंत
- काशीपंत (हे बुंदेलखंडांत मामलतदार होते)
- **बाबूराव** (हे पुण्याच्या दरबारीं बुंदेलखंडचे वकिलीवर होते)
  - **दिनकररावअण्णा** (दत्तक; गुलसराई संस्थानचे मूळपुरुष) (संवत् १८३०–१८८९)
    - बाळकृष्णभाऊ
      - आत्मारामबाबा (दत्तक; केशवरावांचे पुत्र)
    - **केशवराव राजेबहादुर** (संवत् १८८९–१९३७)
      - शिवरामपंत (मयत.)
      - जयरामपंत (मयत)
        - माधवराव (दत्तक, डेपुटी कलेक्टर चांदा.)
      - **आत्मारामबाबा** (संवत् १९३७–१९५०)
        - गोविंदराव
        - नारायणराव
        - भास्करराव
      - सखारामपंत (मयत)
      - **सीतारामनाना** (ह्यास ४ मुलगे आहेत)
      - बाळकृष्णराव
        - माधवराव
      - गंगाधरपंत
      - कृष्णराव
      - रघुनाथराव
    - जनार्दन